15-03-2013 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A.1

SGB/ D/ 11:00

**सभापतीस्थानी माननीय उप सभापती**

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आजच्या तारांकित प्रश्नाच्या यादीतील अनुक्रमांक 1 वरील तारांकित प्रश्न क्रमांक-36662 व अनुक्रमांक 6 वरील तारांकित प्रश्न क्रमांक-38129 हे एकाच विषयाशी संबंधित असल्यामुळे हे दोन्ही प्रश्न क्लब करण्यात यावेत, अशी माझी विनंती आहे.

श्री.राजेंद्र दर्डा : हे दोन्ही प्रश्न क्लब करण्यास हरकत नाही.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराच्या यादीतील अनुक्रमांक 1 व 6 वरील तारांकित प्रश्न क्रमांक-36662 व तारांकित प्रश्न क्रमांक-38129 हे दोन्ही प्रश्न क्लब करण्यात येत आहेत.

**राज्यातील विना अनुदानित व अंशत: अनुदानित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तरांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत**

**(१) * ३६६६२ श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , डॉ.सुधीर तांबे , श्री.सतीश चव्हाण , श्री.अमरसिंह पंडित , डॉ.रणजित पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.प्रवीण पोटे पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३३३७८ ला दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विना अनुदानित व अंशत: अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्चमाध्यमिक शाळा व तुकड्यावरील कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेतरांना जूनी सेवानिवृत्ती योजना लागू करावी अशा मागणीचे एक निवेदन मा. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित व कायम विना अनुदानित शाळा कृती समितीने मा.शालेय शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ९ जानेवारी, २०१३ रोजी वा त्या सुमारास दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या निर्णयानुसार १ नोव्हेंबर, २००५ पुर्वी विनाअनुदानित शाळा व अंशत:अनुदानित शाळा (टप्पा अनुदान) यावर काम करणाऱ्या शिक्षक कर्मचाऱ्यांनाही जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे मा. शालेय शिक्षणमंत्री यांनी आश्वासन दिले होते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी कार्यरत असलेल्या विना अनुदानित व अंशत: अनुदानित शाळा व तुकड्यावरील शिक्षक कर्मचाऱ्यांचे भविष्य निर्वाह निधिचे खाते शिक्षण संचालकांनी दिनांक १६ एप्रिल, २०१२ रोजी आदेश देवूनही उघडण्यात आले नाही हे ही खरे आहे काय, तसेच सदरहू कर्मचाऱ्यांना शासन उपरोक्त रक्कमेवर व्याज देणार आहे काय,

(४) असल्यास, अमरावती विभागातील १ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यांनतर रूजु झालेल्या कर्मचाऱ्यांना नवीन अंशदायी निवृत्ती वेतन योजनेच्या अंमलबजावणीबाबत आलेले १२०० अर्ज प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास तद्नुषंगाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) होय हे खरे आहे.
(२) होय हे खरे आहे.
(३) प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(४) सद्य:स्थितीत अमरावती विभागात ३४४ अर्ज प्रलंबित आहेत.
(५) व (६) अमरावती विभागात प्राप्त २०७१ प्रस्तावांपैकी १७२७ प्रस्तावांना लेखा क्रमांक देण्यात आले आहेत. उर्वरित ३४४ प्रस्तावांना लेखा क्रमांक देण्याची कार्यवाही सुरु आहे.

## मुंबईतील सन २००५ पूर्वी नेमणूक झालेल्या शिक्षण सेवक आणि विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शाळेत नेमणूक झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(६) * ३८१२९ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मा.मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय देऊनही मुंबईतील सन २००५ पूर्वी नेमणूक झालेले आणि २००५ नंतर नियमित झालेले सर्व शिक्षण सेवक आणि २००५ पूर्वी विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शाळेत नेमणूक झालेले आणि २००५ नंतर अनुदानावर आलेले सर्व सहाय्यक शिक्षक व कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४ एप्रिल, २०११ रोजी वा त्या सुमारास केस न. १०२५ आणि केस.नं. १०२६ याबाबत जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेश देऊनही याबाबत अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उपरोक्त शिक्षकांना न्यायालयीन आदेशानुसार पूर्वलक्षी प्रभावाने जूनी पेन्शन योजना/पी.एफ. योजना विनाविलंब लागू करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) सन २००५ पूर्वी १०० टक्के अनुदानित शाळांमध्ये नेमणूक झालेले शिक्षण सेवक दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर ज्यावेळी नियमित वेतनश्रेणीत येतील तेव्हापासून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू राहील असे वित्त विभागाने दिनांक १९ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट केले आहे. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शाळेत नेमणूक झालेल्या सहाय्यक शिक्षक व कर्मचारी यांच्या बाबतीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.
(२) व (३) मा.मुंबई उच्च न्यायालयाने काही प्रकरणी दिलेले आदेश अंतरिम स्वरुपात असून प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. नागपूर खंडपीठातील रिट याचिका क्र.३४५८/२०१२ व इतर याचिकासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालपत्रात शासनाने घेतलेली भूमिका यथोचित असल्याचे स्पष्ट केले आहे.

..३..


असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३६६६२ व ता.प्र.क्र.३८१२९............

श्री.वसंतराव खोटरे : हा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. राज्यात 1 नोव्हेंबर, 2005 पूर्वी अनुदानित व अंशत: अनुदानित शिक्षकांची संख्या 22 हजार इतकी आहे. त्यापैकी 17 ते 18 हजार शिक्षकांना भविष्य निर्वाह निधी क्रमांक देण्यात आलेला आहे आणि वेतनातून त्यांची वर्गणी कपात करण्यात येत आहे. उर्वरित 5 हजार शिक्षकांचा प्रश्न प्रलंबित आहे. महाराष्ट्र एम्प्लॉईज ऑफ प्रायव्हेट स्कूल ॲक्टच्या कलम 3 नुसार राज्यातील अनुदानित आणि अंशत: अनुदानित शिक्षण संस्थांमध्ये पेन्शन योजना सुरु आहे. कलम 4 नुसार मुंबई उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक 4268/2011 मध्ये आदेश दिले आहेत की, अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील याचिकाकर्त्यांना जूनी पेन्शन योजना लागू करण्यात यावी. दिनांक 19.3.2000 रोजी माननीय शिक्षणमंत्री यांनी याबाबत सकारात्मक पत्र दिलेले आहे. शिक्षण सेवकांबाबत जूनी पेन्शन योजना सुरु झालेली आहे. शासनाने या प्रश्नाला उत्तर देताना असे म्हटले आहे की, बाब न्यायप्रविष्ठ आहे. काल राज्यमंत्री महोदयांनी सभागृहात उत्तर देताना म्हटले होते की, दोन महिन्यात पाठपुरावा करु.

सभापती महोदय, शिक्षण सेवकांचा प्रश्न न्यायप्रविष्ठ असताना शासनाने निर्णय घेतला होता. म्हणून या प्रश्नाबाबत शासन किती दिवसात धोरणात्मक निर्णय घेऊन जूनी पेन्शन योजना लागू करणार आहे?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या सभागृहात बारावीच्या शिक्षकांनी उत्तरपत्रिका तपासण्यावर बहिष्कार घातला होता, त्या अनुषंगाने मी काल शासनामार्फत निवेदन केले होते. शिक्षण संघटनांना शासनाची भूमिका मान्य झाली असून त्यांनी बहिष्कार मागे घेतला आहे. या प्रश्नाबाबत पुढील तीन महिन्यात शासन निर्णय घेणार आहे असा उल्लेख करण्यात आला आहे. पुढील तीन महिन्यात याबाबत निर्णय घेण्याचे काम होईल.

--------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील नेट-सेट मुक्त प्राध्यापकांच्या प्रलंबित व इतर मागण्या मान्य करणेबाबत**

**(२) * ३६७१४ डॉ.सुधीर तांबे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे , श्री.अमरसिंह पंडित , श्री.सतीश चव्हाण , श्री.धनंजय मुंडे , श्री.एम.एम.शेख , डॉ.दीपक सावंत , श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो गाणार , श्री.नितीन गडकरी , ॲड.आशिष शेलार , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.सुभाष चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ३३३९१ ला दिनांक १० डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या सदंर्भात :** सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सन १९९१ ते २००० या कालावधीत मान्यताप्राप्त पदांवर रुजू झालेल्या राज्यातील सहा हजारांहून अधिक प्राध्यापकांना नेट-सेट पात्रतेतून वगळण्यात यावे, अशा शिफारशींचा प्रस्ताव मा.उच्च व तंत्रशिक्षण मंत्री यांनी मा.मुख्यमंत्र्यांकडे मान्यतेसाठी पाठविला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रस्तावावर निर्णय घेण्यास दिरंगाई होत असल्याने नेट-सेट सवलतीच्या संदर्भात शासन विरोधात दिनांक ४ जानेवारी, २०१३ पासून १० विद्यापिठांतील सुमारे ६० हजार प्राध्यापकांनी परिक्षाविषयक सर्व कामांवर बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, केरळ न्यायालयाच्या निर्णयानुसार केरळप्रमाणे महाराष्ट्रात नेटसेटमध्ये निकष बदलण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदरहु निर्णयाप्रमाणे युजीसीकडे शासन अर्ज सादर करणार आहे काय,
(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी मंत्रीमंडळाच्या बैठकीत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,
(६) अद्यापही या संदर्भात निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.डी.पी.सावंत, श्री. राजेश टोपे यांच्याकरिता : (१) दि.१९/९/१९९१ ते ३/४/२००० या कालावधीतील बिगर नेट - सेट अध्यापकांच्या संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर अध्यापकांच्या सेवा कोणत्या दिनांकापासून ग्राहय धरुन त्यांना अनुषंगीक लाभ मंजूर करण्यात यावेत. या संदर्भातील निर्णय मंत्रिमंडळ स्तरावर घेण्याबाबतचा प्रस्ताव मा. मुख्यमंत्री यांच्या मान्यतेसाठी सादर केला आहे.
(२) बिगर नेट - सेट अध्यापकांचा विषय सहाव्या वेतन आयोगातील थकबाकी इ. मागण्यांच्या अनुषंगाने शिक्षक संघटनेने परिक्षा विषयक कामकाजावर बहिष्कार घातलेला आहे.
(३) व (४) याबाबतचा कोणताही प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन नाही.
(५) व (६) बिगर नेट -सेट अध्यापकांच्या मागण्यांच्या अनुषंगाने मंत्रीमंडळ स्तरावर निर्णय घेण्यात येणार असून, त्या अनुषंगाने आवश्यक तो प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, ता.प्र.क्र. ३६७१४.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, प्रश्न क्रमांक ५ व ६ च्या उत्तरामध्ये आपल्या अनुमतीने पुढीलप्रमाणे दुरुस्ती करु इच्छितो. दिनांक १९.९.१९९१ ते ३.४.२००० या कालावधीतील बिगर

..५..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३६७१४......

नेट-सेट अध्यापकांच्या संदर्भात दिनांक ६.३.२०१३ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला.  संबंधित बैठकीत ज्या दिनांकास शासन निर्णय निर्गमित होईल.................

नंतर श्री.जुन्नरे....

अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 36714......

श्री. डी.पी.सावंत .....

सदर बैठकीत ज्या दिनांकापासून शासन निर्णय निर्गमित होईल त्या दिनांकापासून त्यांच्या सेवा ग्राहय धरून त्यांना अनुषंगिक लाभ मंजूर करण्यात येतील, असा निर्णय झालेला आहे" असे वाचण्यात यावे.

श्री. निरंजन डावखरे : सभापती महोदय, या संदर्भातील पेमेंट टप्प्याटप्प्याने दिले जाणार आहे की, एकाच वेळी दिले जाणार आहे या संदर्भातील माहिती माननीय मंत्री महोदयांनी या प्रश्नाच्या निमित्ताने देण्याची आवश्यकता आहे. यामधील 80 टक्के वाटा केंद्र शासनाकडून व 20 टक्के वाटा राज्य शासनाने द्यावयाचा असतो. असे असतानाही पेमेंट करण्यास एवढा विलंब लाण्याची कारणे काय आहेत ? या संदर्भातील लिखित आश्वासन मंत्री महोदय देणार आहेत काय ?

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, हा विषय बिगर नेट सेट प्राध्यापकांच्या संदर्भातील असून यासंदर्भात असा निर्णय घेण्यात आला आहे की, कॅबिनेटच्या निर्णयानुसार ज्या दिवसापासून शासन निर्णय निर्गमित होईल त्या दिनांकापासून, त्या दिवसापासून त्यांना नियमित पगार दिले जातील. अनुषंगिक लाभही शासन निर्णय निर्गमित झालेल्या तारखेपासूनच मिळतील तसेच त्यांचे जे स्केल आहे ते स्केल त्या दिवसापासून लागू होतील व त्यांच्या सेवा नियमित होतील. श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदय सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. हा प्रश्न अतिशय चिघळला असून आजही 14 विद्यापीठांमध्ये परीक्षांवर बहिष्कार घालण्यात आलेला असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या परीक्षा लांबणीवर पडलेल्या आहेत. युजीसीने नियुक्तीच्या दिनांकापासून सेवेचा लाभ द्यावा असे राज्य शासनाला स्पष्ट सांगितले आहे की, नाही ? या स्टाफला जीपीएफ, इन्क्रीमेंट अशा प्रकारचे सर्व लाभ दिले जातात. परंतु राज्य शासनाने 7 मार्च 2013 रोजी जे निवेदन दिलेले आहे त्यामध्ये असे म्हटले आहे की, नियुक्तीच्या दिनांकापासून लाभ दिला जाईल. सभापती महोदय, या स्टाफने राज्य शासनाची 23-24 वर्षे सेवा केलेली असतांना त्यांच्या सेवेवर तुम्ही पाणी सोडावयास लावता काय ? त्यामुळे या संदर्भात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 36714......

श्री. वसंतराव खोटरे.....

माझा प्रश्न असा आहे की, या स्टाफला आपण नियुक्तीच्या दिनांकापासून सर्व लाभ देणार आहात काय ? दिनांक 14 ऑगस्ट, 2012 रोजी केंद्र शासनाने यासंदर्भात निर्णय दिलेला आहे की, आमच्याकडून 80 टक्के निधी दिला जाईल. परंतु असे असतांना राज्य शासन 500-500 कोटी रुपये हप्त्यांनी देत आहे. त्यामुळे आपण केंद्र शासनाकडून पैसे घेऊन ते पैसे आम्हाला एक रकमी द्यावे. यासंदर्भात केंद्र शासनाने आता आपल्याला सांगितले आहे की, अगोदर तुम्ही पैसे खर्च केल्यानंतर ते पैसे आम्ही आपल्याला देऊ. त्यामुळे आपण सभागृहाची दिशाभूल का करीत आहात ? या विषयाच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने जो निकाल दिलेला आहे त्या निकालानुसार आपण त्वरित मागण्या पूर्ण करणार आहात काय ?

श्री. डी.पी.सावंत :सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भातील सन्माननीय सदस्यांची तळमळ मी समजू शकतो. सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे की, हे शिक्षक गेल्या 23-24 वर्षापासून कार्यरत आहेत. परंतु आम्ही शासनाच्या बाजूने असा विचार करतो की, जे 23 वर्षातही क्वॉलीफाय होऊ शकले नाहीत असे असतांनाही शासन त्यांना काढण्याची भाषा करीत नाही, उलट त्यांच्या सेवा युजीसीच्या सांगण्यावरुन सुरळीत सुरु ठेवलेल्या आहेत. खरे म्हणजे जे 23 वर्षात क्वॉलीफाय होऊ शकले नाही त्यांच्या बाबत शासन वेगळा विचार करु शकले असते परंतु शासनाने तसे केले नाही.

सभापती महोदय, दुसरी बाब अशी आहे की, 80 टक्क्याचा सॅलरीचा पार्ट युजीसीकडून येत असतो. युजीसीने पैसे दिले आणि आपण त्या पैशाचे वाटप केले नाही असे आज पर्यंत कधी झाले नाही. परंतु यावेळेस युजीसीने अचानकपणे सांगितले की, प्रथम तुम्ही पैसे द्या नंतर आम्ही तुम्हाला पैसे देऊ. परंतु हा क्वान्टम जवळ जवळ 1526 कोटी रुपयांचा आहे. एवढया मोठया पैशाची बजेटमध्ये तरतूद नसतांना शासन ते पैसे देऊ शकत नाही. म्हणून यासाठी आपण येत्या बजेटमध्ये 500 कोटी रुपयांची तरतूद करीत आहोत. दर महिन्याला 500 कोटी रुपये देऊन युजीसीकडून ते पैसे परत घेऊ. त्यामुळे माझी खात्री आहे की, डिसेंबर पर्यंत 1500 कोटी रुपये देण्याचे माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केलेले आहे. त्यामुळे 80 टक्क्याचा प्रश्न निकाली लागेल असा आम्हाला विश्वास आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.** : 36714......

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, युजीसी ग्रँट कमिशनने महाराष्ट्र सरकारला स्पेसिफिपणे सांगितले आहे की, 1500 कोटी रुपये राज्य शासनाने दिल्यानंतर, राज्य शासनाने त्याची रिसीट दाखविल्यानंतर राज्य शासनाला रिएम्बर्समेंट मिळणार आहे. त्यामुळे 500 कोटी रुपयांची तरतूद करुन हा प्रश्न संपत नाही. आम्ही आता 500 कोटी रुपये दिलेले असल्यामुळे तुम्ही आम्हाला 500 कोटी रुपये द्या अशी परवानगी आपण युजीसीकडे मागितलेली आहे काय ? 1500 कोटी रुपये राज्य शासनाने दिल्याशिवाय आम्ही 1500 कोटी रुपये देणार नाही असे युजीसीने आपल्याला क्लिअर केलेले आहे.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे असे म्हटले नाही की, हे सर्व पैसे एक रकमी द्यावेत.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36714...

श्री.डी.बी.सावंत...

युजीसीने 3 इन्स्टॉलमेंटमध्ये निधी परत करू असे सांगितले आहे. युजीसीने एक रकमी निधी द्यावा असे कुठेही म्हटलेले नाही. त्यामुळे 500 कोटी रूपयांचे तीन इंस्टॉलमेंट देण्यास शासन कटिबद्ध आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, योगायोगाने या राज्याला मराठवाड्यातीलच चार शिक्षक मंत्री लाभले आहेत. हे चारही माननीय शिक्षण मंत्री अत्यंत अभ्यासू आहेत. तरी देखील प्रश्न सुटत नाही याचा खेद आहे.

**उप सभापती** : त्यामध्ये ते कच्चे आहेत असे वाटते.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझे वडील दिवंगत श्री.वसंतराव काळे हे देखील या प्रश्नासाठी लढत होते. त्यानंतर या प्रश्नासाठी मी लढत आहे. परंतु, आज पर्यंत हा प्रश्न सुटलेला नाही, हे अतिशय खेदाने नमूद करावेसे वाटते. आपले कान देखील नेट-सेट ऐकून व्यथित झाले असतील. यामध्ये दोन भाग आहेत. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला आहे असे आता सांगितले आहे. जे 1996 पासून अधिव्याख्याता म्हणून लागलेले आहेत व जे आता एम.फील, पी.एचडी. नेट-सेट झालेले आहेत त्यांना सेवा नियुक्ती पासून लाभ देण्यासंबंधी शासन पुनर्विचार विचार करणार आहे काय ? ज्यांनी सुरूवाती पासून सेवा केली आहे, ज्यांना सुरूवाती पासून आपण इन्क्रीमेंट दिलेले आहे, ज्यांच्या सेवा आता पुढे सुरू आहेत, अशा बिगर नेट-सेट अधिव्याख्यात्यांनी पुढील काळामध्ये नेट-सेट उत्तीर्ण केली किंवा पी.एचडी.करून क्वालिफाय झाले तर त्यांना आपण कॅसचा बेनिफिट देणार आहात काय ?

आज आघाडी सरकार किती वर्षे सत्तेवर आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. आपण दरवर्षी सांगत आहात की, पैसे नाहीत. किती दिवस हा भिकारीपणा चालणार आहे ? आपल्याकडे कधी पैसे येणार आहेत ? 80 टक्के रक्कम राज्य शासनाने द्यावी अशा प्रकारचे पत्र केंद्र शासनाने आपल्याला पाठविलेले आहे. त्यासंबंधातील प्रमाणपत्र दिल्यास आम्ही लगेच पैसे देतो असे देखील केंद्र शासनाने सांगितले आहे. तरी देखील आपण तीन हप्ते कशासाठी पाडत आहात ? आता दुष्काळ आहे म्हणून ठीक आहे. या 500 कोटी रूपयांची तरतूद यंदाच्या



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36714...

श्री.विक्रम काळे...

अर्थसंकल्पात तरी केली आहे काय ? काल आम्ही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाचे पुस्तक वाचले असता त्यात ही तरतूद केल्याचे आढळून आलेले नाही. तेव्हा यासाठी आपण अर्थसंकल्पात तरतूद केली आहे काय, असा माझा महत्त्वाचा प्रश्न आहे. माझ्या या तीन प्रश्नासंबंधी माननीय मंत्री महोदय सकारात्मक उत्तरे देतील अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.डी.बी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रमजी काळे हे नेहमीच पोटतिडकीने बोलत असतात. मी सांगितले आहे की, जो शासन निर्णय निर्गमित झालेला आहे तो बिगर नेट-सेट प्राध्यापकांच्या संबंधातील आहे. गेल्या काळात जे अधिव्याख्याते नेट-सेट एम.फील., पी.एचडी.झालेले आहेत त्यांच्या संबंधी शासन नक्कीच वेगळ्याने विचार करीत आहे. येणाऱ्या काही काळामध्ये शासन स्तरावर त्याचा नक्कीच निर्णय होईल. अधिव्याख्याते नंतर क्वालिफाय झाले तर त्यासंबंधी शासन काय करणार आहे असा देखील प्रश्न विचारण्यात आला आहे. त्यासंबंधीचा विचार आज तरी शासना समोर नाही. आज फक्त त्यांच्या सर्व्हिसेस कायम करण्यासंबंधात निर्णय झालेला आहे. जे 20 वर्षात घडले नाही ते पुढील 2 वर्षात घडले तर नक्की यासंबंधी वेगळा विचार करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

..........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यात डीएड झालेल्या शिक्षकांची सीईटी परीक्षा सन 2010 पासून न घेतल्याबाबत**

**(3) * 36811 श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री. विजय गिरकर , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री.जयवंतराव जाधव , श्री.दिपकराव साळुंखे , श्री.अनिल भोसले , श्री.विनायकराव मेटे , श्री.धनंजय मुंडे , श्री.सतीश चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.एम.एम.शेख , श्री.सुभाष चव्हाण , श्री.संजय दत्त , श्री.नागो गाणार , श्री.नितीन गडकरी , श्री.चरणसिंग सप्रा , श्रीमती दिप्ती चवधरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबुतीसाठी सी.ई.टी अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला, तथापि,सन 2010 नंतर वरीलप्रमाणे एकही प्रवेश परिक्षा न घेतल्यामुळे राज्यभरात सुमारे पावणे दोन लाख डी.एड झालेले विद्यार्थी शिक्षण सेवकपदावरील नेमणुकापासुन वंचित राहिल्याचे माहे जानेवारी, 2013 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर परीक्षा नियमितरीत्या घेण्याबाबतची मागणी असंख्य उमेदवारांनी डिसेंबर, 2012 च्या सत्र काळात शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, या पदांची रिक्त संख्या महानगरपालिका, नगरपालिका व जिल्हा परिषद मध्ये 15 हजार 12 आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, प्रश्न भाग (2) व (3) बाबत तातडीने कार्यवाही व्हावी अशी शिक्षक आमदार व महाराष्ट्र शिक्षक परिषदेने शासनास कळविले आहे, हे खरे आहे काय,

(5) असल्यास, शिक्षणसेवकांची पदे भरण्यासाठी सी.ई.टी. घेण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(6) असल्यास, या प्रकरणी होत असलेल्या विलंबाची काय कारणे आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (1) सन 2010 मध्ये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थामधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी सी.ई.टी परिक्षा घेण्यात आली होती. सदर परिक्षेत एकूण 15083 पदांवर पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे.

(2), (3), (4), (5) व (6) स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये रिक्त पदे उपलब्ध नसल्याने सी.ई.टी परिक्षा घेण्याबाबत अद्याप निर्णय घेतलेला नाही.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, येथे एकूण सहा प्रश्न विचारण्यात आले होते. त्यापैकी पहिल्या प्रश्नाला उत्तर देण्यात आले असून प्रश्न क्रमांक 2 ते 6 ला एकत्रितपणे एकच उत्तर देण्यात आले आहे. त्यामुळे आपण हा प्रश्न राखून ठेवावा. आमचे असे म्हणणे आहे की, शासनाने सर्व प्रश्नांना उत्तरे दिली पाहिजेत. आम्ही विचारलेला प्रत्येक प्रश्न हा वेगवेगळा आहे. त्या सर्व प्रश्नांना एका वाक्यात उत्तर देण्यात आले आहे की, कार्यवाही सुरू आहे. आता रिक्त

..4

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36811...

श्री.रामनाथ मोते...

पदांची कार्यवाही सुरू आहे काय, आम्ही मागणी केली त्याची कार्यवाही सुरू आहे काय, अनेकांनी निवेदने दिली होती हे खरे आहे काय, असा प्रश्न विचारला होता त्यावर कार्यवाही सुरू आहे असे आम्ही समजायचे काय ? सगळ्या प्रश्नाला आपण एका वाक्यात उत्तर दिले आहे की, कार्यवाही सुरू आहे. याचा अर्थ शासनाने प्रश्नांची उत्तरे टाळली आहेत. प्रश्नाचे उत्तर येत नसल्यामुळे आपण आपण हा प्रश्न राखून ठेवावा.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, गेल्या तीन वर्षामध्ये सीईटी झालेली नाही. त्यामुळे किती पदे रिक्त आहेत ?

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36811...

श्री. चंद्रकांत पाटील...

डीएड झालेले शिक्षक नोकरीची प्रतिक्षा करीत आहेत. प्राथमिक आणि माध्यमिक शाळेत देखील हा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्या ठिकाणी पदे रिक्त असल्यामुळे विद्यार्थी शिक्षणापासून वंचित आहेत. तेव्हा हा प्रश्न केव्हा सोडविणार आहात ? गेल्या काही वर्षात डीएड पास झालेल्यांची संख्या किती आहे ? डीएड झालेल्यांची संख्या दोन लाखावर असली तरी वर्षाला दोन-तीन सीईटी परीक्षा घेतल्या आणि वर्षाला 40-50 हजार पदे भरली तरी बेरोजगार डीएड शिक्षकांच्या बाबतीत शासन कोणती भूमिका घेणार आहे ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, दिनांक 31 मे 2011 पर्यंत 15 हजार 12 इतकी संभाव्य पदे रिक्त होती व त्याप्रमाणे जाहिरात काढण्यात आली होती. दिनांक 2 मे 2010 परीक्षा घेण्यात आली. दिनांक 1 जून 2010 रोजी त्या परीक्षेचा निकाल लागला. 14 हजार 317 जणांची शिफारस करुन महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेला पाठविण्यात आली. तसेच डी-कॅटेगरीतील 740 शिक्षक जे इंग्रजी माध्यमांचे होते त्यांचा समावेश करण्याचा निर्णय घेण्यात आला. 207 जणांचे समांतर आरक्षण नव्हते ते 2007 नंतर भरण्यात आले. अशाप्रकारे एकूण 15 हजार 264 शिक्षक पात्र ठरले त्यापैकी 15 हजार 083 शिक्षकांना नियुक्ती देण्यात आली. त्यातही 118 शिक्षक राहिले. दिनांक 31 मे 2011 पर्यंतची रिक्त पदांची निश्चिती होती ती भरण्यात आली आणि आज आपल्याकडे रिक्त पदे नाहीत. उलट आपल्याला अजून 181 जणांना नियुक्ती द्यावयाची आहे. आपण एकूण पदांपेक्षा जास्त पदांवर नियुक्ती दिलेली आहे. आज आपल्या राज्यात रिक्त पदे नाहीत.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, डीएड पास झालेल्यांची संख्या किती आहे, आपल्याकडे रिक्त पदे नसतील तर डीएड पास झालेल्या शिक्षकांचे काय करणार आहात ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आपल्या राज्यात डीएड कॉलेजची संख्या खूप आहे. तेव्हा नवीन डीएड कॉलेजला परवानगी द्यायची नाही असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. डीएड कॉलेजची संख्या जास्त असल्यामुळे जास्त विद्यार्थी पास होतात.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36811...

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ज्या डीएड कॉलेजला दर्जा नाही अशी डीएड कॉलेज बंद करणार काय, कारण यामुळे विद्यार्थ्यांची फसवणूक होते. डीएड कॉलेजमधून 17हजार विद्यार्थी बाहेर पडतात आणि तेवढी पदे सुध्दा निर्माण होत नाहीत. भोपाळला जायचे, पैसे द्यायचे आणि डीएड कॉलेज काढायचे अशा काही डीएड कॉलेलमध्ये कोणतीही व्यवस्था नसते, तेव्हा अशी तथाकथित बोगस दर्जाहीन कॉलेजेस बंद करणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने डीएड कॉलेजेसचे इन्स्पेक्शन करण्याचा निर्णय घेतला असून त्याप्रमाणे इन्स्पेक्शन करण्यात आलेले आहे. जर एखादे डीएड कॉलेज कमी दर्जाचे असेल तर ते बंद करणे आवश्यक आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, सीईटी परीक्षा घेण्याची आवश्यकता नाही कारण आपल्याकडे रिक्त पदे नाहीत. माझ्या मतदारसंघातील ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील नगरपरिषदा आणि जिल्हापरिषदांच्या शाळांमध्ये शिक्षकांची हजारो पदे रिक्त आहेत. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, रिक्त पदे नाहीत. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी दिलेली माहिती आम्ही सत्य समजायची की आमच्याकडे आलेल्या तक्रारी आम्ही सत्य समजायच्या ? शिक्षकांची रिक्त पदे आहेत, तेव्हा शासन तातडीने सीईटी परीक्षा घेणार काय ? माझा आणखी एक प्रश्न आहे की, ठाणे आणि रायगड जिल्हयात जिल्हापरिषदेच्या शाळांमध्ये आज शिक्षकांची किती पदे रिक्त आहेत ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जी माहिती देत आहे ती खरी आहे. आपल्या राज्यामध्ये शिक्षकांची जेवढी पदे आहेत तेवढे शिक्षक आहेत. परंतु राज्यामध्ये इनइक्वल डिस्ट्रीब्युशन आहे हे मी मान्य करते. काही ठिकाणी शिक्षकांची पदे सरप्लस आहेत तर काही ठिकाणी ती रिक्त आहेत. आपल्याला ही असमानता दूर करावयाची आहे. आपल्याकडे अधिकचे शिक्षक आणि सीईटी परीक्षा पास असलेले एकूण 3169 शिक्षक आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36811....

प्रा.फौजिया खान....

त्यांना अकॉमोडेट करुन या राज्यात इक्वल डिस्ट्रब्युशन करावयाचे आहे आणि ते काम शासनाच्या माध्यमातून करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : महोदय, डी.एड. पदविका प्राथमिक शिक्षणाचा पाया मजबूर करणारा उपक्रम आहे. या संदर्भातील ह्युमन रिसर्च 5, 10, 15 वर्षासाठी तयार करण्यासंदर्भात शासनाकडे काही योजना आहे काय ? माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, राज्यात गरजेपेक्षा जास्त डी.एड.कॉलेजेस आहेत. त्यामुळे अधिक संख्येने विद्यार्थी पास होऊन बाहेर पडतात. शिवाय आपण सीईटी परीक्षा घेत नाही. आज 3 हजार पेक्षा जास्त शिक्षक नोकरीच्या प्रतिक्षा यादीवर आहेत. हे प्रमाण काही जिल्ह्यात कमी-अधिक असेल. या बाबतचा बॅलन्स इक्वल करण्यासाठी येत्या 5-10 वर्षात उपाययोजना केल्या नाहीत तर शिक्षकांच्या बेरोजगारीचे प्रमाण वाढत राहील आणि त्यांच्यापुढे आता नेमके काय करावे हा प्रश्न निर्माण होईल. त्यामुळे मी स्पेसिफिक प्रश्न विचारतो की, आताच्या नियोजनामध्ये मूलभूत बदल करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात येईल काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मूलभूत बदल करण्याच्या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे आणि तसा प्रयत्न राज्य सरकार करणार आहे. सर्व शिक्षा अभियानामध्ये काही शिक्षक डेप्युटेशनवर गेलेले आहेत. शिवाय महिला शिक्षक प्रसूती रजेवर गेल्या किंवा एखादा शिक्षक निलंबित झाला तर अशा ठिकाणी स्पेस क्रिएट होते. या सर्व गोष्टींना बॅलन्स करुन सर्व ठिकाणी शिक्षक कसे पुरवावयाचे या बाबत मूलभूत विचार सुरु आहे. या संदर्भात शासनाकडून लवकरच कार्यवाही होईल.

-----------

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**शिक्षक हक्क विधेयकाच्या अनुषंगाने विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षकांची पदे मंजूर करण्याबाबत**

**(४) * ३८०४७ श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो गाणार :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने इयत्ता १ ली ते इयत्ता ५ वी च्या व इयत्ता ६ वी ते इयत्ता ८ वीच्या वर्गांसाठी शिक्षकांची पदे विद्यार्थीसंख्येनुसार मंजूर करण्याचे निकष काय आहेत,

(२) या निकषानुसार पदे भरण्याबाबतचे आदेश शासनाने केव्हा निर्गमित केले आहेत,

(३) या संदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभागाचे लोकप्रतिनिधी यांनी दिलेल्या निवेदनावर शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१), (२), (३) व (४) केंद्र शासनाच्या सूचनेप्रमाणे सर्व शाळांची दरवर्षी माहिती DISE या नावाने गोळा केली जाते. DISE सन २०११ च्या अहवालानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विद्यार्थी व शिक्षक यांचे प्रमाण १:२५ आहे. जे आर.टी.ई मध्ये प्रस्तावित १:३० पेक्षा चांगले आहे.

अशी परिस्थिती असतांनाही काही माध्यमिक शाळांमध्ये गणित, विज्ञान व इंग्रजी या विषयांची पदे रिक्त असण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर रिक्त पदे पडताळणीमध्ये अतिरिक्त ठरणाऱ्या शिक्षकांमधून समायोजनाद्वारे भरली नाहीत तर अशी रिक्त पदे भरण्यास परवानगी देण्याबाबत विचार करण्यात येईल.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षक उपलब्ध होत नाहीत या बाबतचा हा प्रश्न आहे. शासन त्यांना मान्यता देत नाही अशा प्रकारचा माझा विषय होता. शिक्षण हक्क विषयाच्या अनुषंगाने या विधेयकाला जे शेड्यूल जोडले आहे त्यानुसार आणि विधेयकाच्या कलम 19 व 25 अन्वये शिक्षकांचे प्रमाण विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात कसे असावे हे नमूद केले आहे. शिवय त्या बाबतचा कायदा झाला आहे आणि तो आपण स्वीकारला आहे. हा कायदा स्वीकारलेला असताना, तो राज्यात लागू केलेला असताना, त्याची अंमलबजावणी सुरु केलेली असताना ज्या तरतुदी 2009 च्या कायद्यात आहेत त्या आपल्यावर बंधनकारक आहेत आणि तो कायदा आपण मान्य केला आहे.

महोदय, इयत्ता पहिली ते पाचवी साठी विद्यार्थी आणि शिक्षकाचे गुणोत्तर प्रमाण बघितल्यास 30 विद्यार्थ्यांमागे 1 शिक्षक आणि इयत्ता 6 वी ते 8 वी साठी 35 विद्यार्थ्यांमागे 1 शिक्षक असावयास पाहिजे. असे असताना शासनाकडून अनेक शाळांमध्ये या प्रमाणात शिक्षक नेमले जात नाहीत. महोदय, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिकांच्या शाळांप्रमाणेच हा कायदा खाजगी शाळांनाही लागू आहे. त्यामुळे खाजगी शाळांनाही या गुणोत्तराच्या प्रमाणात शिक्षकांच्या पदांना

..3..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38047....

श्री.रामनाथ मोते.....

मंजुरी देणार आहात काय ? महोदय, खाजगी शाळांमध्ये शिक्षकांची संख्या निश्चितीकरणासाठी 1996 चा जी.आर. लावला जातो. परंतु त्या ठिकाणी विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात नव्हे तर सरासरी हजेरीच्या प्रमाणात शिक्षक निश्चिती केली जाते. ही बाब अधिनियमाच्या अनुषंगाने पर्मिसेबल नाही. वास्तविक पाहता त्यामध्ये 'प्रवेशित विद्यार्थी' असा शब्दप्रयोग आहे. या ठिकाणी सरासरी हजेरीचा संबंध नाही.

माझी मागणी आहे की, आपण अगोदर या बाबतचा कायदा लागू करा, नाही तर 1996 च्या जी.आर.नुसार कार्यवाही करा. कल्याण महानगरपालिकेच्या शाळेमध्ये 36 शिक्षक अतिरिक्त ठरले आहेत. इयत्ता 1 ते 8 वी पर्यंतच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहाच्या बाहेर जाऊ द्यायचे नाही असे एकीकडे सांगितले जाते. परंतु खाजगी शाळांमध्ये विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षक पुरविले जात नाहीत. माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, इयत्ता पहिले ते आठवीमध्ये 30:1 आणि 35:1 या प्रमाणात शिक्षक उपलब्ध करुन देण्यात येतील काय ?

या अधिनियमाच्या अनुषंगाने ज्या शाळांतील विद्यार्थी संख्या 100 पेक्षा जास्त आहे त्या शाळांमध्ये कला, क्रीडा, कार्यानुभव विषयांच्या शिक्षकांची नेमणूक करण्याचे आदेश दिलेले आहेत. त्यानुसार काही ठिकाणी शिक्षकांच्या नेमणूका झालेल्या आहेत.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38047 ..... श्री. रामनाथ मोते....

परंतु हे शिक्षक कोणी चार महिन्यांसाठी, कोणी सहा महिन्यांसाठी तर कोणी आठ महिन्यांसाठी असतात. त्यांना कायम स्वरुपी, जोपर्यंत पद रिक्त आहे तोपर्यंत कला, क्रीडा आणि कार्यानुभव शिक्षकांच्या नेमणुका करण्याच्या सदंर्भात शासन आदेश देणार का ? कारण यामध्ये आपल्या खर्चाचा विषय नाही. केंद्र शासनाकडून भरपूर पैसे येतात. त्यामुळे शासन याप्रमाणे कार्यवाही करणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी पहिला प्रश्न असा विचारला की शिक्षण हक्क कायद्याप्रमाणे 1:30 आणि 1:35 या रेश्योप्रमाणे शिक्षक देणार का ? मला सभागृहाला ही माहिती देणे आवश्यक आहे की, डाईसचा जो डेटा आहे त्याप्रमाणे आज या राज्यामध्ये 1:25 असा शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा रेश्यो आहे. त्यामुळे आपल्याकडे शिक्षकांची कोठेही कमतरता नाही. 1:25 प्रमाणे आपल्याकडे भरपूर शिक्षक आहेत. परंतु मी सांगितल्याप्रमाणे आपल्याला रिडिस्ट्रिब्युशन करण्याची गरज आहे. मी आपल्याला एक उदाहरण देते. आपल्या राज्यामध्ये 3 हजार शाळा आहेत की ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या 9 आहे. अशा पध्दतीचे एक चित्र आहे. त्यासाठी काही मूलभूत विचार करणे गरजेचे आहे. क्लस्टर करुन, त्यांची ट्रान्सपोर्टची व्यवस्था करुन त्यांच्या बाबतीत विचार करणे गरजेचे आहे. परंतु हे रिडिस्ट्रिब्युशन करणे आवश्यक आहे आणि ती बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, मी जो प्रश्न विचारला तो खाजगी शाळांच्या बाबतीत आहे. मंत्री महोदया जिल्हा परिषदेच्या शाळांच्या बाबतीत सांगत आहेत.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, खाजगी, अनुदानित तसेच जिल्हा परिषदेच्या शाळा या सर्व शाळांच्या बाबतीत मी सांगत आहे. सन्माननीय सदस्यांचा जो दुसरा प्रश्न होता त्याबाबत सांगू इच्छिते की, आपल्याकडे काही नियम असे आहेत की, शिक्षण हक्क कायदा आल्यानंतर आपले मागचे एमईपीएस ॲक्ट असो किंवा इतर दुसरे ॲक्ट असतील त्यामध्ये काही तफावत दिसते. शिक्षण हक्क कायदा सर्वांना सुपरसीड करणारा कायदा असल्यामुळे मागचे सर्व कायदे रद्द करण्याचा निर्णय घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सन्माननीय सदस्यांनी तिसरा प्रश्न

..2...

ता. प्र. क्र. 38047 ..... प्रा. फौजिया खान...

कला, क्रीडा शिक्षकांच्या बाबतीत विचारला. ते शिक्षक कॉन्ट्रक्टवर घेण्याचा निर्णय घेतलेला आहे.

श्री. निरंजन डावखरे : सभापती महोदय, आपल्या शिक्षण हक्क कायद्यामध्ये पूर्वप्राथमिक आणि नर्सरी सेक्शन येते. त्या शाळांमध्ये किती संख्या असली पाहिजे आणि त्या संदर्भातील काही रेग्युलेशन, फी रेग्युलेशन याबद्दलचे योग्य मार्गदर्शन शिक्षण हक्क कायद्यामधून होणार आहे का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आपण फी रेग्युलेशनचा कायदा केलेला आहे त्यामध्ये पूर्वप्राथमिक आणि प्राथमिक या दोघांचाही विचार केलेला आहे. आता सेल्फ फायनान्स ॲक्ट केलेला आहे त्यामध्ये सुध्दा पूर्वप्राथमिक पासून त्यांना अपग्रेड करावयाचे असेल तर त्याची सुध्दा तरतूद केलेली आहे. त्यामुळे पूर्वप्राथमिकचा विचार करण्यात आलेला आहे.

श्री. मुझफ्फर हुसेन : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, आपल्याकडे शिक्षक आहेत, त्यांची भरती आणि बाकीच्या गोष्टी झालेल्या आहेत आणि काही ठिकाणी कमतरता असेल तर ती पूर्ण करता येईल. मागच्या वर्षभरापूर्वी 12 हजार शिक्षक भरतीची परीक्षा घेण्यात आली. या 12 हजार शिक्षकांमध्ये मराठी माध्यम, हिंदी माध्यम, उर्दू माध्यम आणि गुजराथी माध्यम या सर्वांचा समावेश असताना फक्त मराठी माध्यमाच्या 12 हजारच नव्हे तर 15 हजार शिक्षकांची नेमणूक करण्यात आली. त्यामध्ये 650 उर्दू शिक्षकांनी प्रवेश परीक्षा दिली होती, त्यांची निवडही झाली पण त्यांची नेमणूक करण्यात आलेली नाही. ती नेमणूक शासन त्वरित करणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मी 3139 शिक्षकांची संख्या सांगितली होती. जेव्हा ही परीक्षा झाली तेव्हा काही प्रश्नपत्रिकांमध्ये चुका असल्याचे आढळून आले. त्या संदर्भात तक्रार निवारण समिती स्थापन करण्यात आली. त्या तक्रार निवारण समितीमध्ये ज्या अनेक तक्रारी आल्या होत्या त्याप्रमाणे दुरुस्ती करुन त्या विद्यार्थ्यांना पात्र ठरविलेले आहे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38047..... प्रा.फौजिया खान......

त्यामध्ये 600 उर्दू शिक्षकांचाही समावेश आहे. 15012 शिक्षकांसाठी जाहिरात काढण्यात आली होती. हे शिक्षक पात्र ठरले तरी व त्यात मराठी असो की उर्दू असो कोणालाही घेता येणार नाही. त्यासाठी नवीन जाहिरात काढावी लागेल. जरी हे शिक्षक पात्र ठरविण्यात आले तरी आजच्या परिस्थितीत त्यांना घेता येणार नाही.

श्री.मुझफ्फर हुसेन : जाहिरातीमध्ये मराठी शिक्षकांच्या रिक्त जागांचा व अन्य भाषिक शिक्षकांच्या रिक्त जागांचा उल्लेख होता. असे असताना देखील फक्त मराठी माध्यमाच्या शिक्षकांची भरती करण्यात आली व अन्य भाषिक शिक्षकांची भरती करण्यात आली नाही. उर्दू भाषिक शिक्षक पात्र ठरले असले तरी त्यांची भरती करण्यात येत नाही. 12 हजार शिक्षकांमध्ये सर्व माध्यमांच्या शिक्षकांचा समावेश होता. तरी देखील फक्त मराठी माध्यमाच्या शिक्षकांनाच घेण्यात आले, अन्य माध्यमाच्या शिक्षकांना का घेण्यात आले नाही ?

प्रा.फौजिया खान : 12 हजार ही संख्या नव्हती. 15012 रिक्त पदांसाठी ती जाहिरात देण्यात आली होती. त्या जाहिरातीत 3-4 टप्प्यामध्ये दुरुस्त्या करण्यात आलेल्या आहेत. पहिल्या टप्प्यामध्ये मराठी माध्यमाच्या प्रश्न पत्रिकेमध्ये चुका आढळल्यानंतर त्या ट्रान्सलेट करण्यात आल्या. उर्दू माध्यमाच्या प्रश्न पत्रिकेतही चुका आढळल्या. त्याप्रमाणे उर्दू माध्यमाचेही शिक्षक घेतले व नंतर मराठी व उर्दू शिक्षक घेतल्यानंतर पुन्हा तक्रारी आल्या व त्यानंतर असे आढळले की, उर्दू माध्यमाच्या प्रश्नपत्रिकेमध्ये अधिक चुका आहेत. त्यासाठी त्या विद्यार्थ्यांना जे कटऑफच्या जवळ होते त्यांना पात्र ठरविण्यात आले आहे.

श्री.अपूर्व हिरे : सर्व शिक्षकांच्या बाबतीत "राईट टू एज्युकेशन" या ॲक्ट अंतर्गत एकत्र अणण्यासाठी कार्यवाही केली जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. त्यासाठी सर्व शिक्षक आमदारांची मंत्री महोदय एखादी बैठक घेणार आहेत काय ? "राईट टू एज्युकेशन" अंतर्गत सर्व शिक्षकांची नियमावली एकत्रित करण्यासाठी, चर्चा करण्यासाठी, इतर नियमावली रद्द करण्यासाठी एक बैठक घेतली जाईल काय ?

प्रा.फौजिया खान : राईट टू एज्युकेशनची नियमावली करण्यात आलेली आहे. त्या अंतर्गत जुना ॲक्ट रिपिल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/

ता.प्र.क्र.38047....

श्री.भगवान साळुंखे : हिवाळी अधिवेशनामध्ये 2.5.2012 रोजी भरतीवर बंदी आणली होती. ती 15 दिवसामध्ये उठविण्यात येईल असे सदनात माननीय शिक्षण मंत्र्यांनी वचन दिले होते. त्याची प्रतिपूर्ती केव्हा केली जाणार आहे, दुसरा प्रश्न असा आहे की, पटपडताळणीमध्ये अतिरिक्त होणाऱ्या शिक्षकांच्या समायोजनावर बंदी आणली होती. त्यासंबंधी सुरु असलेली न्यायिक प्रक्रिया व त्यामुळे होणारा विलंब जर लक्षात घेतला तर एकेका शाळेत 10-12 शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. त्या जागा भरता येत नाहीत. त्या शिक्षकांच्या समायोजनासाठी शासन काही योजना राबविणार आहे काय, आणि तिसरा प्रश्न असा आहे की, दि.2 मे पूर्वी काही शिक्षक नेमलेले आहेत. त्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यताच रखडलेल्या आहेत. वैयक्तिक मान्यता देण्यासाठी कॅम्प घेण्याचे शासनाने मान्य केलेले होते. त्याला शासनाने पुन्हा स्थगिती दिलेली आहे. ती स्थगिती उठवून त्यांच्या वैयक्तिक मान्यता केव्हा पूर्ण केल्या जाणार आहेत ?

प्रा.फौजिया खान : समायोजनासाठी विशेष पटपडताळणी घेण्यात आली होती. त्या अनुषंगाने किती शिक्षक जादा झालेले आहेत आणि त्यांचे समायोजन करण्याची प्रक्रिया शासन स्तरावर सुरु आहे. लवकरच समायोजनाची प्रक्रिया राज्यात सुरु होणार आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, सभागृहात शैक्षणिक पावित्र्याच्या महत्वाच्या विषयावर प्रश्नोत्तरे सुरु आहेत. असे असताना विरोधी पक्षातील पहिल्या जागेवरील अनेक सन्माननीय सदस्य अनुपस्थितीत आहेत. त्या सन्माननीय सदस्यांना सभागृहात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात येईल काय ?

**उप सभापती** : माननीय सभापतींच्या दालनात एक महत्वपूर्ण बैठक सुरु असून त्या बैठकीसाठी अनेक सन्माननीय सदस्य गेलेले आहेत.

----

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**कायम विना अनुदानित उच्च माध्यमिक शाळांमधून "कायम" हा शब्द काढून अनुदान देण्याबाबत**

**(५) * ३६६८८ श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , श्री.सतीश चव्हाण , श्री.अमरसिंह पंडित , डॉ.सुधीर तांबे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३३८८ ला दिनांक २० डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात. :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कायम विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालयाचा कायम शब्द काढून अनुदान देण्यात यावे यासाठी नागपूर अधिवेशनाच्या दरम्यान मा.शालेय शिक्षण मंत्री व मा.मुख्यमंत्री यांना शिक्षक लोकप्रतिनिधी व संघटनेचे प्रतिनिधी भेटून केलेल्या मागणीवर शासन सकारात्मक निर्णय घेईल असे आश्वासित केल्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(२) उक्त प्रकरणी अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची सविस्तर कारणे काय आहेत ?

**प्रा. फौजिया खान, श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) राज्यातील कायम विनाअनुदानित कनिष्ठ महाविद्यालय/उच्च माध्यमिक शाळांचा "कायम" शब्द काढण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदया काय उत्तर देतील हे आम्हाला ज्ञात झालेल आहे. तरी सुध्दा आमची पोटतिडीक आहे. प्रत्येक अधिवेशन आले की आमची सर्व शिक्षक मंडळी आझाद मैदनावर धरणे आंदोलन करतात. आज देखील आत्मदहनाचा इशारा दिलेला आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनामध्ये इयत्ता 10वी आणि 12वी हे दोन महत्वाचे टप्पे आहेत. आता 10वी आणि 12वीमध्ये ग्रामीण भागातील मुली मोठ्या संख्येने उत्तीर्ण होत आहेत. हा प्रश्न महिलांचा आहे. आपण हे वर्ष महिला वर्ष म्हणून साजरे केलेले आहे. मुलींना न्याय देण्यासाठी "कायम" शब्द तीन महिन्याच्या आत काढण्यात येईल काय, तसेच पुढच्या अधिवेशनासाठी हा प्रश्न राहाणार नाही याची काळजी घेतली जाईल काय ?

प्रा. फौजिया खान : मी मागे सांगितल्या प्रमाणे शालेय शिक्षण विभागाच्या वतीने केलेल्या निवेदनामध्ये असा उल्लेख आहे की या विषयासंबंधी देखील पुढच्या तीन महिन्यामध्ये निर्णय घेण्याचे काम शासनाकडून होणार आहे.

--





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मुंबईतील सन २००५ पूर्वी नेमणूक झालेल्या शिक्षण सेवक आणि विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शाळेत नेमणूक झालेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याबाबत**

**(६) * ३८१२९ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.मुंबई उच्च न्यायालयाने निर्णय देऊनही मुंबईतील सन २००५ पूर्वी नेमणूक झालेले आणि २००५ नंतर नियमित झालेले सर्व शिक्षण सेवक आणि २००५ पूर्वी विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित शाळेत नेमणूक झालेले आणि २००५ नंतर अनुदानावर आलेले सर्व सहाय्यक शिक्षक व कर्मचारी यांना जुनी पेन्शन योजना लागू करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक ४ एप्रिल, २०११ रोजी वा त्या सुमारास केस न. १०२५ आणि केस.नं. १०२६ याबाबत जुनी पेन्शन योजना लागू करण्याचे आदेश देऊनही याबाबत अंमलबजावणी न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त शिक्षकांना न्यायालयीन आदेशानुसार पूर्वलक्षी प्रभावाने जूनी पेन्शन योजना/पी.एफ. योजना विनाविलंब लागू करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**प्रा. फौजिय खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता** : (१) सन २००५ पूर्वी १०० टक्के अनुदानित शाळांमध्ये नेमणूक झालेले शिक्षण सेवक दिनांक १ नोव्हेंबर, २००५ नंतर ज्यावेळी नियमित वेतनश्रेणीत येतील तेव्हापासून त्यांना जुनी पेन्शन योजना लागू राहील असे वित्त विभागाने दिनांक १९ जुलै, २०११ च्या शासन निर्णयान्वये स्पष्ट केले आहे. दिनांक १ नोव्हेंबर, २००५ पूर्वी विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित शाळेत नेमणूक झालेल्या सहाय्यक शिक्षक व कर्मचारी यांच्या बाबतीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(२) व (३) मा.मुंबई उच्च न्यायालयाने काही प्रकरणी दिलेले आदेश अंतरिम स्वरुपात असून प्रकरणे न्यायप्रविष्ठ आहेत. नागपूर खंडपीठातील रिट याचिका क्र.३४५८/२०१२ व इतर याचिकासंदर्भात मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालपत्रात शासनाने घेतलेली भूमिका यथोचित असल्याचे स्पष्ट केले आहे.

श्री. कपिल पाटील : मी मुंबई उच्च न्यायालयातील केसच्या संदर्भात प्रश्न विचारला होता. मुंबई उच्च न्यायालयाचा अंतरिम निकाल स्पष्ट आहे. प्रश्नाच्या लेखी उत्तरामध्ये नागपूर खंडपीठाने काय म्हटलेले आहे हे सोयीस्कररीत्या सांगितले. माझे म्हणणे असे आहे की, मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय अमलात आणणे ही शासनाची जबाबदारी आहे. दुस-या कोर्टामध्ये काहीही निकाल लागलेला असला तरी त्यामुळे पहिल्या न्यायालयाने म्हणजे मुंबई उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय थांबविता येणार नाही. तो निर्णय थांबविण्याचे कारण काय आहे ?.

८ एप्रिल २०११चा २६०९चा निर्णय आहे. विना अनुदानित काळात ज्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांनी सेवा केलेली आहे आणि जे नंतर अनुदानावर आले पण नेमणूक २००५च्या आधीची आहे त्या संदर्भात स्पष्ट म्हटलेले आहे की, "Since the operation of Govt. Resolution

==३==





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

has already been stayed in the companian Writ Petition, same relief would operate even in the same petition."असा स्पष्ट उल्लेख आहे. मुंबई उच्च न्यायालयाने शासनाचा जी.आर. स्थगित केलेला आहे.त्यामुळे त्यांनी जुन्या पेन्शन योजनेमध्ये खाते उघडणे आवश्यक आहे. अंतिम निकाल लागेल तेव्हा लागेल. मुंबई उच्च न्यायालयाचा अंतरिम निकाल स्पष्ट आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाने शासनाचा जी.आर. स्थगित केलेला आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की जुन्या पेन्शन योजनेप्रमाणे खाती उघणे आवश्यक आहे. त्या प्रमाणे खाती न उघडण्याची कारणे काय आहेत ? निकाल लागून दोन वर्षे झालेली आहेत. शासन तातडीने जुन्या पध्दतीने खाती उघडणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : याबाबतीत तीन महिन्यामध्ये निर्णय घेण्यात येईल असे मी सांगितलेले आहे....

श्री. कपिल पाटील : आपण कोर्टाच्या आदेशांना मानत नाही काय ? कोर्टाच्या आदेशाला आपण मानत नसाल तर मग कोणाला मानता ? मुंबई उच्च न्यायालयाने जो निर्णय दिलेला आहे त्याबाबतीत आपण उत्तर देत नाही. मुंबई उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला ८ एप्रिलला ३ वर्षे पूर्ण होतील. आपण मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशांना मानत नाही असे सांगावे, मी खाली बसतो.

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मला संरक्षण द्यावे. सन्माननीय सदस्यांनी प्रथम माझे उत्तर पूर्ण ऐकून घ्यावे. मी चुकीचे उत्तर देत नाही.

...नंतर श्री.गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38129..... प्रा.फौजिया खान....

सभापती महोदय, या बाबतीत अनेक निर्णय झालेले आहेत. तुम्ही जे सांगता आहात ते अंतरिम निर्णय आहेत. परंतु नागपूर कोर्टाने दिनांक 20 नोव्हेंबर, 2012 रोजी लेटेस्ट निर्णय दिलेला आहे. ते अंतरिम निकाल आहेत, यासंदर्भातील शेवटचा निकाल अजून आलेला नाही. नागपूर कोर्टाच्या निकालामध्ये असे म्हंटले आहे कि, "We find that challenge has been raised to the validity of Government Resolution dated 29-11-2010 is without any substance and as such the petitions fail. Rule is according discharged in all these petitions with no order as to cause." सभापती महोदय, नागपूर हायकोर्टाने स्पष्टपणे लेटेस्ट आदेश दिलेला आहे. या शिवाय या संदर्भातील अनेक निर्णय माझ्याकडे आहेत. सुप्रीम कोर्टाने देखील निर्णय दिलेला आहे. त्यामध्ये त्यांनी सांगितले आहे की, "Whether the scheme could be extended or not is a question of an Executive policy and the court would not take the responsibility of directing the Government to extend the policy." या बाबतीत अनेक निर्णय आहेत. त्यामुळे या बाबतीत सर्वंकष विचार करुन तीन महिन्याच्या या संदर्भात निर्णय घेण्याचे शासनाने ठरविलेले आहे.

--------------------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यातील कुपोषण कमी करण्यासाठी देण्यात येणाऱ्या निधीचा विनियोग करण्याबाबत

**(७) * ३७४३८ श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्रीमती विद्या चव्हाण , श्री.जयवंतराव जाधव , श्री.दिपकराव साळुंखे , श्री.अनिल भोसले , श्री.मनीष जैन , श्री.नागो गाणार , डॉ.निलम गोऱ्हे , श्रीमती अलका देसाई :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कृपोषण देखरेख समितीने गेल्या वर्षभरात केलेल्या सर्वेक्षणात कुपोषण निवारणासाठी देण्यात येणारा कोट्यवधी रुपयांच्या निधीचा योग्य पध्दतीने विनियोग होत नसल्यामुळे सर्वाधिक कुपोषित बालकांची संख्या जळगाव जिल्ह्यात सुमारे ६६४१९ एवढी आढळल्याची बाब माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात जळगाव जिल्ह्यात सर्वाधिक कुपोषित बालके असल्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, कुपोषण नियंत्रणासाठी आजपावेतो कोणकोणत्या उपाययोजना करण्यात आल्या वा येत आहेत,

(४) असल्यास, कुपोषण देखरेख समितीच्या अहवालात प्राप्त झालेल्या कुपोषित बालकांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी शासनाद्वारे कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** (१) हे खरे नाही.

माहे डिसेंबर, २०१२ च्या मासिक प्रगती अहवालानुसार जळगांव जिल्ह्यात एकूण वजन घेतलेल्या बालकांची संख्या ३११९१३ इतकी असून त्यामध्ये सर्वसाधारण श्रेणीची २७४८४५, मध्यम कमी वजनाची ३३२३२ आणि तीव्र कमी वजनाची ३८३६ बालके होती. तसेच माहे जानेवारी, २०१३ मध्ये एकूण वजन घेतलेल्या बालकांची संख्या ३१०५७९ इतकी असून त्यामध्ये सर्वसाधारण श्रेणीची २७४५०७, मध्यम कमी वजनाची ३२१४२ आणि तीव्र कमी वजनाची ३९३० बालके आहेत. माहे डिसेंबर, २०१२ च्या तुलनेत जानेवारी, २०१३ मध्ये मध्यम कमी वजनाच्या १०९० बालकांमध्ये सुधारणा आढळून आली असून तीव्र कमी वजनाची ९४ बालके वाढली आहे.

(२) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार वयानुसार वजन याप्रमाणे कुपोषणाची श्रेणी ठरविली जाते. परंतु, दि.१४/११/२०१२ ते

३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दि.०७/०४/२०१३ या कालावधीमध्ये महाराष्ट्र कुपोषणमुक्त करण्यासाठी राजमाता जिजाऊ आरोग्य व पोषण अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत जास्तीत जास्त कुपोषित बालकांमध्ये सुधारणा होण्यासाठी वयानुसार वजन याबरोबरच दंडघेर घेऊन कुपोषित बालके शोधून काढण्यात येत आहेत. त्यामुळे जानेवारी, २०१३ मध्ये तीव्र कमी वजनाची ९४ बालके जास्त आढळून आली आहेत.

(३) व (४) कुपोषण नियंत्रणासाठी एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गतच्या नियमित उपाय योजनाबरोबरच महाराष्ट्र कुपोषणमुक्त करण्यासाठी राजमाता जिजाऊ आरोग्य व पोषण अभियान दि.१४/११/२०१२ ते ०७/०४/२०१३ या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत विभागीय स्तर, जिल्हास्तर, प्राथमिक आरोग्य केंद्र स्तर, गाव पातळीवर ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. त्यात तीव्र कमी वजनाच्या बालकांना ग्राम बाल विकास केंद्रात दाखल करण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. तसेच माता व कुटूंब सक्षमीकरणावर आणि संस्थात्मक प्रसुतीवर भर देण्यात येत आहे.

श्री.हेमंत टकले : महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यात कुपोषणावर नियंत्रण येत नाही म्हणून शासन वेगवेगळया योजना राबवित आहे. महाराष्ट्र कुपोषण मुक्त करण्यासाठी राजमाता जिजाऊ आरोग्य आणि पोषण अभियान दिनांक १४.११.२०१२ ते दिनांक ७.४.२०१३ या कालावधीसाठी शासन राबवित आहे. तीव्र कमी वजनाच्या बालकांचा ग्राम बालविकास केंद्रात दाखल करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. तरी सुध्दा जानेवारी २०१३ मध्ये तीव्र कमी वजनाची ९४ मुले जास्त आढळून आली. ही संख्या कमी होण्यापेक्षा ती संख्या वाढत आहे. शासनाकडून अभियान राबविण्याच्या कालावधीमध्ये अशा प्रकारची संख्या संख्या वाढत असेल तर ते अभियान योग्य पध्दतीने राबविले जाते आहे की नाही याचा शोध घेतला जाईल काय, सदर अभियान राबविण्यासाठी आतापर्यंत किती निधी खर्च करण्यात आला आहे ? दिनांक ७.४.२०१३ नंतरच्या कालावधीसाठी या बाबतीत काय उपाययोजना केली जाणार आहे जेणे करुन महाराष्ट्र कुपोषण मुक्त होईल.

४...


असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३७४३८

प्रा.वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. त्यांनी कुपोषित बालका संबंधीची आधीची आकडेवारी व सद्य:स्थितीची आकडेवारी यासंबंधीची माहिती दिली. या बाबतीत मी सभागृहाला सांगू इच्छिते की, आय.आय.पी.एस.आणि युनीसेफच्या माध्यमातून एक अहवाल आलेला आहे. महाराष्ट्राचा २००६ आणि २०१२ च्या परिस्थिती संदर्भातील मोठा रिपोर्ट आलेला आहे. वयाच्या मानाने कमी उंचीची मुले होती ती ३९ टक्क्यावरुन २२ टक्क्यांपर्यंत आलेली आहेत. उंचीच्या मानाने कमी वजनाची मुले १९.९ टक्के होती, ती संख्या १५.५ टक्क्यांपर्यंत आलेली आहे. वयाच्या मानाने कमी वजनाची मुले होती, ती संख्या २९.६ वरुन २१.८ टक्क्यांपर्यंत आलेली आहेत. ही काही सन्मानाची गोष्ट नाही. कुपोषण दूर व्हावे यासाठी शासनाकडून प्रामाणिकपणे प्रयत्न होत आहेत.

दरम्यानच्या काळात कॅगचा अहवाल आला, त्या अहवालामध्ये जे नमूद केले आहे ते मला या ठिकाणी सांगितले पाहिजे की, कुपोषणाच्या बाबतीत महाराष्ट्राचा २९ क्रमांक होता. एनडीटीव्ही चित्रवाहिनीवर यासंदर्भात चर्चासत्र आयोजित केले होते. त्या चर्चासत्रात तेथील व्यासपीठावरील वक्त्यांनी महाराष्ट्र आणि गुजरात राज्याचे कौतुक केले. राजमाता जिजाऊ आरोग्य व पोषण अभियान सुरु केलेले आहे. त्या अभियानातून वेगवेगळया योजना सुरु केलेल्या आहेत. मागच्या वर्षी ग्राम अभियान योजना सुरु केली, या वर्षी ग्राम प्लस शहरी अभियान सुरु केलेले आहे. या योजनांच्या माध्यमातून महाराष्ट्रातून कुपोषण कमी करावे असा आमचा प्रयत्न आहे व त्या दृष्टीने आम्ही पावले टाकीत आहोत.

श्रीमती शोभा फडणवीस : राज्यात कुपोषण देखरेख समितीने गेल्या वर्षभरात केलेल्या सर्वेक्षणात कुपोषण निवारणासाठी देण्यात येणारा कोटयावधी रुपयांचा निधीचा योग्य पध्दतीने विनियोग होत नाही अशा स्वरुपाचा प्रश्न विचारण्यात आला होता. कुपोषण कमी करण्यासाठी किती निधी मंजूर करण्यात आला होता व प्रत्यक्षात किती निधी खर्च करण्यात आला आहे, निधी खर्च झाला नसेल तर त्याची कारणे काय आहेत ?

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37438.........

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, माझ्याकडे सन 2011-12 व 2012-13 ची आकडेवारी उपलब्ध आहे. 2011-12 च्या अर्थसंकल्पामध्ये विभागाला 1279 कोटी रुपयांचा नियतव्यय मंजूर करण्यात आला होता. सुधारित तरतूद रु.1131 कोटी इतकी प्राप्त झाली. दिनांक 31.3.2012 च्या अर्थसंकल्पामध्ये रु.1108.23 कोटी इतका नियतव्यय मंजूर झाला. एम.आय.एस.प्रमाणे 1098.14 कोटी रुपये इतका खर्च झाला असून बी.डी.एस.वर प्राप्त झालेल्या खर्चाची टक्केवारी 99.09 टक्के इतकी झालेली आहे. 2012-13 या वर्षामध्ये अर्थसंकल्पीय तरतूद रु.1302.73 कोटी इतकी करण्यात आली, बी.डी.एस.वर प्राप्त झालेली रक्कम रु.1171.46 कोटी असून त्यातील एम.आय.एस.वर प्राप्त झालेली रक्कम रु.1035 कोटी असून बी.डी.एस.वर प्राप्त झालेल्या खर्चाची टक्केवारी फेब्रुवारी, 2013 पर्यंत 88.41 टक्के इतकी आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आयसीडीएस आणि राज्य शासनाच्या आरोग्य विभागाच्या आकडेवारीमध्ये तफावत आहे का? दोन्ही विभाग वेगवेगळ्या पध्दतीने आकडेवारी तयार करतात का? कुपोषणाची ग्रेड निश्चित करताना तीव्र, मध्यम कुपोषित बालके असतील तर त्यासाठी वजन आणि ऊंची गृहीत धरली जाते. यापूर्वी वजन आणि वय विचारात घेतले जायचे. त्यानंतर वचन, ऊंची आणि वय विचारात घेणे सुरु झाले. त्यात बदल करुन दंडाचा घेर ॲड करण्यात आला. आता पायावर आलेली सूज देखील ॲड करण्यात आल्यामुळे कुपोषणाची आकडेवारी लपविता येते हे सत्य आहे काय? शासन कुपोषणासंबंधी श्वेतपत्रिका केव्हा काढणार आहे?

प्रा.वर्षा गायकवाड : समितीने अहवाला दिला त्यामध्ये सार्वजनिक आरोग्य आणि आयसीडीएस यांच्या आकडेवारीमध्ये थोडाफार फरक झालेला आहे. विभागाने जागतिक बँकेच्या निकषाचा विचार करुन वय आणि वजनानुसार निकष निश्चित केले होते. मध्यंतरीच्या काळात सॅम आणि मॅम संदर्भातील निकषामध्ये वजन, वय व ऊंची यांचा समावेश केलेला होता. आता दंडाचा घेर सुध्दा विचारात घेणे सुरु केलेले आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी श्वेतपत्रिका केव्हा काढणार असा प्रश्न विचारला आहे. मधल्या काळात महिला धोरणाच्या कामात मी व्यस्त होते. या संदर्भात कन्सल्टन्सी

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड.........

नेमण्यास सांगितले आहे.  सर्व मटेरियल तयार केले असून विविध विभागांच्या माध्यमातून चर्चा झालेली आहे.  शेवटची बैठक सर्व आमदारांसमवेत घेऊन नंतर कॅबिनेटला प्रस्ताव पाठविण्याची इच्छा आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला एका महत्वाच्या विषयाकडे आपले लक्ष वेधावयाचे आहे. मी आता सभागृहात प्रवेश केल्यानंतर सभागृहाचे कामकाज सकाळी 11.00 वाजता सुरु झ ााले हे पाहून मला आश्चर्य वाटले. काल ॲडव्होकेट जनरल यांनी न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या मुद्यावरुन खालच्या सभागृहाचे कामकाज बंद पाडण्यात आले. या सभागृहात त्या मुद्याबाबत चर्चा सुरु असताना असे ठरले की, सर्वपक्षीय गटनेत्यांसमवेत बैठक घेण्यात येईल. त्यानुसार आयोजित केलेल्या बैठकीला माननीय सभापती, माननीय अध्यक्ष, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, दोन्ही सभागृहाचे माननीय विरोधी पक्षनेते, गटनेते यांच्यासह ॲडव्होकेट जनरल हे देखील उपस्थित होते. बैठक सुरु असताना 11.00 वाजण्याच्या काही मिनिटापूर्वी सभागृहाचे कामकाज पुढे ढकलण्यात यावे, ते एक तास उशिरा सुरु करावे असे ठरले. खालच्या सभागृहाचे कामकाज सकाळी 11.00 ऐवजी दुपारी 12.00 वाजता सुरु करण्याचे ठरविण्यात आले. आम्हाला त्या बैठकीला निमंत्रित करण्यात आले होते. आम्ही तेथील चर्चेत सहभागी झालो होतो. त्यामुळे सभागृहाचे कामकाज ठरल्याप्रमाणे उशिरा सुरु होणे अपेक्षित होते.

**उप सभापती** : एका अत्यंत महत्वाच्या विषयावर बैठक सुरु होती, हे मला मान्य आहे. मी स्वत: त्या बैठकीला हजर होतो. 11.00 वाजण्यास दहा मिनिटांचा अवधी शिल्लक असताना मी माननीय सभापतींच्या परवानगीने त्या ठिकाणाहून निघालो, विरोधी पक्षनेत्यांसह इतरही सर्वपक्षीय गटनेते तेथे उपस्थित होते. मला आपण किंवा इतर कोणीही सभागृहाची बैठक नियमित वेळेत म्हणजे सकाळी 11.00 वाजता सुरु करावयाची नाही असे सांगितले नाही. असा कुठेही आणि कोणीही उल्लेख केलेला नव्हता. सभागृह वेळेवर सुरु करावयाचे नाही अशी मला सूचना देण्यात आली असती तर मी त्या सूचनेचे पालन केले असते. मी सकाळी 11.00 वाजता बेल थांबल्याबरोबर सभागृहात प्रवेश केला, प्रश्नोत्तराचा तास पुकारण्यात आला. सभागृहात देखील उपस्थित माननीय सदस्यांपैकी कोणी निदर्शनास आणून दिले असते तर मी त्यांच्या भावनेचा आदर केला असता.....

नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** ......

मी आता पर्यंत सर्व सन्माननीय सदस्यांचा आदर करीत आलेलो आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,मी काल या ठिकाणी ॲडव्होकेट जनरलच्या बाबतीत प्रश्न विचारला होता त्यावेळेस माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, या विषयाच्या संदर्भात उद्या सकाळी बैठक घेतली जाणार आहे.ही बैठक झाल्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरु होईल. ही जी काही चर्चा झाली होती ती रेकॉर्डवर आहे.

**उप सभापती** : माननीय उप मुख्यमंत्र्यांनी ही बाब जेव्हा सांगितली तेव्हा मी सभागृहात उपस्थित नव्हतो त्यामुळे या गोष्टीची मला कल्पना नव्हती. समजा तसे झाले असतांना सभागृहाचे कामकाज सुरु केले असेल तर मी माझ्या चुकीबद्दल क्षमा मागतो. आता हा विषय संपलेला आहे. आता तारांकित प्रश्न क्रमांक 37438 वरील चर्चा पुढे सुरु करण्यात येत आहे.

------------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. :37438** चर्चा पुढे सुरु ......)

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय,या प्रश्नाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, कुपोषणाच्या संदर्भात युनिसेफचा रिपोर्ट माझ्याकडे आहे. परंतु त्या बाबत मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, जळगाव जिल्हयामध्ये कुपोषितांचा प्रश्न मोठया प्रमाणावर आहे. महाराष्ट्र हे पुरोगामी राज्य असतांना सुध्दा आपल्या राज्यात कुपोषणाचे प्रमाण खूप वाढत आहे. यामध्ये प्रशासनाचा गलथानपणा किंवा आपण कुपोषित बालकांपर्यंत पोहचत नसल्यामुळे आपल्या राज्यात कुपोषणाचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे कुपोषणाला आळा घालण्यासाठी आपण काही कडक उपाययोजना करणार आहात काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, कॅगचा रिपोर्ट हा केंद्र शासनाचा आहे. आयआयपीएस आणि युनिसेफचा रिपोर्ट हा थर्ड बॉडीचा आहे. मागच्या वर्षी आपण राजमाता जिजाऊ ग्राम अभियान सुरु केले असून या वर्षी आम्ही राजमाता जिजाऊ शहर अभियान सुरु करीत आहोत. कुपोषणामध्ये जळगावचा क्रमांक कितवा आहे हे सांगण्यास मला अजिबात इंटरेस्ट नाही. महाराष्ट्र कुपोषण मुक्त व्हावा, अशी आपली जी इच्छा आहे तशीच माझीही इच्छा आहे. जळगाव येथील कुपोषण कमी व्हावे, यासाठी मुला मुलींची प्रभात फेरी काढण्यात आली होती, विवाहितांसाठी समुपदेशन दिवस, गर्भवती मातांची तपासणी तसेच त्यांचेही समुपदेशन, लोहयुक्त गोळयांचे वाटप, दंत दिवस, स्तनदा माता समुपदेशन दिवस, आहार प्रात्याक्षिक दिवस, आरोग्य दिवस, वैयक्तिक तपासणी, प्रौढ सासू-सासऱ्याचे समुपदेशन असे विविध कार्यक्रम घेतलेले आहेत. तसेच ज्या मुलांची वजने कमी असल्याचे आढळून आली अशा ठिकाणी गृहभेटी देऊन मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. कुपोषणाच्या संदभार्रत आम्ही विविध उपक्रम केलेले आहेत.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सर्वात जास्त कुपोषित आणि सर्वात जास्त दारिद्रय असलेल्या पहिल्या 8 राज्यात महाराष्ट्र येतो हे खरे आहे काय, व या संदर्भातील निर्मूलनासाठी आपण कोण कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत ?

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय,मी मघाशी कॅगचा रिपोर्ट वाचून दाखविला असून त्यामध्ये 29 राज्यामध्ये महाराष्ट्राचा नंबर 24 वा आहे हे मी अगोदरच सांगितलेले आहे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सर्वात कुपोषित आणि सर्वात दारिद्रय असलेल्या राज्यामध्ये महाराष्ट्राचा क्रमांक आठवा येतो काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छिते की, या विषयाच्या संदर्भात एनडीटीव्हीने एक कार्यक्रम आयोजित केला होता या कार्यक्रमामध्ये महाराष्ट्र व गुजरात राज्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी झाल्यामुळे त्यांनी महाराष्ट्र व गुजरात या राज्यांचे कौतुक केले होते.

**उप सभापती** :आता पुढील प्रश्न पुकारण्यात येत आहे.

श्री. कपिल पाटील :सभापती महोदय,मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर आलेले नाही.

**उप सभापती** :मी पुढचा प्रश्न पुकारला असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे.

-----------------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**राज्यातील गरीब व सर्वसामान्य कुटुंबातील मुले शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून फी ची प्रतिपूर्ती करण्याबाबत**

**(८) * ३७१६५ श्री.सतीश चव्हाण , श्री.धनंजय मुंडे , श्री.विक्रम काळे , श्री.एम.एम.शेख , श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक २५६७९ ला दिनांक २ एप्रिल, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च माध्यमिक विद्यालयांना अनुदान पात्र करण्याबाबतचा शासनाचा विचार झाला आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील गरीब व सर्वसामान्य कुंटुंबातील मुले शिक्षणापासून वंचीत राहू नये म्हणून त्यांच्या फीची परिपुर्ती करण्याबाबत शासनाचा विचार झाला आहे काय,

(३) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.फौजिया खान,श्री. राजेंद्र दर्डा यांचे करिता :** (१) व (२) सदर बाब शासनाच्या विचाराधिन आहे. (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37165 ....

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असा हा प्रश्न आहे. आम्हाला पहिल्या प्रश्नासंबंधी शासनाकडून उत्तर मिळाले आहे. आम्ही विचारलेले क्रमांक 2,3,4 वरील प्रश्न हे ग्रामीण भागशी संबंधित आहेत. ग्रामीण भागातील गोरगरिबांची लेकरे शाळेमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये शेतकरी व शेतमजुरांची देखील मुले आहेत. त्यांना इबीसीची सवलत मिळते. त्याचे दर 1950 मध्ये ठरविलेले आहेत. हे दर अतिशय अल्प आहेत. माझ्या माहिती प्रमाणे हे दर अनुक्रमे रूपये 3/-, 4/-, 5/-, 6/- असे आहेत. या दराची फेर निश्चिती करणे गरजेचे आहे. तेव्हा या दराची फेरनिश्चिती शासन करणार आहे काय ? त्याची अंमलबजावणी येत्या शैक्षणिक वर्षापासून करणार आहात काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या राज्यामध्ये 7271 कनिष्ठ महाविद्यालये आहेत. त्यातील जवळजवळ 4 हजार महाविद्यालये अनुदानित आहेत. इबीसीचा लाभ घेणारी मुले, प्रायमरी व सेकंडरी स्कूलमधील शिक्षकांची मुले व राज्यातील सर्व मुलींना आपण मोफत शिक्षण देतो. अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी फी प्रतिपूर्तीपोटी प्रति विद्यार्थी 16 रूपये व बारावीसाठी प्रति विद्यार्थी 18 रूपये देण्यात येते. टर्म फी प्रतिपूर्ती एक महिन्याच्या समतूल्य देण्यात येते. नुकताच शासनाने वेतनेतर अनुदानाचा निर्णय घेतलेला आहे. एप्रिल 2013 पासून या सर्वांना वेतनेतर अनुदान देखील मिळणार आहे. अशा विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण देण्याची शासनाची योजना आहे. त्याचा लाभ त्या विद्यार्थ्यांना मिळतो.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, ज्या विनाअनुदानित शाळेतील किंवा कनिष्ठ महाविद्यालयातील कुठल्याच विद्यार्थ्यांना फीची प्रतिपूर्ती होत नाही. ती आपण सुरू करणार आहात काय ? अनुदानित शाळेत देखील गोरगरिबांची मुले जातात. त्यांना आपण इबीसीचा लाभ देतो. त्यांचे दर वाढविण्याची गरज आहे. त्याबाबत शासन निर्णय घेणार आहे काय, हा माझा महत्त्वाचा प्रश्न आहे. वेतनेतर अनुदानामध्ये ही फी मिळत नाही हे मी आपल्या माहितीसाठी सांगत आहे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, आपण विद्यार्थ्यांना मोफतच शिक्षण देतो. वेतनेतर अनुदान देखील संस्थांना देण्यात येणार आहे. त्यामुळे किती रूपये प्रतिपूर्ती करतो ही बाब महत्त्वाची नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.37165 ....

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, उच्च माध्यमिक विद्यालयांना अनुदान देण्याबाबत महत्त्वाचा प्रश्न विचारेला आहे. महाराष्ट्रामध्ये गेल्या 12 वर्षापासून आपण कायम विनाअनुदान धोरण अवलंबिले आहे. जेव्हा श्री.विखे-पाटील मंत्री होते त्यावेळी कायम हा शब्द वगळण्यात आला आहे. परंतु, उच्च माध्यमिक विद्यालयातील शाळांमधील कायम हा शब्द वगळण्यात आलेला नाही. त्या शाळेत 12 वर्षापासून शिक्षक काम करीत आहेत. शिक्षकांची पत्नी म्हणून आपण त्यांच्याकडे आदराने पाहतो. परंतु, त्यांच्या पत्नीवर कोणाची तरी धुणी-भांडी धुण्याची वेळ आलेली आहे. ते शिक्षक आज कोणताही पगार न घेता काम करीत आहेत. उच्च माध्यमिक विद्यालयांना शासनाने अनुदान दिले पाहिजे. त्याबाबत शासन उदासीन का आहे ? या शाळेतील शिक्षकांची अवस्था अत्यंत बिकट आहे. शिक्षक हे ज्ञान देण्याचे काम करतात. मुले ज्ञान घेण्यासाठी शाळेत येतात. यासंबंधी अनेक प्रश्न विचारण्यात आले आहेत. पण शासनाने त्याबाबत कधीही गंभीरतेने विचार केलेला नाही. तेव्हा शासन उच्च माध्यमिक विद्यालयांना लवकरात लवकर अनुदान देणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या प्रश्नासंबंधी शासन गांभीर्याने विचार करीत आहे. यासंबंधी तीन महिन्यात निर्णय घेण्यात येईल हे मी पूर्वीच सांगितले आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनामध्ये हेच छापील उत्तर येते. मागे जे उत्तर होते तेच आता देखील आले आहे. म्हणून सर्व शिक्षक आमदारांची विनंती आहे की, पुढच्या अधिवेशनात हे उत्तर येणार नाही, याचे पूर्ण पालन शासन करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, निर्णय घेण्याचे ठरलेले आहे. यात अनेक महत्त्वाचे प्रश्न आहेत. त्याचा आता शेवट करायचा आहे. या प्रश्नावर निर्णय घ्यायचा आहे.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**श्रीमती सोनिया गांधी यांची काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी पंधरा वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचे अभिनंदन**

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, अखिल भारतीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा व केंद्रातील युपीए सरकारच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी यांचे पक्षातील कणखर नेतृत्व व त्यांच्या अध्यक्ष पदाच्या कालखंडाला काल, गुरुवार दिनांक 14 मार्च 2013 रोजी 15 वर्षे पूर्ण झालेली आहेत. श्रीमती सोनिया गांधी यांनी काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाची धुरा हाती घेतली तेव्हा त्यांनी प्रत्येक आव्हानांचा सामना केलेला आहे. त्यांच्या कणखर नेतृत्वाला 15 वर्षे पूर्ण झालेली आहेत. केंद्रात सत्ता नसताना आणि केवळ तीन राज्यांमध्ये कॉग्रेसची सत्ता असताना श्रीमती सोनिया गांधी यांच्या धाडसी व अचूक निर्णयाच्या जोरावर त्यांनी यशाची शिखरे गाठली. त्यांच्या नेतृत्वामुळे देशात मागील नऊ वर्षापासून काँग्रेसची सत्ता आहे तर 12 राज्यांमध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार आहे. श्रीमती सोनिया गांधी यांच्या कणखर नेतृत्वाला 15 वर्षे पूर्ण झालेली आहेत त्या निमित्ताने त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मी या सभागृहात मांडत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांना त्यांच्या नेतृत्वाबद्दल आदर आहे, हे ठीक आहे. परंतु या सदनामध्ये त्यांच्या नावाचा उल्लेख होत असेल आणि उद्या आम्ही त्यांच्या नावाने टीका केल्यानंतर, त्या सदनाच्या सदस्या नाहीत, त्या खुलासा करु शकत नाहीत, त्यामुळे आपणास बोलता येणार नाही, असा आदेश आपण आम्हाला देणार काय ?

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय श्री.नितीन गडकरी जेव्हा भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाले तेव्हा त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात आला होता. मी त्यांचे चेअरवर असताना अभिनंदन केले होते. ते या सदनाचे सदस्य होते हे मला माहीत आहे. ते आजही या सदनाचे सदस्य आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आम्ही भविष्यात त्यांचे नाव घेऊन त्यांच्यावर टीका केल्यास त्या या सदनाच्या सदस्या नाहीत. तेव्हा आपणास नाव घेता येणार नाही अशाप्रकारचे निदेश आपण देऊ शकणार नाहीत हा माझा मुद्दा आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आदरणीय श्रीमती सोनिया गांधी या कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या आहेत त्या विषयी आम्हाला काही म्हणावयाचे नाही. माननीय श्री.नितीन गडकरी यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात आला त्यावेळी माननीय सभापतींच्या दालनात सर्व गट नेते जमले होते. त्याठिकाणी हा प्रस्ताव मान्य झाल्यानंतर त्यावर सभागृहात चर्चा झाली. श्रीमती सोनिया गांधी या राष्ट्रीय नेत्या आहेत. श्रीमती सोनिया गांधी यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्यांना घाईघाईने मांडण्याचे काही कारण नाही. त्यांनी तो प्रस्ताव सन्मानाने आणावा. माननीय सभापतींच्या दालनात रोज सकाळी 10.30 वाजता सभागृहाचे नेते, विरोधी पक्ष नेते , गट नेत्यांची बैठक होत असते. त्यावेळी आपणास हा विषय मांडता आला असता. आपणास घाई करण्याची आवश्यकता नव्हती. आपल्या ऐवजी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी मांडला असता म्हणून आपण घाई केली काय ? सॉरी, सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त हे नियमाच्या बाहेर जाणार नाहीत हे मला माहीत आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मी सत्ताधारी पक्षाच्या सदस्य असलो तरी मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांच्या मताशी सहमत आहे. माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी श्रीमती सोनिया गांधी यांच्या अभिनंदनाबद्दलचा प्रस्ताव मांडलेला आहे तो आपण स्वीकारावा आणि त्यावर वाद घालू नये.

-----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**भंडारा जिल्ह्यातील तीन मुलींवर अत्याचार होऊन त्यांचा केलेला खून**

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय गृह मंत्री उपस्थित आहेत म्हणून मी त्यांचे लक्ष एका विषयाकडे वेधू इच्छितो.

सभापती महोदय, आताच या ठिकाणी एका महिलेच्या कर्तृत्वाबद्दल उल्लेख झाला. एका बाजूला महिलांच्या कर्तृत्वाचा उल्लेख होत असताना दुसऱ्या बाजूला भंडारा जिल्ह्यातील मुरमाडी येथे तीन अल्पवयीन मुलींवर अत्याचार होऊन त्यांचा निदर्यपणे खून करण्यात आला....

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, या विषयावर निर्णय झालेला आहे. त्यावर पुढील आठवड्यात चर्चा होईल.

------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**उप सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, उच्च शिक्षणाची धोरणे ठरविण्यासाठी "महाराष्ट्र स्टेट काऊन्सिल फॉर हायर एज्युकेशन" (उच्च शिक्षण परिषद) अशा एका स्वतंत्र व्यवस्थेची महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार तरतूद करण्यात येणे, 1994 साली हा कायदा अस्तित्वात येणे, परंतु तेव्हापासून आजपर्यंत गेली 18 वर्षे महाराष्ट्र स्टेट काऊन्सिल फॉर हायर एज्युकेशन अस्तित्वात आलेला नसणे, राज्यातील उच्च शिक्षण, तंत्रशिक्षण, वैद्यकीय शिक्षण आणि व्यावसायिक शिक्षणाबाबतची धोरणे ठरविण्यासाठी या काऊन्सिलने सल्लागाराची भूमिका निभावणे अपेक्षित असणे, या काऊन्सिलच्या कामातील महत्त्वाचा भाग म्हणजे सध्या स्वतंत्रपणे् काम करणारे उच्च शिक्षण विभाग, तंत्रशिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग आणि व्यवसाय प्रशिक्षण विभाग हे एकमेकांना जोडून ठेवणे, दरवर्षी दोन वेळा या काऊन्सिलची बैठक होणे अपेक्षित असणे. मात्र गेल्या 18 वर्षांमध्ये एकदाही अशी बैठक झाली नसल्याचे किंवा काऊन्सिल तयार झाली नसल्याचे निदर्शनास येणे, धोरणांच्या आखणीमध्ये महत्त्वाची भूमिका असलेल्या महाराष्ट्र स्टेट काऊन्सिल फॉर हायर एज्युकेशनच्या तरतुदीकडेच शासनाचे दुर्लक्ष झालेले असणे, सदरहू बाब अत्यंत गंभीर असल्याने या बाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया, त्याकरिता मी हा मुद्दा औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून उपस्थित करीत आहे

---------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, राज्यातील पोलीस विभागात वेगवेगळ्या संवर्गात सुमारे 12,699 पदे रिक्त असून वेळेवर भरती प्रक्रिया पूर्ण न झाल्याने किंबहुना अपुऱ्या संख्याबळामुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यास शासनाला अनेक अडचणी येत आहेत. या बाबत माननीय उच्च न्यायालयाने सुध्दा दखल घेऊन शासनास निर्देश दिलेले आहेत. शासनाच्या म्हणण्यानुसार राज्यात केवळ 9 प्रशिक्षण केंद्रे असल्याने भरती प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षण केंद्रांमध्ये अडचण निर्माण होते. न्यायालयाच्या निदेशानुसार शासनाने प्रशिक्षण केंद्राची संख्या वाढविण्याबाबत व भरती केलेल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी अशा प्रकारची विनंती मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून करीत आहे.

--------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंप प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, अलिबाग तालुक्यातील आर.सी.एफ. कंपनीने एक्साईज ड्युटी बुडविल्यामुळे एक्साईज विभागाने त्या कंपनीला नोटीस दिली होती. त्या कंपनीने खोटी कागदपत्रे तयार करुन, खोटे हिशेब दाखवून अबकारी विभागाची मोठी फसवणूक केल्याचा ठपका त्या कंपनीवर ठेवण्यात आला. त्या कंपनीकडून विशाखापट्टणम येथून नाफ्ता आणला जातो. त्या नाफ्त्यातून केवळ शेतकऱ्यांसाठी युरिया खताची निर्मिती करावी अशी अट होती. कंपनीने त्या नाफ्त्यापासून युरिया न बनविता टी.जी. बनविले आणि त्यामध्ये त्यांनी जवळजवळ 5 कोटी रुपयांचा टॅक्स चुकविला. या कंपनीने निरनिराळे कर न भरता 2001 पासून मोठी अफरातफर केली आहे. त्यामुळे अबकारी विभागाने त्या कंपनीला 10 कोटी रुपये दंडाची नोटीस दिली. त्या विरोधात आर.सी.एफ. कंपनी उच्च न्यायालयात गेली. उच्च न्यायालयाने त्या कंपनीला 15 कोटी रुपयांचा दंड आणि 10 कोटी रुपये दंडात्मक कारवाई करण्याचा निर्णय दिला. उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात आर.सी.एफ.कंपनी सर्वोच्च न्यायालयात गेली. सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय कायम ठेवून आर.सी.एफ. कंपनीने ताबडतोब सर्व पैसे भरण्याचे आदेश दिले आहेत.

सभापती महोदय, आर.सी.एफ.कंपनीने अबकारी कराप्रमाणे राज्य सरकारचा व्हॅट भरलेला नाही. माझी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती आहे की, या कंपनीची चौकशी झाली पाहिजे. आर.सी.एफ. कंपनीच्या बेकायदेशीर कामाबाबतची चौकशी करुन व त्या कंपनीचे अकाऊंट वित्त विभागाच्या विक्रीकर विभागाच्या माध्यमातून तपासून त्या कंपनीने राज्य सरकारचा बुडविलेला कर वसूल केला पाहिजे, अशी मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती करतो.

-------------

नंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेकडून विविध प्रकल्पांच्या विकास कामांसाठीच्या खर्चासाठी सुमारे 25 मालमत्ता बँकेकडे गहाण ठेवण्याच्या हालचाली सुरु असल्याचे निदर्शनास येत असणे, या बाबतीत प्रामुख्याने यामध्ये शहरातील ऐतिहासिक पुराणवास्तू छत्रपती शिवाजी महाराज वास्तू संग्रहालयाचा समावेश असणे, त्याचबरोबर नेहरु बालोद्यान, नक्षत्रावाडी येथील जागा समाविष्ट असणे, महाविरणाच्या थकबाकीसाठी 100 कोटी रुपये व समांतर जलवाहिनी प्रकल्पासाठी 100 कोटी रुपये असे मिळून 200 कोटी रुपयांकरिता महानगरपालिका अब्जावधी रुपयांच्या या मालमत्ता आयडीबीआय बँकेकडून कर्ज घेण्याकरिता गहाण ठेवणार असल्याने हजारो कोटी रुपयांचे बजेट मांडणाऱ्या, सर्वात श्रीमंत समजल्या जाणाऱ्या महापालिकेवर ही वेळ आल्याने ही बाब अत्यंत खेदजन्य असून शिवाजी महाराजांचे वास्तूसंग्रहालय हे महाराष्ट्रातील जनतेचा अभिमान असून अशा ऐतिहासिक वास्तूसंग्रहालयाचा होणारा लिलाव व नामुष्की थांबविण्याकरिता मी ही बाब या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर यांनी जो औचित्याचा मुद्दा उपस्थित केलेला आहे तो दिशाभूल करणारा आहे असे माझे म्हणणे आहे. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, मुंबई महानगरपालिकेने छत्रपती शिवाजी महाराज वास्तूसंग्रहालयापासून वरळी येथील नक्षत्रगृहापर्यंत 25 प्रॉपर्टीज बँकेकडे गहाण ठेवण्याच्या दिशेने मुंबई महानगरपालिका काम करीत आहे. मुंबई महानगरपालिकेची सद्य:स्थिती अशी आहे की, मुंबई महानगरपालिकेचे काही हजार कोटी रुपयांचे फिक्स डिपॉझीट्स राज्यातील आणि देशातील राष्ट्रीयकृत आणि वेगवेगळ्या बँकांमध्ये पडलेले आहेत. अशा पध्दतीने मुंबई महानगरपालिकेची कोणतीही प्रॉपर्टी जर कोठेही गहाण ठेवावयाची असेल तर त्याला नियम 92(डी) खाली स्थायी समिती आणि सुधार समितीची मान्यता घ्यावी लागते. महानगरपालिकेने नियम 92(डी) खाली सुधार समितीची मान्यता घेतलेली नाही, स्थायी समितीची मान्यता घेतलेली नाही. त्यामुळे या ठिकाणी चुकीच्या गोष्टी रेकॉर्डवर येत आहेत. यासाठी राज्य सरकारची सुध्दा परवानगी लागते. यासाठी नगरविकास विभागाची मंजुरी नाही, स्थायी समितीची मान्यता नाही, सुधार समितीची



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ॲड. आशिष शेलार .....

समितीची मान्यता नाही, असा कोणताही प्रस्ताव नाही त्यामुळे मुंबई महापालिकेबद्दल अशा पध्दतीचा जो औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे तो असत्य आहे.

**उप सभापती** : आपण जो हरकतीचा मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यावर माझी हरकत आहे. तुम्हाला मुंबईच्या सर्व प्रॉपर्टीजची माहिती कशी काय ?

ॲड. आशिष शेलार : कारण मी मुंबई महानगरपालिकेमध्ये सुधार समितीचा अध्यक्ष होतो त्यामुळे मला पूर्ण माहिती आहे.

**उप सभापती** : मी सुध्दा 12 वर्षे एका महानगरपालिकेचा महापौर होतो पण मला एवढी माहिती नाही.

---

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, केंद्र शासनाच्या जैवविविधता अधिनियमानुसार सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांनी जैवविविधता व्यवस्थापन समिती स्थापन करणे सक्तीचे आहे. परंतु महाराष्ट्रातील एकाही महानगरपालिकेने या अधिनियमाचे पालन केलेले नाही. जैव विविधता व्यवस्थापन समिती स्थापन करुन नागरिकांमध्ये पर्यावरण आणि जलसाक्षरतेचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. वनसंपदेसह जलसाक्षरतेचे असलेले महत्व, घाटमाथ्यावरील वाढती वस्ती, खाणींमुळे नामशेष होत असलेले जलस्त्रोत, सातत्याने होणाऱ्या वाळू उपशामुळे नद्यांची झालेली दुरवस्था, त्यामुळे बंद पडत चाललेले पारंपरिक जलस्त्रोत व त्यामुळे राज्यात व देशात निर्माण झालेली भीषण पाणी टंचाई या सर्वांवर मात करण्यासाठी

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी.....

या सर्वावर मात करुन जैवविविधता समिती प्राधान्याने स्थापन करण्यात यावी. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने राज्यातील सर्व महापालिकांना तातडीने या समित्या स्थापन करण्याचे आदेश द्यावेत अशी विनंती मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे. सभापती महोदय, माननीय नगरविकास राज्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. आपण त्यांना यासंबंधी निर्देश द्यावेत.

------

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील उमराळे गावातील मयत सौ.मीना शिवाजी चारोस्कर या महिलेस प्रसव वेतनानंतर निगडोळे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दि.10.1.2013 रोजी प्रसूतीसाठी व उपचारार्थ दाखल करण्यात येणे, प्रसूतीनंतर उपचारादरम्यान डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे या महिलेचा मृत्यू होणे, अशाच प्रकारे अनेक रुग्णांचा येथील डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळे यापूर्वी सुध्दा मृत्यू झालेला आहे. या आरोग्य केंद्रातील डॉ.मेकेवाड व डॉ.देवळीकर यांच्यावर कोणतीही कारवाई करण्यात न येणे, परिणामी रुग्णालयात मृत्यूच्या घटनेत सातत्याने वाढ होणे, त्यामुळे नागरिकांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला संताप व चिडीची भावना, याबाबत प्राथमिक आरोग्य केंद्राची चौकशी करुन मृत्यूला जबाबदार डॉक्टरांवर कारवाई करण्याची आवश्यकता व भविष्यात अशा घटना घडू नये यासाठी उपाययोजना करण्यात यावी अशी सूचना मी या औचित्याचा मुद्यांद्वारे करीत आहे.

-----

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, लोकसभेमध्ये कामकाज करणारे सदस्य समर्थ असतात. परंतु संपूर्ण देशाशी संबंधित एखादा महत्वाचा विषय चर्चेला येतो त्यासंबंधीचा कायदा करण्यापूर्वी मते व्यक्त होत असतील तर ते गंभीर असते. तो कायदा कन्करन्स लिस्टमधील असेल तर त्या कायद्यामुळे राज्यांना सुध्दा त्याचे परिणाम भोगावे लागतात. काल संपूर्ण दिवसभर दूरदर्शनच्या सर्व वाहिन्यांवर एकच विषय सुरु होता. केंद्र सरकार शारीरिक संबंधाचे वय 16 वर्षे व लग्नाचे वय 18 वर्षे करण्यासंबंधी नवीन कायदा आणू इच्छित आहे. त्याची चर्चा सर्वत्र जोरात सुरु आहे. त्याबाबत देशात मतप्रणाली सुरु आहे. हे गणित आम्हाला समजलेले नाही. काल सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी त्यांच्या भाषेमध्ये या विषयाला विरोध केलेला आहे. हा बदल केला जावा की नाही याबाबत महिलांची वेगवेगळी मते आहेत. मला असे वाटते की, प्रत्येक विधानसभेमध्ये या कायद्यासंबंधी समाजाच्या भावना व्यक्त झाल्या पाहिजेत. या औचित्याच्या माध्यमातून मी सरकारला सांगतो की, सध्या अधिवेशन सुरु असल्यामुळे या सदनाचे मत केंद्रीय कायदा होण्यापूर्वी त्यांना कळविले तर ते महत्वाचे ठरेल. या विचित्र विषयाबाबत घराघरामध्ये चर्चा सुरु आहे. म्हणून सरकारने पुढील आठवड्यात याबाबतचा स्वत:हून ठराव आणावा त्यावर पक्षाच्यावतीने मते व्यक्त केली जातील. त्यावेळी त्या कायद्याबाबत या सदनाला काय वाटत आहे ते मांडले तर त्या कायद्याला बळकटी आणण्यासाठी मदत होईल व मार्गदर्शन होईल अशी भावना मी या औचित्याच्या मुद्याद्वारे व्यक्त करीत आहे.

---------

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

मुंबई येथील शास्त्रीनगर येथे असलेल्या महानगरपालिकेचे यानगृह, रेल्वेलगतच्या उड्डानपूल दरम्यान गेल्या काही वर्षात मोठ्या प्रमाणात झोपडपट्टया बांधण्यात आलेल्या आहेत. दि.7.3.13 रोजी पहाटेच्या सुमारास आग लागून 400 झोपड्या जळून खाक झाल्या. या आगीत 17 रहिवासी जखमी झाले. वांद्रू पूर्व येथील झोपडपट्टीतही अशीच आग लागली होती. वांद्रे पूर्व व पश्चिम भागात रेल्वे स्थानकाला लागून अनेक बहुमजली झोपडपट्टया बांधण्यात आल्या आहेत. या झ ोपडपट्टयात वास्तव्य करणाऱ्यांविरुध्द अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे भविष्यात तेथे कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती उद्‌भवणार असल्यामुळे वांद्रे पूर्व व पश्चिम भागात रेल्वेला समांतर असलेल्या सर्व अनधिकृत झोपड्या निष्कासित करण्याची कारवाई तातडीने करण्याची आवश्यकता असल्यामुळे सदर बाब मी औचित्याच्या मुद्याद्वारे मी उपस्थित करीत आहे.

-------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक राऊत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

धारावीच्या पुनर्विकासाचा प्रकल्प सुरु आहे त्यांना 400 चौ.फुटाचे हक्काचे घर मिळण्यासाठी समस्त धारावीकर एकजुटीने उभे राहिले आहेत. मागील पाच-सहा वर्षापासून ते लढा देत आहेत. मध्यंतरी शासनाच्या माध्यमातून त्या ठिकाणी छोट्याशा सेक्टरचे काम चालू झालेले आहे त्याबाबतीत धारावीकरांनी प्रखर विरोधी केलेला आहे.त्या आंदोलनाचा एक भाग म्हणून तेथील सामाजिक कार्यकर्ते दिलिप कटके आणि धारावी बजाच आंदोलनाचे कार्यकर्ते उपोषणाला बसलेले आहेत. शासनाने धारावीकरांच्या मनाचा आढावा घेण्याची आवश्यकता आहे. जे लोकांना हवे आहे ते देण्यासाठी शासनाने तत्पर राहून त्यांची 400 चौ.फुटाची जी मागणी आहे ती पूर्ण करावी अशी माझ ी शासनाला विनंती आहे.

---

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

माननीय नगरविकास राज्यमंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत. मी औचित्याच्या मुद्याद्वारे, अधिकारी आपल्या हातामध्ये किती अधिकार घेतात आणि मग कुणाला कसे जुमानत नाहीत हे निदर्शनास आणून देत आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये श्री. डोळे नावाचे आयुक्त आहेत. प्रोप्रायटर मंगेश एण्टरप्रायझेसची अधिकृत होर्डिंग्ज न पाडण्याबाबत कोर्टाने स्टे दिला. ती स्टे ऑडर डोळे यांना दिली.त्यावेळी मी पुण्यात होतो. मी त्यांना फोन केल्यानंतर त्यांनी दोन-तीन होर्डिंग्ज पाडली आणि नंतर ते थांबले. आज पुन्हा त्यांनी होर्डिंग्ज पाडायला सुरुवात केली. आज पुन्हा सकाळी त्यांना स्टे ऑर्डर पाठविली. खरे तर स्टे ऑर्डर दिल्यानंतर त्यांनी थांबायला पाहिजे. ते अधिकारी असे का करीत आहेत ? या आधी गृह खात्यामध्ये अधिकारी सुपारी घेऊन एकमेकांना मारायचे अधिका-यांकडून अधिका-यांचे कॉण्ट्रॅक्ट किलिग व्हायचे. या पद्धतीने समोरुन घ्यायचे आणि करायचे असे सुरु झालेले आहे. तेव्हा हे होर्डिंग पाडण्याचे थांबवून त्या अधिका-यांना येथे बोलावून त्यांना जाब विचारला पाहिजे.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



MSS/ पूर्वी श्री. खंदारे 12:20

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी मांडलेल्या पर्यावरण समितीच्या संदर्भात आणि माननीय विरोधी पक्षनेते यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्यासंदर्भात माननीय नगरविकास राज्यमंत्री उत्तर देत आहेत.

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी अतिशय चांगल्या प्रकारे सांगितले की जैवविविधतेच्या संदर्भात केन्द्र सरकारने जो निर्णय दिलेला आहे त्याची अंमलबजावणी होण्यासाठी महानगरपालिकेने त्या त्या समित्या स्थापन कराव्यात अशी त्यांनी मागणी केलेली आहे. आमच्या विभागामार्फत त्याची लगेच अंमलबजावणी होईल.

**उप सभापती** : आपली राज्य शासनाची जी पर्यावरण समिती आहे त्या समितीच्या बैठका सहा-सहा महिन्यांनी किंवा वर्षाने होतात. सगळे लोक त्यांच्याकडे खेटे मारत असतात. तेथे जे होते ते येथे होऊ नये. कामे जलद गतीने आटोपण्यास सांगावे. नाही तर एक वेगळे कुरण तयार होईल.

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी मांडलेल्या औचित्याच्या मुद्याच्या संदर्भात मी सांगू इच्छितो, तेथील होर्डिंग पॉलिसी संदर्भात हायकोर्टाने स्टे दिलेला आहे ही वस्तुस्थिती आहे. पण हे प्रकरण नेमके काय आहे हे तत्काळ पाहिले जाईल आणि तशा प्रकारची वस्तुस्थिती असेल तर ताबडतोब त्यांना सूचना देण्यात येतील.

---

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

गेल्या वर्षी दिनांक 9 ऑगस्ट 2012ला पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या जलवाहिनीच्या प्रकल्पाच्या संदर्भात तेथील शेतक-यांनी आंदोलन केले होते. त्यामध्ये मोरेश्वर साठे, श्यामराव तुपे आणि कांताबाई ठाकर हे तीन शेतकरी ठार झाले होते. त्या नंतर मावळ गोळीबारातील मृतांच्या नातेवाईकांना नोकरी देण्याचे आश्वासन सरकारने दिले होते. ही घटना होऊन दीड वर्षे झालेले आहे. तरी देखील मृतांच्या कुटुंबातील नातेवाईकांना अनुकंपातत्वावर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने नोकरीमध्ये सामावून घेतलेले नाही. माननीय नगरविकास राज्यमंत्री सभागृहामध्ये आहेत. माननीय गृहमंत्री सभागृहामध्ये आहेत. या दोन मुद्याकडे मी शासनाचे लक्ष वेधित आहे की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत मृतांच्या नातेवाईकांना अनुकंपा तत्वावर नोकरीत सामावून घेतले जाईल असे अशवासन मुख्यमंत्र्यांनी, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये दिले होते. सर्वपक्षीय नेत्यांनी तेथे भेटी दिल्या होत्या. तेव्हा नोकरीमध्ये सामावून घेण्यासंबंधीच्या आश्वासनाची अंमलबजावणी व्हावी.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

सभापती महोदय, दुसरा माझा मुद्दा असा आहे की, न्यायालयीन चौकशीचा अहवाल सरकारकडे सादर होऊन 7 महिने झालेले आहेत. परंतु सदर चौकशी आयोगाच्या अहवाल विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना सादर व्हावा व त्यावर चर्चा व्हावी. सभापती महोदय, आपण स्वत: भेटी देता, माननीय उप मुख्यमंत्री महोदय हे भेटी देतात, माननीय श्री.उध्दव ठाकरे साहेब भेटी देतात, माननीय श्री.राहुल गांधी यांनी भेट दिली आहे. त्यानंतर दीड वर्षाच्या कालावधीत त्या शेतकऱ्यांना नोकरी मिळाली नाही, त्या अहवालावर सभागृहातही चर्चा झाली नाही ही अतिशय गंभीर गोष्ट आहे.

**उप सभापती** : आपण आपला औचित्याचा मुद्दा मांडला आहे, त्यावर आपण कृपया भाषण करु नये.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मी भाषण करीत नाही. माझ्या मुद्यावर आपले निर्देश हवे आहेत.

**उप सभापती** : या तिघांना नोकरी देण्याबाबत मी या ठिकाणी जरुर सांगेन. ज्यांना नोकरी देण्याचे वचन दिले होते, त्याची प्रतिपूर्ती लवकर करण्यास हरकत नाही. हे राज्य शासनाचे आश्वासन आहे म्हणून मी सांगतो आहे.

------------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, अन्न व प्रशासन विभागाने जी.आर.काढला आहे. त्या जी.आर.मध्ये असे सांगण्यात आले आहे की, डॉक्टरांनी प्रिस्क्रिप्शन दिल्यानंतर एका प्रिस्क्रिप्शनवर एकच वेळा औषध मिळणार. त्यामुळे डॉक्टरांकडून पुन्हा पुन्हा प्रिस्क्रिप्शन लिहून घेण्यासाठी रुग्णांना वारंवार जावे लागेल. डायबेटिक्स, बी.पी.चे रुग्ण असतात, त्यांना कायम स्वरुपी औषधे घ्यावी लागतात. काही रुग्णांना तर आयुष्यभर औषधे घ्यावी लागतात. एका प्रिस्क्रिप्शन एकच वेळा औषधे मिळणार असल्यामुळे त्या रुग्णांना डॉक्टरांकडे वारंवार खेटे घालावे लागतील, त्या डॉक्टरांना पुन्हा पुन्हा कन्सल्टींग फी द्यावी लागेल. अन्न व औषध प्रशासनाचा हा नवीन जी.आर.आला आहे. तो जी.आर. राज्य सरकारने हस्तक्षेप करुन त्वरित मागे घेण्यास सांगावे आणि रुग्णांना या जी.आर.पासून वाचवावे.

-----------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

पृ.शी.: कन्नमवार नगर, विक्रोळी येथील म्हाडा वसाहतीमधील इमारतींवरील पाण्याच्या टाक्या दुरुस्त करणे बाबत.

पृ.शी.: कन्नमवार नगर, विक्रोळी येथील म्हाडा वसाहतीमधील इमारतींवरील पाण्याच्या टाक्या दुरुस्त करणे बाबत श्रीमती अलका देसाई यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्रीमती अलका देसाई यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे त्यांनी ती मांडावी.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"कन्नमवार नगर, विक्रोळी ही वसाहत महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाची वसाहत आहे. येथील 265 इमारती असून या वसाहतीची निर्मिती गेल्या 40 वर्षापासूर्वीची आहे. या इमारतींमध्ये पिण्याच्या पाण्यांच्या पाण्याच्या 6 टाक्या आहेत. परंतु गेल्या 40 वर्षापासून त्यांची अद्यापपर्यंत दुरुस्ती केली नसल्याने या टाक्याची अवस्था दयनीय झाली असल्याने त्या अतिशय खराब झालेल्या आहेत. त्यामुळे येथील रहिवाशांचे आरोग्यावर दुष्परिणाम होणे, सबब विक्रोळी वसाहतीच्या 265 इमारतींच्या टाक्यांची तातडीने दुरुस्त करण्याबाबत करावयाची कार्यवाही, अशा या अतिशय महत्वाच्या विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना मांडीत आहे, या बाबतीत शासनाने गांभीर्याने दखल घ्यावी अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

---------------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



ABG/ MMP/ D/ प्रथम श्री.शिगम 12:25

## नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

**उप सभापती** : आज नियम 289 अन्वये प्रस्ताचाची जी सूचना सन्माननीय सदस्यांकडून देण्यात आली होती. त्या सूचनेच्या अनुषंगाने मी निर्णय देत आहे.

आज सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे, श्री.रामनाथ मोते, श्री.चंद्रकांत पाटील, डॉ.रणजित पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेवर महाराष्ट्र विधान परिषद नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे, त्या प्रस्तावात माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांचा समावेश असल्यामुळे त्यावर सविस्तर चर्चा होईलच. त्यामुळे सदर नियम 289 च्या प्रस्तावाच्या सूचनेस मी अनुमती नाकारीत आहे.

--------------

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु.शी.**: नियम 93 च्या सूचना

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "कुकडी प्रकल्पाचे पाणी तलावात सोडले जात नसल्यामुळे करमाळा तालुक्यातील अनेक गावांना पिण्याच्या पाण्याचा व जनावरांच्या चाऱ्यांचा निर्माण झालेला प्रश्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबतीत शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.जयंत पाटील यांनी " अंबरनाथ भास्करनगर कै.भाऊसाहेब भोर विद्यालयातील शाळेच्या आवारात दिनांक 14 मार्च, 2013 रोजी ब्रिलियंट क्लासेसचा संचालक फिरोज अब्दुल माजीत खान हा 10 वीच्या बीजगणित विषयाचा पेपर विकत असल्याची घडलेली घटना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबतीत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी "अनुसूचित जमातीतील जातीच्या लोकांना प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र मिळण्यास येत असलेल्या अडचणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबतीत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "मुंबई मरीन लाईन्स येथील रेल्वेच्या गेस्ट हाऊसमध्ये सेक्स रॅकेट चालवित असल्याची निदर्शनास आलेली बाब" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबतीत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी "नीट (नॅशनल इंसिजिबिलीटी एन्ट्रन्स टेस्ट) ही परीक्षा वैद्यकीय प्रवेशासाठी केंद्राने ठरवणे पण हया प्रवेश परीक्षेसाठी प्रवेश परीक्षा होऊनही अजूनही कोर्टात ही बाब असल्यामुळे विद्यार्थी व पालक चिंतेत असणे"या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबतीत शासनाने निवेदन करावे.

6...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.चंद्रकांत पाटील यांनी मुंबईसह राज्यातील अनेक शहरांमधील जैविक कचऱ्यात समाविष्ठ असलेल्या सॅनिटरी नॅपकिन्सचे विघटन करण्यासाठी बायोडिग्रेटेबल रॅपर्स पुरविण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबतीत शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी मौजे अंबविली,ता.अंधेरी, जि.मुंबई उपनगर येथील समशेर सिध्दीकी याच्या मालकीच्या जमिनीवर म्हाडाने बेकायदेशीररित्या अतिक्रमण करुन भूखंड विकणे, सदर प्रकरणी चौकशी अहवाल सादर करण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या बाबतीत शासनाने निवेदन करावे.

आता लक्षवेधी सूचना चर्चेला घेण्यात येतील. सर्वप्रथम मी तिसरी लक्षवेधी सूचना चर्चेला घेत आहे.

------

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ गितेनंतर 12:30

**पृ.शी.**: नवी मुंबई परिसरातील बांगलादेशी नागरिकांनी पोलीस पथकावर केलेला हल्ला

**मु.शी.**: नवी मुंबई परिसरातील बांगलादेशी नागरिकांनी पोलीस पथकावर केलेला हल्ला याबाबत श्रीमती अलका देसाई, सर्वश्री सुभाष चव्हाण, संजय दत्त, किरण पावसकर, जयवंतराव जाधव, अनिल भोसले, डॉ.नीलम गोऱ्हे, सर्वश्री विनायक राऊत, चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, राणा जगजितसिंह पाटील, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विजय गिरकर, हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 105 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"दिनांक २५ फेब्रुवारी, २०१३ रोजी नवी मुंबईतील खारघर मधील ओवे गावात बांगलादेशीयांना पकडण्यासाठी गेलेल्या सीआयडीच्या पथकावर १० ते २० जणांच्या जमावाने लोखंडी सळ्या आणि लाठ्या-काठ्यांनी हल्ला करण्याची घटना घडणे, मुंबई पुणेसह इतर महत्त्वाच्या शहरामध्ये दहशतवादी हल्ले घडविण्याची शक्यता असण्याचा अहवाल केंद्रीय गुप्तचर विभागाला मिळणे, राज्यातील गडचिरोली, गोंदिया जिल्ह्यात चिनी प्रवाशांची तसेच कोकणातील रायगड जिल्ह्यात कोरियन नागरिकांची संख्या वाढत असून राज्यात अशाप्रकारे वाढलेल्या चिनी, कोरियन, पाकिस्तानी, बांगलादेशी व अफगाणिस्तानी नागरिकांच्या संख्येमुळे सुरक्षेचा प्रश्न निर्माण होणे या नागरिकाची तातडीने चौकशी करुन त्यांना आपल्या मायदेशी पाठवण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही."

श्री.आर.आर.पाटील (गृहमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

......2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ल.वे.सूचना क्रमांक-3..........

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, दिनांक 25.2.2013 रोजी नवी मुंबईतील खारघर येथील ओवे गावात बांगलादेशी नागरिकांना पकडण्यासाठी गेलेल्या सीआयडी पथकावर 10 ते 20 जणांच्या जमावाने लोखंडी सळ्यांनी हल्ला चढविला. निवेदनात म्हटले आहे की, आरोपींचा यापूर्वी कोणत्या गुन्ह्यामध्ये सहभाग होता असे आढळून आलेले नाही. त्यांचा पूर्वी कोणत्या गुन्ह्यामध्ये सहभाग नसेल तर त्यांनी पोलिसांवर हल्ला चढविण्याची हिंमत कशी केली? ते चेंडू फळी खेळत होते का? जे पोलिसांवर हल्ला करतात, ते काहीही करु शकतात याचे हे द्योतक आहे. नवी मुंबई परिसरात मोठया प्रमाणात बांगलादेशी नागरिक आढळून येत आहेत. त्या भागात बिल्डींग व्यवसाय मोठया प्रमाणात वाढीला लागला असल्यामुळे इमारत बांधकामात या बांगलादेशी नागरिकांना कामावर घेतले जाते. ज्या बिल्डरांकडून बांगलादेशी नागरिकांना काम पुरविले जाते त्यांच्यावर शासन कारवाई करणार आहे का?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी सभागृहाला दिलेली माहिती अगदी सत्य आहे. या बांगलादेशी नागरिकांना इमारतीच्या बांधकामाकरिता मजूर म्हणून ठेवून घेण्यात आले होते. यांचा देशातील प्रवेश अनधिकृतपणाचा आहे. पोलिसांना ही माहिती मिळाल्यानंतर रात्री 12.30 वाजता रेड घालून त्यांना ताब्यात घेतले. आणखी काही बांगलादेशी नागरिक त्या परिसरात राहतात अशी माहिती पकडलेल्या आरोपींकडून पोलिसांना मिळाली होती. त्यांना शोधण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकावर हल्ला झाला. आरोपींची पोलीस कस्टडी पूर्ण झालेली असून सध्या हे सर्व आरोपी मॅजिस्ट्रेट कस्टडीत आहेत. सर्व गोष्टीचा तपास सुरु असून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे मदत करणारे जे कोणी असतील त्यांच्यावर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सभापती महोदय, मागील दोन-तीन वर्षापेक्षा यावर्षी जे लोक बांगलादेशातून अनधिकृतपणे बांधकाम व्यवसायात मजूर म्हणून येत आहेत त्यांच्यावर मोठया प्रमाणात पोलिसांनी कारवाई केली आहे. 2012 मध्ये 2234 बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतल्यानंतर पोलीस त्यांना सरळ बांगलादेशात नेऊन सोडू शकत नाहीत. हे आपल्या देशाचे नागरिक नाहीत, परकीय

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ गितेनंतर 12:30

श्री.आर.आर.पाटील...........

नागरिक आहेत, अनधिकृतपणे देशात प्रवेश केला आहे हे कोर्टात सिध्द करावे लागते. कोर्टात सिध्द करुन या नागरिकांना त्यांच्या देशात नेऊन सोडले जाते. गेल्या वर्षभरात 2234 बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेतले असून त्यापैकी 569 नागरिकांना बांगलादेशात नेऊन सोडण्याचे काम पोलिसांनी केले आहे. उर्वरित लोकांबाबत कोर्ट प्रोसेस सुरु आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

अस्धारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ बांधकाम व्यावसायिकांसाठीच आहे असे नाही तर मुंबईमध्ये अनेक परदेशी कंपन्या बांधकामांचे काम करीत आहेत. या कंपन्या बाहेरच्या देशातील लोकांना मोठया प्रमाणात मुंबईमध्ये आणीत आहेत. या ठिकाणी सांगण्यात आले की, सन 2012 मध्ये 143 गुन्हे दाखल करण्यात आले. 279 लोकांना मायदेशी धाडण्यात आले. परंतु एवढीच संख्या नसून ही संख्या काही लाखांमध्ये जाण्याची शक्यता आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, सर्वच लोकांना पोलीस मायदेशी पाठवू शकत नाहीत. आपल्याकडे व्हीसा नसतांना आपण दुसऱ्या देशात गेलो तर आपल्याला ताबडतोब डिपोर्ट केले जाते. केंद्राच्या माध्यमातून या संदर्भात कायद्यामध्ये बदल घडवून आणण्याची आवश्यकता आहे. मुंबईमध्ये आज जे बांगलादेशी कामगार येतात त्यांची संख्या लाखोंमध्ये गेलेली आहे. त्यामुळे यासंदर्भात शासन काही ठोस कारवाई निवडणूक प्रक्रिया सुरु होण्याच्या अगोदर सुरु करणार आहे काय ? निवडणुकीच्या अगोदर बांगलादेशींवर कारवाई केली नाही तर हे लोक रेशनकार्ड तसेच लायसन्स बनवून बोगस मतदार होतील त्यामुळे ज्या बांधकाम कंपन्या परदेशी मजुरांना जास्त प्रमाणात आणतात अशा कंपन्यांवर कारवाई केली तर या प्रश्नाचे समूळ उच्चाटन होऊ शकेल त्यामुळे या संदर्भात शासन कायद्यामध्ये काही सुधारणा करणार आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, विशेषत: बांगालादेश व पाकिस्तानमधून आपल्या देशात अनाधिकृतपणे प्रवेश करुन त्या लोकांनी येथे वास्तव करु नये म्हणून इंटेलिजन्स विभागामध्ये याच कामासाठी "आय" शाखा गठीत केलेली आहे. या संदर्भात गेल्या वर्षी सर्वाधिक केसेस आहेत. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली बाब खरी आहे की, परदेशातील बरेच लोक आपल्या देशात अनाधिकृतपणे प्रवेश करीत आहेत. प्रवेश करतांना पोलिसांच्याही काही अडचणी आहेत. हे लोक पहिल्यांदा पश्चिम बंगालमध्ये येतात. या लोकांची भाषा बंगाली असून ते आपल्या सारखेच दिसणारे आहेत. आम्ही या या गावाचे रहिवासी असल्याचे तेथील सरपंचाचे प्रमाणपत्र घेऊन ते लोक येथे येतात. त्या आधारावर त्यांचे मतदार यादीत नाव येते, पॅनकार्ड निघते, ड्रायव्हींग लायसन निघते. परंतु पोलिसांच्या सखोल चौकशीमध्ये या लोकांना प्रोत्साहन देणारे एजंट आढळून आलेले आहेत तसेच या लोकांना सहकार्य करणारे शासकीय कर्मचारी सुध्दा

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील......

आढळून आलेले आहेत. त्यामुळे या लोकांना प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत करणारे जे कोणी आहेत त्यांच्यावर यंत्रणेने सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची आवश्यकता आहे. परंतु वर वरची कागदपत्रे बघून या लोकांना थेट प्रवेश दिला जात असेल, लायसन दिले जात असेल तर अशा प्रोत्साहन देणाऱ्या अधिकाऱ्यांवरही कारवाई केली जाईल. यामध्ये जे एजंट काम करीत आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यात आलेली आहे. बांधकाम व्यवसायामध्ये जे मजूर ठेकेदार आहेत ते अशा गोष्टींना प्रोत्साहन देत असतात. गेल्यावर्षी अशा 30 लोकांवर कारवाई सुध्दा करण्यात आलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, हा विषय केवळ बंगाली मजुरांच्याच बाबतीतील नाही तर पश्चिम बंगाल मधून मोठया प्रमाणात मुलींचे व्यवहार होतात, मजूर येतात व मोठया प्रमाणात व्यापार करणारे लोक येतात. त्यामुळे अशा रितीने बॉर्डरवरुन भारतात सहज प्रवेश मिळतो ही गंभीर बाब आहे. तेथून मजूर, महिला आणल्या व काही लोक त्या मुलींना फसवून वेश्या व्यवसायात ढकलतात हे सिध्द झालेले आहे. हा विषय अतिशय गंभीर असल्यामुळे केवळ मजूर हा विषय न ठेवता बांगला देशींचा महाराष्ट्रात आज जो मोठया प्रमाणात प्रवेश होत आहे त्यांना कोणत्याही प्रकारे लायसन्स किंवा राहण्यासाठी सोय केली जाणार नाही तसेच हे लोक महाराष्ट्रात येणार नाही यासाठी शासन कोणती ठोस उपाययोजना करणार आहे ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, दिल्लीमध्ये झालेल्या वेगवेगळया बैठकीमध्ये बांगलादेशी किंवा कोणत्याही परकीय नागरिकाने एकदा भारतामध्ये प्रवेश केल्यानंतर, येथील गर्दीमध्ये मिसळल्यानंतर त्यांना शोधून काढणे अवघड जात असते. हे लोक आपल्या देशाचे नसून दुसऱ्या देशाचे आहेत हे कोर्टासमोर सिध्द करणे या सर्व विलंब लागणाऱ्या गोष्टी आहेत. त्यामुळे या संदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाला विनंती केली आहे की, हे लोक सीमेच्या आत येणार नाही, अशा पध्दतीच्या दक्षता घेणे आवश्यक आहे. आपल्याकडे ज्या प्रमाणे मजूर आणले जातात त्या प्रमाणे वेश्या व्यवसायामध्ये मुलींना कामाला लावले जाते.

यानंतर श्री. भारवि....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

त्या मुलींचा गैरवापर केला जात आहे. त्यांच्यावर अन्याय केले जात आहेत. ही माहिती पोलिसांना असून त्या मुली देखील पोलिसानां आढळून आलेल्या आहेत. ही संख्या फार मोठी आहे. या मुलींना अटक केल्यानंतर त्यांना ठेवायचे कुठे ही देखील पोलिसांसमोर मोठी अडचण आहे. आज संक्रमण शिबिर देखील नाही. त्यामुळे अशा मुलींची व्यवस्था करण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. अशा प्रकारे या परदेशी नागरिकांना आणले जात आहे. या बहुतांशी लोकांची भाषा बंगाली आहे. एखाद्या चुकीच्या माणसाला पकडले की, अनेक एनजीओ उठतात आणि देशाच्या नागरिकांना पकडले असा आरोप करून पोलिसांना रॉंग बॉक्समध्ये टाकण्याचा प्रयत्न करतात. एवढेच नव्हे तर पोलिसांवर टीकाटीपणी करून त्यांना नाउमेद केले जाते. पश्चिम बंगालमधून सरपंचाचे प्रमाणपत्र घेऊन आल्यानंतर त्याची शहानिशा करण्यामध्ये वेळ जातो. आज बांगलादेशी नागरिक मोठ्या संख्येने येत आहेत ही गोष्ट खरी आहे. त्यांना सीमेवरच रोखण्याची आवश्यकता आहे. पण केंद्र सरकारच्या सुद्धा काही अडचणी आहेत. ती सीमा फारच पुअर आहे. तेथे कुठलेही भौगोलिक डीमार्केशन नाही. तेथे नदी किंवा पर्वत नाही. येथील काही गावांचा भाग बांगलादेशात आहे, तर काही भाग भारतात आहे. भारतामध्ये राहणाऱ्यांच्या शेतजमिनी पूर्वापारपणे बांगला देशात आहेत. त्यांचे नातेवाईक तेथे आहेत. त्यामुळे त्यांना येथे यायला मोठ्या प्रमाणावर स्कोप मिळतो. त्या परिसरातील गुप्तचर यंत्रणा मजबूत केली पाहिजे. ते नागरिक येथे पोचल्यानंतर त्यांना अटक करण्यापेक्षा ते येणार नाहीत या गोष्टीची दक्षता घेणे आवश्यक आहे. ही बाब आम्ही केंद्र सरकारच्या सुद्धा लक्षात आणून दिलेली आहे. जे लोक येथ पर्यंत येऊन पोहोचले आहेत, जरी त्यांच्याकडे पॅन कार्ड, ड्रायव्हींग लायसेन्स, रेशकार्ड, मतदार यादी ओळखपत्र असले तरी सुद्धा अत्यंत कठोरपणाने व्हेरिफिकेशन करून परदेशी नागरिकांना घालविण्याची भूमिका पोलिसांनी स्वीकारलेली आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, फार महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. माझा असा प्रश्न आहे की,.....

**उप सभापती** : या लक्षवेधी सूचनेवरील चर्चा फार लांबलेली आहे. त्यामुळे मी आता आपणास संधी देणार नाही. आता मी सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनाच शेवटचा प्रश्न विचारण्यासाठी संधी देणार आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझा शेवटचा प्रश्न आहे. ...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांना माझी विनंती आहे की, माझा शेवटचा प्रश्न आहे असे बोलून आपण नेहमी माझ्या अंगावर का येता ? माझ्या समोर आणखी लक्षवेधी सूचना देखील आहेत.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मला परवानगी मागण्याचा अधिकार नाही काय ?

**उप सभापती** : मी आपणास अनुमती दिलेली नाही.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, आपण माझा खेद नोंदवून घ्यावा.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. त्यासंबंधी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी जेन्युईन प्रॉब्लेमचा उल्लेख केलेला आहे. बांगला देशी नागरिक सहजरित्या बॉर्डर क्रॉस करून येतात. ते भारतीय लोकांसारखेच दिसतात. ही सर्व वस्तुस्थिती आहे. हा विषय गंभीर आहे. बांगला देशी हे अँटी सोशल आणि अँटी नॅशनल ॲक्टीव्हीटीमध्ये देखील गुंतल्याचे निदर्शनास आलेले आहे. मुंबईमध्ये सर्व रिसोर्स उपलब्ध असल्यामुळे देशाच्या कुठल्याही भागामध्ये जाण्या पेक्षा ते मुंबईत आकर्षित होतात. पोलिसांच्या गुप्तचर विभागाला मुंबई, पुण्याच्या कुठल्या भागामध्ये बांगलादेशी वास्तव्य करून आहेत याची कल्पना असते. तेव्हा बांगलादेशी नागरिकांना लोकेट करून त्यांच्या विरूद्ध विशेष मोहीम उघडून कारवाई करण्याचा विचार शासन करणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, यात काम करताना पोलिसांना येणाऱ्या व्यावहारिक अडचणी सुद्धा सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त साहेब आपण समजून घेतल्या पाहिजेत. परदेशी नागरिकांना घालविले पाहिजे यात दुमत नाही. एखाद्या भारतीय नागरिकाच्या घराची झडती घेतली तर त्यांना अपमान झाल्या सारखे वाटते. त्यांची प्रतिक्रिया येते. त्यामुळे दोन्ही बाजूने पोलिसांना अडचणी आहेत. तरी सुद्धा गुप्तचर यंत्रणेच्या बेसवर आपण आता पर्यंत कधीही केल्या नव्हत्या एवढ्या मोठ्या प्रमाणावर कारवाई केलेली आहे. येथे येणाऱ्या परदेशी नागरिकांवर आपण कारवाई करतो आहोतच. पण त्यांना येथे येण्यासाठी जे प्रोत्साहन देणारे आहेत, येथे आल्यानंतर त्यांना जे मदत करणारे शासकीय यंत्रणेतील जे लोक आहेत त्यांच्यावर देखील कठोरपणाने कारवाई करण्याच्या सूचना मी दिलेल्या आहेत.

यानंतर श्री.अजित...

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील.....

सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात राज्य शासन आणि पोलीस दल अतिशय गंभीर आहे म्हणून पोलीस विभागाने गेल्या वर्षी सर्वाधिक कारवाया केलेल्या आहेत. या घटनेमध्ये पोलिसांना रात्री 1.30 वाजता माहिती मिळाल्यानंतर पोलीस घटनास्थळी पोहोचले. याचा अर्थ पोलीस कारवाई करीत आहेत, घटनास्थळी जात आहेत, कोर्टात जाऊन परदेशी नागरिक असल्याचे पुरावे देऊन त्यांना परदेशी पाठवित आहेत. आय शाखेतील कर्मचाऱ्यांची संख्या वाढविणे, त्यांना पाठबळ देणाऱ्या यंत्रणा आणखी सक्षम करणे आणि परदेशी नागरिकांना या ठिकाणी येण्यासाठी जे लोक मदत करीत त्यांच्यावर कठोर कारवाई करणे अशाप्रकारच्या उपाय योजना करण्याचे शासनाने ठरविलेले आहे.

---------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : मुंबईत कचरा वेचणाऱ्यांच्या रोजीरोटीवर आलेली गदा

**मु. शी.** : मुंबईत कचरा वेचणाऱ्यांच्या रोजीरोटीवर आलेली गदा या संबंधी श्रीमती विद्या चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुंबईत कचरा वेचण्याच्या कामात खाजगी कंपन्या व ठेकेदारांची घुसखोरी वाढणे, डंपिंग ग्राऊंडवर पूर्वापार कचरा वेचायला जाणाऱ्या महिलांना वारंवार धमकावणे, सुका कचरा - प्लॅस्टिक, काच, पत्रे अशा वस्तू आधीच लंपास करणे, यामुळे या महिलांच्या रोजीरोटीवर गदा येणे, परिणामी या महिलांपुढे उपजीविकेचा प्रश्न उभा राहणे, मुंबईतील कचऱ्याचे वेचन करुन पर्यावरणाचे रक्षण करणाऱ्या या महिलांना शासनाचे कोणतेच सहकार्य नसणे, त्यांना आरोग्याबाबत कोणतीही सुविधा मिळत नसणे, या महिलांना शासनाकडून संरक्षण व त्यांना आरोग्य सुविधा देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया. "

श्री. भास्कर जाधव ( नगर विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मुंबई आणि मोठ्या शहरामध्ये कचरा वेचणाऱ्यांच्या समस्या वाढल्या आहेत. कचरा, कागद, प्लास्टिक आणि इतर वस्तू वेचणाऱ्यांमध्ये विशेषत: मागसवर्गीय आणि दलित महिला आहेत. त्या सर्व महिला अत्यंत गरीब असून त्या झ ोपडपट्टयांमध्ये राहत आहेत. या महिला रोज सकाळी 5.30 वाजता कचरा गोळा करण्यासाठी बाहेर पडतात. या महिला शहरातील कचरा वेचण्याचे महत्वाचे काम करीत आहेत.

सभापती महोदय, घटनेच्या अनुच्छेद 46 नुसार अनुसूचित जाती जमातीतील वर्गाचे आर्थिक आणि शैक्षणिक हितसंबंध जोपासण्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. परंतु शासन त्यांच्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना करीत नाहीत हे मला येथे खेदाने नमूद करावेसे वाटते. मागासवर्गीय लोकांना न्याय देण्यासाठी शासनाचा सामाजिक न्याय विभाग आहे त्याशिवाय तीन-चार महामंडळे आहेत. या महामंडळांना शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मिळतो. या महामंडळांमार्फत दलित आणि मागासवर्गीय महिलांसाठी विशेष मोहीम राबवून त्यांना सुविधा देणे शासनास सहज शक्य आहे.

सभापती महोदय, महानगरपालिका, नगरपालिका आणि जिल्हापरिषदांमार्फत राज्य स्तरीय औद्योगिक फेडरेशनची स्थापना केली तर या महिलांना चांगल्या प्रकारे काम देता येईल. मुंबई महानगर पालिकेचे 27 हजार कोटी रुपयांचे बजेट आहे. डम्पींग ग्राऊंडवर कचऱ्याची गाडी नेण्यासाठी प्रत्येक फेरीला हजार रुपये दिले जातात. निवेदनात नमूद करण्यात आलेले की, 25 वर्षाचा ठेका दिलेला आहे. कचरा वेचण्याचा ठेका दिल्यामुळे कचरा वेचणाऱ्या महिलांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. त्यांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळत नाही. त्यांना कोणत्याही प्रकारच्या सुविधा नाहीत. तेव्हा कचरा वेचणाऱ्या महिलांसाठी शासन स्पेशल ड्राईव्ह घेऊन त्या प्रमाणे उपाययोजना करणार आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मुंबई शहरात जवळपास सहा ते सात हजार टन कचरा गोळा होता. प्लास्टीक,प्लास्टीकच्या बाटल्या, काचेच्या बाटल्या वेचण्याचे काम करणाऱ्या महिलांपुरती ही लक्षवेधी मर्यादित आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की,त्या मागासवर्गीय समाजातील आहेत, परंतु या ठिकाणी अशा प्रकारची कोणतीही वर्गवारी केलेली नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ पूर्वी श्री.अजित... 12:50

श्री.भास्कर जाधव....

साधारणपणे हे काम एका विशिष्ट वर्गाच्याच लोकांनी, महिलांनी करावे अशा प्रकारचे कोठेही बंधन वा अट नाही. ही गोष्ट खरी आहे की, हे थोडेसे घाणीमध्ये करावयाचे काम आहे. महानगरपालिकेने सुवर्ण जयंती रोजगार योजनेंतर्गत 157 महिला बचत गट रजिस्टर केले आहेत. त्यामध्ये 1,658 महिला आहेत. या महिला बचत गटांना 13 वॉर्डमध्ये 5-6 गट मिळून महिलांचा एक गट तयार केला आहे. प्रत्येक गटाला कचरा वेचण्यासाठी 8 तासासाठी एक टेंपो दिला आहे. त्या टेंपोचे दिवसाचे भाडे 800 रुपये असून, तो खर्च महानगरपालिकेच्या वतीने केला जातो. माझ्याकडे असलेल्या माहितीनुसार एका गटाला महिन्याला 1 लाख रुपयांचे उत्पन्न त्यातून मिळते. शिवाय 11 ठिकाणी कचऱ्यावर प्रक्रिया करणारे शेड्स त्यांना उपलब्ध करुन दिलेले आहेत. 25 वर्षासाठी अशा प्रकारचे टेंडर दिले आहे. त्या ठिकाणी 2300 महिलांना कायमस्वरुपी रोजगार द्यावा अशा प्रकारची अट घालून त्या महिलांचे पुनर्वसन करण्याची आणि रोजगाराची जास्तीत जास्त हमी घेण्यात आलेली आहे. सन्माननीय सदस्या ज्या संघटनेबाबत सांगत आहेत ते कोणत्याही प्रकारे रजिस्टर नाही.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

ॲड.आशिष शेलार : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी सविस्तर उत्तर देण्याचा प्रयत्न केला आहे. या निमित्ताने मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, मुंबई शहरामध्ये रॅक पीकर्सच्या मोठ्या प्रमाणावर वसाहती आहेत. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले की, रॅक पीकर्स आयडेंटीफाईड संस्थांमध्ये काम करीत नाहीत. कदाचित ते खरे असेल. परंतु मुंबई महानगरपालिकेला मुंबईतील वेगवेगळ्या ठिकाणी असलेल्या रॅक पीकर्सच्या झोपडपट्या, वस्त्या नक्की माहीत आहेत. मी स्पेसिफिक विचारतो की, म्युनिसीपल सॉलिड वेस्ट मॅनेजमेट रुल अंतर्गत रॅक पीकर्सना पर्यावरण मित्र म्हणून घोषित करण्याची तरतूद आहे. त्यानुसार त्यांना पर्यावरण मित्र म्हणून घोषित करण्यात येईल काय ? एमएसडब्ल्यू रुल खाली सर्वांचे पुनर्वसन करणे आवश्यक आहे. माननीय राज्यमंत्र्यांनी देवनारच्या डंपिंग ग्राऊंडच्या ठेकेदाराबद्दल सांगितले. ती चांगली गोष्ट आहे. परंतु रॅक पीकर्सच्या मुलांसाठी शाळा, पुनर्वसन केंद्र, मेडीकल सेंटर बांधणे आवश्यक आहे. तसेच मुंबई शहरामध्ये रॅक पीकर्सना पर्यावरण मित्र म्हणून घोषित केल्यानंतर त्यांचे पुनर्वसन केले पाहिजे अशी तरतूद एमएसडब्ल्यू रुलमध्ये आहे. अशा प्रकारचे

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

पुनर्वसन करण्यास प्रशासनाला बाध्य करण्यात येईल काय ? तसेच रॅक पीकर्सच्या वस्त्यांमध्ये मेडीकल हेल्थच्या सुविधा पोहोचविण्याची तरतूद एमएसडब्ल्यू रुलमध्ये असतानाही ती केली जात नाही. त्यामुळे अशा प्रकारची तरतूद करण्याचे बंधन महानगरपालिकेवर टाकण्यात येईल काय ?

श्री.भास्कर जाधव : महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी महानगरपालिकेत नगरसेवक म्हणून चांगले काम केले आहे. त्यांनी सांगितलेली माहिती मी स्वत: काळजीपूर्वक ऐकत होतो. त्यांचे तिन्ही प्रश्न मुंबई महानगरपालिका प्रशासनाशी संबंधित आहेत. मुंबई महानगरपालिकेने या संदर्भातील निर्णय घेणे आवश्यक आहे. मी सन्माननीय सदस्यांना सुरुवातीलाच सांगू इच्छितो की, आपण सांगितलेली माहिती तपासून पाहिली जाईल. आपण सांगितल्यानुसार रुलमध्ये तरतूद असून सुध्दा महानगरपालिकेने त्याची अंमलबजावणी केली नसेल तर महानगरपालिकेला तशी अंमलबजावणी करण्यास भाग पाडले जाईलच. परंतु अशा पध्दतीने मुंबई महानगरपालिकेने महिलांकडे दुर्लक्ष करुन मानवतावादी दृष्टिकोन बाजूला सारला असेल किंवा या लोकांवर अन्याय केला असेल तर महानगरपालिकेला समज सुध्दा दिली जाईल.

श्री.किरण पावसकर : महोदय, गोळा होणारा कचरा, त्यासाठी दिलेली जागा आणि ठेकेदार या संदर्भातील संख्या माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितली. माननीय राज्यमंत्र्यांनी कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या कामगारांची जी संख्या सांगितली ती अपुरी आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ...

त्यासाठी नियमानुसार ठेवलेली माणसे आणि कॉन्ट्रॅक्ट झाल्यानंतर सबकॉन्ट्रॅक्चुअल केलेली जी सिस्टिम आहे त्या सिस्टिममध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या पुष्कळ आहे. लोकांच्या मनात अशी भीती आहे की, या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी सुक्या आणि ओल्या कचऱ्यातून वीज निर्मितीसाठी हा कचरा वापरला जाणार आहे, त्यासाठी मोठ्या कंपन्यांशी महानगरपालिकेच्या चर्चा चालू आहेत आणि त्यांच्याकडे हे सर्व काम गेल्यानंतर आपल्याकडे दुर्लक्ष केले जाईल. कचऱ्याची विल्हेवाट लागली पाहिजे, त्यातून वीज निर्मिती झाली पाहिजे पण ज्या फिगर आणि फॅक्टस् शासनाकडे आणि महानगरपालिकेकडे आहेत त्या कॉन्ट्रॅक्टच्या आणि असलेल्या कागदावरच्या आहेत. त्याहीपेक्षा सबकॉन्ट्रॅक्चुअल सिस्टिम करुन एवढा मोठा कचरा उचलण्यासाठी जी मोठी यंत्रणा वापरली जाते त्यांच्यासाठी महानगरपालिका काही करणार आहे का ? त्यांच्यावर कारवाई करण्यापेक्षा या मोठ्या संख्येने असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत काही करणार का ? त्यांना फक्त समज देऊन भागणार नाही. वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी ठोस कार्यवाही करणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड. आशिष शेलार यांच्या प्रश्नाला उत्तर देतांनाच मी सांगितले की, मुंबई महानगरपालिकेने यासंदर्भात दुर्लक्ष केलेले आहे. त्यांच्याकडून ते काम करुन घेतले जाईल असे मी सांगितले. त्याच पध्दतीने त्यांना समज दिली जाईल याचा अर्थ असा की, मुंबई महानगरपालिकेला शासनाची नाराजी कळविली जाईल. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या कॉन्ट्रॅक्टरला 25 वर्षाकरिता हे कॉन्ट्रॅक्ट दिलेले आहे. तो कॉन्ट्रॅक्टर किंवा जी एजन्सी आहे ती सुध्दा या कचरा खत प्रकल्पामध्ये फार चुकीचे काम करीत आहे, ही बाब सुध्दा शासनाच लक्षात आलेली आहे. परंतु मुंबई महानगरपालिकेने तो निर्णय स्वतंत्रपणे घेतला असल्यामुळे शासनाने त्यात हस्तक्षेप केला तर मुंबई महानगरपालिका राज्यकर्त्या पक्षाकडे नाही म्हणून शासन कारवाई करते अशा प्रकारची भूमिका किंवा असा संदेश लोकांमध्ये जाऊ नये याकरिता काळजी घेतली जाते. परंतु त्यांनी 2300 कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी घ्यावे असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. त्यामध्ये अट आहेच. महानगरपालिकेकडून त्या अटीची पूर्तता केली जाईल याची सुध्दा दखल शासनाकडून निश्चितपणे घेतली जाईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी असा उल्लेख केला की, महानगरपालिकेचा कॉन्ट्रॅक्टर चुकीचे काम करीत आहे. त्याची शहानिशा शासन करु शकते. त्याबाबत मला बोलावयाचे नाही. त्यांनी असे विधान केले की, एजन्सी चुकीचे काम करते. या ठिकाणी कलेक्शनचा विषय सुरु आहे. कचरा रॅकपिकर्स कलेक्ट करतात आणि सेपरेट करतात त्या बद्दलची चर्चा या ठिकाणी चालू आहे. त्यांनी तो विषय या ठिकाणी डायव्हर्ट केला आणि विचारले की, डम्पीन्ग ग्राऊंटच्या ट्रिटमेंटचा कॉन्ट्रॅक्टर काय करीत आहे ? या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत. मुंबई शहरामध्ये कचरा कलेक्शनचे काम ॲंथनी यांना दिलेले आहे आणि ते नीट काम करीत आहेत की नाही हा मुद्दा आहे. कॉन्ट्रॅक्ट काय करतो असा मुद्दा उपस्थित करण्यात आला. हे दोन्ही विषय वेगवेगळे आहेत.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मघाशी माननीय मत्र्यांनी असे उत्तर दिली की, ते काम महिलांनाच द्यावे याची सक्ती करणार आहोत. म्हणजे शासन उपकार करीत नाही. मला असे सांगावयाचे आहे की, दुसरे कोणी कचरा उचलण्याचे कामच करणार नाही. महिलांना काम देता म्हणजे उपकार करता का ? दुसरे कोणीही कचरा उचलण्याचे काम करीत नाही. त्यांना महिलांशिवाय पर्याय नाही. त्यामुळे हे 25 वर्षाचे जे टेंडर दिलेले आहे ते चुकीचे आहे. महानगरपालिकेमध्ये कोणाची सत्ता आहे ते महत्वाचे नाही. राज्य शासन म्हणून आपली काय भूमिका आहे ? ज्या ठिकाणी चुकीचे काम चालले आहे त्या ठिकाणी हस्तक्षेप करुन ते ताबडतोब रद्द करावे. जर ते रद्द करणार नसाल तर या कचरा वेचणाऱ्या ज्या दलित आणि मागासवर्गीय महिला आहेत त्यांच्यावर हा अन्याय आहे. अशी अन्यायकारक भूमिका राज्य शासनाने घेता कामा नये. याबाबत शासनाकडून आम्हाला ठोस उत्तर पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण या सातत्याने महिलांकरिता, झोपडपट्टीवासीयांसाठी, दलितांसाठी, मागासवर्गीयांसाठी काम करतात याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. त्यांच्या सद्भावनांबद्दल शंका घेण्याचे कारण नाही. परंतु त्यांनी त्यांच्या भावना व्यक्त करीत असताना कोणताही प्रश्न विचारलेला नाही. त्यांनी सदनाला माहिती दिली आहे. त्यानंतर सन्माननीय सदस्य श्री.आशिष शेलार यांनी एमएसडब्ल्यू अंतर्गत 3 महत्वाचे प्रश्न विचारले आहेत. त्यांनी असे म्हटले की, या कामगारांसाठी वैद्यकीय सेवा उपलब्ध केली पाहिजे, शाळा सुरु केल्या पाहिजेत. या चांगल्या प्रश्नांबाबत मी सांगितले होते की, यासंबंधी महानगरपालिकेने दुर्लक्ष केले असेल तर शासनाकडून त्यात लक्ष घातले जाईल. त्या गोष्टी करण्यासाठी त्यांना भाग पाडण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी कॉन्ट्रॅक्टर व सब कॉन्ट्रॅक्टरबाबत प्रश्न विचारला आहे. पण त्या करारामध्ये 2300 महिलांना त्यांनी कायम स्वरुपी घेतले पाहिजे अशी एक अट आहे. सन्माननीय सदस्या म्हणाल्या की, शासन त्या महिलांवर मेहेरबानी करीत नाही. ही वस्तुस्थिती आहे. शासनाला स्वत:च्या कर्तव्याची जाणीव आहे व शासन स्वत:च्या कर्तव्यापासून दूर जाऊ इच्छित नाही. त्यानुसार शासनाने तेथील 50 महिलांना प्रशिक्षण दिलेले आहे. महानगरपालिकेने त्या महिलांचे 157 गट केलेले आहेत. 1658 महिला आहेत. 5-6, 5-6 महिलांचा ग्रूप केलेला आहे. हे ग्रूप 13 वॉर्डात विभागलेले आहेत. त्यांना एकेक टेम्पो दिलेला आहे, त्या टेम्पोचे भाडे महानगरपालिकेकडून दिले जाते. अशा प्रकारे सुवर्ण जयंती रोजगार योजनेंतर्गत व दत्तक वस्ती योजनेंतर्गत काम सुरु आहे. या कामामध्ये सन्माननीय सदस्यांना अधिक भर घालावी असे वाटत असेल, या महिलांसाठी अधिकची मदत करण्यासाठी सूचना करावयाची असेल तर त्यांनी ती करावी, शासन त्याप्रमाणे काम करील. शासन त्यांच्या मताशी सहमत आहे.

श्री.विद्या चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदय असे म्हणाले की, मी प्रश्न विचारला नाही. माझे असे म्हणणे आहे की, राज्यस्तरीय औद्योगिक फेडरेशन स्थापना करण्यात यावे. कंपोस्ट खत तयार करण्याचे काम कंत्राट एका खाजगी कंपनीला दिले आहे. ते चुकीचे आहे. ते काम महिलांना द्यावे. जेथे पैसे मिळविण्याचे काम असते ते खाजगी कंत्राटदारांना दिले जाते.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

शासनाला महिलांचे फेडरेशन स्थापन करणे सहज शक्य आहे, पण ते शासन करीत नाही. मी प्रश्न विचारला नाही असे म्हणणे चुकीचे आहे. माझी मागणी शासन लक्षात न घेता एका खाजगी कंत्राटदाराच्या पाठीशी उभे राहत आहे. हे पूर्णपणे अन्यायकारक आहे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांना असे आरोप करता येणार नाहीत. मी कोणत्याही कंत्राटदाराच्या पाठीशी उभा राहत नाही. राज्यस्तरीय फेडरेशन तयार करण्याबाबत मी स्पष्टपणे उत्तर दिलेले आहे की, फेडरेशन करण्याचा हा विषय नसून मुंबई महानगरपालिकेपुरती मर्यादित ही लक्षवेधी सूचना आहे. त्यामुळे फेडरेशन तयार करता येईल की नाही हा महानगरपालिकेचा वेगळा विषय आहे. कचरा वेचणे व कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी कंत्राटदार नेमणे हे दोन्ही विषय वेगवेगळे आहेत. मी सन्माननीय सदस्यांचे प्रश्न नाकारलेले नाहीत. कचरा वेचण्याच्या कामापासून महिलांना वंचित केले जात नाही. त्यांचे काम संरक्षित केले जाणार आहे. कंत्राटदाराला कचरा वेचण्याचे काम दिलेले नाही, प्रक्रिया करण्याचे काम दिलेले आहे. काही अंशी कचरा गोळा करण्याचेही काम दिलेले आहे. आज ज्या महिला काम करीत आहेत त्या कामापासून त्यांना वंचित केले जाणार नाही.

---------

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ D/ MMP/

**पृ. शी**. : महावितरण कंपनीने रेडिओ फ्रिक्वेन्सी आणि इन्फ्रारेड मीटर्सची खरेदी जास्त दराच्या कंपन्यांकडून करणे

**मु. शी**. : महावितरण कंपनीने रेडिओ फ्रिक्वेन्सी आणि इन्फ्रारेड मीटर्सची खरेदी जास्त दराच्या कंपन्यांकडून करणे यासंबंधी सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, ॲड.आशिष शेलार, श्री.रामनाथ मोते,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनोद तावडे ( विरोधी पक्ष नेते ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"वीज मीटर रीडिंगमधील फेरफारीला आळा घालण्यासाठी व राज्य भारनियमनमुक्तीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी महावितरणने या रेडिओ फ्रिक्वेन्सी आणि इन्फ्रारेड मीटर्सचा पर्याय शोधून काढणे, मीटर्सची खरेदी करण्याकरिता प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे.फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स यांचे दर सर्वात कमी असतानाही त्यांना केवळ 1 लाख मीटर्सचा पुरवठा करण्याचे आदेश देणे. जास्त दर असलेल्या मे.पालमोहन इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लि., नवी दिल्ली व मे.रोलेक्स मीटर्स प्रा.लि., हैद्राबाद यांना 3.2 लक्ष मीटर्सचा पुरवठा करण्याचे आदेश देण्यात येणे, यामुळे महावितरणवर 405 लक्ष रुपयांचा अतिरिक्त बोजा पडणे, प्रत्यक्षात निविदा काढताना कंत्राटदाराला त्याची पात्रता सिध्द केल्यानंतरच काम देण्याची आवश्यकता असताना या बाबीकडे दुर्लक्ष करुन नवीन कंपनीला काम देताना पूर्ण देऊ नये असा वित्त व लेखा संहितेस धरुन नसणारा नियम काढण्यात येणे, मे.पालमोहन इलेक्टॉनिक्स लिमिटेड व मे.रोलेक्स मिटर्स प्रा.लिमिटेड यांनी महावितरणाला पुरविलेल्या मिटर्सबाबत राज्यभरातील वीजधारकांकडून मोठ्या प्रमाणात तक्रारी प्राप्त होणे, यात बऱ्याच ठिकाणी विजेचे बिल शून्य रुपये तर काही ठिकाणी 40 हजार रुपयांचे मासिक देयक जनतेला प्राप्त होत असणाऱ्या तक्रारीचा समावेश असणे, याबाबत शासनाने तातडीने कारवाई करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया."

4....

श्री.राजेंद्र मुळक ( ऊर्जा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

5....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ D/ MMP/

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य वीज मंडळाच्या तीन वेगवेगळ्या कंपन्या केल्या आहेत. या कंपन्यांची मनमानी चालली आहे. त्याचे एक मूर्तिमंत उदाहरण समोर आलेले आहे. मीटर खरेदीतील हा भ्रष्टाचार आहे. या कंपनीला पात्र ठरविल्यामुळे त्या कंपनीने त्यांचा रेट नमूद केला. ज्या कंपनीचा सर्वात दर कमी आहे त्या कंपनीला 1 लाख मीटर्सचे काम दिले. ज्यांचा जास्त दर आहे त्या दोन कंपन्यांना प्रत्येकी 3.2 लाख मीटर्सचे काम दिले. जे टेंडर एल-1 आहे, त्यांना कमी काम दिले. त्याबाबत कारण असे दिले आहे की, बाहेरची कंपनी आहे, पहिल्यांदाच काम करीत आहे, अधिक मीटर्स पुरविण्याची क्षमता नाही. त्या कंपनीची क्षमता नसेल तर ते पात्र कसे झाले ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

त्या कंपनीची क्षमता नव्हती तर मग इतर कंपन्यांना कमी दराने मीटरचा पुरवठा करण्यास का सांगितले नाही ? त्यांना जास्त दराने मीटरचा पुरवठा करण्याचे टेंडर का दिले ?

उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, महावितरण कंपनीचे स्वत:चे नियम आहेत. अन्य सर्व खात्यांना शासनाचे जे नियम लागू आहेत ते नियम या महावितरण कंपनीला लागू नाहीत. त्यांनी आपले वेगळे नियम केले आहेत. या कंपनीला वर्षाला 10 हजार कोटी देऊन जगविण्यात येते. हे जनतेचे पैसे आहेत. या कंपनीचे ते स्वत:चे पैसे आहेत अशातला भाग नाही. जनतेचा पैसा त्या कंपनीला जात असताना इतर विभागाना जे नियम लागू आहेत तेच निमय या कंपनीला देखील लागू असले पाहिजेत. साध्या शेंबड्या मुलाला देखील कळेल की ज्याचे कमी दर आहेत त्यालाच काम दिले पाहिजे. त्या कंपनीला काम देताना जी काही अडचण सांगितलेली आहे ती मला मान्य नाही. दुस-या दोन कंपन्याना डोळयासमोर ठेवून अधिका-यांनी त्यांना काम दिले आहे. त्या दोन कंपन्यांना एल-1च्या दराने काम द्यायला पाहिजे होते. यामध्ये भ्रष्टाचार झालेला असून. अन्य कंपन्यांना दिलेले काम रद्द करुन ज्या कंपनीचे एल-1 टेंडर आहे त्या कंपनीला सर्व काम देण्यात येईल काय ? अशा प्रकारचे निर्णय घेणा-या अधिका-यावर कारवाई केली जाईल काय ? तसेच या कामामध्ये जो जास्तीचा भूर्दंड पडला तो अधिका-यांच्या पगारातून वसूल केला जाईल काय ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, राज्यामध्ये एएमआर आणि आरएफ असे 2 प्रकारचे मीटर बसविण्याचे काम सुरु आहे. एएमआर म्हणजे ॲटोमॅटीक मीटर रिडिंग आणि आरएफ म्हणजे रेडिओ फ्रिक्वेन्सी. यापूर्वी आपल्याकडे असलेल्या मीटर्सचे आपण मॅन्युअली रिडिंग करीत होतो. मीटर रिडर त्या ठिकाणी जाऊन तेथील मीटर रिडिंगची नोंद करुन कार्यालयामध्ये येऊन बिलिंग करीत होता. या कामामध्ये अनेक तक्रारी आल्या. उपभोक्त्याकडून अशा तक्रारी आल्या की आमचे मीटर रिडिंग कमी असताना ते जास्त दाखविण्यात आले. या सभागृहामध्ये देखील अनेकदा अशी चर्चा झाली की बिलिंग कमी दाखवून उपभोक्त्याला मदत करण्यात आली. दिवसेंदिवस ॲटोमायझ्‍ेशन होत आहे. हे असे मीटर्स आहेत की जो कोणी रिडर असेल तो हॅण्डसेट घेऊन तेथे जाईल आणि मीटरमध्ये असलेल्या चीपमध्ये जी काही रिडिंग झालेली असेल ती डाऊनलोड करुन ऑफिसमधील कॉम्प्युटरवर फीड करुन बिलिंग करील. ही मीटर्स घेत असताना काही





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

अनियमितता झाल्या असे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले.एमएससीडीसीएल या कंपनीमध्ये असलेली निविदा करण्याची पध्दत ही प्रचलित पध्दत आहे. ही कंपनी स्थापन होण्यापूर्वी ती जेव्हा सरकारची संस्था होती तेव्हा पासून निविदा काढण्याची पध्दत सारखीच आहे. आता नव्याने ई-टेंडर पध्दतीने महामंडळाची प्रोक्युअरमेण्ट करण्यात येते.

या प्रश्नाच्या बाबतीत मी सांगू इच्छितो की, जेव्हा टेंडर झाले त्यावेळी एल-1, एल-2, एल-3 आणि एल-4 पर्यन्तच्या कंपन्या क्वॉलिफाय झाल्या. आपण काय करतो ? तर ज्याने एल-1 टेंडर भरलेले आहे आणि त्याने जे स्पेसिफिकेशन्स दिलेले आहेत त्याप्रमाणे प्रोक्युअरमेण्ट होणार आहे की नाही या संदर्भात महावितरणाची जी संस्था आहे त्या संस्थेकडे हे मीटर्स टेस्टिंगसाठी पाठविले जातात. केन्द्र शासनाने ठरविलेल्या संस्थेकडे हे मीटर्स टेस्टिंगसाठी पाठविले जातात. ते योग्य असतील तरच या सर्व लोकांना आपण क्वॉलिफाय करतो. ही सर्व प्रक्रिया झाल्यानंतर चार-पाच कंपन्या क्वालिफाय झाल्या. फ्लॅश इलेक्ट्रिानिक्स म्हणून जी कंपनी आहे तिने एल-1 टेंडर भरले. ही कंपनी पहिल्यांदाच मीटर पुरविण्यामध्ये सहभागी झाली. जनरेशन कंपनी, एमएससीडीसीएल, ट्रान्समिशन या तिन्ही कंपन्यांन्यामध्ये ही कंपनी कधीच पार्टिसिपेट झाली नाही. या कंपनीने देशपातळीवर, पंजाबमध्ये काम केले असा उल्लेख केलेला आहे. जेव्हा अशा प्रकारच्या नवीन कंपन्या येतात त्या कंपन्यांच्या संदर्भात आपण एक निश्चित असे धोरण आखून ठेवलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक...

सभापती महोदय, यामध्ये साधारणत: नवीन पुरवठादार असेल, जो प्रथमच आपल्याला पुरवठा करीत असेल तर त्याच्यासाठी काय निकष लावलेले आहेत त्या संदर्भात मी माहिती देऊ इच्छितो. कंपनी निविदेत नमूद केलेले साहित्य आजपर्यंत कोणत्याही शासकीय अथवा निमशासकीय संस्था अथवा विद्युत मंडळे यांना पुरवठा केलेला नसेल अशा पुरवठाधारकांना साधारणत: निविदेमध्ये नमूद असणाऱ्या संख्येच्या 10 टक्के पर्यंतच पुरवठा करण्याचे आदेश सक्षम अधिकाऱ्यांच्या मंजुरी नंतर देण्यात येतात. देशात कोठेही केले नसेल आपल्या राज्यात तर नाहीच. प्रथमच एन्ट्री करीत असेल अशांनाच ही सवलत लागू आहे. आता ई-टेंडरींग आहे, त्याने आपला रेट कमी कोट केलेला आहे. म्हणून तो एल-1 मध्ये आलेला आहे. कॉम्पीटेशन अनहेल्दी करावयाची असेल तर जे कॉही ॲच्युअल रेट असतील, त्याच्यापेक्षा खाली रेट कोट करुन टाकावयाचे आणि याच्यामध्ये आपण पार्टिसिफेट व्हावयाचे. नंतर कालांतराने हळूहळू आपले रेट वाढवावयाचे अशी प्रक्रिया अनेकदा लोक करतात. परंतु याच्यामध्ये नवीन पुरवठादारासाठी मी मघाशी सांगितली ती पध्दत स्वीकारली आहे.

सभापती महोदय, दुसऱ्या नंबरवर फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स बसते. फ्लॅश इलेक्ट्रानिक्स सेमी रेग्युलर पुरवठादारामध्ये येते. सेमी रेग्युलर पुरवठादार म्हणजे काय ? ज्या कंपनीने नमूद केलेल्या साहित्याचा महावितरण किंवा शासकीय, निमशासकीय संस्था अथवा विद्युत मंडळ यांच्याकडे एखादी साहित्याची एखादी ऑर्डर पूर्ण केली असेल, अशा निविदाधारकांना निविदेच्या नमूद असणाऱ्या 20 टक्के पर्यंत पुरवठा करता येईल. फ्लॅश इंडिया कंपनीने पंजाब येथे अशा प्रकारचा साहित्यांचा पुरवठा केला असल्यामुळे त्या कंपनीला सेमी रेग्युलेटर या कॅटगरीमध्ये टाकले. सभापती महोदय, ज्यावेळी फ्लॅश इंडिया कंपनीचे रेट उघडण्यात आले..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. या तीन कंपन्या आहेत. त्या कंपन्या खाजगी आहेत. त्या कंपन्यांवर शासनाचा फक्त एम.डी.राहतो. या कंपन्यांमध्ये पैस सरकारचे नाही, विजेचा दर ठरविण्याचा या कंपन्यांना अधिकार नाही. वीज निर्मिती करणारी कंपनी वेगळी आहे. वीज वितरण करणारी कंपनी वेगळी आहे. वीज पारेषण कंपनी वेगळी आहे, त्यांना शासनाकडून काहीही अनुदान दिले जात नाही. या तिन्ही कंपन्यांचा कारभार स्वतंत्र आहे. या तिन्ही कंपन्या कंपनी ॲक्टखाली रजिस्टर्ड झालेल्या आहेत. एखाद्या कंपनीने टेंडर काढावे,

2...

श्री.दिवाकर रावते...

तशा प्रकारे या कंपन्या टेंडर काढतात. एखाद्या कंपनीत गैरव्यवहार झाला अथवा कर्मचाऱ्यांचा प्रश्न निर्माण झाला तर कामगार मंत्री आणि उद्योग मंत्री लक्ष घालतात, तशा या तिन्ही कंपन्या आहेत. माननीय ऊर्जा राज्य मंत्री हे या कंपन्या शासनाच्या आहेत अशा अनुषंगाने सभागृहात उत्तर देत आहेत. या तिन्ही कंपन्यांमध्ये शासनाचा अधिकार काय आहे, या कंपन्यांमध्ये शासनाचे भाग भांडवल किती आहे, या कंपन्यावर शासनाचे नियंत्रण कशा पध्दतीचे आहे याचा माननीय मंत्री महोदयांनी खुलासा करावा.

महोदय, एमईआरसीने सांगितले म्हणून गेल्या दहा महिन्यात 10 हजार कोटी रुपये वीज दरात वाढ झाली. परंतु दर वाढ कमी करण्याच्या बाबतीत शासन काहीही करु शकत नाही. एखाद्या ग्राहकाला वीज स्वस्त दरात द्यावयाची ठरविले तर या शासनाला तेवढे सुध्दा अधिकार नाहीत. शेतकऱ्यांना वीज बील माफ करावयाचे शासनाने ठरविले तर शासनाला तेवढे पैसे कंपनीला द्यावे लागतात. या कंपन्यांवर सरकारचा काय अधिकार आहे याचा खुलासा होणे गरजेचे आहे. सदोष मीटरमुळे वीज ग्राहकांची मोठया प्रमाणात लूट होत आहे, त्यावर नियंत्रण कसे आणणार आहात असा सन्माननीय विरोधी पक्ष नेत्याचा प्रश्न असा आहे. त्या बाबतीत माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

श्री.राजेंद्र मुळक : या तिन्ही कंपन्यांवर सरकारचे नियंत्रण काय आहे अशा प्रकारचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेला आहे. या तिन्ही कंपन्या कंपनी ॲक्ट अंतर्गत रजिस्टर्ड आहेत. या कंपन्यांमध्ये 100 टक्के शेअर्स राज्य शासनाचे आहेत. ही होल्डींग कंपनी आहे. ही होल्डींग कंपनी या तिन्ही कंपन्यांना गर्व्हन करते....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2..... श्री.राजेंद्र मुळक.....

याचा अर्थ शासनाचे नियंत्रण या तीनही कंपन्यांवर आहे, 100 टक्के शेअर आहेच. होल्डींग कंपनीचे माननीय मंत्री महोदय हे अध्यक्ष असून मी राज्यमंत्री या नात्याने उपाध्यक्ष आहे आणि कंपनीचे संचालक मंडळ देखील कार्यरत आहे. प्रचलित नियमानुसार कंपनीमध्ये कामकाज होत असते. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, फ्लॅश इलेक्ट्रॉनिक्स कंपनी सेमी रेग्युलेटर सप्लायर कॅटॅगरीमध्ये येते. आपल्या राज्यामध्ये या कंपनीने एखाद्या वेळेस काम केले असेल अशा प्रसंगी 20 टक्के एल 1 चे काम करण्याची संधी देतो. ही संधी देत असताना पूर्णपणे मीटर पुरवठा करावयाच्या संदर्भात यांना काम देता येत नव्हते. कारण ही कंपनी सेमी रेग्युलेटर सप्लायर कॅटॅगरीमध्ये येत असल्यामुळे एल 2, एल 3, एल 4 आणि एल 5 या क्षेत्रातील कंपन्यांना विनंती करण्यात आली की, एल 1 चा रेट आहे .....(अडथळा).... टेंडरबाबत प्रश्न विचारल्यामुळे मला त्याची माहिती देणे आवश्यक आहे. तुम्ही रेट चेंज करणार का असा प्रश्न विचारला होता. रेट चेंज करीत असताना कोणती प्रक्रिया घडली हे मी आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अतिशय स्पष्ट प्रश्न मी विचारला होता. आता सगळी माहिती नेटवर उपलब्ध आहे. एखाद्या कंपनीने बाहेर कुठे काम केले असेल, कसे केले, किती केले ही माहिती उपलब्ध होऊ शकते. शासन ती माहिती क्वॉलिफाईड करते. संचालक मंडळाने 20 टक्के काम दिले पाहिजे असे ठरविले होते. इतरांना याच रेटने काम द्यायचे ठरविले होते. नंतर निर्णय बदलण्यात आला. संचालक मंडळावर जी मंडळी आहेत त्यांनी केलेल्या घोटाळ्याची चौकशी आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपविली पाहिजे, इतकी गंभीर प्रकरणे आहेत. 405 लक्ष रुपयांचा अतिरिक्त बोजा पडला आहे. हा पहिला टप्पा आहे. इतरही घोटाळ्यांची माहिती माझ्याकडे उपलब्ध झालेली असून ती मी अधिवेशनाच्या पुढील काळात उपस्थित करणार आहे.

सभापती महोदय, शासनाला माहिती कळल्यानंतर क्वॉलिफाय केले असेल तर नियम का करण्यात आले? याचे कारण म्हणजे वर्षानुवर्षे जे बांधिल आहेत त्यांनाच काम देता आले पाहिजे. रेट तोडणाऱ्या दुसऱ्या कोणत्या कंपनीने यात शिरकाव करु नये. रेट तोडणारी कंपनी आली तर ती क्वॉलिफाय नसेल तर तपासणी करता येते. शेवटी इंटरनेटवर सर्व माहिती उपलब्ध आहे. काम केले आहे की नाही हे पाहता येते. आर.सी.वर असलेली कंपनी स्वीकारायची की नाही

...2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-2..... श्री.विनोद तावडे....

याकरिता "The Board standardized terms and conditions indicate that the lowest tender could get order of 50% of the requirement or any reasonable quantity subject to his capability. These terms and condition also indicate the treatment given to the state units agreeing to lowest acceptable rate." नियमात जर असे म्हटले असेल तर या प्रकरणात असे का केले याचे उत्तर दिलेले नाही. माझा स्पष्ट आरोप आहे की, ठरवून केवळ दोन कंपन्यांना मदत करण्यासाठी हे केलेले आहे. त्यामुळे याची चौकशी करणार का?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आपले जे प्रचलित नियम आहेत त्या नियमांतर्गत निविदा फायनल करण्यात आली. हे करीत असताना कुठेही अनियमितता झालेली नाही. प्रोसेसप्रमाणे आपण टेंडर अलॉट केले आहे......(अडथळा)...मी माननीय विरोधी पक्षनेत्यांचे उत्तराच्या माध्यमातून समाधान करतो. सभापती महोदय, टेंडरची प्रक्रिया पूर्ण करीत असताना एखादा नवीन पुरवठादार येत असेल............

नंतर 2सी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी )

श्री. राजेंद्र मुळक ....

राज्यातील सर्वच्या सर्व मीटर्स बदलवत असतांना त्या पुरवठा दाराला तो एल वन आला म्हणून पूर्ण काम देणे देणे शक्य नाही. सदर पुरवठादार जे काही मीटर्स आपल्याला पुरवतो त्यातील एखादे मीटर जर चुकीने फॉल्टी आले तर संपूर्ण काम ठप्प होऊ शकते. यापूर्वी ज्या लोकांनी मीटर्सचा पुरवठा केला असेल किंवा त्याच्याही पहिले ज्या ठेकेदाराने मीटर्सचा पुरवठा केला असेल तर अशा वेळेला त्याला व इतरांना आपण ते काम डीव्हाईड करुन देतो. परंतु रेग्युलर सप्लायर असेल व त्याच्या पूर्वीच्या कामामध्ये कोणतीही अनियमितता नसेल, क्वालीटी मेन्टेन केली असेल तर अशा ठेकेदारांना रेग्युलर पुरवठादार म्हटले जाते. नवीन पुरवठादार आल्यानंतर त्याला 100 टक्के काम देणे अनुज्ञेय नाही तर आपण यामध्ये 20 टक्के काम देत असतो.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, खरे म्हणजे या विषयावर व्यापक चर्चा होण्याची आवश्यकता आहे. या ठिकाणी सन्माननीय मंत्री महोदयांनी नियमितता नियमितता या शब्दाचा वारंवार पुनरुच्चार केलेला आहे. परंतु माननीय मंत्री महोदय जो काही नियम सांगत आहेत तो नियम यांच्या बोर्डाने तयार केलेला आहे. हा काही कायदा वगैरे नाही. तर त्यांच्या बोर्डाने तयार केलेला तो नियम आहे, ते बोर्डाने केलेला ठराव आहे. यामध्ये नियम, कायदा, रुल असे काहीही नाही हे प्रथम आपण लक्षात घेण्याची आवश्यकता आहे. अशा पध्दतीने बोर्डाने घेतलेल्या निर्णयामुळे जी टेंडर्स महाग घेतली जातात त्याचा परिणाम पर्यायाने वीज ग्राहकांवर होत असतो. वीज बोर्डाला दर वर्षी एमईआरसीला एआरआर सबमिट करावा लागत असतो. यामध्ये आमचा रेव्हेन्यू रेट काय आहे हे सादर करावे लागत असते. एक व्यक्ती एक लाख रुपयाचा एक मीटर देते तर दुसरी व्यक्ती एक मीटर 3.20 लक्ष रुपयाला देते. जे वाढीव पैसे द्यावे लागतात त्या आधारावर एमईआरसी वीज बिल ठरवते व महाराष्ट्रातील जनतेला वीज भाववाढ सहन करावी लागते. बोर्डाने केलेला जो ठराव आहे तोच मुळात कायद्याचा भंग करणारा आहे.

सभापती महोदय, कोणतेही टेंडर ठरावाच्या आधारावर निघू शकत नाही तर ते इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्टच्या आधारावर निघत असते. ठरावाचा आधार घेऊन तुम्ही ते नियमित करुच शकत नाही. इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्टमध्ये असे म्हटले आहे की, तुम्ही पूर्ण काम किती पैशांमध्ये

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार ....

करणार यावरच टेंडर निघत असते. यांच्या टेंडरमध्ये पूर्ण कामासाठी फ्लॅश इलेक्ट्रानिक्सने पैसे भरल्याचा दावा केला असेल तर ते काम इंडियन कॉन्ट्रॅक्ट ॲक्ट प्रमाणे द्यावेच लागेल व तसे करणे हे कायदेशीर बंधनकारक आहे. तुमच ठराव केंद्रीय कायद्याला पळवाट काढू शकत नाही.

सभापती महोदय, सीव्हीसीने यासंदर्भात गाईडलाईन्स दिलेल्या असून त्यामध्ये लोएस्ट टेंडर्सला हायर टेंडरने मॅच करणे आवश्यक आहे. असे झाले नाही तर त्यावेळेस स्पॉट टेंडर काढले जाते किंवा रि टेंडर काढावे लागते. तुमचा ठराव सीव्हीसीच्या गाईडलाईन्सचा भंग करीत आहे, तुमचा ठराव कॉन्ट्रॅक्ट ॲक्टचा तसेच टेंडर कंडीशनचा ठरावाचा भंग करीत आहे. लोएस्ट ठेकेदाराचे काम सिक्युअर्ड कसे करावयाचे अशी जर तुम्हाला भीती असेल तर त्या संदर्भात सीव्हीसीने यासंदर्भातही स्पष्टपणे गाईडलाईन्स दिलेल्या आहेत. त्यांच्या गाईडलाईन्समध्ये असे म्हटले आहे की, "तुम्ही यांसदर्भात ॲडिशनल सिक्युरीटी डिपॉझिट घ्या". परंतु जर तुम्ही त्यांच्याकडून ॲडिशनल सिक्युरीटी डिपॉझिट घेणार नसाल, कॉन्ट्रॅक्ट ॲक्टचा भंग करणार असाल , तुम्ही सीव्हीसीचा भंग करणार असाल आणि महाराष्ट्रातील जनतेवर विजेची दरवाढ करणार असाल व या निमित्ताने करप्शनचे नवीन दुकान तुमच्या बोर्डाच्या ठरावाच्या माध्यमातून सुरु करणार असाल तर ते योग्य नाही. त्यामुळे यासंदर्भात आमची मागणी अशी आहे की, या विषयाला आपल्याला खऱ्या अर्थाने न्याय द्यावयाचा असेल तर या प्रक्रियेला त्वरित स्टे द्यावा आणि इकॉनॉमिक अफेन्स खाली त्याची चौकशी करावी.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय,टेंडर प्रोसेच्या संदर्भात मी आपल्याला अगोदरच सर्व माहिती दिलेली आहे. यामध्ये थोडीही अनियमितता असेल तर मी तातडीने दूर करण्याच्या संदर्भातील आदेश आजच दिले जातील. यासंदर्भात स्टे देऊनच चौकशी करण्यात येईल. चौकशीमध्ये जे काही आढळून येईल त्या प्रमाणे योग्य ती कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही चौकशीचे स्वागत करतो. येथे सीव्हीसीचा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. कॉन्ट्रॅक्ट ॲक्टचा भंग झाला असेल तर हे सर्व जाणीवपूर्वक केले आहे असे आमचे मत आहे. त्यामुळे यात कायदेशीर कारवाई करण्याचे वचन आम्हाला दिले पाहिजे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, चौकशी ही अत्यंत पारदर्शी पद्धतीने होईल. सभागृहात सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्याचाही विचार समितीने करावा अशा सूचना देऊन अत्यंत पारदर्शकतेने चौकशी करण्यात येईल. चौकशी समिती कोणाची नेमावी याबाबत मी आता नेमके सांगू शकत नाही. याबाबत मला अधिकाऱ्यां समवेत चर्चा करावी लागेल. तसेच, लॉ डिपार्टमेंटच्या अधिकाऱ्यांशी देखील चर्चा करावी लागेल. त्यानुसार कोणाची समिती नेमायची याबाबत निर्णय घेण्यात येईल. अत्यंत पारदर्शकपणे चौकशी करण्यात येईल हे आधीच सांगितले आहे. या लक्षवेधी सूचनेतील प्रश्नांच्या माध्यमातून महामंडळाच्या टेंडर बद्दल कोणाला साशंकता वाटत असेल तर त्यासंबंधी चौकशी करणे ही स्वाभाविकच आहे. त्याप्रमाणे आम्ही चौकशी करू.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जगात इलेक्ट्रॉनिक आयटेमचे दर उतरत जातात. ते कधीही चढत नाहीत. ज्यावेळी बाजारात मोबाईल आला त्यावेळी त्याची किंमत 40 हजार होती. त्याच मोबाईलची आजची किंमत पाच हजार रूपये आहे. पूर्वी बँकांसाठी जे सॉफ्टवेअर आले होते त्याची किंमत 5 कोटी रूपये होती. त्याच सॉफ्टवेअरची आता किंमत 25 हजार रूपये आहे. तेव्हा इलेक्ट्रॉनिक मिटर बसविताना देखील तोच उद्देश असला पाहिजे. त्याचे दर वाढता कामा नये, उलट ते कमी झाले पाहिजेत. यामध्ये ठराविक लोकांनी यायला पाहिजे म्हणून एवढा टर्न ओव्हर पाहिजे, एवढी गॅरंटी पाहिजे, ह्या ज्या अटी घालत आहात त्या चुकीच्या आहेत. त्या इलेक्ट्रॉनिक आयटेममध्ये घालण्याची आवश्यकता नाही. त्याचाही विचार मंत्रिम्होदय करतील काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आधीच सांगितले की, सदर टेक्नॉलॉजी ही पहिल्यांदाच इन्ट्रोटयूस होत आहे. कोणतेही नवीन इलेक्ट्रॉनिक यंत्र पहिल्यांदा बाजारात येते तेव्हा त्याची किंमत जास्त असते. कालांतराने ती किंमत कमी होते. हे पहिल्यांदाच इन्ट्रोटयूस झालेले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, या चौकशी समितीमध्ये सर्व पक्षीय आमदारांना नेमावे. हे गंभीर प्रकरण आहे. गरीब माणसाला जेव्हा पाच ते दहा हजार रूपयांचे वीज बिल येते तेव्हा त्याचे काय होते ते लक्षात घ्यावे. शेतकऱ्यांकडे विजेचे थकबाकी का राहते ? तेव्हा या मीटर संबंधात आपण आमदारांची समिती नेमावी व त्यास आपण मंजुरी द्यावी.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आम्ही जी समिती स्थापन करणार आहोत त्या समितीला आमदारांचे देखील म्हणणे ऐकून घ्यावे असे सांगू.

.................

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनीवर होत असलेले अतिक्रमण

**मु.शी.** : राज्यातील वक्फ बोर्डाच्या मालकीच्या जमिनीवर होत असलेले अतिक्रमण यासंबंधी डॉ.नीलम गोऱ्हे,वि.स.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अल्पसंख्यांक विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यभरात वक्फ बोर्डाच्या मालकीच्या एकूण जागेपैकी ६० टक्के जागेवर विविध संस्था संघटना व व्यक्तींनी बेकायदेशीरपणे अतिक्रमण, केले असून त्यापैकी विविध ८२ ठिकाणच्या सुमारे ८० एकर जागा विविध सरकारी व निमसरकारी कार्यालयांनी बळकावल्या असल्याचे माहे जानेवारी, २०१३ च्या सुमारास निदर्शनास येणे, या अतिक्रमण केलेल्या ८२ ठिकाणच्या सरकारी व निमसरकारी कार्यालयात औरंगाबादमधील जिल्हाधिकारी व मुख्यमंत्री कार्यालयाचा समावेश असणे, तसेच या जागेचे भाडेही त्यांनी न भरल्याने वक्फ बोर्डाच्या कायदयानुसार भाडे भरण्याबाबत बजावण्यात आलेल्या नोटीसा, या सरकारी कार्यालयाकडून जागेच्या भाडयाची वसूली करण्याबाबत व सदरची वक्फ बोर्डाची जागा त्यांना परत देण्याबाबत शासनाने केलेली कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.मोहम्मद आरीफ (नसीम) खान (अल्पसंख्यांक विकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वक्फ बोर्डाच्या जमिनींची किंमत 1 लाख 20 हजार कोटी एवढी आहे. वक्फ बोर्डाच्या मालकीच्या 60 टक्के जमिनींवर अतिक्रमण झालेले आहे. मी लक्षवेधी सूचना उपस्थित करण्याचे कारण असे आहे की, अनेक ठिकाणी वक्फ बोर्डाच्या जमिनीवर नवीन बांधकामे झालेली दिसतात. तेव्हा असे वाटते की, तेथील ट्रस्टींनी त्यात लक्ष घालून पुनर्विकास करण्याचे ठरविले आहे की काय ? मी आपल्याला 3-4 उदाहरणे देणार आहेत. मुंबई सेंट्रल येथे मोक्याच्या ठिकाणी असलेली अनाथाश्रमाची जमीन त्यावेळच्या ट्रस्टींनी एक कोटी रूपयाला विकली होती. नंतर ही जमीन नीलकमल रिअॅल्टर्स आणि बिल्डर्स यांना विकण्यात आली. त्याचे आता बाजारमूल्य 100 कोटी रूपये एवढे आहे. अशी अनेक उदाहरणे आहेत. दादर मधील पीर बगदादी दर्ग्याच्या जागेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचे देखील आरोप झालेले आहेत. निर्माण भारती डेव्हलपर्सला 14 एकर जागा देण्यात आली आहे. त्यासंबंधी औरंगाबाद खडपीठामध्ये दावा सुरू आहे. सदर जागा ही 8 कोटी रूपयांना विकण्यात आली होती. निर्माण भारतीच्या संचालक मंडळामध्ये काही उच्च पदस्थ देखील होते. सन्माननीय मंत्री महोदयांनी उपाययोजना सुचविल्या आहेत. मात्र आजार एका बाजूला आणि उपचार दुसऱ्या बाजूला अशा त्या उपाययोजना आहेत. वक्फ बोर्डाच्या जमिनी भाड्याने दिलेल्या आहेत. वक्फ बोर्डाच्या ट्रस्टींनी दुसऱ्याला म्हणजे बिल्डरला पॉवर ऑफ अॅटर्नी दिलेली आहे. एवढेच नव्हे तर या जागांची विक्री देखील होत आहे. तेव्हा याबाबत शासन कोणता प्रतिबंध करणार आहे ? वक्फ बोर्डाच्या जमिनीचे व्यवहार हे बाजारभावा प्रमाणेच केले पाहिजेत.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

अन्यथा पॉवर ऑफ ॲटर्नी करुन भाडे कराराने जागा देण्यास प्रतिबंध करणारा कायदा केंद्र सरकारची परवानगी घेऊन करणार आहात काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, ज्या 60 ठिकाणी अतिक्रमणे झालेली आहेत त्यातील काही ठिकाणी सरकारने अतिक्रमण केलेले आहे ती जागा मिळू शकेल. परंतु ज्या खाजगी लोकांनी वक्फ बोर्डाच्या जागेवर अतिक्रमण केलेले आहे त्यांच्यावर कोणती कारवाई केलेली आहे ? मुस्लिम संरक्षण कायद्यानुसार ज्या स्त्रियांना तलाक मिळत नाही अशा स्त्रियांना वक्फ बोर्डाने पैसे द्यावेत अशी तरतूद आहे. माझा प्रश्न आहे की, आतापर्यंत वक्फ बोर्डाने किती स्त्रियांना मदत दिली या संबंधीचा अहवाल आपण सभागृहात मांडणार काय ?

श्री.नसीम खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी दोन प्रश्न उपस्थित केलेले आहेत. त्यांनी उपस्थित केलेले प्रश्न लक्षवेधी सूचनेतील विषयांव्यतिरिक्त आहेत. मराठवाड्यात 82 ठिकाणी वक्फ बोर्डाच्या जमिनीवर शासकीय आणि निमशासकीय इमारती उभ्या आहे त्याबाबत काय कारवाई करण्यात आली असा लक्षवेधी सूचनेचा मूळ विषय आहे. त्या संदर्भातील विस्तृत माहिती निवेदनात दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी नीलकमल रिॲलेटर्स, बॉम्बे सेंटरच्या जागेसंबंधी उल्लेख केला. मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, सन 1995 मध्ये वक्फ बोर्डाचा कायदा आला. त्या कायद्यान्वये वक्फ बोर्डाची जागा कोणालाही विकता येत नाही. वक्फ बोर्ड कोणालाही जागा विकत नाही. तीन वर्षासाठी भाडेकरारावर जागा देण्याची तरतूद आहे. हा कालावधी वाढविण्या संबंधातील सुधारणा संसदेमध्ये प्रलंबित आहे. येणाऱ्या काळामध्ये त्यामध्ये सुधारणा होईल. वक्फ बोर्डाच्या कायद्यानुसार कोणालाही जागा विकता येत नाही. ट्रस्टनी चॅरिटी कमिशनरकडून परवानगी घेऊन जागा विकण्याचा प्रयत्न केला त्यांच्यावर वक्फ बोर्डाने कडक कारवाई केलेली आहे, त्याला स्थगिती दिलेली आहे, तेथील सर्व कामे बंद करण्यात आलेली आहेत आणि इन्क्वॉयरी कमिशन ॲक्ट प्रमाणे चौकशी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी मूळ प्रश्न उपस्थित केलेला आहे की, वक्फ बोर्डाच्या जागेवर शासकीय व निमशासकीय कार्यालये आहेत त्यांच्यावर कारवाई करणार किंवा कसे. वक्फ बोर्डाच्या 82 जागा आहेत. लातूर,उस्मानाबाद, नांदेड, परभणी, औरंगाबाद आणि जालना येथील वक्फ बोर्डाच्या जागेवर जी शासकीय आणि निमशासकीय कार्यालये आहेत त्या सर्व कार्यालयांना सेक्शन 54 अंतर्गत जागा खाली करण्याबाबत वक्फ बोर्डाने नोटीस दिलेली आहे आणि पुढील कार्यवाही प्रगतीपथावर आहे. ..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी वक्फ बोर्डाचा विषय उपस्थित करुन शासनाचे लक्ष वेधले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. माननीय मंत्री महोदय देखील कार्यक्षम आहेत. ते वक्फ बोर्डाचा कारभार चांगल्या प्रकारे करीत आहेत. महाराष्ट्रामध्ये वक्फ बोर्डाची 90 हजार एकर जमीन आहे त्यातील 50 हजार एकर जमीन मराठवाड्यात आहे. वक्फ बोर्डाच्या जमिनीवर असलेल्या शासकीय कार्यालयांकडून आजपर्यंत कोणत्याही प्रकारचे भाडे वसूल केलेले नाही. तेव्हा माझा प्रश्न आहे की, ज्या दिवसांपासून ही कार्यालये आहेत त्या दिवसापासून भाडे आकारणार काय ? काही संस्थाना नाममात्र दराने वक्फ बोर्डाच्या जमिनी दिलेल्या आहेत. त्या जमिनींवर मोठे मोठी कॉलेजेस उभी आहेत. काही ठिकाणी तर कॉम्प्लेक्स देखील झालेली आहेत. तेव्हा त्यांच्याकडून जे नाममात्र भाडे घेण्यात आलेले आहे त्या भाड्यामध्ये वाढ करणार काय ? महाराष्ट्रात वक्फ बोर्डाच्या ज्या काही प्रॉपर्टीज असतील त्याचा विनियोग वक्फ बोर्डाच्या नियमाप्रमाणे मुस्लिम समाजातील किंवा उपेक्षित समाजातील महिलांसाठी करणार काय ?

यानंतर श्री.बोर्डे...

अमुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान : सभापती महोदय, सध्याच्या कायद्यातील तरतुदीनुसार कोणतीही जागा तीन वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी भाडेपट्टयावर देऊ शकत नाही असा नियम आहे. राज्यातील निरनिराळ्या जिल्ह्यांमध्ये 82 ठिक्‌णी वक्फ बोर्डाच्या जमिनी विविध सरकारी आणि निमसरकारी कार्यालयांनी बळकावल्यामुळे त्या जमिनी खाली करण्यासाठी संबंधितांना सेक्शन-54 नुसार नोटीस देण्यात आलेली आहे. जमीन प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. महोदय, या ठिकाणी अतिक्रमणाबाबत सांगितले गेले. महोदय, सुप्रीम कोर्टात 13, औरंगाबाद उच्च न्यायालयात 97, नागपूर उच्च न्यायालयात 51 औरंगाबाद व नागपूरच्या ट्रिब्युनल कोर्टामध्ये 214 व 34 अशा प्रकारे वक्फ बोर्डाच्या जमिनीसंदर्भातील 2476 प्रकरणे निरनिराळ्या न्यायालयात प्रलंबित आहेत. वक्फ बोर्ड आणि अल्पसंख्याक विकास विभागाच्या माध्यमातून वक्फ बोर्डाच्या जमिनी लवकरात लवकर मुक्त करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. गेल्या अडीच वर्षात अशा प्रकारे बळकावलेली 512 एकर पेक्षा अधिक जमीन मुक्त करुन घेतलेली आहे. ती जागा वक्फ बोर्डाच्या ताब्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील जुन्नर तालुक्यातील 25 ठिकाणी वक्फ बोर्डाची 125 एकर जमीन अन्य लोकांनी अनधिकृतपणे ताब्यात ठेवली होती. ती जमीन वक्फ बोर्डाने ताब्यात घेतलेली आहे. ती जमीन मुक्त करण्यात आम्ही यशस्वी झालो आहोत.

ॲड.अनिल परब : महोदय, माननीय मंत्र्यांनी सांगितले की, वक्फ बोर्डाच्या जमिनीची 2476 प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत. त्यांनी असेही सांगितले की, वक्फ बोर्डाच्या जमिनी 3 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी भाडेपट्टयावर देता येत नाहीत. वक्फ बोर्डाच्या जमिनीबाबत न्यायालयात अनेक प्रकरणी लढाई सुरु आहे. चॅरीटेबल कमिशनर असेल, सुप्रीम कोर्ट असेल, हाय कोर्ट असेल या ठिक्‌णी जे वकील तारखेला जात नाहीत, न्यायालयात योग्य प्रकारे ऑर्ग्युमेंट करीत नाहीत असेच वकील जाणीवपूर्वक दिले जातात. वक्फ बोर्डाची जागा खाजगी विकासकाच्या ताब्यात असलेल्या प्रकरणी शासनाचा वकील जाणीवपूर्वक केस हरतो. अशा प्रकारे न्यायालयात हरलेली अनेक प्रकरणे आहेत. जे वकील जाणीवपूर्वक केसेस हरले असतील त्यांच्यावर शासन कारवाई करणार काय ? माझी माहिती आहे की, अशा प्रकारे जाणीवूपर्वक केसेस हरल्यामुळे वक्फ बोर्डाच्या जमिनी खाजगी विकासकांकडे गेल्या आहेत. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना स्पेसिफिक विचारतो की, गेल्या पाच वर्षात अशा किती प्रकरणांत शासन वक्फ बोर्डाच्या जमिनी हरले आहे याचा अहवाल सादर करण्यात येईल काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नसीम खान : महोदय, न्यायालयात जी प्रकरणे प्रलंबित आहेत त्यांचे चांगल्या प्रकारे मॉनिटरींग व्हावे तसेच शासनाची व वक्फ बोर्डाची बाजू न्यायालयात व्यवस्थितरित्या मांडली जावी म्हणून चांगल्या दर्जाचे वकील देण्याचेच काम वक्फ बोर्डाच्या माध्यमातून झाले आहे. उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालयमध्ये प्रलंबित असलेल्या प्रकरणांत शासनाची बाजू योग्यप्रकारे मांडण्यासाठी चांगल्या दर्जाचे वकील, सिनियर कौन्सिल यांची नेमणूक केली आहे. माझ्या माहितीनुसार आतापर्यंत एकाही प्रकरणात न्यायालयात जाणीवपूर्वक हरलो आणि वक्फ बोर्डाची जागा खाजगी लोकांकडे गेली असे घडलेले नाही.

ॲड.अनिल परब : या बाबतची माहिती आपल्याकडे दिली तर आपण कारवाई करणार काय ?

श्री.नसीम खान : होय.

ॲड.आशिष शेलार : महोदय, श्री.मुकेश अंबानीची अँटेलिया बिल्डींग आणि वरळी येथील....

श्री.नसीम खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जो प्रश्न उपस्थित करीत आहेत तो या लक्षवेधी सूचनेशी संबंधित नाही.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, अजून माझा प्रश्नच पूर्ण झालेला नाही.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : माननीय मंत्री एवढे का घाबरले ? अँटिलियामध्ये कोण राहतात ?

श्री. नसीम खान : त्यासाठी वेगळा प्रश्न किंवा वेगळी लक्षवेधी सूचना उपस्थित करावी. त्या बाबतीत सविस्तर उत्तर देण्यात येईल.

श्री. विनोद तावडे : आपण सन्माननीय सदस्यांना प्रश्न आधी ऐकून घ्यावा.

ॲड. आशिष शेलार : सभापती महोदय, अँटेलिया आणि वरळीला समुद्र किनारी असलेली मशीद या दोन्ही विषयामध्ये वक्फ बोर्डामध्ये त्या जागा वक्फ बोर्डाच्या अखत्यारितून काढून खाजगी विकासकाला देण्याचा निर्णय झालेला आहे, तो निर्णय कधी झाला, कोणत्या वर्षी झाला ? अशा पध्दतीच्या वक्फ बोर्डाच्या जागा विकासकांसाठी मोकळ्या केल्या जातात तेव्हा अशा पध्दतीचे अर्जदार आणि आपले निर्णय यापुढे वेबसाईटपुरतेच नाही तर पब्लीक सजेशन्स अँड ऑब्जेक्शन्ससाठी लोकांसमोर आणणार का ?

श्री. नसीन खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी फार चांगला मुद्दा उपस्थित केलेला आहे. आमचे सुध्दा असे म्हणणे आहे की, राज्यात वक्फच्या जेवढ्या जागा आहेत, ज्या मालमत्ता आहेत त्या वेबसाईटवर आणल्या पाहिजेत, सार्वजनिक केल्या पाहिजेत आणि आपल्या वक्फची मालमत्ता किती आणि कोठे कोठे आहे हे लोकांना कळले पाहिजे. याची सुरुवात झालेली आहे. वक्फ बोर्डाच्या सर्व जागांचे संगणकीकरण करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्याचा निधी अलॉट करण्यात आलेला आहे आणि ती कार्यवाही प्रगतिपथावर आहे.

-----

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG

**पू. शी.** : अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील थळ येथील आर.सी.एफ. कंपनीच्या सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी टाकलेल्या पाईपलाईनची दुरुस्ती व पाईपलाईन पाण्याखाली ठेवण्याच्या दृष्टीने होत असलेले दुर्लक्ष

**मु. शी.** : अलिबाग (जि. रायगड) तालुक्यातील थळ येथील आर.सी.एफ. कंपनीच्या सांडपाण्याचा निचरा करण्यासाठी टाकलेल्या पाईपलाईनची दुरुस्ती व पाईपलाईन पाण्याखाली ठेवण्याच्या दृष्टीने होत असलेले दुर्लक्ष यासंबंधी श्री. जयंत प्र. पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. जयंत प्र. पाटील ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मत्स्यव्यवसाय. मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" अलिबाग (जि.रायगड) तालुक्यातील थळ येथील आर.सी.एफ. कंपनीच्या सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी खोल समुद्रात कंपनी अस्तित्वात आल्यापासून पाईपलाईन कार्यान्वित असणे, सदर पाईपलाईनची कंपनीमार्फत निगा न राखल्याने पाईप लाईन पाण्यावर येणे, मच्छिमार करणाऱ्या मच्छिमारांच्या बोटींना पाण्यावर आलेल्या या पाईपलाईनमुळे अडथळा निर्माण होणे, मच्छिमार बोटींचे सातत्याने नुकसान होणे, या संदर्भात अनेक वेळा लोकप्रतिनिधी तसेच ग्रामपंचायती मार्फत आर.सी.एफ. प्रशासनासमवेत झालेल्या चर्चेत कंपनीच्या प्रशासनाने आश्वासन देऊनही दुरुस्तीबाबत तसेच पाईप लाईन पाण्याखाली ठेवण्याच्या दृष्टीने कोणतीही कारवाई करण्यास या प्रशासनाचे होत असलेले दुर्लक्ष, बोटीचे नुकसान होत असल्याने आर.सी.एफ. प्रशासनाकडून स्वखर्चाने पर्यायी जेट्टी बांधून मिळणेबाबत स्थानिक कोळी बांधवांनी निवेदन देणे, सभागृहात चर्चा केल्यानुसार शासनाच्या विभागाने प्रत्यक्ष केलेल्या पाहाणीनुसार खडकवासला संशोधन केंद्राकडून पाईपलाईन बदलण्यात आली नाही तर या परिसरात स्फोट होण्याची शक्यता वर्तविण्यात येणे, या गंभीर समस्येबाबत कोणतीही कारवाई होत नसल्याने, कोळी बांधवांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना व प्रतिक्रिया."

...3...

श्री. भास्कर जाधव ( मत्स्यव्यवसाय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये खरी वस्तुस्थिती सांगितलेली आहे त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. ही लक्षवेधी सूचना पोर्ट, फिशरीज आणि एन्व्हायर्नमेंट या तीन खात्यांशी संबंधित आहे. मी मंत्री महोदयांबरोबर लक्षवेधी सूचना सुरु होण्याच्या आधी चर्चा केली त्यावेळी त्यांनी सांगितले की, तीनही विभागांच्या बाबतीत उत्तर देण्यास मी समर्थ आहे आणि मी उत्तर देईन. त्या ठिकाणी आर.सी.एफ.मध्ये एन्व्हायर्नमेंटच्या बाबतीत आणि सेफ्टीच्या दृष्टीकोनातून भयानक परिस्थिती आहे. खडकवासला येथील संस्थेने जो अहवाल दिलेला आहे त्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, जर ही पाईपलाईन बदलली गेली नाही तर त्या ठिकाणी स्फोट होऊन तीनही गावांना धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. या तीनही गावांची पाहणी तेथील विधिमंडळाचे संबंधित सदस्य, तेथील सेफ्टी ऑफीसर, फॅक्ट्री ऑफीसर, मच्छीमार आणि एमएमबीचे सी.ओ. यांना संयुक्तरित्या सोबत घेऊन त्या ठिकाणी मंत्री महोदय भेट देतील का आणि या अधिवेशन कालावधीमध्ये ही भेट होईल का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे तो तेथील मच्छिमारांच्या ज्या बोटी आहेत, ज्या होड्या आहेत त्या जेटीपर्यंत येत नाही त्याकरिता आर.सी.एफ.च्या दूषित पाण्यावर ट्रिटमेंट करुन ते पाणी समुद्रामध्ये आर.सी.एफ.च्या ज्या पाईपलाईनमधून सोडले जाते त्या पाईपमुळे तेथील होड्या अडतात हा मूळ प्रश्न सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आर.सी.एफ.बरोबर मंत्री महोदयांच्या उपस्थितीमध्ये आणि आमच्या सर्वांच्या उपस्थितीमध्ये बैठक झाली. त्यावेळी मत्स्यव्यवसाय विभागाचे अधिकारी, एन्व्हायर्नमेंट विभागाचे अधिकारी तसेच एमएमबीचे अधिकारी उपस्थित होते आणि ज्या सूचना सूचविलेल्या आहेत त्यामध्ये जेटी बांधावी लागेल, त्या ठिकाणी चॅनेल बदलावा लागेल, थोडी वाळू काढावी लागेल, ती पाईपलाईन आणखी खाली नेण्याचा प्रयत्न करावा लागेल, असा सर्व गोष्टी करुनच हा प्रश्न कायमस्वरुपी सुटेल आणि त्याची अंदाजित रक्कम जवळजवळ 26,47,61,917 रुपये झालेली आहे. हा प्रस्ताव आपण केंद्र शासनाकडे मूव्ह करीत आहोत. यामधून आपल्याला आर.सी.एफ.ला वगळावयाचे नाही. कारण शेवटी हा प्रश्न केंद्र शासनाच्या अखत्यारित आहे, एमएमबीच्या अखत्यारित आहे, मत्स्य विभागाच्या अखत्यारित आहे. एका बाजूने हा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने केंद्र सरकार आणि आर.सी.एफ. कंपनी यांना जबाबदार धरुन हे काम करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

पण त्याच्या व्यतिरिक्त सन्माननीय सदस्यांनी असे सांगितले की, तेथील विधिमंडळाचे लोकप्रतिनिधी, एमएमबीचे अधिकारी, मत्स्य विभागचे अधिकारी व पर्यावरण विभागाचे अधिकारी यांच्यासमवेत या अधिवेशनात तेथे भेट देण्यासाठी आम्हाला जाता येईल की नाही याबद्दल शंका आहे. पण त्यासाठी प्रयत्न करु. मला वाटते की, अधिवेशनानंतर जाता येईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे अधिवेशन काळातच भेट देण्याबाबत मला खुणावत आहेत. तसा प्रयत्न निश्चितपणे करु. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे खूप तळमळीने हा प्रश्न सातत्याने मांडत आहेत. तो प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासन त्यांना निश्चितपणे सहकार्य करील.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी हा प्रश्न अनेक वर्षे या सभागृहात मांडत आहे. खडकवासला येथे हे संशोधन केंद्र आहे. त्या केंद्राला भेट देण्याची मागणी मी या सभागृहात केली होती. सभागृहात चर्चा झाल्यानंतर त्या केंद्राची पाहणी करण्यात आलेली आहे. म्हणून हे एस्टिमेट झालेले आहे. त्या ठिकाणी पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. आरसीएफ कंपनीने 5 हजार टनाऐवजी 8 हजार टनाचे उत्पादन सुरु केलेले आहे. तेथे जनसुनावणी न घेता, पर्यावरण विभागाची परवानगी न घेता, पर्यावरण विभागाच्या नियमांचे सातत्याने उल्लंघन करण्याचे काम आरसीएफ करीत आहे. म्हणून माझी मागणी आहे की, त्यासंबंधीचा निर्णय अधिवेशन काळातच होऊ शकतो. मी मागील दोन अधिवेशनात मागणी केल्यामुळे विभागाने रिपोर्ट तयार केलेला आहे. तो रिपोर्ट आरसीएफला कळविला तर त्या परिसरातील गावांना सुरक्षितता मिळेल व समाधान लाभेल. या गोष्टी सरकार करील काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, अधिवेशन काळामध्ये या सर्व अधिकाऱ्यांना सोबत घेऊन त्या ठिकाणी निश्चितपणे भेट देण्यात येईल.

-----

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

विशेष उल्लेखाच्या सूचना

**पृ.शी./मु.शी.**: खडवली (पूर्व) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची इमारत धोकादायक होणे याबाबत श्री.भाई गिरकर यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.भाई गिरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" खडवली (पूर्व) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा शासनाच्या बांधकाम विभागाने धोकादायक इमारत जाहीर केले असणे, मात्र असे असताना या शाळेमध्ये सर्रासपणे विद्यार्थ्यांना शिकविले जात नसणे, इतकेच नव्हे तर अध्ययनाच्या वेळेत त्यांच्याकडून झाडू मारुन घेणे, पाणी भरणे आदि कामे करुन घेतली जात असणे, अभ्यासा व्यतिरिक्त शाळेकडून करुन घेतल्या जाणाऱ्या कामांचे ओझे विद्यार्थ्यांच्या पाठीवर असणे, ही इमारत सन 1978-79 ची म्हणजे 34 वर्षापूर्वीची असणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उप अभियंता यांनी दि.6.10.2012 रोजी जिल्हा परिषदेच्या कार्यकारी अभियंत्यांना पत्र दिले असणे, दरम्यान आमदार किसन कथोरे यांच्या प्रयत्नाने खडवलीत सहा वर्ग खोल्यांच्या बांधकामाकरिता 24 लाखांचा निधी मंजूर झाला असणे, त्यापैकी 9 लाख 90 हजार रुपये शिक्षण विभागाला मिळालेले असणे, परंतु कल्याण पंचायत समितीच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने सदर शाळेच्या इमारतीचा प्रस्ताव न पाठवता गुजराथी वर्गाचा प्रस्ताव पाठवला असणे, त्यामुळे गेली दीड वर्षे ही धोकादायक इमारत तोडणे शक्य झाले नसणे, या धोकादायक शाळेत मुलांना अध्ययन कमी व इतर कामेच अधिक प्रमाणात करावी लागत असणे, ही कामे नेहमीच करावी लागत असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे असणे,"

ही बाब मी विशेष उल्लेखाद्वारे उपस्थित करीत आहे.

-------

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

**पृ.शी./मु.शी.**: मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर,पुणे येथे महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनीच्या पाईप लाईनमधून गॅस गळती होणे.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"दिनांक 6.2.2013 रोजी मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर, पुणे येथे महाराष्ट्र नॅचरल गॅस कंपनीच्या पाईपमधून मोठ्या प्रमाणावर गॅसची गळती झाली. या कॉलनीपासून माझे घर 2 मिनिटांवर आहे. सदर गॅस गळतीचे मुख्य कारण म्हणजे सदर ठिकाणाजवळ दिलीप अनगळ या विकासकाने इमारतीचे बांधकाम सुरु केले आहे. मलनिस्सारणाचे पाईप जमिनीमध्ये कमीत कमी पाच फूट खोल टाकावे लागतात. परंतु सदर विकासकाने केवळ तीन फुटापर्यंत पाईप टाकले. या विकासकाने महानगरपालिकेचीही परवानगी घेतलेली नव्हती. अशा प्रकारच्या घटना यापूर्वीही झालेल्या आहेत. पुणे महानगरपालिकेने या संदर्भात विकासकाला फक्त नोटीस पाठविण्या पलिकडे त्यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई केलेली नाही. मात्र गॅस कंपनीविरुध्द केस दाखल केली. परंतु ज्या विकासकाने खोदकाम केले आहे, ज्यामुळे गॅस गळती झाली. तेथील लोकांच्या जीवाला धोका निर्माण झाला होता. मी असे म्हणत नाही की, आपल्याला फार मोठे अधिकार आहेत. परंतु नागरिकांच्या हिताच्या संदर्भात पुणे महानगरपालिकेने दिरंगाईची भूमिका घेतलेली आहे. त्या अनुषंगाने महापालिकेने या विकासकाविरुध्द कारवाई करुन अधिवेशन संपण्यापूर्वी आम्हाला माहिती मिळावी अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे विनंती करीत आहे.

--------

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.30 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.50 ते 2.30 पर्यंत सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

----

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

( चर्चा पुढे सुरु...

प्रा.सुरेश नवले ( नामनियुक्त ) : आदरणीय सभापती महोदय, मी माननीय राज्यपाल महोदयांचे आभार व्यक्त करण्यासाठी व त्यांच्या अभिभाषणावर विचार व्यक्त करण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, मी माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण अतिशय लक्षपूर्वक ऐकले. त्यानंतर त्यांचे अभिभाषण मी एकाग्रतेने ऐकले. माननीय राज्यपाल महोदयांनी अतिशय धीरगंभीरपणे.....

**सभापती** : माननीय मुख्यमंत्री महोदय, आपणास निवेदन करावयाचे आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : होय.

----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371(2) च्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या निर्देशाबद्दल राज्याचे महाअधिवक्ता यांनी शासनाच्या वतीने माननीय उच्च न्यायालयात दाखल केलेले प्रतिज्ञापत्र

पृ.शी. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 371(2) च्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या निर्देशाबद्दल राज्याचे महाअधिवक्ता यांनी शासनाच्या वतीने माननीय उच्च न्यायालयात दाखल केलेले प्रतिज्ञापत्र या विषयी माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले निवेदन.

श्री. पृथ्वीराज चव्हाण ( मुख्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने निवेदन करु इच्छितो.

सभापती महोदय, काल दिनांक 14 मार्च, 2013 रोजी राज्याचे महाअधिवक्ता यांनी भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद 371 (2) च्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या निर्देशाबद्दल माननीय उच्च न्यायालयामध्ये घेतलेल्या भूमिकेबद्दल विधिमंडळाच्या काही सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतले होते. या संदर्भात आज दिनांक 15 मार्च, 2013 रोजी माननीय सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, माननीय अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, मी, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्षनेते व सन्माननीय गटनेते यांच्या समवेत विधान भवन येथे बैठक घेण्यात आली. त्या बैठकीत राज्याचे महाअधिवक्ता हे सुध्दा उपस्थित होते. या चर्चेमध्ये शासनाने आपली भूमिका स्पष्ट केली आहे. माननीय राज्यपाल राज्यातील वेगवेगळ्या भागातील अनुशेष दूर करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याबद्दल निर्देश देतात, त्यात विनियोगाचाही समावेश आहे. राज्य सरकार नेहमी माननीय राज्यपालांच्या निर्देशांचे पालन करीत आले आहे आणि या पुढेही करीत राहणार आहे. राज्याचा समतोल विकास करण्याकरिता घटनेच्या तरतुदीप्रमाणे राज्य शासन कटिबध्द आहे. या प्रकरणात आता माननीय उच्च न्यायालयाचे आदेश अपेक्षित आहेत. ते आदेश प्राप्त झाल्यानंतर आवश्यकता भासल्यास त्या बद्दलही स्पष्टीकरण राज्य शासनातर्फे करण्यात येईल. मी सभागृहाला आश्वासित करू इच्छितो की, विदर्भ व मराठवाडा विभागातील माननीय राज्यपालांनी केलेली तरतूद जर अखर्चित राहिली तर, तो निधी इतर विभागांमध्ये वळविला जाणार नाही. राज्याचा समतोल विकास करण्याकरिता शासन कटिबध्द आहे. धन्यवाद !

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ABG/ D/ MMP/ प्रथम श्री. शिगम 14:30

**सभापती** : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे आज संपवावीत अशी अपेक्षा आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील उत्तराचे भाषण सोमवारी लक्षवेधी सूचनांवरील चर्चा संपल्यानंतर होईल. सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी आपले भाषण सुरु करावे.

---------------

यानंतर श्री. भोगले.....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आता या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी जे निवेदन केले त्या निमित्ताने आमच्या मराठवाड्याला न्याय देण्याची भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. यापुढे मराठवाडा आणि विदर्भाला जो निधी दिला जाणार आहे तो इतरत्र वळविला जाणार नाही असा ठाम विश्वास दिलेला आहे, त्याबद्दल आम्ही सर्वजण शासनाचे आणि त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी कोणत्या नियमाच्या आधारे भाष्य केले?

श्री.विनोद तावडे : माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेल्या निवेदनावर बोलता येते का?

श्री.हर्षवर्धन पाटील : त्यांना निवेदन आवडले म्हणून त्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. ते निवेदनावर बोललेले नाहीत.

श्री.दिवाकर रावते : माननीय सदस्यांना नियमाची माहिती आहे. मी फक्त जाणून घेऊ इच्छितो की, कोणत्या नियमाच्या आधारे त्यांनी भाष्य केले. मला त्यांची री ओढायची इच्छा आहे. कोणत्या नियमाच्या आधारे भाष्य केले हे माहित नसल्यामुळे मला री ओढता येत नाही.

**सभापती** : माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना मी सांगू इच्छितो की, माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहात एखादे स्टेटमेंट केल्यानंतर त्यावर भाष्य करायचे नसते. आता आपण भाष्य केले असल्यामुळे यापुढे लक्षात ठेवावे. माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी आपले भाषण सुरु करावे.

--



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.**: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु....

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याविषयी सर्वसमावेशक भूमिका आदरणीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात स्पष्ट केलेली आहे. त्यामुळे मी मानीय मुख्यमंत्र्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र हे समतेचा पुरस्कार करणारे राज्य आहे. महाराष्ट्रामधील कोणताही भाग उपेक्षित राहणार नाही, सगळ्यांना न्याय दिला जाईल ही प्रामाणिक भूमिका राज्य शासनाची आहे आणि हीच भूमिका माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ओतप्रोत दिसून येते. माननीय राज्यपालांनी आपल्या भाषणाचा प्रारंभ मराठी भाषेतून केला. मला याबद्दल मनापासून आनंद झाला. मराठी भाषेचे तीर्थप्राशन करुन माननीय राज्यपालांनी उर्वरित भाषण इंग्रजी भाषेतून केले. महाराष्ट्रामध्ये एक चांगला संदेश गेला की, महाराष्ट्र हे माय मराठीवर प्रेम करणारे राज्य आहे. अमृतातेही पैजा जिंकणारी ही मराठी भाषा आहे. या मराठी भाषेविषयीचे प्रेम माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणातून व्यक्त केले आहे. त्यामुळे मी माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे विकासाचा पट आहे. राज्यामध्ये राबविल्या जाणाऱ्या सगळ्या विकास योजनांचे प्रतिबिंब माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात उमटते. हे भाषण म्हणजे सुलभ आहे, सरधोपट आहे. लालित्यपूर्ण शब्दांचा आश्रय न घेता महाराष्ट्रातील अश्राप जिवांना आश्रय देणारे हे अभिभाषण आहे.

नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विक्रम काळे)**

प्रा. सुरेश नवले .....

महाराष्ट्रातील जनतेची भावना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये ओतप्रोत भरुन वाहतांना आपल्याला दिसून येते. म्हणून मी माननीय राज्यपालांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो व त्याला माननीय विरोधी पक्ष नेते हसून प्रतिसाद देत असल्यामुळे त्यांनाही मी धन्यवाद देतो. एवढे उदारवादी धोरण विरोधी पक्षाने नेहमी ठेवण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा पुरस्कार महाराष्ट्रातील विरोधी पक्ष सुध्दा करतो हे चित्र माझ्या दृष्टीने अतिशय आनंददायी आहे व महाराष्ट्राला ते पुढे घेऊन जाणारे आहे.

सभापती महोदय, आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार माननीय यशवंतराव चव्हाण साहेबांचे हे जन्मशताब्दी सोहळा वर्ष आहे. हरित क्रांतीचे प्रणेते माननीय वसंतरावजी नाईक यांचीही जन्म शताब्दी महाराष्ट्र शासनाच्या वतीने साजरी केली जात आहे. महाराष्ट्र शसन जात-पात-धर्माच्या पलीकडे जाऊन काम करते असा संदेश माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रामध्ये गेलेला आहे व या गोष्टीचा मला निश्चितपणे आनंद आहे. समतेचे देवदूत राजश्री शाहू महाराजांचे स्मारक कोल्हापूर येथे उभे केले जाणार असून महाराष्ट्र शासनाने तशा प्रकारची घोषणा केलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे अतिभव्य स्मारक महाराष्ट्र शासनाच्या वतीने केले जाणार आहे. यासंदर्भात इंदू मिलची जागा देण्याच्या संदर्भातील संपूर्ण प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे अजरामर स्मारक राज्य शासनाच्या वतीने उभारले जाणार आहे व त्यामुळे जे भव्य, दिव्य, आकाशगामी, आभाळा एवढे स्मारक उभे करण्याकडे महाराष्ट्र शासनाचा कल आहे. अशा महाराष्ट्र शासनाच्या दूरदृष्टीच्या दृष्टीला मनापासून धन्यवाद देतो व त्यादृष्टीने राज्य शासनाची वाटचाल राहणार आहे.

सभापती महोदय, कधी कधी काय होते, निसर्ग चक्राचा परिणाम आहे. झोपेच्या वेळी मनामध्ये विचार येतात व झोप पळून जाते व कधी कधी विचार करण्याची वेळ येते तेव्हा झोप येते. असे अनेकदा घडते. विशेषत: परीक्षार्थी विद्यार्थी परीक्षेला जातात त्यावेळेस नेमके मनामध्ये भरुन वाहणारे विचार हे विस्मरणाच्या खाईत जातात आणि प्रश्नाची उत्तरे नेमक्या वेळेस आठवत नाही



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

असे बऱ्याच वेळेस होते आणि परीक्षागृहाच्या बाहेर पडल्यानंतर विद्यार्थ्याला सर्व प्रश्नांची उत्तरे आठवतात. हा विस्मरणाचा दुष्परिणाम आहे. कदाचित असाच दुष्परिणाम किंवा अनावधानामुळे मराठवाडयातील दुष्काळाचा उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात आला नसावा असा कयास मी बांधतो. हे अनावधाने घडलेले आहे. परंतु महाराष्ट्राचे मंत्रिमंडळ अभिभाषण तयार करुन माननीय राज्यपालांच्या मान्यतेसाठी पाठवते आणि त्यानंतर माननीय राज्यपाल महोदय त्या अभिभाषणाला मान्यता देऊन ते अभिभाषण करतात अशा प्रकारची रीत आहे. मला प्रश्न असा पडतो की, आमच्या महाराष्ट्रातील मंत्री मंडळाच्या माननीय मंत्र्यांना हे अवधान राहू नये याचे आश्चर्य वाटते. त्यामुळे हा विस्मरणाचा परिणाम आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

मराठवाड्यातील दुष्काळा संबंधीचा उल्लेख अभिभाषणात आला नाही. त्यासंबंधीचे हे स्पष्टीकरण आहे. माननीय मुख्यमंत्री बीडला आले होते. ... (अडथळा) .... मी आपणास सांगू इच्छितो की, माननीय मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांची स्मरण शक्ती अत्यंत दांडगी आहे. माननीय मुख्यमंत्री बीडला आल्यानंतर त्यांनी अनेक प्रश्न मार्गी लावले आहेत. माननीय पालकमंत्र्यांच्या नजरेतून काही गोष्टी सुटल्या होत्या. त्यांच्या अकार्यक्षतेमुळे त्या बीड जिल्ह्यात राबविल्या जात नव्हत्या. त्या सर्व गोष्टी सोडविण्याचा प्रयत्न माननीय मुख्यमंत्री महोदयांनी केला. त्यामुळे मी माननीय मुख्यमंत्र्यांचा मना पासून आभारी आहे. माननीय राज्यपालांच्यावतीने माननीय मुख्यमंत्री बीड जिल्ह्यात आले व त्यांनी अनेक प्रश्नांचा उहापोह केला. .... (अडथळा) .....

मी या मताचा आहे की, चांगल्या कार्यक्षमतेने काम करणाऱ्या अधिकाऱ्याचे निश्चितपणे कौतुक केले पाहिजे. पण त्याचे स्तोम किंवा अवडंबर माजविता कामा नये. आपण कौतुक निश्चित करावे. पण अवडंबर किती माजवायचे ? आपण किती स्तोम माजविणार आहात ? व्यक्तिमत्त्व महत्त्वाचे नाही. त्याच्या कार्य गुणांचे कौतुक करणारे हे शासन आहे. म्हणून तर जिल्हाधिकाऱ्याला आहे तेथेच ठेवले. काम करा, काम करते रहो असे सांगितले. दुष्काळाच्या परिस्थितीत निस्पृहतेने काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या पाठीमागे शासन उभे रहात आहे, असे चित्र नव्हे तर संदेश या शासनाने महाराष्ट्राला दिलेला आहे.

माझे सर प्रा.शिवाजीराव भोसले मला नेहमी सांगायचे की, लक्ष देण्याचे आणि लक्ष जाण्याचे या दोन वेगळया प्रकारच्या तऱ्हा आहेत. लक्ष दिल्या शिवाय लक्षात येत नाही. लक्षात आल्या शिवाय लक्षात रहात नाही. याकडे राज्य शासनाचे दुर्लक्ष होऊ नये म्हणून लक्षपूर्वक मी राज्य शासनाचे या विषयाकडे लक्ष वेधत आहे. हा विषय महाराष्ट्रातील ऐतिहासिक वास्तू आणि गडकोटांचा आहे. त्याकडे शासनाचे आज अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. महाराष्ट्रातील ऐतिहासिक वास्तू, गडकोट अबोल ग्रंथ आहेत. ज्याला दृष्टी असेल तो हे ग्रंथ वाचू शकेल. इतिहासामध्ये घडलेल्या अनेक घटनांचे हे साक्षीदार आहेत. अशा या साक्षीदार असणाऱ्या ऐतिहासिक वास्तूंना,





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

गडकोटांना जतन करण्यासाठी राज्य शासनाने ठोस उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. प्रसंगी गरज पडली तर केंद्र शासनाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करावी किंवा माननीय पंतप्रधांनाना भेटून त्यांच्याशी चर्चा करावी. या ऐतिहासिक वास्तू विशद करून त्या जतन करणे कसे आवश्यक आहे हे जर त्यांना सांगितले आणि त्या वास्तू जतन केल्या तर महाराष्ट्रातील जनता आपल्याला दुवा दिल्या शिवाय राहणार नाही. ती दूरदृष्टी निश्चितपणे शासनाकडे आहे असा अभिप्राय या क्षणी मी व्यक्त केला तर तो अप्रस्तुत ठरू नये.

महाराष्ट्राने 54 विशाल प्रकल्पांना मान्यता दिलेली आहे. 43 हजार कोटींची गुंतवणूक होणार आहे. 30 हजार लोकांना रोजगार उपलब्ध करून देण्याची क्षमता असणारा हा विभाग आहे. विदर्भामध्ये रूपये 18500 कोटींचे आश्वासित करार झालेले आहेत. उद्योग विभागाला चालना देण्याचा प्रयत्न उद्योग विभागाचे प्रमुख माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांनी केलेला आहे. श्री.राणे साहेब दूरदृष्टी असणारा नेता आहे. महराष्ट्राच्या मंत्रिमंडळामध्ये कार्यक्षमतेने काम करणारा नेता आहे. भविष्याच्या गर्भामध्ये काय दडले आहे हे शोध घेणारा हा नेता आहे. त्यामुळेच त्यांनी उद्योग खात्याला चालना दिलेली आहे. त्याबद्दल मी त्यांचेही मन:पूर्वक अभिनंदन करतो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले...

जे विशाल प्रकल्प आहेत ते मराठवाडा आणि विदर्भातील ज्या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे, ज्या भागांमध्ये दैन्य आहे, दुष्काळ आहे, ज्या भागांमध्ये बेकारांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे, ज्या भागांमध्ये लोकांच्या हाताला काम मिळत नाही अशा भागांमध्ये आणू शकलो तर मला खात्री आहे या भागांतील असलेला अनुशेष दूर करण्यासाठी शासन प्रयत्नशील असा संदेश महाराष्ट्रामध्ये जाऊ शकेल.

सभापती महोदय, वस्त्रोद्योग धोरण जाहीर झालेले असून त्यामध्ये 312 प्रकल्पांना मंजुरी दिलेली आहे. या प्रकल्पांमध्ये जवळपास 2700 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून 21 हजार रोजगार उपलब्ध होणार आहेत. आपणास माहीत आहे की, मराठवाडा आणि विदर्भामध्ये कापसाचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन होते. मागील दोन वर्षापासून कापूस उत्पादक शेतकरी संकटामध्ये आहे. कापसावर पडलेल्या रोगामुळे कापसाचे पीक उद्ध्वस्त झालेले आहे. या पिकावर अनेक मोठ्या रोगांचा संचार होत आहे. कधी तेल्या रोग पडत आहे तर कधी अन्य रोग पडत आहे. त्यामुळे या भागातील कापसाचे उत्पादन घटत आहे. त्यामुळे तेथील शेतकरी हवालदिल झालेला आहे. या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने वस्त्रोद्योग धोरण जाहीर केलेले आहे. या निमित्ताने मला राज्य शासनाला विचारावयाचे आहे की, या 312 प्रकल्पांनपैकी मराठवाडा आणि विदर्भामध्ये किती प्रकल्प उभे करणार आहात, जवळपास 2700 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे त्यापैकी किती गुंतवणूक मागासलेल्या भागामध्ये होणार आहे ? कारण ज्या भागामध्ये कापूस उत्पादन होते त्या भागामध्ये वस्त्रोद्योग धोरण उभे केल्यास त्या भागातील शेतकऱ्यांना न्याय मिळू शकेल. मराठवाडा हे कापसाचे आगार आहे. त्या ठिकाणी वस्त्रोद्योग धोरण राबविणार नसाल तर त्या भागातील शेतकऱ्यांना आपण कशाप्रकारे न्याय देणार आहात ? तेव्हा शासनाने वस्त्रोद्योग धोरण राबविताना फक्त मराठवाडा आणि विदर्भ विभाग डोळ्यासमोर ठेवला पाहिजे. ज्या भागामध्ये जी वस्तू पिकते त्या भागात तो उद्योग हे धोरण राबविण्याची गरज आहे. राज्य शासन अशाप्रकारचे धोरण निश्चितपणे राबवेल याची मला खात्री आहे.

प्रा.सुरेश नवले...

सभापती महोदय, काँग्रेस सदस्यांच्या वाट्याचा वेळ मला मिळालेला आहे. बीड जिल्ह्यामध्ये कृषी योजना राबविली. परंतु जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांचे प्रस्ताव संबंधित विमा कंपनीकडे न पाठविता विम्याचे सर्व पैसे खाल्ले. शेतकऱ्यांनी विम्याचे हप्ते भरुन देखील त्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही. यास जी संस्था आणि अधिकारी जबाबदार आहेत त्यांच्यावर राज्य शासनाने कारवाई करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये सहा लाख मेट्रीक टनाची गोदामे उभारली जाणार आहेत. यातील काही गोदामे मराठवाड्यात असावीत अशी अपेक्षा आहे. या गोदामांना नाबार्ड कडून सबसिडी मिळते. ही सबसिडी मिळण्यामध्ये अनेक अडचणी आहेत. जी गोदामे बांधलेली आहेत त्यांना सबसिडी मिळालेली नाही. या गोदामांना सबसिडी मिळण्यासाठी शासनाने नाबार्डला विनंती करावी.

सभापती महोदय, हे शासन शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे आहे. तेव्हा खंडकरी शेतकऱ्यांना 25 हजार 800 एकर जमीन परत देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे.

महोदय, विदर्भात नझुलची जमीन आहे. त्या जमिनीच्या माध्यमातून भूमिधारी असलेल्यांना भूमी स्वामित्वाचा अधिकार दिलेला आहे. या बाबतचा कार्यक्रम राज्य सरकार मोठ्या प्रमाणावर राबविणार आहे. महोदय, आमच्याकडे व्यासांची परंपरा आहे. व्यास, वाल्मिकी हे स्वत:च्या शेतामध्ये तांदूळ पिकवित होते. ऋषी आणि मुनीची परंपरा म्हणजे शेतकऱ्यांची परंपरा होय. स्वत:च्या शेतात तांदूळ पिकविणारा व्यास हा आमच्या शेतकऱ्यांचा पूर्वज आहे. या पूर्वजांच्या प्रति मी आदर व्यक्त करतो.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील शेतकरी मर्सिडीज गाडीमधून फिरतो ही वस्तुस्थिती आहे. विदर्भ आणि मराठवड्यातील शेतकरी सुध्दा अशाच प्रकारे मर्सिडीज किंवा टोयाटो गाडीमधून फिरावा अशी आमची अपेक्षा आहे. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आपल्याला शेतकऱ्यांबद्दल जिव्हाळा, प्रेम, आस्था, आदर, आपुलकी आहे. महोदय, शेतकऱ्यांच्या शेतात 10-20 ठिकाणी हेलीपॅड बांधले जावे आणि त्यांनी हेलिकॉप्टरमधून आपल्या शेतीची पाहणी करावी, असे चित्र ज्या वेळी महाराष्ट्रात उभे राहील त्या वेळी महाराष्ट्र हे शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करणारे शासन आहे यावर लोक विश्वास ठेवतील. या दृष्टिकोनातून शासनाने प्रयत्न करावा, अशी माझी विनंती आहे. कारण आज आमच्यावर दुष्काळामुळे मरण्याची वेळ आली आहे.

महोदय, मी राज्यपाल नियुक्त आमदार आहे, प्रतिनिधी आहे. माननीय राज्यपालांविषयी माझ्या मनात नितांत आदर आहे. त्यांनी केलेल्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करुन, त्यांचे आभार मानने हे माझे आद्य कर्तव्य आहे. माननीय राज्यपालांनीच मला या ठिकाणी बसविलेले आहे. त्यांनी विधानपरिषदेत वास्तवतावादी चित्र मांडण्यासाठी मला या ठिकाणी पाठविले आहे. महोदय, समर्थांनी सांगितले की,

रघुरायाचा वर, पावलो सत्वर
जनाचा उध्दार करावया
राघवाची पदे मानसी धरीन
विश्वाचा उध्दार हे नमात्रे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

महोदय विश्वाचा उध्दार करण्याची जबाबदारी त्या त्या प्रदेशातील, त्या त्या देशातील सरकारची आहे. या निमित्ताने राज्यातील लोकांचा उध्दार करण्याची जबाबदारी, लोकांच्या विकासाला चालना देण्याची जबाबदारी ही राज्य सरकारची आहे. ती जबाबदारी राज्य सरकारने व्यवस्थितरित्या पार पाडावी अशी मी विनंती करतो.

महोदय, अनाधि कालापासून म्हणजेच जेव्हापासून माणसाची उत्पत्ती झाली तेव्हापासून प्रत्येक माणसाला कोडे पडले आहे की, मी कोण आहे ? आज मराठवाड्यातील जनतेला सुध्दा अशाच प्रकारचे कोडे पडलेले आहे. या कोड्यातून बाहेर कसे पडावे असा यक्ष प्रश्न त्यांच्या पुढे आहे आणि त्याचे उत्तर राज्य शासनाकडे आहे. शासनाने त्यांच्या समोरील यक्ष प्रश्न सहजगत्या सोडविण्याचा प्रयत्न केला तर, खरोखरच राज्य सरकाररला त्यामध्ये यश येऊ शकेल. तशा प्रकारचे यश मिळविण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न करावा. यासाठी आमच्या दुवा, शुभेच्छा सरकारसोबत आहेत. ते यश सरकारला मिळेल एवढेच या निमित्ताने सांगतो.

महोदय, पुन्हा एकदा माननीय राज्यपालांना मन:पूर्वक धन्यवाद देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

----------

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. खेद एवढ्याकरिताच आहे की, आपल्या लालित्यपूर्ण भाषणामधून माननीय राज्यपालांच्या भाषणातील अनेक मुद्यांना गुदगुल्या करत सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी हे अभिभाषण कसे निषेधार्ह आहे हे सांगण्याचा पूर्ण प्रयत्न अपेक्षा व्यक्त करत करत केला. त्यामुळे भाषणासाठी उभे राहताना या अभिभाषणामध्ये अभिनंदनीय काही सापडते का हे परत परत बघण्याचा प्रयत्न मी करीत होतो.

सभापती महोदय, त्यांनी एक चांगला मुद्दा मांडला आणि मला बरे वाटले. माननीय राज्यपालांचे अभिभाषण मराठीतून व्हावे याकरिता मी सातत्याने पाठपुरावा करीत होतो. सभागृहामध्ये पाठपुरावा केला तसेच माननीय राज्यपालांना पत्र पाठवून पाठपुरावा केला. मी अगोदर जाऊन सांगितले की, राज्यपाल महोदय, आपले भाषण आहे, आपण मराठीतून सुरुवात करावी. डॉ. पी.सी.अलेक्झांडर राज्यपाल असताना ते आपल्या अभिभाषणाची सुरुवात मराठीतून करीत असत आणि पुढचे भाषण इंग्रजीतून वाचत असत. मी माननीय राज्यपालांना भेटलो. त्यांनी गेल्या वर्षी अभिभाषणातील पहिला शब्द मराठीतून वाचला होता. त्यावेळी आम्ही त्यांना धन्यवाद देऊन पुष्पगुच्छ दिला आणि त्यांना सांगितले की, पुढच्या वेळी मराठीतून आणखी जास्त बोलावे. यावेळी ते पूर्ण वाक्य मराठीतून बोलले. मराठीतून भाषण सुरु केल्याबद्दल मध्यवर्ती सभागृहामध्ये उभे राहून सर्वांच्या वतीने मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानले. त्यांचे आभार या सभागृहात मानण्याची संधी सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी घेतल्याबद्दल त्यांना मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, हे सर्व प्रयत्न या सदनातून होतात. आपल्या सभागृहातून प्रयत्न होतात. तो प्रयत्न दिवाकर रावते करतो यापेक्षा सदनातील एक सदस्य या नात्याने मी आपणा सर्वांच्या वतीने आग्रह धरत असतो. त्याचा सन्मान माननीय राज्यपालांनी केला त्याबद्दल माननीय राज्यपालांना धन्यवाद देत असतानाच मुद्दाम एक बाब सांगतो. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील या महाराष्ट्राला खटकलेली, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील महाराष्ट्राला आणि खासकरुन मराठवाडा आणि विदर्भातील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अत्यंत बोचलेली एक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

गोष्ट म्हणजे दुष्काळावर बोलत असताना माननीय राज्यपालांच्या भाषणामध्ये फक्त पश्चिम महाराष्ट्राचा उल्लेख होता आणि इतर भागाकडे दुर्लक्ष झाल्याची खंत ग्रामीण भागामध्ये निर्माण झ ाली. ती खंत अत्यंत व्यथित करणारी होती. हे म्हणत असताना मला याची आठवण करुन द्यावयाची आहे की, राज्यात शिवशाहीचे सरकार असताना 1996-97 मध्ये आताच्या मानाने फक्त 15 टक्के दुष्काळ होता. त्यावेळी माननीय राज्यपाल डॉ. पी.सी. अलेक्झांडर साहेब स्वत: आठ दिवस मराठवाड्यामध्ये हेलिकॉप्टर घेऊन आले होते. मी स्वत: आठ दिवस त्यांच्याबरोबर होतो. ते आठ दिवस मराठवाड्चच्या सर्व भागामध्ये फिरले. त्या ठिकाणी दुष्काळ कसा आहे तो त्यांनी पाहिला. ज्या नद्या सुकल्या होत्या त्या पाहिल्या. रोजगार हमी योजनेची कामे त्यांनी पाहिली. जलसंधारणाच्या कामापासून सर्व कामांवर आठ दिवस सकाळ पासून संध्याकाळपर्यंत ते रोज फिरत असत. त्यांच्या बरोबर मी फिरत असे. त्या कामांची पाहणी करुन त्याचा एक अहवाल करुन राज्य शासनाला देऊन राज्यपाल या नात्याने जो काही संदेश द्यावयाचा तो दिला. त्यावेळी दहा ते पंधरा टक्के दुष्काळ होता.

सभापती महोदय, आताचा दुष्काळ फार गंभीर आहे. काल मी माननीय राज्यपालांना भेटावयास गेलो आणि त्यांना खास भेटून विनंती केली की, त्यावेळेला आम्ही आठ दिवस फिरलो आता आपण अठरा नाही तर 80 दिवस फिरलात तरी कठीण आहे पण आपण एवढे न फिरता विदर्भाच्या आणि खासकरुन मराठवाड्याच्या आणि पश्चिम महाराष्ट्रातील जे दुष्काळी तालुके आहेत तेथील लोक आपली अपेक्षेने वाट पाहात आहेत, आपण महाराष्ट्र शासनाच्या वतीने या ठिकाणी जे काही जाहीर केलेले आहे किमान त्याची तरी अंमलबजावणी होत आहे की नाही हे पाहण्यासाठी फिरावे अशा प्रकारची व्यक्तीगत विनंती मी केली. त्यानंतर शिवसेना-भारतीय जनता पक्षाच्या शिष्टमंडळाच्या वतीने त्यांना निवेदन देऊन विनंती करण्यात आली. केवळ हे अभिभाषण करण्यासाठी येईपर्यंत राज्यपाल त्या भागात गेले नाहीत त्याबद्दल खेद नव्हे तर खंत व्यक्त करतो.

सभापती महोदय, या अभिभाषणामध्ये माननीय राज्यपाल महोदयांनी दुष्काळाच्या संदर्भामध्ये दहा बाबी सांगितलेल्या आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी दुष्काळावरील

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

चर्चेला जे उत्तर दिले ते त्यांनी हे पुस्तक वाचूनच दिले. त्याच्या पलीकडे त्यांनी नवीन काहीही सांगितले नाही. ज्याला आपण ब्ल्यू प्रिंट म्हणतो त्या पध्दतीने माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाची ब्ल्यू प्रिंट जशीच्या तशी सादर केली आणि इतर काही बाबी सांगितल्या. त्यांनी नवीन काहीच सांगितले नाही. माननीय राज्यपाल महोदयांनी जे सांगितले आहे त्यात अत्यंत खंत व्यक्त करावयास लावणारी व आपल्यालाही जाणवेल अशी बाब आहे. आम्हाला, मराठवाड्याला ते मागून घ्यावे लागते. राज्यकर्ते त्या ठिकाणी बघायला सुध्दा तयार नसतात. सवतीचे पोर रडले तरी त्याच्याकडे कोणी पाहात नाही तशा प्रकारची मराठवाडा आणि विदर्भाची परिस्थिती आपण कायम अनुभवतो. काल जे झाले आणि आज जे निवेदन झाले त्यावरुन माननीय राज्यपालांच्या निर्देशानंतर सुध्दा अशा प्रकारे मराठवाडा आणि विदर्भाकडे सवतीचे पोर म्हणून पाहिले जाते. महाराष्ट्र निर्माण झाला तो मुंबईसह मिळविण्याकरिता हुतात्मे झाले. त्यामध्ये आमचे नागपूर कराराने आले आणि मराठवाडा स्वखुशीने आला. मराठवाडा तुमच्या स्वातंत्र्यात नव्हता. मराठवाड्याने स्वत:चा स्वातंत्र्य लढा लढला. श्री. गोविंदभाई श्रॉफ, स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्य सैनिकांनी लढा लढून वेगळा मराठवाडा मिळविला.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

त्यामुळे मराठी मुलुखामध्ये जाण्याचा त्यांना ध्यास होता. मराठी मुलुखाचे आम्ही आहोत हे सांगण्याचा ध्यास होता. साधुसंत आमच्या मराठवाड्यामध्ये निर्माण झाले. त्यांचा वसा घेऊन कोणतीही अट न घालता मराठवाडा या महाराष्ट्रात सामील झाला. आमचा महाराष्ट्र आहे आणि मराठवाडा व विदर्भ ही दोन सवतीची मुले आहेत अशा प्रकारची वागणूक गेली 60 वर्षे या दोन भागांना दिली जाते. दुर्दैव असे आहे की, वैधानिक विकास मंडळांच्या माध्यमातून राष्ट्रपतींच्या अधिपत्याखाली असलेले राज्यपाल तो अधिकार वापरत आहेत. घटनेच्या 371(2) मधूनही राज्यात काही भागात निर्माण झालेल्या अनुशेषाची चिंता सभागृहात व्यक्त करावी लागते, सभागृहात त्याची चर्चा करावी लागते. राज्याचे महाअधिवक्ता न्यायालयात जाऊन या संदर्भात आम्हाला मिळालेला अधिकारही मंजूर नाही किंवा तो योग्य नाही असे सांगतात, त्याचा येथे खुलासा करावा लागतो ही दुर्दैवी बाब आहे. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मराठवाड्यातील दुष्काळाचा उल्लेख न होणे आणि त्याचवेळी पश्चिम महाराष्ट्राचा उल्लेख होत असताना गेल्या 6 महिन्यामध्ये या सदनात पाहत आहोत. सर्व वर्तमानपत्रातून वाचत आहोत की, जत व आटपाडी या भागात पाणी पोहोचलेले नाही. तेथील लोक पाणी कसे पोहोचणार या चिंतेत होते. त्या भागासाठी इकडून, तिकडून पाणी सोडण्यात आले. त्याचे फोटो वर्तमानपत्रातून येतात. उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार हे इतके उत्साही होते की, आटपाडीला बोगद्याद्वारे पाणी सोडल्यानंतर ते पाईपवर उडी मारुन वाकून वाकून पाणी जाते की नाही ते बघत होते. त्याचे फोटो पेपर्समध्ये छापून आले होते. दूरदर्शनवर दिसत होते. परंतु सोडण्यात आलेले पाणी त्या बोगद्यात अडले होते. बोगदा बंद असल्यामुळे ते पाणी पुढे गेले नाही. मंत्री महोदयांनी त्यावेळी मिरवून घेतले, पण पाण्याची मिरवणूक काढता आली नाही. ही परिस्थिती तेथे निर्माण झाली. आटपाटीला पाणी जाण्यासाठी आटापिटा किती केला होता तो दिसून आला. जतला पाणी मिळण्यासाठी आटापिटा केला, त्यासाठी आदरणीय मुख्यमंत्री तेथे गेले होते. तेथे पूजा झाल्यावर पाणी सोडल्यावर वर्तमानपत्रात छापून आले होते. परंतु ते पाणी उलट फिरले. पुढे पाणी जाण्याचे बंद झाले होते. ही परिस्थिती आहे. शासनाने जे केले त्याबद्दल आनंद आहे. जत, आटपाडी या टंचाईग्रस्त भागाला टेंभू, म्हैसाळ, पुरंदर, उरमोडी या भागातील पाणी दिल्यानंतर त्याची देयके टंचाईतून देण्यात आली. म्हणजे केंद्र सरकारकडून टंचाई निवारणासाठी आलेल्या मदतीतून करोडो रुपयांची देयके देण्यात आली. त्याबद्दल आमची

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.दिवाकर रावते.....

तक्रार नाही. कारण सरकारच्या तिजोरीत पैसाच नाही. परंतु ती देत असताना सर्व पक्षांना विश्वासात घेतले पाहिजे होते. जालना जिल्ह्यात लोकांनी बिले न भरल्यामुळे वीज खंडित करण्यात आली होती. वीज पुरवठा पूर्ववत करण्यासाठी लोकांना आंदोलन करावे लागले. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांना उपोषणाला बसावे लागले. मी राजीनामा देतो असे त्यांना सांगावे लागले. या सदनात मी हा प्रश्न मांडला त्यावेळी उप मुख्यमंत्र्यांना आम्ही तो निधी देतो असे सांगावे लागले. म्हणजे आम्हाला येथे झगडल्याशिवाय काही मिळत नाही. राज्यपालांच्या अभिभाषणातून मराठवाड्याला झगडल्याशिवाय काही मिळणार नाही हे समोर आलेले आहे. विदर्भाला आंदोलन केल्याशिवाय काही मिळत नाही. हे माझेच आहे असे समजून पश्चिम महाराष्ट्राचे लाड पुरविले जातात, त्यांचे देणे आहे ते द्यावे. पण त्यांचे लाड पुरविले जातात त्यावेळी खेद व्यक्त करावा लागतो.

सभापती महोदय, पीक विमा योजनेचा या अभिभाषणात उल्लेख केलेला आहे. या योजनेचा अर्थ काय आहे ? शेतकऱ्यांचे पीक नासले, फुकट गेले तर त्याला आधार मिळण्यासाठी पीक विम्याचे पैसे त्यांना मिळावेत. कर्जात गेलेल्या शेतकऱ्यांना थोडासा आधार मिळावा यासाठी पीक विमा योजना आहे.

जत येथे एका व्यक्तीने आत्महत्या केली होती त्या ठिकाणी मी गेलो होतो. त्याचा उल्लेख मी माझ्या भाषणात काल केला होता. त्या माणसाने आत्महत्या केली हे दुर्दैव आहे. परंतु त्या महिलेचे 10 हजाराच्या पेन्शनवर घर चालते ती पेन्शन अडविण्यात आली. पेन्शन न देणाऱ्या अधिकाऱ्यास 15 दिवस फरार ठेवले. त्या अधिकाऱ्यांविरुध्द गुन्हा नोंदवून अटक करण्यास कोणीही तयार नाही. सतत पाठपुरावा केल्यानंतर संपूर्ण जत शहर बंद करण्यात आले होते. ते अधिकारी मुंबईला पळून आले होते. मला मिळालेली माहिती आणखी वाईट आहे. त्या अधिकाऱ्यांना अटकपूर्व जामीन मिळेपर्यंत मोकळे ठेवण्यात आले होते. सांगली जिल्ह्यासाठी पीक विम्याचे 32 कोटी रुपये आले होते. त्यापैकी आटपाडी तालुक्याचे 22 कोटी होते. हे पैसे शेतकऱ्यांना मिळाले असते तर मे महिन्यापर्यंत त्यांची चिंता दूर होऊ शकली असती. मजुरीचा खर्च कमी होईल. पुढील हंगामासाठी शेतीवर खर्च करावयाचा आहे. हा पैसा दुष्काळी भागाकरिता पीक कर्जाला स्थगिती दिलेली आहे. ते पैसे वळते करुन घेतलेले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

हे जे चालले आहे ते योग्य नाही. आपण नियम तयार करता, लोकांना आधार देतो असे सांगता, पण लोकांना आधार काही मिळत नाही. तेव्हा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील पीक कर्जाच्या संदर्भातील व्यथा संपुष्टात येऊ शकत नाहीत म्हणून मी येथे खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, रोजगार हमी योजना महाराष्ट्रामध्ये बंद झालेली आहे. महाराष्ट्रात कोणती योजना चालू आहे हे कोणी सांगत नाही. दुष्काळी भागामध्ये या योजनेअंतर्गत किती खर्च होणार आहे हे देखील कोणी सांगत नाही. केन्द्र सरकारकडून किती पैसे आले, राज्याने किती पैसे खर्च केले याची आकडेवारी माझ्याकडे आहे. मूळ कायदा 2005साली अस्तित्वात आला. नॅशनल रुरल एम्प्लॉयमेण्ट गॅरण्टी ॲक्ट 2005 हा कोणत्या राज्यांना लागू होणार यासंबंधीची सूची दिलेली आहे. त्या सूचीमध्ये महाराष्ट्र राज्याचे नाव नाही. कारण महाराष्ट्र राज्याची स्वत:ची योजना होती. त्यामुळे महाराष्ट्र राज्याचा सूचीमध्ये समावेश करण्यात आला नाही. नंतर केव्हा तरी सूचीमध्ये समावेश झाला असेल तर ते मला माहीत नाही. मूळ कायद्यामध्ये महात्मा गांधीचा संबंध नव्हता. नंतर केन्द्र सरकारने आदेश काढून महात्मा गांधी नॅशनल रुरल गॅरण्टी ॲक्ट 2005 असा कायदा केला. यासंबंधी हिंदीमध्ये आदेश निघाला. त्यामध्ये राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजने के स्थान पर "महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार गॅरण्टी अधिनियम" असे म्हटलेले आहे. महाराष्ट्राचा जो आदेश निघालेला आहे त्यामध्ये मनरेगा ही काय भानगड आहे हे समजत नाही आणि कोणी समजून सांगत नाही. "म" म्हणजे काय "न" म्हणजे काय ? हे कोणी सांगत नाही. चुकीची ॲब्रिव्हेशन्स देऊन चुकीच्या योजना लोकांच्या तोंडी घातल्या जात आहेत. काल माननीय उप मुख्यमंत्री यांची देखील मनरेगा म्हणजे काय हे सांगताना पंचाईत झाली. बँकेमध्ये मनरेगा या नावाने खाते उघडले असेल तर ते चुकीचे हेड आहे. या योजनेबाबत शासन कितीही सांगत असले तरी या योजनेवर किती लाख मजूर काम करीत आहेत अणि काम कसे चालले आहे हे आम्हाला माहीत आहे. या योजनेतून निर्मितीची व्यवस्था झाली नाही. कामावर प्रत्यक्षात दोन-तीन लाख मजूर आहेत काय ? खरे तर मजूर मिळत नाहीत म्हणून ही योजना राबविली जात नाही अशी परिस्थिती आहे. दुष्काळासंबंधी उत्तर देताना माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, किमान एवढे मजूर आले तर तेथे रोजगार हमी योजनेची कामे देऊ. परिस्थिती अशी आहे की, मजूर येत नाहीत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

योजनेवर पैसे खर्च होताता. पण हे पैसे कोठे जातात हे समाजायला मार्ग नाही. तेव्हा या योजनेने दुष्काळग्रस्त भागातील लोकांना कोणता आधार मिळालेला आहे हे काही समजले नाही. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना आहे. या योजनेतील "म" म्हणजे महात्मा गांधी "न" म्हणजे काय ? राष्ट्रीय शब्द घेतला तर त्याचे अद्याक्षर "रा" आले पाहिजे किंवा नॅशनल शब्द घेतला तर "न" अक्षर आले पाहिजे. सगळया योजन "गांधी" नावाने आहेत. संजय गांधी, राजीव गांधी ही मूळ नावे तशीच्या तशी आहेत.

...नंतर श्री. गिते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, या रोहयोच्या पैशांचे काय झाले याचा संशोधन करावे लागेल. उन्हा तान्हात राहणाऱ्या, पाण्यावाचून तडफडणाऱ्या ग्रामीण भागातील कास्तकारांपर्यंत रोहयोची कामांची माहिती होत नाही, सदर योजनेची कामे करण्यासंदर्भात ग्रामीण पातळीवरील शासकीय यंत्रणांकडून मागणी देखील केली जात नाही, पर्यायाने या भागातील कास्तकारांना कामे उपलब्ध होत नाहीत. मागेल त्याला काम देण्यासाठी ही रोजगार हमी योजना सुरु केली आहे, परंतु मजुरांना रोहयोची कामे दिली जात नाही, या गोष्टीचा मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, विदर्भातील 8 कापूस उत्पादक जिल्हयासाठी 3250 कोटी रुपये इतका नियतव्यय शासनाने जाहीर केला. परंतु या 8 जिल्हयांसाठी फक्त 75 कोटी रुपयांचा नियतव्यय दिला गेला. 3250 कोटी रुपयाच्या नियतव्ययाला 5 ने भागितले जेवढी रक्कम येईल. तेवढा तरी नियतव्यय दिला पाहिजे. परंतु फक्त 75 कोटी रुपयांचा नियतव्यय देऊन विदर्भातील आठ जिल्हयातील कापूस पिकविणाऱ्या कास्तकारांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम शासनाकडून करण्यात आले आहे. विदर्भाती कापूस उत्पादक कास्तकारांवर जो अन्याय केला गेला त्या बाबतीत मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, कृषी आणि कृषी संलग्न क्षेत्र वाढविण्याकरिता 1800 कोटी पैकी फक्त 850 कोटी रुपये एवढाच निधी देण्यात आला. तो निधी प्रत्यक्षात कोणत्या कामासाठी दिला आहे याची सदनाला माहिती दिली गेली पाहिजे व हा निधी का कमी दिला गेला या सदंर्भातील देखील माहिती सभागृहाला दिली पाहिजे.

सभापती महोदय, मागच्या वर्षी पडलेल्या दुष्काळाच्या वेळी कोरडवाहू संदर्भात धोरण जाहीर केले जाईल अशा प्रकारची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केली होती. परंतु कोरडवाहुचे धोरण अद्याप आमच्यापर्यंत आलेले नाही. ते धोरण आपल्याकडे आले असेल तर त्याची मला माहिती नाही. कोरडवाहुसाठी येत्या पाच वर्षात किती निधी कोण कोणत्या योजनांवर खर्च केला जाणार आहे, कोणत्या विकास योजना तयार केल्या जाणार आहेत या विषयी या अभिभाषणात काहीही माहिती देण्यात आलेली नाही. या बाबतीत धोरण जाहीर केले जाईल अशी फक्त घोषणा करण्यात आली. आश्वासीत उत्पादकाला 100 कोटी रुपये ठेवले आहे असे म्हटले आहे.

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

उत्पादकाच्या उत्पन्नाला हमी भावासाठी किती रुपयांचा निधी ठेवण्यात आला आहे याचा खुलासा होत नसल्यामुळे शेतकऱ्याला हमी भाव मिळेल अशी शाश्वती नाही, त्यामुळे मी खेद व्यक्त करतो. उडीद, तूर , पॅडी आणि ज्वारी असे इंग्रजीत लिहीले आहे आणि मराठीत उडीद आणि तूर असे म्हटले आहे. पॅडी म्हणजे गहू असावा असे मला वाटते. भाताला पॅडी म्हणतात याची मला कल्पना नाही. माननीय राज्यपालांचे इंग्रजी व मराठी अनुवाद असलेली अभिभाषणाचे पुस्तके किती विनोदी आहेत याची बरीच उदाहरणे सांगता येतील. धान्यांची नावे इंग्रजीमध्ये लिहिताना संबंधित अधिकाऱ्यांना भान रहात नसेल तर माननीय राज्यपाल महोदयांच्या अवमान करणाऱ्या अधिकाऱ्यावर कोणती कारवाई करणार असा माझा या निमित्ताने शासनाला प्रश्न आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी गायी, म्हशी आणि दूध वाढविण्यास वाढविण्यास सांगितले आहे. मला कळत नाही. अधिकारी आमच्या सभागृहाला मुर्ख समजतात काय, या सभागृहातील सदस्यांना काही कळत नाही असे समजता काय? मागच्या वेळी पॅकेज अतर्गत गायी आल्या, त्या कोणी पळविल्या ? सन्माननीय श्री.विनोदजी तावडे तुम्ही त्यावेळी या बाजुला होतात. त्यावेळी माननीय श्री. अजित पवार यांनी उभे राहून मला विचारले की, मला त्यांची नावे सांगा, मी संबंधितांविरुध्द कारवाई करीन. एक आमदार, एक माजी खासदार आणि एक माजी आमदार या लोकांचे वेगवेगळे व्यवसाय आहेत, त्यांना अल्पभूधारक म्हणून गायींचे वाटप केले. त्यावेळी मी नावे देखील सांगितली. या संदर्भात मी संबंधितांवर कारवाई करीन असे माननीय श्री.अजित पवार यांनी मला सांगितले होते. त्यावेळी ते उप मख्यमंत्री होते. परंतु त्यांनी काहीही केले नाही. बोले तैसा चाले, एकमेव आमचे दादा. सभागृहात शब्द दिल्यानंतर तो पाळला गेला नाही. म्हणून माननीय श्री. अजितदादा पवार यांच्या शब्दावर विश्वास किती ठेवावयाचा असा प्रश्न आमच्या मनात तेव्हापासून भेडसवू लागला आहे. आपल्याला सर्वांना कल्पना आहे की, सर्व संबंधित अधिकारी पशुधन खरेदीसाठी बाजारात जातात, तेथे सौदा केला असे दाखविता. अर्धे पैसे त्याचे आणि अर्धे पैसे अधिकाऱ्यांचे असे वाटून घेतात. कोणत्याही कास्तकाराच्या दावणीला जनावर जात नाही. या खरेदीमध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार चालतो. ही गंभीर बाब आहे. या बाबतीत शासनाने वेळोवेळी गांभीर्याने लक्ष घातले नाही म्हणून मी खेद व्यक्त करतो.

3...



ABG/ MMP/ D/ प्रथम श्री.शिगम 15:15

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, आम आदमी विमा योजना केंद्राचे नाव मराठीत आणि इंग्रजीत सारखीच लिहिलेली आहे. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेचे नाव इंग्रजीत तसेच आहे व मराठीतही तसेच आहे. अभिभाषण तयार करताना या योजनांचा अनुवाद करण्यात आलेला नाही.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MMP/ गितेनंतर 15:20

श्री.दिवाकर रावते..

भाषांतर नाही. इंदिरा गांधी विधवा निवृत्तवेतन योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना इंग्रजी आणि मराठी भाषेत एकच उल्लेख आहे. एकदा नाव दिले की ते तसेच राहते. रावते, दर्डा हे नाव तसेच राहणार. या गोष्टी शासनाने निर्माण केल्या पाहिजेत.

सभापती महोदय, एक गोष्ट मी अत्यंत खेदाने नमूद करतो. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्ष यांच्यामध्ये वाद असू शकतात, हे मान्य आहे. एकमत होत नाही हेही मान्य आहे. वारंवार सांगितले जाते की, आघाडीचे सरकार आहे. एकमेकांना जुळवून घ्यावे लागते. मग एका योजनेला दोन महान विभुतींची नावे कशी दिली गेली? तुमची भांडणाची पध्दत काय आहे? 'राजमाता जिजाऊ आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जाणीव जागृती अभियान'. दोन्ही विभुतींच्या नावांने दोन वेगवेगळ्या योजना राबविता आल्या असत्या. त्यामुळे तुमचे आणि आमचेही समाधान झाले असते. दोन विभुतींना सन्मानित केल्याचे प्रचार करीत आहात. या सगळ्या विचाराची किती विक्षिप्तता आहे?

सभापती महोदय, अल्पसंख्याकाकरिता एक परिच्छेद आहे. काय काय करतो, काय काय करतो हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. आम्हाला आनंद आहे. ते राज्याचे घटक आहेत, समाजाचे घटक आहेत. त्याबद्दल आमची तक्रार नाही. नागपूरच्या हज हाऊसपासून संभाजीनगरला नवीन हज हाऊस बांधण्याचा प्रयत्न करीत आहात. जरुर करा. विमानतळावर ते कसे बसतात हे आम्ही बघतो. त्यांच्या तंबूचे उद्‌घाटन माननीय मंत्री श्री.दर्डा हेच करतात. परंतु संपूर्ण पुस्तिकेमध्ये किंवा संपूर्ण अभिभाषणामध्ये या महाराष्ट्रातील एकाही देवस्थानाचा उल्लेख नाही किंवा देवस्थानाच्या विकासाचा उल्लेख नाही. या महाराष्ट्रातील महालक्ष्मी मंदिराच्या विकासाकरिता 100 कोटी रुपये जाहीर केले, त्यातील एक रुपया देखील दिलेला नाही. या अभिभाषणात महालक्ष्मी मंदिराच्या विकासाच्या संकल्पनेच्या संदर्भात यावर्षी 10 कोटी रुपये दिले आहेत असा उल्लेख असावयास हवा होता. औंढा नागनाथ तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता भरीव निधी जाहीर केला गेला, आतापर्यंत फक्त 2 कोटी रुपये खर्च झाले आहेत. उर्वरित निधीचा पत्ता नाही. याबद्दल अभिभाषणात कुठेही उल्लेख दिसून येत नाही.

सभापती महोदय, धाराशिव येथील तुळजापूरच्या मंदिराबद्दल, माहुरच्या तीर्थक्षेत्राबद्दल अभिभाषणात उल्लेख केलेला नाही. हिंदूंचे नाव घेतल्यानंतर मुसलमानांना राग येईल एवढी भीती

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MMP/ गितेनंतर 15:20

श्री.दिवाकर रावते..

वाटते का? महाराष्ट्रातील एकाही हिंदू देवस्थानाचा अभिभाषणामध्ये उल्लेख नाही. साधुसंतांचा हा महाराष्ट्र असताना या महाराष्ट्रातील एकाही देवस्थानाचा अभिभाषणात उल्लेख नसल्यामुळे मी अत्यंत जाणीवपूर्वक, द्वेषपूर्ण आणि निंदनीय खेद व्यक्त करतो. महाराष्ट्रातील हिंदू जनतेला अशा प्रकारे अवमानित करणार असाल तर ते योग्य नाही. स्वत:ला नि:धर्मी राज्यकर्ते म्हणवणाऱ्यांना हे शोभनीय नाही.

सभापती महोदय, मुंबई महापालिकेची जकात रद्द करु आणि राज्यातील सर्व महापालिकांना जकात रद्द केल्याबद्दल स्थानिक कर लागू करण्याचे जाहीर केले गेले. व्यापाऱ्यांनी आणि उद्योग क्षेत्राने आग्रह धरल्यामुळे जकातीऐवजी स्थानिक कर लागू करणार असे जाहीर करण्यात आले. मुंबई महापालिकेचा मुद्दा दाखला दिला आहे. या मुद्याबाबत माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांनी विस्ताराने भूमिका मांडावी. त्यांचा या विषयाबाबत चांगला अभ्यास आहे. मराठी भाषेतून अभिभाषणाला सुरुवात केल्याबद्दल मी माननीय राज्यपालांचे अभिनंदन केले, माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी अभिनंदन केले आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे कामकाज मराठी भाषेतून चालले पाहिजे यासाठी प्रत्येक अधिवेशनात मी विविध प्रकारच्या आयुधांचा वापर केला आहे. विशेष उल्लेख, औचित्याचा मुद्दा उपस्थित करुन मराठी भाषेचा वापर करण्याची मागणी करीत होतो. मुंबई उच्च न्यायालयाचे 'बॉम्बे हायकोर्ट' ऐवजी 'मुंबई उच्च न्यायालय' असे नामकरण करण्याबद्दल अभिभाषणात कुठेही उल्लेख दिसत नाही.

नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

बॉम्बेचे "मुंबई" करण्यामध्ये एवढी कसली तांत्रिक बाब ? बॉम्बेचे मुंबई करण्यामध्ये आपल्याला एवढी वर्षे का लागत आहेत ? खरे म्हणजे आमच्या राज्यकर्त्यांमध्ये दम नसल्यामुळेच हे घडत आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर मुंबईचे नाव झालेले आहे. या शहराला जगाच्या पाठीवर मुंबई म्हणून ओळखले जाते. केंद्रामध्ये असे कोणते टिकोजीराव बसून राहिलेले आहेत की, ज्यांच्या एका लेखणीने बॉम्बेचे "मुंबई" व्हायला अडले आहे.

सभापती महोदय, आम्ही दूरदर्शनवर दिल्ली उच्च न्यायालय, अलाहाबाद उच्च न्यायालय, कलकत्ता उच्च न्यायालय असे पाहत असतो परंतु मुंबईचा बोर्ड दिसतो तो "बॉम्बे हायकोर्ट". हे सर्व बदले पर्यंत "बॉम्बे हायकोर्ट" एवढे तरी तुम्ही मराठीतून लिहू शकता की, नाही ? मुंबई उच्च न्यायालयाची भाषा मराठी होण्याच्यासंदर्भात अनेक वेळा आग्रह झाला, वकिलांनी उपोषणे केली, संघर्ष केला, आंदोलने केली परंतु तरी सुध्दा मुंबई उच्च न्यायालयाची भाषा मराठी होऊ शकली नाही त्यामुळे मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण विनोदी आहे हे मी माननीय राज्यपाल महोदयांचे भाषण सुरु असतांना बोललो होतो तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदय हसले होते. महाराष्ट्रामध्ये 96 टक्के विजेची मागणी पूर्ण झालेली आहे असा जेव्हा अभिभाषणामध्ये उल्लेख झाला तेव्हा हा संदेश संपूर्ण राज्यामध्ये जात असतांना अर्धा महाराष्ट्र पोट भरुन हसत होता. महाराष्ट्रात अर्ध्याहून अधिक महाराष्ट्र अंधारात असतांना महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची एवढी चेष्ट कोणी केली नसेल एवढी चेष्टा माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणात केल्यामुळे मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाला खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, विनोद म्हणजे किती विनोद करावा यालाही काही मर्यादा असतात. 6925 गिरणी कामगारांपैकी केवळ 24 गिरणी कामगारांना घरे दिली गेली आणि हे सुध्दा अभिभाषणात गौरवाने सांगितले जाते याचे मला दुःख वाटते. 1.5 लाख गिरणी कामगारांना घरे द्यावयाची आहे परंतु त्याचा काहीच उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात नाही. गिरणी कामगारांना घरे मिळण्याची मला सुतराम शक्यता दिसत नसल्यामुळे मी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणा संदर्भात खेद व्यक्त करतो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

सभापती महोदय, या ठिकाणी मी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांचे अभिनंदन करतो. माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात नक्षलग्रस्त भागाच्या संदर्भात उल्लेख आला असून तो चांगला उल्लेख आहे. माननीय आबांनी गेल्या दोन वर्षात नक्षलग्रस्त भागामध्ये मुंबईच्या पोलीस अधिकाऱ्यांनी तसेच तेथील प्रशासनाने नक्षली प्रश्न योग्य पध्दतीने हाताळल्यामुळे या परिस्थितीवर ताबा मिळवल्याचे दिसते त्यामुळ मी गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री म्हणून तसेच गृहमंत्री म्हणून आबांना धन्यवाद देतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या संपूर्ण अभिभाषणामध्ये देशाच्या आर्थिक राजधानी असलेल्या मुंबई बद्दल उल्लेख करण्यात आलेला नाही. मुंबईचा उल्लेख केवळ कर लादण्याच्या संदर्भात करण्यात आलेला आहे. मुंबईत आज मोठया प्रमाणात वाहतुकीची कोंडी होंत आहे, जुन्या वाहनांचा प्रश्न आहे, मुंबईत परप्रातियांच्या बेकायदशीर 50 ते 60 हजार रिक्षा आहेत, परप्रांतियांच्या लोंढयाबद्दल, फेरी वाल्यांच्या धोरणाबद्दल काहीही उल्लेख करण्यात आलेला नाही. सामान्यांकरिता घर निर्मितीची घोषणा शासनाने गेल्यावर्षी केली होती परंतु सामान्यांच्या घरांचा कोणताही उल्लेख माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करण्यात आलेला नाही. सिंचनातून निर्माण झालेल्या घोटाळयाबाबत शासनाची नक्की काय भूमिका आहे याबाबतची भूमिका माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात देण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये शिक्षणाच्या संदर्भात केवळ चार ओळी दिलेल्या आहेत. या चार ओळी आहेत की, चारोळी आहे हे काही समजत नाही. महाराष्ट्राची जडणघडन ज्याच्यामध्ये आहे, देशामध्ये महाराष्ट्र शिक्षणामध्ये अग्रेसर आहे असे म्हटले जाते, त्या संदर्भात मंत्री महोदय अभिमानाने सांगतात की, माझे खाते चांगले आहे. परंतु अशी शेखी मिरवणाऱ्या शिक्षणाच्या संदर्भात केवळ चार ओळींचा उल्लेख केलेला आहे हे शोभादायक नाही. शिक्षणाच्या संदर्भात महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना कोणतीही आश्वासितता माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये दिसून आलेली नाही. शिक्षकांचा संप सुरु आहे. आता शिक्षकांचा संप मिटला असे सांगितले जात असले तरी त्यांना आपण काय चुना लावला आहे याची



अग्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

माहिती शिक्षकांना आहे. बनवा बनवी करु नका. काही का होईना बारावीच्या विद्यार्थ्यांचे पेपर तपासायला गेले याबद्दल तुम्हाला धन्यवाद देतो. परंतु महाराष्ट्रात आज अतिशय गंभीर परिस्थिती आहे. महाराष्ट्र हा मराठी माणसांचा आहे,

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

सभापती महोदय, हा महाराष्ट्र मराठी माणसांचा आहे. या महाराष्ट्राची राजभाषा मराठी आहे. या महाराष्ट्रावर मराठीचा ठसा आहे. हा महाराष्ट्र साधू-संतांचा आहे. अमृताच्या पैजा जिंकणारा हा महाराष्ट्र आहे. अशा या महाराष्ट्रामध्ये आपण शिक्षणाच्या बाबतीत जे काही निर्णय घेतले आहेत ते फार ते फार गंभीर आहेत. ते आपल्यालाही पटणारे आहेत. त्यात आपली कोंडी होणार आहे. आमच्या मराठवाड्यातून देखील शिक्षक सम्राट निर्मार्ण व्हावते अशी आमची इच्छा आहे. महाराष्ट्रात 2008 पासून मराठी माध्यमांची अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित, कोणत्याही प्रकारची शाळा काढण्यास परवानगीच नाही. त्यासंबंधी देखील येथे चर्चा झाली. अर्ज कसे फेटाळले गेले त्यासंबंधी देखील चर्चा झाली. इंग्रजी माध्यमाच्या सुमारे 1200 शाळांसह, कन्नड, गुजराती व हिंदी माध्यमाच्या शाळांना मान्यता देण्यात आली आहे. तसे शासन निर्णय जुलै 2009 ते ऑगस्ट 2010 च्या काळात काढण्यात आले आहेत. स्वभाषेच्या शाळांना मान्यता न देणाऱ्या आदरणीय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांना मेडल द्यावेसे वाटते. अशा प्रकारचे कौतुक आपल्याच कारकिर्दीमध्ये झालेले आहे. मराठी शाळांना मान्यता न देणारे महाराष्ट्र हे भारतातीलच नव्हे तर जगातील एकमेव राज्य आहे. असा कौतुक आपण निर्माण केला. त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. महाराष्ट्रात मराठी भाषेची मुस्कटदाबी करणारे, कोंडी करणारे व मराठी शाळांना भवितव्य न ठेवणारे आपण जे धोरण स्वीकारले आहे त्याचा मी निषेध करतो आणि थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

......

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे (कोकण पदवीधर) : आदरणीय सभापती महोदय, मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी उभा आहे. महाराष्ट्र राज्याचे माननीय राज्यपाल श्री.के.शंकरनारायणन यांनी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाच्या सन्माननीय सदस्यांना संबोधित करून या राज्याचा विकास, तसेच राज्याच्या प्रगतीची वाटचाल कोणत्या दिशेने होणार आहे याबाबत यथायोग्य मार्गदशन केले आहे.

महोदय, ज्यांनी या महाराष्ट्र राज्याला घडविले, राज्याला विकासाची योग्य दिशा दाखवून राज्य विकासासाठी आपले योगदान दिले ते महाराष्ट्राचे शिल्पकार, मंगलकलश प्रणेते, स्वर्गीय यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष शासनाने विविध उपक्रम राबवून साजरे केले आहे, हे आपणा सर्वांना ज्ञात आहेच.

या अनुषंगाने मी काही मुद्दे मांडून सूचना करणार आहे. शासनाने गोंदिया, चंद्रपूर व बारामती येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे त्या भागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक हेळसांड थांबून त्यासाठी नागपूर, पुणे वा मुंबईकडे धावपळ करण्याची त्यांना गरज उरणार नाही व सहाजिकच तेथील जनतेला एक प्रकारे दिलासा मिळणार आहे. याबद्दल मी माननीय राज्यपाल महोदयांच्या प्रती आभार व्यक्त करतो. वैद्यकीय महाविद्यालये गरजेनुसार नव्याने स्थापन करणे हे स्वागतार्ह आहे. परंतु सध्या अस्तित्वात असलेल्या वैद्यकीय महाविद्यालयात असणाऱ्या गैरसोयी व कमतरता याकडे गांभीर्याने लक्ष देणे अत्यंत गरजेचे आहे. तरी त्या दृष्टीने शासनाने कार्यवाही करावी अशी मी विनंती करतो.

या अनुषंगाने मी असेही निदर्शनास आणू इच्छितो की, सद्य:स्थितीत कोकण विभागातील महाविद्यालये मुंबई विद्यापीठास संलग्न असल्याने तेथील संस्था व विद्यार्थ्यांना अनेक गैरसोयींना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे कोकणवासीय संस्था व विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करावे अशी विनंती करतो.

तसेच कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळाची स्थापना करावी अशी अनेक वर्षापासून कोकणवासीय जनतेची आग्रही मागणी आहे. तरी तेथील विकासाच्या दृष्टीने कोकणासाठी स्वतंत्र वैधानिक विकास मंडळ देखील शासनाने स्थापन करून कोकणवासीयांना न्याय द्यावा अशीही विनंती करीत आहे.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

त्याच बरोबर शासनाने सुमारे 1 लाख शाळांमधील 1.80 कोटी विद्यार्थ्यांना व 5 लाख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाला आधार कार्ड वितरित करण्याचा तसेच 1 एप्रिल 2013 पासून खाजगी, प्राथमिक व 3 माध्यमिक शाळांना वेतनेतर अनुदान देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. याबाबत शासनाचे आभार मानतो. तथापि, हे अनुदान थकबाकीसह द्यावे अशी अपेक्षा सर्व शिक्षकवर्गाची व शिक्षणसंस्थांची असल्याने अपेक्षित कार्यवाही शासनाने करावी अशी विनंती करतो.

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे...

सभापती महोदय,"शालार्थ" सारखी अतिशय आवश्यक आणि काळाला अनुसरुन संगणक प्रणाली सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन व भत्ते ऑनलाईन (Online) पध्दतीने प्रदान करण्यात येणार आहे. तथापि, या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा "भविष्य निर्वाह निधी"देखील ऑनलाईन पध्दतीने प्रदान करावा ज्यामुळे या सर्व मंडळींना या योजनेचा जास्त फायदा मिळेल. कारण प्रॉव्हीडन्ट फंड कार्यालयाची अवस्था अतिशय वाईट आहे. त्या ठिकाणी कागदाचे ढिगारेच्या ढिगारे पडले आहेत. मंत्रालय इमारतीस आग लागून त्यामध्ये अनेक फाईल्स आणि कागदपत्र जळाली त्याप्रमाणे या कार्यालयास आग लागल्यास अतिशय महत्वाची कागदपत्रे जळून खाक होतील आणि असे झाले तर शिक्षक वर्ग आपणास कधीही माफ करणार नाही. तेव्हा शिक्षकांचा भविष्य निर्वाह निधी देखील ऑन लाईन करावा अशी विनंती आहे. ऑन लाईन शालार्थ पध्दतीमुळे एक पारदर्शकता निर्माण होईल. त्याच बरोबर शाळांचे प्रस्ताव व शासनाने मान्यता दिलेल्या शाळा याबाबतची सर्व माहिती "शालार्थ" प्रणालीमध्ये समाविष्ट केल्यास या योजनेचा निश्चित फायदा होऊन संभ्रमावस्था दूर होईल असे मला वाटते्. तेव्हा त्या दृष्टीने कार्यवाही अशी विनंती आहे.

सभापती महोदय, शासनाने "स्वयं अर्थसहाय्यित शाळांचे (Self Finance School) धोरण आणले असून मराठी, उर्दू व गुजराती माध्यमांच्या शाळांना देखील स्वयं अर्थसहाय्य पध्दतीने मान्यता देण्याचे ठरविण्यात आले आहे असे समजते. परंतु मराठी, उर्दू व गुजराती माध्यमांच्या शाळा या धोरणानुसार टिकणे कठीण आहे. महाराष्ट्र हे कल्याणकारी राज्य आहे हे लक्षात घेता या बाबत फेरविचार व्हावा आणि या शाळांच्या अनुदानित पध्दतीस मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, राज्यातील इच्छूक नागरिकांचा नागरी सेवामध्ये सहभाग वाढावा म्हणून या पूर्वी राज्यात चार अखिल भारतीय सेवा पूर्व प्रशिक्षण संस्था स्थापन केलेल्या आहेत. नाशिक आणि अमरावती येथे नव्याने दोन संस्था सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यामुळे नागरी सेवांमध्ये आपले करिअर करण्यासाठी पुढे येणाऱ्या इच्छुकांच्या संख्येत वाढ होईल याबाबत शंका बाळगण्याचे कारण नाही. शासनाच्या कृतीचे मी अभिनंदन करतो. आपणा सर्वांना विदित आहे

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे...

की, आदिवासी, दुर्गम व ग्रामीण भागातील उमेदवारांना इंग्रजीचे शिक्षण मिळणे कठीण असते व त्यांचे शिक्षण मराठी माध्यमातून झाले असल्यामुळे इंग्रजीमधून परीक्षेसाठी तयारी करणे त्यांना अतिशय कठीण जाते. त्यामुळे अनुसूचित जाती / जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या उमेदवारांना नागरी सेवेमध्ये उपलब्ध होण्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. युपीएससीने प्रादेशिक भाषा वगळून इंग्रजी भाषेत परीक्षा घेण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे साहजिकच या राज्यातील मराठी उमेदवारांवर अन्याय होणार आहे. मला कल्पना आहे की, हा राज्याचा विषय नसून तो केंद्राचा आहे. परंतु माननीय राज्यपाल, माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री यांनी पुढाकार घेतल्यास निश्चितच केंद्राला योग्य निर्णय घेण्यास आपण भाग पाडू शकाल असा मला विश्वास आहे. तेव्हा आपण मराठी उमेदवारांना न्याय मिळवून द्यावा अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, एखाद्या महिलेवर अतिप्रसंग होतो तेव्हा तिच्या आयुष्याच्या चिंधड्या होतात. तेव्हा एक संवेदनशील राज्य म्हणून तिला मदतीचा हात देऊन तिचे पुनर्वसन करणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्याने एक कॉर्पस फंड निर्माण करावा. त्यातून त्या महिलेच्या शिक्षणाचा खर्च करावा. त्याच प्रमाणे तिला योग्य रोजगार मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावा. कारण लोकांचा अतिप्रसंग झालेल्या महिलेकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलतो. तिला समाजाने स्वीकारणे हा देखील एक महत्वाचा विषय आहे. तेव्हा अशा महिलांचे योग्य पुनर्वसन व्हावे आणि तिला धैर्य देणे हे राज्याचे प्रथम कर्तव्य असावे आणि त्यासाठी राज्याने कॉर्पस फंड तयार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, शासनाने या पूर्वीच राज्यातील अकरा जिल्ह्यांमध्ये आर्थिकदृष्टया मागास विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरु केली असून उर्वरित सर्व जिल्ह्यात देखील ती सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. इतकेच नव्हे त्यांच्या निवासाची सोय करण्यासाठी 2250 क्षमतेची 14 वसतिगृहे स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. ही बाब निश्चितच आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या व उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनींच्या हिताच्या दृष्टीने स्वागतार्ह आहे. त्याबाबत मी शासनाचे आभार मानतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

------

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ KTG/ D/ पूर्वी श्री.अजित.... 15:40

श्री.राम पंडागळे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल मांडलेल्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला पाठिंबा देऊन त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचे अनेक मुद्दे मांडण्यात आलेले आहेत. हे खरे आहे की, आज राज्यामध्ये भीषण दुष्काळ पडलेला आहे. राज्यातील दुष्काळी परिस्थिती जवळजवळ हाताबाहेर गेली असून, ती गंभीर बनली आहे. राज्यातील खेड्यापाड्यांमध्ये आणि विशेषत: मराठवाड्यातील खेड्यापाड्यांमध्ये आपल्या बाळाला कढेवर घेऊन दिवसभर टँकरची वाट पाहणाऱ्या महिला दिसत आहेत. त्या महिला गावात कधी टँकर येईल आणि कधी माझ्या तहानलेल्या मुलाला पाणी पाजेल याच विचारात असतात. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या भाषणात दुष्काळाच्या बाबतीत अनेक व्यथा मांडल्या. ही वस्तुस्थिती आहे की, एक 12 वर्षाचा मुलगा विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेला आणि विहिरीतून पाणी खेचत असताना विहिरीत पडून त्याचा करुण अंत झाला. आपल्या मुलाला बघण्यासाठी गेलेल्या आईचा देखील त्यात अंत झाला. पाण्याची इतकी भीषण परिस्थिती राज्यात आहे.

महोदय, राज्यातील जवळजवळ 11801 गावांमध्ये पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरु आहेत. आजही अनेक तालुक्यांमध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. या सर्व परिस्थितीतून दिलासा देण्यासाठी आदरणीय राज्यपालांनी एकही गाव पाण्याविना तडफडणार नाही, एकही जनावर चाऱ्याविना, पाण्याविना मरणार नाही अशा प्रकारची भूमिका घेतली आहे. राज्यामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणावर भयानक दुष्काळ असताना आज एकही जनावर चाऱ्याविना मेल्याची बातमी नाही. त्यामुळे शासन या बाबतीत किती गंभीर आहे हे या निमित्ताने पहावयास मिळते.

महोदय, माननीय मुख्यमंत्री तसेच माननीय उप मुख्यमंत्री दुष्काळी भागाचा दौरा करीत आहेत. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार सबंध दुष्काळी भागाचा दौरा करीत आहेत. आठवड्यातील किमान दोन दिवस दुष्काळी जिल्ह्यांत जाऊन तेथील अधिकाऱ्यांना बरोबर घेऊन दुष्काळी परिस्थतीची पाहणी करीत आहेत. एवढेच नव्हे तर तेथील अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देऊन दुष्काळ निवारणाचे काम करीत आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे....

महोदय, केंद्र सरकारकडे मागणी केल्यानंतर केंद्र सरकारने 1200 कोटी रुपये दुष्काळ निवारणाच्या कामासाठी दिले आहेत. केंद्र सरकारने 1200 कोटी रुपये दिल्यानंतर सुध्दा माननीय विरोधी पक्ष नेते, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी निदर्शनास आणून दिले की, ही रक्कम अपुरी आहे. ठीक आहे. ही रक्कम अपुरी असेल. राज्यातील दुष्काळाच्या प्रश्नाबाबत केंद्र व राज्य सरकार इतके खंबीर आहे की, या दुष्काळावर मात करण्यासाठी ते 1 रुपया सुध्दा कमी पडू देणार नाही याची हमी आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी घेतली आहे. राज्य सरकारने सुध्दा या बाबत हमी घेतली आहे. महोदय, माननीय श्री.अटलबिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना सुध्दा आपल्या राज्यात अशाच प्रकारचा दुष्काळ पडला होता. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, माननीय विरोधी पक्ष नेते आणि इतर नेते केंद्राने दुष्काळ निवारणाच्या कामासाठी मदत करावी म्हणून दिल्लीला गेले होते. महोदय, आज केंद्र सरकारने महाराष्ट्राला दुष्काळ निवारणाच्या कामी 1200 कोटी रुपये दिले असताना सुध्दा विरोधी पक्षाकडून 9 हजार कोटी रुपये का दिले नाही असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. मी त्यांच्या निदर्शनास आणून देतो की, तुमच्या पक्षाच्या पंतप्रधानांनी राज्यातील दुष्काळ निवारणाच्या कामासाठी केवळ 50 कोटी रुपये दिले होते हे आपण विसरता ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राम पंडागळे ....

त्यावेळी 50 कोटी रुपये देऊन संपूर्ण महाराष्ट्राच्या तोंडाला पाने पुसली गेली याचा आपल्याला विसर पडलेला आहे, ही दुर्दैवाची गोष्ट आहे. राज्य शासन अतिशय खंबीर आहे, ताकदीचे आहे. दुष्काळातील एकाही गावाला, एकाही जनावराला पाण्यशिवाय, चाऱ्याशिवाय मरु देणार नाही याची हमी राज्य सरकारने या निवेदनाव्दारे घेतलेली आहे, हे मी आपल्याला सांगू इच्छितो.

सभापती महोदय, आदिवासींसाठी विविध कल्याणकारी योजनांचा या ठिकाणी ऊहापोह करण्यात आलेला आहे, ही चांगली गोष्ट आहे. दर वर्षाप्रमाणे या वर्षी देखील आदिवासींच्या कल्याणाच्या योजना या ठिकाणी आणलेल्या आहेत. या योजना कागदावरच राहतात का ? आज आपण दुर्गम भागामध्ये गेल्यानंतर किती कुपोषित बालके आहेत याची जर आपण संख्या पाहिली तर अंगावर शहारे येतील. जवळपास 4 हजार कुपोषित बालके आज राज्यामध्ये मेळघाट आणि इतर दुर्गम भागामध्ये आहेत. म्हणजे शासन तिथपर्यंत पोहोचत नाही असे मला वाटते. शासनाचे अधिकारी फक्त कागदावरच सर्व दाखवितात. आदिवासींसाठी ज्या योजना आहेत त्या आदिवासींपर्यंत पोहोचत नाहीत. या योजना फक्त कागदावरच आहेत. आदिवासींच्या मुलांना साप चावून जवळजवळ 118 मुले गेल्या वर्षी गतप्राण झाले. आदिवासी आश्रमशाळेतील मुलांच्या जेवणामध्ये पाली, सरडे मिळतात पण साप सुध्दा मिळाला, ही अत्यंत दुर्दैवाची आणि महाराष्ट्राला लाजिरवाणी गोष्ट आहे. या कल्याणकारी योजना कागदावरच न राहता प्रत्यक्षात राबविल्या पाहिजेत अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, डिसेंबरमध्ये दिल्लीत जी दुर्घटना घडली, त्या ठिकाणी महिलेवर जो दुर्दैवी अत्याचार झाला त्या बाबतीत या ठिकाणी उल्लेख करण्यात आलेला आहे. त्याची दखल राज्य सरकारने घेतली ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे परंतु भंडाऱ्यामध्ये 3 दलित मुलींवर बलात्कार करुन त्यांना पाण्यामध्ये फेकून ठार मारण्यात आले त्याचा मात्र या ठिकाण्ी उल्लेख करण्यात आलेला नाही. एकाबाजूला दिल्लीच्या घटनेचा या ठिकाणी उल्ल्ेख करता आणि दलितांच्या आयाबहिणींचे रक्षण केले पाहिजे, दलितांच्या ज्या मुली आहेत त्यांच्या अब्रूचे रक्षण केले पाहिजे त्याचा मात्र या ठिकाणी उल्लेख झाला नाही ही दुर्दैवाची अत्यंत गोष्ट आहे. आमच्या

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG

श्री. राम पंडागळे .....

आयाबहिणींच्या अब्रूचे काही महत्व नाही का ? या ठिकाणी आधी त्या मुलींवर बलात्कार करुन पाण्यात टाकून त्यांना ठार मारले असे पोलीस अधीक्षकांचे निवेदन येते आणि आता चार दिवसापूर्वी पुन्हा दुसरे असे निवेदन आले की, त्यांच्यावर बलात्कार झालेला नाही. म्हणजे अगोदरचे निवेदन खरे आहे की आताचे निवेदन खरे आहे ? म्हणजे कोणी तरी असत्य बोलत आहे. आधीचे निवेदन असत्य आहे किंवा आताचे निवेदन तरी असत्य आहे. म्हणून या बाबत स्पष्ट उल्लेख झाला पाहिजे.

सभापती महोदय, संपूर्ण राज्यामध्ये भंडारा येथील अत्याचाराच्या घटनेमुळे संपूर्ण दलितांच्या मनामध्ये असंतोष आहे. संपूर्ण दलितांच्या मनामध्ये असंतोष भिनभिनतो आहे. म्हणून या घटनेची शासनाने योग्य प्रकारे दखल घेतली पाहिजे अशी मी आपल्या वतीने विनंती करतो. या ठिकाणी खंडकरी शेतकऱ्यांचा लढा आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराबद्दल उल्लेख झालेला आहे परंतु महार वतनाच्या हजारो एकर जमिनी धनदांडग्यांनी काबीज केलेल्या आहेत. महार वतनाच्या अनेक जमिनी शासनाने सुध्दा काबीज केलेल्या आहेत. पुणे शहरामध्ये जे कृषी विद्यापीठ आहे ते महार वतनाच्या जमिनीवर उभे केलेले आहे. खंडकरी शेतकऱ्यांना जर तुम्ही न्याय देणार असाल तर राज्यातील दलितांना आपण केव्हा न्याय देणार ? या राज्यातील दलितांच्या महार वतनाच्या ज्या जमिनी राज्य सरकारने घेतलेल्या आहेत त्या जमिनी ताबडतोब परत केल्या पाहिजे अशी मी विनंती करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राम पंडागळे...

महार वतनाच्या जमिनी ज्या धनदांडग्यांनी आपल्या बळावर काबीज केल्या आहेत त्या त्यांना परत मिळाल्या पाहिजेत अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, जाता जाता शासनाचे अभिनंदन केल्याशिवाय मला राहवत नाही. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये इंदू मिलच्या जागेचा उल्लेख करण्यात आला आहे त्याबाबात मी राज्यपालांचे अभिनंदन करतो. दलितांचा लढा उभा राहिला. बौध्द तरुणांनी श्री.आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली इंदू मिलमध्ये जाऊन मिलची जागा काबीज केली. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री यांनी बोलणी करण्यासाठी निमंत्रण पाठविल्यावर आम्ही त्यांच्याशी बोलणी केली. त्यावेळी त्यांनी आम्हाला सांगितले होते की, इंदू मिलची जागा खाली करुन शासनाच्या ताब्यात द्यावी. आम्ही त्याप्रमाणे ती जागा दिली. माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधान यांच्याकडे शिष्टाई करुन इंदू मिलची जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी दिलेली आहे. भविष्यामध्ये त्या जागेवर डॉ.आंबेडकरांचे भव्य स्मारक केले जाईल असा उल्लेख अभिभाषणात केल्याबद्दल मी सरकारचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी राज्यपालांच्या अभिनंदनाचा जो प्रस्ताव मांडला आहे त्याला पाठिंबा देतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपलेही आभार मानतो आतण माझे भाषण थांबवितो.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन्माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत खेद व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी सांगू इच्छिते की, सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे असे म्हणाले की, भंडाऱ्याच्या पीडित मुली दलित होत्या. त्या मुली दलित नव्हत्या तर ओबीसीमधील होत्या.

**तालिका सभापती (श्री.विक्रम काळे)** : तो शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री.राम पंडागळे : सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाचे हे धोरण आहे.

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी खाली बसावे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी अभिभाषणात राज्य शासनाचे भरभरुन कौतुक केलेले आहे. परंतु वस्तुस्थितीचा विचार करण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय कृषी योजना ही योजनेसाठी केंद्र सरकारकडून दरवर्षी पैसा मिळतो. विमाच्या योजनेतून प्रत्येक शेतकऱ्याला स्वत:च्या कर्जातून हप्ता भरावा लागतो. परंतु प्रत्येक 2 वर्षांनी दुष्काळ पडतो त्यावेळी 50 पैशापेक्षा कमी आणेवारीचा जो घोळ असतो त्यावेळी शेतकऱ्यांना कधीही विम्याची रक्कम मिळत नाही. ही दुर्दैवी गोष्ट आहे. पैसेवारीचे टेबल बदलण्याची आम्ही वारंवार मागणी करीत असतो. ब्रिटिश काळापासूनचा हा टेबल आहे. आम्ही मागणी केल्यानंतर 4 अधिकारी बसतात. कधी 25 गावांचे झोन, कधी 15 गावांचे झोन केले जातात. मोठ्या प्रमाणावर झोनमध्ये बदल करतात. परंतु आणेवारीची पध्दत बदलत नाहीत. या संदर्भात समिती नेमण्यात येईल असे शासनाने कबूल केले होते. समिती नेमली आहे असेही सांगितले. परंतु ती समिती शेतकऱ्यांचा हिताचा विचार करणारी असावयास पाहिजे. त्या समितीचा अभिभाषणात उल्लेख नसल्यामुळे मी खेद व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, या अभिभाषणामध्ये गायी-म्हशींच्या दूध उत्पादनात वाढ करण्याकरिता शासनाने राज्यात सर्वसमावेशक अनुवंशिकता सुधार कार्यक्रमास मंजुरी दिली असल्याचे नमूद केलेले आहे. परंतु जनावरांना रोग लागल्यानंतर त्यांच्यावर औषधोपचार करावा लागतो त्यावेळी कोणत्याही पशुवैद्यकीय चिकित्सालयात डॉक्टर, एलएसएस अधीक्षक ,लिपिक सापडत नाहीत.

3....

NTK/ D/ KTG/

श्रीमती शोभा फडणवीस........

केवळ त्या ठिकाणी इमारती उभ्या राहत असतील, जनावरांना तपासण्यासाठी कोणीही नसतील तर नवीन दवाखान्यांची वाढ करुन दूध उत्पादनात वाढ होऊ शकणार नाही. पशुवैद्यकीय चिकित्सालयांसाठी सामुग्री आलेली असते. पण कित्येक ठिकाणी पशुंच्या दवाखान्यांच्या इमारती नाहीत. त्यामुळे जनावरांच्या दवाखान्यांची निर्मिती केली पाहिजे. त्यांच्या आरोग्याची स्थिती चांगली रहावी यासाठी कोणतीही तरतूद केल्याचे अभिभाषणात उल्लेख नसल्यामुळे मी खेद व्यक्त करीत आहे.

सभापती महोदय, लोकसंख्या व अंतर यामधील मानके विचारात घेऊन नवीन आरोग्य संस्थांच्या बृहत योजनेला शासनाने मंजुरी दिल्याचे व 1259 आरोग्य संस्था निर्माण करण्याचा व 57 संस्थांची श्रेणीवाढ केल्याचे अभिभाषणात नमूद केलेले आहे. आज आदिवासींच्या संदर्भात उल्लेख करण्यात आला आहे. आदिवासींच्या पाड्यांचा मी अभ्यास केला असता तेथे आरोग्य केंद्रे आहेत, दवाखाने आहेत, प्राथमिक स्वास्थ्य केंद्रे आहेत. आरोग्य संस्था आहेत. परंतु तेथे डॉक्टर्स नाहीत, नर्सेस नाहीत.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

औषधे नाहीत, डायरिया सारख्या रोगाने आदिवासींचा मृत्यू होतो. मागच्या वेळी एका प्रश्नाला उत्तर देताना 21 डॉक्टर दिले म्हणून सांगितले. मी ताबडतोबीने फोन करुन 21 डॉक्टरांच्या ऑर्डर्स् झाल्या का म्हणून विचारले तेव्हा त्यांनी ऑडर्स झाल्या असे सांगितले. परंतु प्रत्यक्षात तीन डॉक्टर देखील कामावर हजर झाले नाहीत. खरे म्हणजे डॉक्टर्स, नर्सेस, कंपाऊंडर, औषधे, रक्त तपासणीस अशा सर्व पदांनी परिपूर्ण असलेला दवाखाना दिला तरच लोकांना आरोग्य विषयक सुविधा मिळू शकतील. केवळ नवीन नवीन दवाखाने काढून आम्ही लोकांसाठी काही तरी करीत आहोत असे सांगण्याचा प्रयत्न शासनाकडून होत आहे. ग्रामीण भागामध्ये, आदिवासी भागामध्ये सुसज्ज अशा दवाखान्यासंबंधीचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नसल्यामुळे मी खेद व्यक्त करते.

राज्यामध्ये महिलांवरील अत्याचार, बलात्कार आणि खून यांचे प्रमाण प्रचंड वाढत असताना महिला निर्भयपणे वावरण्याच्या बाबतीत पूरक वातावरण निर्माण करण्यास माझे शासन नेहमीच अग्रेसर राहिले आहे असे अभिभाषणामध्ये म्हटलेले आहे. असे जर शासन अग्रेसर राहिले असते तर प्रत्येक अधिवेशनामध्ये महिलांवरील बलात्काराचे, मुलींच्या अपहरणाचे, मुलींना जीवे मारण्याचे प्रश्न येथे कशाला उपस्थित झाले असते ? एकीकडे महिलांवर अत्याचार होत असताना दुसरीकडे आम्ही महिलांची सुरक्षितता करतो असे सांगून महिलांच्या जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार होत आहे. भंडारा जिल्ह्यातील तीन अल्पवयीन मुलींचा खून झाला. एक महिना झाला तरी गुन्हेगार अजून सापडलेले नाहीत. गुन्हेगारांना पकडण्यामध्ये सरकार अपयशी ठरलेले आहे. आता गोंधळ घालून ती केस दाबण्याच प्रयत्न केला जात आहे. प्रत्यक्षात पोलिसांची संख्या किती आहे, महिला पोलिसांची संख्या किती आहे, पोलीस ठाण्यामध्ये काय व्यवस्था आहे, पोलीस ठाण्यामध्ये गेल्यानंतर तेथे तक्रारी लिहून घेतल्या जातात की नाही यासंबंधीचा कोणताही उल्लेख या अभिभाषणामध्ये नाही म्हणून मी या गोष्टीचा खेद व्यक्त करते.

सभापती महोदय, आज राज्यामध्ये फक्त 18 टक्के सिंचन होते. 82 टक्के शेती कोरडवाहू आहे. काही ठिकाणी 13 टक्के तर काही ठिकाणी 16 टक्के सिंचन होते. विदर्भामध्ये 13 टक्के सिंचन होते. 80 टक्क्या पेक्षा जास्त शेती कोरडवाहू आहे. या कोरडवाहू शेतीसाठी शासन एखादा

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

नवीन कार्यक्रम घेणार आहे काय ? शेतीच्या उत्पादकतेमध्ये शाश्वतता आणायची म्हणजे काय करायचे, बिनपाण्याने शेती होत नाही. पावसाच्या पाण्याने शेती होते. पाऊस देखील एका वर्षी पडतो तर दुस-या वर्षी पडत नाही. कोरडवाहू शेतीबाबत शासन नेमके काय करणार आहे ? केवळ अधिका-यांची कमिटी नेमून आणि एअर कंडिशन ऑफिसमध्ये बसून निर्णय होऊ शकणार नाही. प्रत्यक्षात शेतक-यांना काय पाहिजे, शेतक-यांच्या जमिनीची क्वॉलिटी काय आहे हे पाहून निर्णय घ्यावयास पाहिजे. आमच्या चंद्रपूर जिल्ह्यामध्ये धाना शिवाय काही होत नाही. पण आम्हाला वारंवार सांगितले जाते की पीक बदला. आता पीक बदलायचे म्हणजे काय करायचे हे कोणी सांगत नाही. अशा पध्दतीने कोरडवाहू शेतक-याची थट्टा करु नका. या शेतक-यांना विश्वासात घेऊन त्यांच्यासाठी काही कार्यक्रम देण्यासंबंधीचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नसल्यामुळे मी खेद व्यक्त करते.

सभापती महोदय, देशातील 35 अतिमागास जिल्हयामध्ये ज्या जिल्ह्याचा समावेश होतो त्या भंडारा जिल्ह्यातील औद्योगिक विकासाचे चित्र फार फसवे आहे. मोहाडी तालुक्यातील भंडारा थर्मल पॉवरसाठी 1200 एकर, बेलच्या कारखान्यासाठी 500 एकर, तिरोडयातील अदानी पॉवरसाठी 300 एकर अशा एकूण 2000 एकर जमिनीच्या भूसंपादनासाठी कंपनीच्या अधिका-यांची मोठी धडपड सुरु आहे. परंतु शेतक-यांना एकरी किती मोबदला देण्यात येणार आहे याचा कुठेही उल्लेख नाही. केवळ भोळयाभाबडया शेतक-यांची फसवणूक सरकारी अधिका-यांना हाताशी धरुन केली जात असल्यामुळे मी खेद व्यक्त करते.

सभापती महोदय, मला विशेषत्वाने सांगावेसे वाटते की, हा सर्व विकास आपण कोणाच्या जोरावर करणार आहोत ? अनेक खात्यामध्ये अधिकारी/कर्मचा-यांची पदे रिक्त आहेत. प्रत्येक अधिवेशनामध्ये रिक्त जागा भरण्याचा मुद्दा आम्ही मांडत असतो. परंतु त्या जागा भरल्या जात नाहीत. मग त्या रिक्त जागा गडचिरोली जिल्ह्यातील असोत अथवा धुळे जिल्ह्यातील असाते. जिल्हा महसूल विभाग हा शासनाचा कणा असूनही राज्यात 4 अपर जिल्हाधिकारी, 71 उप जिल्हाधिकारी, 81 तहसीलदार 431 नायब तहसीलदार अशी महसूल खात्यातील 587 पदे रिक्त आहेत. सदरची पदे भरण्यासाठी एमपीएससी पासून अनेक मार्ग असले तरी त्याकडे शासनाचे लक्ष नाही. या रिक्त जागा भराव्यात अशी मी विनंती करते.

..3..



MSS/ D/ KTG/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

श्रीमती शोभा फडणवीस...

सभापती महोदय, या ठिकाणी गेल्यावर्षीच्या आकडेवारीवरुन सांगावेसे वाटते की, राज्यामध्ये दाखल झालेल्या गुन्हापैकी केवळ 8 टक्के गुन्हयातील आरोपीना शिक्षा झालेली आहे. 14 लाखोक्षा अधिक गुन्हे न्यायालयीन सुनावणीच्या प्रतीक्षेत आहेत, आरोपींना शिक्षा होण्याचे प्रमाण 2009मध्ये 11 टक्के, 2010मध्ये 10 टक्के आणि 2011मध्ये 8 टक्के आहे. प्रथम वर्ग सत्र न्यायालयाची संख्या 1126 असून त्यात अवघे 591 सरकारी वकील आहेत. उर्वरित न्यायालयात वकिलांची पदे रिक्त आहेत. गुन्हा घडल्यानंतर आणि आरोपीला अटक झाल्यानंतर 90 दिवसात तपास पूर्ण करुन न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्याचे कायदेशीर बंधन पोलिसांवर असले तरी खटला सुनावणीसाठी केव्हा येईल यावर कोणतीही मर्यादा नाही.

...नंतर श्री. गिते...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस..

त्याचप्रमाणे साक्षीदार उपस्थित न राहणे, पंच, साक्षीदार फितूर होणे, या सगळया प्रकरणांमुळे खऱ्या अर्थाने गुन्हेगार सुटतो आणि म्हणून महाराष्ट्र हे गुन्हेगारांचे राज्य आहे अशा पध्दतीचा प्रचार सगळीकडे होतो. राज्यातील लोकांना न्याय देण्याकरिता चांगल्या प्रकारची व्यवस्था व्हावयास पाहिजे, परंतु तशा व्यवस्थे बाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख दिसून येत नाही म्हणून मी खेद व्यक्त करते आणि एवढे बोलून मी माझे भाषण संपविते.

-----------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई ( नामनियुक्त ) : सभापती महोदय, हे वर्ष महाराष्ट्राचे आधुनिक शिल्पकार स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी वर्ष म्हणून आपण साजरे करीत आहोत. राज्याचा विकास करण्याबरोबरच पंचायत राज्य, कृषी उद्योग, सहकार, सामाजिक न्याय, शिक्षण आणि कला संस्कृती आणि पायाभूत सुविधा या क्षेत्रात महाराष्ट्राला प्रगतीपथावर नेण्यास त्यांनी मोठे योगदान दिले आहे. त्यांच्या स्मृतीस आदरांजली अर्पण करण्यासाठी आणि युवा पिढीला त्यांच्या कार्याची ओळख व्हावी म्हणून त्यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहात याबद्दल मी शासनाने अभिनंदन करते.

सभापती महोदय, राज्यात सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक व औद्योगिक विकासाची नवी दिशा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिषणातून दिसून येते. सरकार जन सामान्याना केंद्रबिंदू मानून अनेक योजना राबवित आहे. त्याच्याच परिणाम म्हणजे राज्यात होत असलेली प्रगती होय.

महोदय, या वर्षाच्या माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात गरीब, डोंगराळ व ग्रामीण भागाचे मोठ्या प्रमाणात प्रतिबिंब दिसून येते. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी केंद्र सरकारने इंदू मील क्रमांक 6 ची जमीन उपलब्ध करुन देण्या विषयी संमती दिली ही बाब अभिमानास्पद आहे. उक्त जमिनीवर सदर स्मारकासाठी आरक्षण ठेवण्याकरिता बृहन्मुंबईच्या मंजूर आराखडयात फेरबदल करण्याची प्रक्रिया राज्य शासनाने सुरु केलेली आहे. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक करण्याचे देशाचे स्वप्न लवकरात लवकर साकार होणार आहे. ते स्मारक आंतरराष्ट्रीय दर्जाचे व्हावे यासाठी प्राधिकरण स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. हे प्राधिकरण लवकरात लवकर स्थापन करण्यात यावे अशी माझी शासनास विनंती आहे. या बाबतीत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी मोठा वाटा उचलला त्यांचे हे प्रतिबिंब आहे,म्हणून त्यांचे आभार मानते.

सभापती महोदय, मागील डिसेंबरमध्ये देशाच्या राजधानीत दुर्देवी घटना घडल्यामुळे महिलावरील अत्याचाराचा मुद्दा पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आलेला आहे. या राज्यात 39 समुपदेशन केंद्रे आतापर्यंत कार्यान्वित होती. 51 नवीन समुपदेशन केंद्रे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या शिवाय 54 नवीन केंद्रे सुरु करण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. माझी छोटीशी मागणी आहे की, ही केंद्रे अग्रक्रमाने आणि लवकरात लवकर सुरु करावीत, जेणेकरुन आम्हा भगिनींना त्या प्रक्रियेमध्ये जे काही चालले आहे ते समजू शकेल.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई..

सभापती महोदय, या राज्याचे माननीय राज्यपाल आणि माननीय मुख्यमंत्री यांचे मी आभार मानते. माझ्या वडीलांचे घर तोंडवली, जि.सिंधुदुर्ग येथे आहे. आपण संयुक्त सी-वर्डचा प्रकल्प करीत आहात व त्या प्रकल्पास मान्यता देखील मिळालेली आहे. मी तोडवली गावातील रहिवासी म्हणून पुनःश्च आभार मानते.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा औद्योगिक क्षेत्रात मोडलेला नाही, महाराष्ट्र सरकारने त्या बाबतीत गती देण्याचे काम केलेले आहे. त्या गोष्टीचा मला अत्यंत आनंद होत आहे....

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.........

सभापती महोदय, राष्ट्रीय कृषी विमा योजना राबवून सर्व प्रमुख पिकांच्या जोखीम स्तरात 60 टक्क्यावरुन 80 टक्क्यापर्यंत वाढ केली आहे. राज्यात यावर्षी रब्बी पिकाच्या क्षेत्राला जास्तीत जास्त विमा संरक्षण प्राप्त होईल आणि जास्तीत जास्त शेतक-यांना विम्याचा लाभ मिळेल.

सभापती महोदय, शासनाने शेतक-यांना 1 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज बिनव्याजी आणि 3 लाख रुपयांपर्यंतचे पीक कर्ज प्रतिवर्षी 2 टक्के इतक्या दराने देण्याचे ठरविले आहे. राज्यातील एकूण 123 दुष्काळग्रस्त तालुक्यामधील प्रति कुटुंबास 100 दिवसांऐवजी 150 दिवसांपर्यंत रोजगार मिळणार आहे. या सगळया गोष्टींचा विचार केल्यानंतर मला असे वाटते की, हे धोरण राबविताना त्याचा विचार होऊन अग्रक्रम मिळावा एवढे बोलून माझे भाषण पूर्ण करते.

----

3सी.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, 28 व्या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य आरोग्य कार्यक्रम दिनांक 6 फेब्रुवारी, 2013 रोजी ठाणे जिल्हयातील पालघर येथे सुरु करण्यात आला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा माननीय सोनिया गांधी यांच्या हस्ते हा कार्यक्रम सुरु झाला. या कार्यक्रमाचे स्वरुप असे आहे की, साधारणपणे 0 ते 18 वयोगटापर्यंतच्या 1.95 कोटी मुलांची सर्वव्यापी तपासणी होणार आहे. म्हणजेच महाराष्ट्र राज्याच्या ग्रामीण भागातील 1.95 कोटी विद्यार्थ्यांची तपासणी होणार आहे. यासाठी शासन एक ॲम्ब्युलन्स, 2 डॉक्टर, 1 परिचारिका, 1 मिश्रक आणि 1 प्रयोगशाळा तंत्रज्ञ उपलब्ध करुन देणार आहे. महाराष्ट्रातील त्या त्या ठिकाणच्या ग्रामीण भागात विद्यार्थ्यांची तपासणी करण्यासाठी ही ॲम्ब्युलन्स फिरणार आहे.

सभापती महोदय, आज राज्यातील प्रा.आ.केंद्रामध्ये डॉक्टर उपलब्ध नाहीत. 2 डॉक्टर, 1 एएनएम, 1 लॅब टेक्नीशियन आणि 1 फार्मासिस्ट कुठून उपलब्ध करणार आहात, महाराष्ट्रात फार्मसी कॉलेज किती आहेत, किती फार्मासिस्ट कार्यरत आहेत, किती आयुर्वेदिक, युनानी, होमिओपॅथी डॉक्टर्स उपलब्ध आहेत? या सर्व डॉक्टर्सना ॲलोपॅथीची प्रॅक्टिस करण्यास अनुमती देऊन न्यायालयाचा अवमान करणार आहात काय?

सभापती महोदय, शासनाच्या योजना कशा हवेत विरतात याचे हे एक मूर्तीमंत उदाहरण आहे. ग्रामीण भागातून निवडून येणाऱ्या आमदारांना विचारा, त्यांच्या भागातील प्रा.आ.केंद्रामध्ये डॉक्टर्स उपलब्ध आहेत का? शासनाने वाडा तालुक्यातील रुग्णालयामध्ये डॉक्टरांची पदे भरण्याकरिता जाहिरात दिली. 'बीयुएमएस मेडिकल ऑफिसर पाहिजेत' अशी जाहिरात देण्यात आली होती. राज्याच्या आरोग्य विभागाची दोरी यांच्या हातात देणार का? मुलांची तपासणी करीत असताना आपण असे म्हटले आहे की, ज्यांच्यामध्ये जन्मजात व्यंग आहे, गर्भातच व्यंग आहे त्यांचीही तपासणी होणार आहे. या योजनेचे काँग्रेस पक्षाचे जे प्रमोटर आहेत त्यांच्या तोंडून असे ऐकण्यात आले की, त्यांची ग्रोथ कशी होते याचे मॉनिटरिंग केले जाणार आहे. गर्भाची सोनोग्राफी मशिनद्वारे तपासणी करावयाची असेल तर हजारो रुपये खर्च येतो. हे कसे शक्य होणार आहे? माननीय राज्यपालांच्या तोंडी अशा प्रकारचे वाक्य नमूद करणे हा त्यांचा अवमान आहे. ही योजना बोगस ठरणार आहे, हे मी मंत्रीमहोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो.

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ गितेनंतर 16:05

डॉ.दीपक सावंत..........

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेच्या निमित्ताने मी मेळघाटला जाण्यापूर्वी अमरावती येथे गेलो होतो. तेथे 25 कोटी रुपये खर्चून सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बांधण्यात आले आहे.

नंतर 3डी.1....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत ......

हे हॉस्पिटल एकदम चकाचक आहे. या हॉस्पिटलच्या फरशीत आपला चेहरा दिसेल एवढे हे हॉस्पिटल चकाचक आहे. खरे म्हणजे या हॉस्पिटलमध्ये पेशंटच येत नसल्यामुळे हे हॉस्पिटल चकाचक आहे. या हॉस्पिटलच्या संदर्भात माहिती घेतल्यानंतर त्या हॉस्पिटलमध्ये गेल्या 3 वर्षात लहान मुलांच्या केवळ 137 शस्त्रक्रिया झाल्याची माहिती मिळाली. या ठिकाणी राजीव गांधी जीवनदायी योजना राबवली जात नाही. अमरावती जिल्हयामध्ये जीवनदायी योजना सुरु आहे परंतु अमरावतीमध्ये जीवनदायी योजना बंद आहे. जीवनदायी योजना बंद असेल तर सर्वसामान्य लोकांनी जायचे कोठे ? हजारो शस्त्रक्रिया केल्या, करोडो रुपये खर्च केले हे आपण कोणत्या तोंडाने सांगता ? अमरावतीचे डॉक्टर्स काही दिवसापूर्वी संपावर गेले होते. या ठिकाणचे जे डॉक्टर्स आहेत ते खाजगी हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन करतात आणि बिले मात्र सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलच्या नावावर टाकतात. यामध्ये त्यांना पैसे मिळाले नाही म्हणून तेथील डॉक्टर्स संपावर गेले होते अशी माहिती मिळाली आहे.

सभापती महोदय, राज्यासमोर स्त्रीभ्रूण हत्येचा ज्वलंत विषय आहे. सोनोग्राफीच्या केंद्रावर आपण बंधने आणलेली आहेत. सोनोग्राफीच्या बंधनामुळे अनेक लोकांचे नुकसान झालेले आहे. प्रत्येक धंद्यामध्ये चांगले वाईट काम करणारे लोक असतातच. स्त्रीभ्रूण हत्या थांबल्या पाहिजेत ही वस्तुस्थिती आहे परंतु काही अधिकारी आपल्या भागात स्त्रीभ्रूण हत्या जास्तीत जास्त पकडल्या हे दाखविण्याचा प्रयत्न करीत असतात. याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे जळगावच्या डॉ. दमाणी यांचे आपल्याला देता येईल. डॉ. दमाणी या 25 वर्षापासून उत्तम स्त्रीरोग तज्ञ म्हणून जळगावमध्ये प्रॅक्टीस करीत आहेत. या डॉक्टरांकडे एक महिला नेहमी येत असे. या महिलेला पहिल्यांदा दोन मुली झाल्या होत्या व त्या मुलींचा जन्म डॉ. दमाणी यांच्या हॉस्पिटलमध्येच झाला होता. या नंतर ही महिला तिसऱ्यांदा गरोदर होती. या महिलेचा सहाव्या महिन्यात गर्भपात होत असतांना डॉ. दमाणी यांना फोन आला. त्यावेळी डॉ. दमाणी जेवण करीत होते. ते जेवण सोडून हॉस्पिटलमध्ये आले परंतु तोपर्यंत या महिलेचा गर्भपात झाला होता. हे अर्भक बाहेर आले, ब्लिडींग झाले. गर्भपात होतांना त्या ठिकाणी सर्व नातेवाईक उपस्थित होते. हा गर्भपात आपोआप झाला होता. यानंतर डॉ.दमाणी यांनी सिव्हील सर्जन, सीईओ यांना विचारले की, मी या गर्भाचे काय करु.

डॉ.दीपक सावंत ......

हा गर्भ बायोमेडीकल म्हणून टाकायचा की, या गर्भाचा दफनविधी करायचा, यासंदर्भात कोणाकडेही उत्तर नव्हते. आपल्या मेडिकल सायन्स मध्ये अशा गर्भाचे नेमके काय करावयाचे, याचा कोणताही कायदा नाही. सीव्हील सर्जनने हे अर्भक त्यांच्या स्वाधीन करा, असे लिहून दिले. यासंदर्भात सासू-सासरे यांची कन्सेंट घेऊन हे अर्भक त्यांच्या हातात दिले. परंतु दुसऱ्या दिवशी हा गर्भ गटारामध्ये मिळाला. यामध्ये डॉ. दमाणी यांची काय चूक होती ? डॉक्टरांची काहीही चूक नसतांना पोलीस आले, डॉक्टरांवर गुन्हा दाखल झाला, त्यांना दवाखान्यातून फरफटत नेले गेले व त्यांच्यावर कलमे लावून त्यांना दोषी धरण्यात आले. या डॉक्टरांची नंतर जामिनावर सुटका झाली. या प्रश्नाच्या संदर्भात आम्ही सभागृहात आवाज उठवून देखील त्या महिला डॉक्टरांवरील गुन्हे मागे घेतले गेले नाहीत, ही दुर्देवाची गोष्ट आहे. स्त्रीभ्रूण हत्या रोखतांना डॉक्टर दोषी आहेत. मात्र काही वेळा यामध्ये जे दोषी नाहीत त्यांच्यावर देखील कायद्याचा आधार घेऊन कारवाई केली जाते. सुक्या बरोबर जसे ओले जळते तसा हा प्रकार आहे. त्यामुळे या संदर्भात पोलिसांनी तसेच सीव्हील सर्जनने कारवाई करतांना काळजी घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपल्याकडे 1259 नवीन आरोग्य संस्था येत आहेत. आपल्याकडे आरोग्य केंद्राची श्रेणीवर्धन करण्याची पध्दत आहे. आज महाराष्ट्रात 136 ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्रे नाहीत. त्यामुळे या 136 ठिकाणी नव्याने प्राथमिक आरोग्य केंद्राची बांधणी करण्याची आवश्यकता आहे. परंतु या बाबीचा माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात उल्लेख सुध्दा करण्यात आलेला नाही. विद्यमान 57 केंद्रांची श्रेणीवाढ करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. आरोग्य संस्थांमध्ये कशा प्रकारे सेवा दिल्या जातात, याची या सभागृहात चर्चा बऱ्याच वेळा झालेली असल्यामुळे मला यासंदर्भात जास्त काही बोलावयाचे नाही. शासनाने 100 विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असतांना 3 वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याचा प्रयत्न केलेला आहे. लातूर येथे रेडिओलॉजीचे डिपार्टमेंट आहे परंतु त्या ठिकाणी सीटीस्कॅन मशीन नाही.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

लातूरमध्ये रेडिऑलॉजी डिपार्टमेंट आहे, पण त्यांच्याकडे सिटीस्कॅनचे मशीन नाही. हे कॉलेज राज्य शासनाने दिलेले आहे. असे जर असेल तर मुले कशी शिकणार ? अशा अनेक त्रुटी असताना आपण आणखी तीन वैद्यकीय महाविद्यालय सुरू करीत आहात. कालच मला माननीय मंत्री डॉ.विजयकुमारजी गावित हे सांगत होते की, आम्हाला पैसेच मिळत नाही. मग आम्ही काय करणार, कुठून पैसे आणणार ? ही त्यांची हतबलता आहे. त्यामुळे आपण तीन मेडिकल कॉलेजेस कशी काय काढणार ? हा माझा प्रश्न आहे.

सभापती महोदय, मी एकच महत्त्वचा विषय आता मांडणार आहे. आदिवासींना प्रकल्प कार्यालयात सहजपणे पोहोचता यावे व त्यांना कल्याणकारी योजनांचा लाभ घेता यावा म्हणून शासन प्रयत्नशील आहे. या कल्याणकारी योजना खरोखर आदिवासींपर्यंत पोहोचतात काय ? त्याचे जीवंत उदाहरण मी आपल्या समोर मांडतो. आदिवासींसाठी असणाऱ्या योजना एस.टी.बसस्थानकावरील टी.व्ही.वर प्रदर्शित करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. हा प्रस्ताव 21 मार्च 2012 रोजीचा म्हणजे मागच्या वर्षीचा आहे. यामध्ये आपण काय सांगितले होते ? 22 विशेष दर्जाच्या बसस्थानकांमध्ये 42 इंचाचे एलसीडी टीव्ही लावून जाहिरात प्रसारित करणे. या जाहिरातीचा दर प्रति सेकंद रूपये 397 इतका खर्च होता. त्यासाठी रूपये 5 कोटी 81 लाख इतका खर्च करून एलसीडी टीव्ही बसविण्यात आले. आदिवासींच्या कल्याणकारी योजनांची माहिती आपण कधी एस.टी.च्या बसस्थानकावर पहिली आहे काय ? "अ" दर्जाच्या बसस्थानकामध्ये 75 ठिकाणी टीव्ही बसविण्यात आले. त्यासाठी 1 कोटी 40 लाख रूपये खर्च आला. या सर्व कामासाठी एकूण 8 कोटी 49 लाख 26 हजार 478 रूपये खर्च झालेले आहेत असे दाखविण्यात आलेले आहेत. वस्तुत: हा निधी खर्च झालेला नाही. कारण कुठल्याही बसस्थानकावर एलसीडी टीव्ही वर आदिवासींसाठी कोणत्या योजना राबविल्या गेल्या याची जाहिरात केल्याचे दिसून येत नाही.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत...

त्यापेक्षा भयानक गोष्ट मी आपल्या समोर मांडणार आहे. आपल्याकडे शबरी महामंडळ आहे. या महामंडळाला केंद्र शासनाकडून 200 कोटी रूपये इतका निधी येतो. सन 2009-2010 पासून हा निधी यायला सुरूवात झालेली आहे. आता आपण 2013 मध्ये आहोत. आदिवासींना आपण काय काय देतो ? या योजनांमुळे आदिवासींचा उद्धार व्हायला पाहिजे होता. प्रत्येक आदिवासी गाडीतून फिरला पाहिजे होता. आज तो सायकलवरून देखील फिरत नाही. आदिवासींना व्यवसाय करण्यासाठी आपण काय काय देतो ? माल वाहतूक रिक्षा, कॉंक्रीट मिक्सर मशीन, ट्रॅक्टर, ट्रॉली, मिनी ट्रक, प्रवासी वाहन, पिक-अप व्हॅन, किराणा दुकान, ब्युटी पार्लर, फळांचे दुकान, शेळी-मेंढी, पीठ गिरणी, वीट भट्टी, महिंद्राचे मिनी ट्रक्स, महिंद्रा बोलेरो कार, स्टील फॅब्रीकेशन, रोटोव्हेटर, महिंद्र ट्रॅक्टर, टेलरिंग शॉप, इत्यादी बाबी आपण त्यांच्यासाठी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यांची संख्या देखील सांगतो. माल वाहतूक रिक्षा 150 दिलेल्या आहेत. कॉंक्रीट मिक्सर 60 दिलेले आहेत, 135 मिनी ट्रक्स दिलेले आहेत, 18 मिनी महिंद्रा ट्रक्स दिलेले आहेत, 60 महिंद्रा बोलेरोच्या गाड्या दिलेल्या आहेत. 200 रोटोवेअर दिलेले आहेत, अशा प्रकारे अनेक ठिकाणी या गोष्टी दिलेल्या आहेत. या बरोबरच फॅशन डिझायनरचा कोर्स, बांबू पासून वस्तू करण्याचे प्रशिक्षण दिले गेले, ॲडव्हान्स ब्युटिशियनच कोर्स, अशा अनेक गोष्टी दिल्या गेल्या आहेत. आदिवासींसाठी बारदान आणि प्लास्टीक देखील खरेदी करण्यात आले. ते कुठून खरेदी केले असेल ? बिहार, यु.पी.येथून हे खरेदी करण्यात आले. महाराष्ट्रात बारदान आणि प्लास्टीक कुठेही नाही. यामध्ये लक्षांक देखील दिलेला आहे. या विषयाची माहिती घेण्यासाठी मी पत्र लिहिले व 200 लाभार्थींची यादी द्यावी अशी विनंती केली. पण आज पर्यंत मला या 200 लाभार्थ्यांची यादी मिळालेली नाही.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत......

आजपर्यंत ती यादी मला मिळालेली नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी कुपोषणाचे प्रमाण कमी झालेले आहे असे सांगितले. आज देखील प्रश्नोत्तराच्या तासामध्ये तसे सांगितले. कुपोषणाचे प्रमाण कमी करावयाचे असेल तर शासनाने कुपोषणा संबंधीची आकडेवारी लपवून माननीय राज्यपालांची दिशाभूल करु नये. कारण शासन आता नव नवीन मानके आणून कुपोषण नाही असे दाखविण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु हा शासनाचा केविलवाना प्रयत्न आहे. या कुपोषणावर करोडो रुपये खर्च होत आहेत. परंतु आज कुपोषणाच्या सर्व योजना बंद आहेत. मातृत्व अनुदान योजनेची 400 कोटी रुपयांची औषधे मार्च 2012 पासून देणे बंद झालेले आहे. अमरावती, ठाणे, नंदूरबार या जिल्ह्यात कुठेही औषधे नाहीत. औषधे असतील तर आपण मंत्री महोदयांनी मला तसे सांगावे. आपण दोघेजण तेथे जाऊन पाहणी करु. आज या ठिकाणी माननीय महिला व बाल कल्याण विभागाच्या मंत्री येथे उपस्थित आहेत हे माझे सौभाग्य आहे. मी आपणास मातृत्व अनुदान योजनेतील पैसे कोठे कोठे मिळाले नाहीत ते दाखवून देतो.

सभापती महोदय, नवसंजीवनी योजनेतील बुडीत रोजगार बंद केलेला आहे. आधार कार्ड असेल तर आदिवासींना पैसे मिळतात. आधार कार्ड नसेल तर जननी सुरक्षा योजनेतील देखील पैसे मिळत नाहीत अशी दुर्दैवी परिस्थिती आहे. अनेक विषय मांडावयाचे आहेत. परंतु येथेच थांबतो. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे राज्यपाल माननीय के.शंकरनारायणन् यांनी जे अभिभाषण केले त्या संदर्भातील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी मांडला. त्यास पाठिंबा देण्यासाठी आणि त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मी कमी वेळेमध्ये सर्व मुद्यांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करणार आहे.माननीय राज्यपालांचे अभिभाषण मला मनस्वी आणि सर्वस्पर्शी वाटले. कारण दुष्काळाची पार्श्वभूमी असताना एक समृध्द इतिहास असलेल्या प्रगतीशील आणि सांस्कृतिक राज्याचे प्रमुख म्हणून त्यांनी जे अभिभाषण केले ते सर्व विषयांना स्पर्श करणारे होते.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये गंभीर दुष्काळी परिस्थिती आहे. त्या दुष्काळाची अतिशय गंभीरपणे दखल घेऊन माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये पहिल्या चार परिच्छेदामध्ये या दुष्काळाचा मुकाबला करण्याचा आणि मराठवाड्यातील दुष्काळात होरपळणाऱ्या माणसाला मानाने आणि सन्मानाने पुन्हा एकदा उभा करण्याचा, त्याला टंचाईच्या परिस्थितीतून बाहेर काढण्याचा विचार या अभिभाषणामध्ये पहावयास मिळतो.

सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी टीका केली आहे. दुष्काळाच्या पहिल्या टप्प्यावर जवळ जवळ एक-चतुर्थांश कालखंड गेला आहे आणि मोठा कालखंड पुढे आहे. या कालखंडामध्ये अनेक मोठ्या गंभीर समस्या निर्माण होणार आहेत. त्या समस्यांना आपण कशाप्रकारे तोंड देऊ या संदर्भात विरोधी पक्षातील नेते सदस्यांनी काही सकारात्मक स्वरुपाच्या सूचना केल्या असत्या तर त्या या सभागृहाला निश्तिचपणें लाभदायक ठरल्या असत्या. मी त्यांच्या भाषणांच्या मुद्याकडे जाणार नाही.

सभापती महोदय, हे शासन शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांचे आहे. तेव्हा खऱ्या अर्थाने माणूस केंद्रबिंदू असलेला विचार शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारातून पहावयास मिळतो, तो माणूस येथे हरता कामा नये. कारण हा दुष्काळ निसर्गदत्त आहे. या निसर्गदत्त दुष्काळाचा मुकाबला मराठवाड्यातील जनतेने केला पाहिजे असे नव्हे तर,

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड....

तर महाराष्ट्रातील सर्व जनतेने मानवी हृदयाने मिळून त्याचा मुकाबला केला पाहिजे आणि पक्षभेद विसरुन काम केले पाहिजे, हे मी सुरुवातीस सांगू इच्छितो.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात एक महत्त्वाचा विषय प्रतिपादित केला आहे. अभिभाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाबाबत नमूद केले आहे. मुंबईतील इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्याचे घोषित केले आहे. यामुळे केवळ मुंबई, महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशात लोकशाहीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक माणसाला आनंद झाला आहे. ही महत्त्वपूर्ण गोष्ट भारतीय समाज जीवनातून पहावयास मिळते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक होणार म्हणजे केवळ दलितांनाच आनंद झाला असे नाही. सर्व समाजातील लोकांना त्याचा आनंद झाला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे घटनाकार होते. ज्यांनी या देशाची लोकशाही शेकडो वर्षे कशी असावी या बाबत सर्वंकष विचार करुन संपूर्ण बाबी राज्य घटनेच्या चौकटीत चौकटबध्द केल्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारत असताना अजून एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकाच्या संकल्पनेला सर्वांनी पाठिंबा दाखविल्याचे चित्र मला यावेळी पहावयास मिळते. काही वर्षांपूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव मराठवाडा विद्यापीठाला देण्याबाबतचा ठराव पुढे आल्यानंतर त्या काळात त्याला विरोध झाला होता. परंतु आता तशा प्रकारचा विरोध होत नसल्यामुळे असे लक्षात येते की, आज महाराष्ट्र पुढे चालला आहे. किंबहुना तो विचाराने देखील पुरोगामी होत आहे. त्याच बरोबर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार देखील काही अंशी लोकांच्या लक्षात यावयास लागले आहेत. त्यामुळेच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक झाले पाहिजे अशा प्रकारचा मुद्दा अभिभाषणातून मांडण्यात आला आहे.

महोदय, जगामध्ये एकूण 7 आश्चर्य आहेत. त्यातील एक आश्चर्य असलेले 'ताजमहाल' हे भारतात आहे. या माध्यमातून मी राज्य सरकारला नम्रपणे सुचवू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्रीय स्मारक जगातील इतर आश्चर्यासारखे आश्चर्यजनक झाले पाहिजे. हे स्मारक घाईघाईने नव्हे तर योग्य प्रकारे नियोजन करुन केले पाहिजे, असे मला सुचवावेसे वाटते.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात इतरही अनेक बाबी आहेत. लोकनेते

ॲड.जयदेव गायकवाड....

स्व.यशवंतराव चव्हाण आणि स्व.वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दीबाबतचा देखील अभिभाषणात उल्लेख आहे. या दोन्ही लोकनेत्यांची जन्मशताब्दी आपण साजरी करीत आहोत. या बाबत मला सुचवावेसे वाटते की, स्व.यशवंतराव चव्हाण यांनी ग्रामीण भारत घडविण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हे तर सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याचा प्रयत्न केला. महोदय, मी ज्या वेळी ग्रामीण भागात फिरतो त्या वेळी असे निदर्शनास येते की, बहुतेक गावांतील ग्रामपंचायतींना इमारती नाहीत. या निमित्ताने मी विनंती करतो की, एक विशेष कार्यक्रम हाती घेऊन राज्यात अत्याधुनिक ग्रामपंचायतीची कार्यालये निर्माण केली पाहिजेत.

महोदय, मुंबईमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्याची संकल्पना आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी अलीकडच्या काळात वडाळा येथे क्रांतिबा महात्मा फुले यांचे स्मारक उभारण्याची संकल्पना मांडली होती. या बाबत राज्य सरकारने निश्चितपणे विचार करावा.

महोदय, जाता जाता एका महत्त्वाच्या मुद्याकडे सरकारचे लक्ष वेधू इच्छितो. राज्य सरकारने वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले आहे. परंतु हे धोरण एका संकल्पनेतून पहावयास मिळते. माझी विनंती आहे की, मुंबई आणि इचलकरंजी येथे टेक्सटाईल पार्क निर्माण केले पाहिजे. या माध्यमातून महाराष्ट्राच्या औद्योगिक प्रगतीचे पाऊल टाकले पाहिजे.

महोदय, आता मी अतिशय महत्त्वाच्या मुद्याकडे सरकारचे लक्ष वेधत आहे. शिक्षणाच्या विषयाकडे आपण फार लक्ष देतो. गेल्या तीन-चार दिवसांत शिक्षण विभागाच्या प्रश्नांवर सभागृहात ऊहापोह झाला आणि काही प्रश्न मांडले गेले.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. जयदेव गायकवाड .....

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये शैक्षणिक संस्था निघतात पण वसतिगृहांची संख्या मात्र कमी दिसते. महाराष्ट्रात शैक्षणिक क्षेत्रामध्ये ज्या ठिकाणी कॉलेजेस आहेत त्या ठिकाणी वसतिगृहे निर्माण केली पाहिजेत अशी मी सूचना करतो. शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला मला अनेक विद्यार्थी भेटतात आणि सांगतात की, मला इंजिनिअरींगला प्रवेश मिळाला परंतु मला वसतिगृहामध्ये प्रवेश मिळाला पाहिजे. पंधरा वीस दिवसानंतर त्या विद्यार्थ्याची चौकशी केल्यानंतर मला असे कळते की, तो विद्यार्थी पुण्यावरुन गावाला निघून गेला कारण त्यांची राहण्याची सोय नव्हती. म्हणून या वसतिगृहाच्या प्रश्नाबद्दल महाराष्ट्र शासनाने विचार केला पाहिजे, असे मला सुचवावेसे वाटते.

सभापती महोदय, आपण छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक देखील उभे करणार आहोत. त्यांची संकल्पना या सभागृहामध्ये मांडली गेली. छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक देखील जागतिक स्तराचे झाले पाहिजे. संपूर्ण देशाचे लक्ष जाईल अशा प्रकारचे ते स्मारक झाले पाहिजे. कारण छत्रपती शिवाजी महाराज हे खऱ्या अर्थाने या देशाच्या स्वातंत्र्याचे स्फुर्तीदायी नेतृत्व होते. त्यापूर्वी आपला देश 900 वर्षे पारतंत्र्यामध्ये असताना त्या कालखंडामध्ये एका सरदाराच्या घरातून आलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांनी क्रांतिकारक काम केले आहे. त्या इतिहासामध्ये मी जाणार नाही. परंतु स्वातंत्र्याचे एक प्रतिक, स्वातंत्र्य सेनानी, खरा संघर्ष करणारा आणि या महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक करताना ते इतिहासाने परिपूर्ण झाले पाहिजे. कारण आपण प्रतापगडावर छत्रपतींच्या लढाईचा इतिहास पाहतो. त्या ठिकाणी अफझलखानाची समाधी आहे. आमचे अनेक मित्र म्हणतात की, छत्रपतींचे स्मारक आहे, अफझलखानची समाधी आहे पण जिवा महालाचे काय ? आपण गर्वाने सांगतो की, होता जिवा म्हणून वाचला शिवा. खरोखर या म्हणीचा जर मागोवा घ्यावयाचा असेल तर छत्रपतींच्या स्मारकाबरोबर जिवा महालाचे देखील स्मारक झाले पाहिजे असे मी या ठिकाणी सूचवू इच्छितो.

सभापती महोदय, युपीएससीच्या परीक्षेतून मराठी भाषा वगळण्यात आलेली आहे त्याबद्दल महाराष्ट्र शासनाने निश्चितपणे गंभीरपणे दखल घेतली पाहिजे आणि त्या बाबतीत न्याय मिळविला पाहिजे. मराठी माणसाच्या काळजाचा तुकडा म्हणून ज्याकडे आपण पाहतो त्या कर्नाटक

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ MMP

ॲड. जयदेव गायकवाड ....

राज्यातील मराठी भाषिक लोकांची होणारी कुचंबणा, तेथील कात्रीत सापडलेले मराठी भाषिक, त्या बेळगावमधील मराठी भाषिकांसाठी महाराष्ट्राने काही तरी केले पाहिजे. खरे तर ते मरेपर्यंत एकाकी लढत राहिले आहेत. महाराष्ट्रातून त्यांना काही मदत मिळते असे मला तरी वाटत नाही. ते स्वबळावर लढत असताना, त्या ठिकाणी पारतंत्र्यात राहिल्यासारखी अवस्था असताना देखील मराठी माणसाच्या स्वाभिमानाचा झेंडा त्या ठिकाणी ते फडकवितात. त्यांनी अलीकडे मिळविलेला विजय म्हणजे तुमच्या आमच्या सर्वांच्या दृष्टीने अभिमानाची बाब आहे. त्या बेळगावसाठी या महाराष्ट्राने काही तरी केले पाहिजे अशी सूचना करुन मी माझे दोन शब्द संपवितो.

---

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई गिरकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माझ्या पूर्वीच्या अनेक वक्त्यांनी उल्लेख केल्याप्रमाणे शाहू, फुले, आंबेडकरांचा महाराष्ट्र हे एक गुळगुळीत वाक्य झालेले आहे. या महाराष्ट्रामध्ये दलित अत्याचाराच्या घटना मोठ्या प्रमाणावर घडत आहेत. भंडाऱ्यामध्ये श्री. भोतमांगे अजूनही वणवण फिरत आहे. त्या प्रकरणाच्या बाबतीत पोलिसांनी व्यवस्थित चौकशी न केल्यामुळे आरोपी सुटलेले आहेत. महिनाभरापूर्वी पुन्हा त्या ठिकाणी 3 मुलींवर अत्याचार झाला. माझ्या पूर्वीच्या वक्त्यांनी बलात्कार झाला, बाकी काही झाले अशा प्रकारचा मुद्दा मांडला. दिल्लीला एका अभागी मुलीवर अत्याचार झाला त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये आहे परंतु दुर्दैवाने फुले, शाहू, आंबेडकरांच्या या महाराष्ट्रामध्ये माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये त्या दलित महिलांवर झालेला अत्याचार किंवा श्रीरामपूरला गेल्या 28 तारखेला दलित महिलेवर झालेल्या अत्याचाराचा कोठेही उल्लेख नाही.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर....

सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांनी अभिभाषणाबद्दल राज्यपालांचे अभिनंदन करण्यासाठी प्रस्ताव मांडलेला आहे. प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक करण्याची घोषणा दि.6 डिसेंबर रोजी करण्यात आली. 6 डिसेंबर नंतर आता मार्च महिना सुरु आहे. सन्माननीय सदस्य श्री.आशिष शेलार यांनी त्यावेळी मुद्दा उपस्थित केला होतो की, ही जी जागा आहे त्याचा टीडीआरचे काय झाले, सीआरझेडचे काय झाले, डीपीमध्ये ही योजना आली आहे काय ? परंतु तीन महिन्यानंतरही जैसे थे परिस्थिती आहे. समाजाला, किंबहुना, महाराष्ट्रातील आंबेडकरी जनतेला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना मानणाऱ्या सर्व लोकांना एक स्वप्न दाखविले जात आहे. इंदू मिलच्या जागेवर स्मारकाचे डॉ.आंबेडकरांचे भव्य स्मारक बांधण्याचे स्वप्न दाखविले जात आहे. त्याचा उल्लेख अभिभाषणामध्ये आलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे अरबी समुद्रामध्ये भव्य स्मारक बांधण्याची योजना झालेली आहे. त्याचा आराखडा तयार झालेला आहे. राज्यपालांच्या यापूर्वीच्या अभिभाषणात त्याचा उल्लेख केला होता. दुर्दैवाची यावेळी त्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. म्हणून मी म्हटले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची अशी अवस्था झ ालेली की, राज्यपालांच्या अभिभाषणत त्याचा उल्लेख आलेला नाही. तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचेही पुढील वर्षात तसेच होणार आहे का असे मी खाजगीमध्ये विचारले होते. सत्ताधारी पक्षातील एका सन्माननीय सदस्यांच्या भाषणात असा उल्लेख झाला की, या स्मारकाबाबत शंका व्यक्त करण्यात आली आहे. ती शंका मीच व्यक्त केली होती. विरोधी पक्षातील एक आमदार म्हणून मी शंका व्यक्त केली होती. पण माझ्या शंकेबाबत ते काय म्हणाले होते ते मी येथे सांगणार नाही. परंतु हे भव्य स्मारक कधी होणार आहे ? त्यासाठी कालबध्द कार्यक्रम ठरला आहे की नाही ?

सन्माननीय सदस्य श्री.राम पंडागळे यांनी माननीय श्री.वाजपेयी यांचा उल्लेख केला आहे. माननीय श्री.वाजपेयी यांचे सरकार असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे ज्या अलिपूर येथे राहत होते आणि त्यांनी जेथे देशाची घटना लिहिली आणि ज्या ठिकाणी त्यांचे शेवटचे वास्तव्य होते, जेथे त्यांचे महापरिनिर्वाण झाले ती जागा माननीय श्री.वाजपेयी यांच्या सरकारने ताब्यात घेतली होती आणि त्याचा मोबदला दिलेला आहे. परंतु अजूनही त्या ठिकाणी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.भाई गिरकर....

सध्याच्या केंद्र सरकारने भव्य स्मारक उभे केलेले नाही. त्या स्मारकासाठी कितीही पैसा लागला तरी दिला जाईल असे म्हटले होते. पण तसे झालेले नाही.

सभापती महोदय, कबड्डीपटूंचे शासनाने 3 कोटी रुपये दिलेले नाहीत. त्याची घोषणा होऊन 1 वर्ष झालेले आहे. गेल्या 4 मार्चला या महिला कबड्डीपटूंनी वर्ल्ड कप जिंकला होता. 8 मार्च, 2012 रोजी त्या महिलांना प्रत्येकी 1-1 कोटी रुपये दिले जातील अशी घोषणा करण्यात आली होती. परंतु 8 मार्च, 2013 रोजी पुन्हा महिला दिनीही त्यांना ती रक्कम दिलेली नाही. याबाबत पुन्हा पुन्हा चर्चा करावी लागते त्याचा मला खेद होत आहे. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर जे ज्येष्ठ सदस्य आहेत. मी आणि ते देवगडला कबड्डीची स्पर्धा बघण्यासाठी गेलो असताना सुवर्णा बारटक्के ह्या आमच्याकडे बघत होत्या. तेथे 1 कोटी रुपयांचा कबड्डीचा कार्यक्रम घेतला जातो, पण घोषित केलेले 1 कोटी रुपये मिळतील असे त्यांना वाटत होते. परंतु त्यावेळी मी त्यांना असे म्हटले की, 1 कोटी रुपये देण्यासाठी प्रयत्न करु. ते 3 कोटी 31 मार्चपर्यंत देण्यात येतील असे सांगण्यात आलेले आहे. शासनाकडून कोणत्याही कामासाठी पैसा कमी पडू देणार नाही असे सांगितले जाते, परंतु प्रत्यक्षात कार्यवाही केली जात नाही.

श्री.भोतमांगे कुटुंबीयांवर अत्याचार करण्यात आले. परंतु पोलिसांनी त्या प्रकरणाचा नीट तपास केल्यामुळे त्यातील काही आरोपी निर्दोष सुटले. भोतमांगे अनुसूचित जातीचे आहेत की इतर मागासवर्गीय आहेत हे महत्वाचे नाही. भंडारा येथे 3 लहान मुलींवर अत्याचार झाले त्या नराधामांचा अजूनही शोध लागलेला नाही. गेल्या 26 फेब्रुवारीला श्रीरामपूर येथे दलित महिलेला मोटर सायकलवरुन पळवून नेण्यात आले. तेथील नगराध्यक्षाच्या मुलाचे त्याच्या पुतण्याचे रेल्वे फ्लॅटफॉर्मवर भांडण झाल्यामुळे त्याने त्या महिलेला फरफटत नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. त्या प्रकरणातील आरोपीला अद्यापपर्यंत पकडलेले नाही. हा महाराष्ट्र शाहू, फुले, आंबेडकरांचा आहे असे म्हटले जाते. अशा दलित महिलांवरील अत्याचाराचा पाढा वाचता येईल इतकी प्रकरणे राज्यात घडलेली आहेत. पण वेळेअभावी मी त्याचा उल्लेख करणार नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई गिरकर....

सभापती महोदय, या सभागृहामध्ये शासनातर्फे असे सांगितले गेले की, आम्ही दलितांसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात फंड आरक्षित केलेला आहे. 1994च्या अर्थसंकल्पामध्ये अनुसूचित जातीसाठी केवळ 92 कोटी रुपये दिले होते. जेव्हा पहिल्यांदा युती शासन सत्तेवर आले त्यावेळी अनुसूचित जातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात युती शासनाने 600 कोटी रुपये दिले होते. आता अनुसूचित जातीसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात निधी राखून ठेवला जातो मात्र नंतर त्याला कट लावून तो पैसा दुसरीकडे वळविला जातो. अनुसूचित जातीच्या मुलांच्या वसतिगृहासाठी, शिष्यवृत्तीसाठी, आश्रमशाळांसाठी अनुदान नाकारुन त्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पाप हे शासन करीत आहे. आता सन्माननीय सदस्य ॲड. जयदेव गायकवाड यांनी सांगितले की, वसतिगृहामध्ये प्रवेश न मिळाल्यामुळे एका विद्यार्थ्याला आपल्या गावी परत जावे लागले. या शासनाने केवळ महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ, बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेऊन चालणार नाही तर त्यांचे विचार कृतीत आणले पाहिजे.

सभापती महोदय, कोकणातील मुंबई-गोवा रस्ता क्रमांक 17 या रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर अपघात होत असतात. सिंधुदुर्ग जिल्ह्याचे जेवढे क्षेत्र आहे त्याच्या निम्मे क्षेत्र गोवा राज्याचे आहे. या गोव्याचा विकास पर्यटनावर झालेला आहे. सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यामध्ये पर्यटनाची अनेक स्थळे आहेत. परंतु ती विकसित करण्याकडे, पर्यटनाच्या दृष्टीने इन्फ्रास्ट्रक्चर निर्माण करण्याकडे शासनाने दुर्लक्ष केलेले आहे. आपल्या राज्यापेक्षा गोवा राज्यामध्ये पेट्रोल 25 रुपयांनी स्वस्थ आहे. या राज्यामध्ये स्त्रीभ्रूण हत्येचा विषय ऐरणीवर आलेला असताना त्याबाबतीत ठोस अशी उपाययोजना राज्य सरकारने केलेली नाही. गोवा राज्यामध्ये जर मुलगी जन्माला आली तर गोवा सरकार तिला एक लाख रु. देते. तशा प्रकारची कोणतीही उपाययोजना आपल्या राज्य सरकारने केली नसल्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. हे सरकार फक्त महिलांच्या विकासाच्या, मागासलेल्या समाजाच्या विकासाच्या, आदिवासींच्या विकासाच्या वल्गना करीत आहे, त्यांच्या विकासासाठी कोणताही ठोस कार्यक्रम या अभिभाषणामध्ये नसल्यामुळे मी खेद व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

----

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. अनिल परब (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि काही महत्वाचे मुद्दे आपल्या नजरेसमोर आणण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, शासनाने म्हटलेले आहे की, क्रीडा संस्कृतीला चालना देण्यासाठी क्रीडा धोरण मंजूर केलेले आहे. एका बाजूला क्रीडा धोरणाला मंजुरी देत असताना दुस-या बाजूला महाराष्ट्राचा क्रीडा क्षेत्राचा महत्वाचा असा जो छत्रपती पुरस्कार आहे तो पुरस्कार 2009-2010, 2010-2011 आणि 2011-2012 अशा तीन वर्षात दिला गेला नाही. हा पुरस्कार महाराष्ट्रातील खेळाडूसाठी अतिशय महत्वाचा पुरस्कार असून तो तीन वर्षापासून दिला गेला नाही याबद्दल मी खेद व्यक्त करतो. आताच येथे असे सांगण्यात आले की, नागरीसेवामधील महाराष्ट्रातील इच्छुकांचा सहभाग वाढण्याच्या संदर्भात जी काही माहिती आम्हाला उपलब्ध झालेली आहे ती अशी आहे की, परप्रांतामध्ये लेखी परीक्षेला बसायचे आणि तोंडी परीक्षेला मुंबईमध्ये यायचे. जर 100 सीटचा कोटा असेल तर 40 सीट परप्रांतातून आणि 40 महाराष्ट्रातून घ्यायच्या असे जे काही धोरण बाकीच्या राज्यातून अवलंबिले जात आहे त्यामुळे महाराष्ट्रातील मुलांवर अन्याय होत आहे तो दूर करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करायला पाहिजे असे मला वाटते.

...नंतर श्री. गिते..

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने गिरणी कामगारांसाठी गृहनिर्माणाचे धोरण जाहीर केलेले आहे. मुंबईत म्हाडाच्या 56 वसाहती आहेत. या वसाहतींना जवळपास 40 ते 50 वर्षे झाली आहेत. शासनाने पुनर्विकासाचे धोरण जाहीर केले. दिनांक 10 सप्टेंबर, 2010 पूर्वी जे पुनर्विकासाचे धोरण होते, त्यात प्रिमियम देऊन डेव्हलपमेंट करा किंवा स्टॉक द्या अशा प्रकारचे दोन ऑप्शन्स होते. त्यात मुंबई शहरातील 327 प्रपोजल्स म्हाडाकडे आले होते. परंतु या संदर्भात अचानक काय झाले त्याची मला माहिती नाही. त्याच्यातील एक प्रस्ताव बंद केला आणि जो अव्यवहारी प्रस्ताव तसाच ठेवला आणि लोकांना सांगितले गेले की, हाऊसिंग स्टॉक जर घेतला तर 1 लाख घरे मुंबई शहरात तयार होतील. परंतु 327 प्रस्ताव परत गेल्यामुळे आज हाऊसिंग स्टॉकही मिळत नाही. म्हाडाने पुनर्विकासाचे पुस्तक छापले होते. त्याला अनुसरुन लोकांनी अर्ज केले. स्वत:ची घरे खाली करुन रहिवासी ट्रान्झीट कॅम्पमध्ये रहावयास गेले आहेत. काही लोक भाडयाच्या घरात शिफ्ट झालेले आहेत. जे लोक भाडयाच्या घरात गेले आहे त्यांचे विकासकांनी त्यांचे भाडे बंद केले आहे. त्यांना भाडेही मिळत नाही आणि घरेही मिळत नाही. महाराष्ट्र शासनाच्या चुकीच्या धोरणामुळे म्हाडाचा पुनर्विकासाची कामे पूर्णपणे बंद आहेत. जवळपास 1 लाख रहिवासी पुनर्विकासात अडकून पडलेली आहेत. पुनर्विकासाच्या धोरणाच्या बाबतीत या ठिकाणी जे काही नमूद केले आहे ते वास्तवतेला धरुन नाही म्हणून मी खेद व्यक्त करतो. मुंबईतील लोकांसाठी पुनर्वसनाचे धोरण योग्य पध्दतीने राबवावे अशी या निमित्ताने माझी मागणी आहे.

सभापती महोदय, कायदा व सुव्यवस्था व्यवस्थित ठेवणारे प्रगतशील राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. राज्यात पोलीस दलाची भरती होते. पूर्वी पोलीस भरतीमध्ये पोलिसांच्या मुलांना प्राधान्य मिळावयाचे. पोलीस दलात पोलीस कर्मचारी मोठया विश्वासने काम करीत आहे. त्याप्रमाणे पुढे माझा मुलगा देखील पोलीस दलात माझ्या सारखेच काम करील. पोलिसांच्या मुलांना घरातच पोलिस प्रशिक्षण मिळत होते. पोलीस दलात पोलिसांच्या मुलांना प्राधान्य देण्याचे बंद केल्यामुळे अतिशय वाईट परिस्थिती निर्माण झाली आहे. पोलिसांच्या मुलांना पोलीस दलाच्या भरतीच्या वेळी प्राधान्य देण्याची विशेष सवलत गेली अनेक वर्षापासून चालू होती,

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.अनिल परब...

परंतु गेल्या दहा वर्षापासून ही सवलत बंद झाली आहे. त्यामुळे पोलीस कर्मचाऱ्यांमध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. म्हणून ही सवलत पुन्हा सुरु करण्यात यावी अशी माझी या निमित्ताने शासनास विनंती आहे.

सभापती महोदय, बांद्रा पूर्व येथे सरकारी कर्मचाऱ्यांची 97 एकर जमीनीवर वसाहत आहे. त्या वसाहतींचा पुनर्विकास करावा अशी सरकारी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. तेथील शासकीय कर्मचारी गेल्या 35 वर्षापासून शासकीय सेवा करीत आहेत. त्या कर्मचाऱ्यांच्या हाऊसिंग सोसायटयांना प्लॉट मिळावा, पोलीस अधिकारी आणि कर्मचारी गेली अनेक वर्षे शासनाची सेवा करीत आहेत, त्यांच्याही सोसायटयांना प्लॉट देण्यात यावेत. परप्रांतातून आलेल्या व 15 वर्षे वास्तव्य अससलेल्या व्यक्तीला एसआरएमध्ये घरे उपलब्ध करुन देता. परंतु सरकारी कर्मचारी शासनाची वर्षानुवर्षे सेवा करीत आहेत. ते सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांना अंबरनाथ, डोंबिवली, कल्याण या ठिकाणी वास्तव्यासाठी जावे लागते. त्यांनी छोटया छोटया नियोजित हाऊसिंग सोसायटया तयार करुन भूखंड मागितले आहेत. सरकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या सोसायटयांना भूखंड दिले तर शासनाची सेवा ते अतिशय जोमाने करतील. मुंबईतील पोलीस वसाहती जीर्ण झालेल्या आहेत. त्या इमारती पडावयास लागल्या आहेत. या गोष्टींचा विचार करावा असे मी या अभिभाषणाच्या निमित्ताने शासनास सूचवू इच्छितो आणि माझे मनोगत पूर्ण करतो.

-------------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आपल्या अभिभाषणात आपल्या राज्यातील अनेक आवश्यक विषयांवर लक्ष वेधले आहे. गेली दोन वर्षे राज्यात पुरेसा पाऊस न पडल्यामुळे राज्यात 17 जिल्हयात दुष्काळ व पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी राज्य शासनाकडून युध्द पातळीवर काही निर्णय घेण्यात आले आहेत. 1663 गावे, 4490 वाडयांना टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत असून टंचाईग्रस्त गावांसाठी विविध योजना राबविण्यात येत असून त्यासाठी आतापर्यंत 414 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. दुष्काळ व पाणी टंचाईमुळे शेतात कोणतेही पीक उरलेले नाही. पशुधनावर शेतकऱ्यांचे जीवन अवलंबून आहे. आज दुग्धव्यवसायातून शेतकऱ्यांना थोडया प्रमाणात उत्पन्न मिळते आहे. त्या पशुधनाला जगविण्यासाठी शासनाने चारा छावण्या सुरु केलेल्या आहेत. या छावण्यांमध्ये 4.50 लाख जनावरे असून त्या जनावरांच्या चाऱ्याची जबाबदारी शासनाने घेतलेली आहे....

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

या 6 महिन्यांच्या काळात आतापर्यंत 749 कोटी रुपये चाऱ्यावर खर्च केले आहेत. महाराष्ट्रापुढे ही सगळ्यात मोठी समस्या निर्माण झालेली आहे. हा फक्त ग्रामीण भागातील नागरिकांचा प्रश्न नसून शहरी भागात राहणारे श्रीमंत आणि मध्यमवर्गीय यांनी सुध्दा या अन्नदात्याला अडचणीच्या काळात मदत करणे आवश्यक आहे. दुष्काळ ही महाराष्ट्रातील सगळ्यांपुढील समस्या आहे. यासाठी दूरदर्शन वाहिन्या, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमांचा चांगल्याप्रकारे वापर करुन लोकांना आवाहन केले तर शासनाकडे अधिक मदत प्राप्त होऊ शकते. तसे आवाहन करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, ज्या तालुक्यात भूजल पातळी 2 मीटरपेक्षा अधिक खाली गेली आहे त्या ठिकाणी सुधारणा करण्यासाठी सिमेंटचे नाले व बंधारे बांधण्याचा कार्यक्रम घोषित केला असून त्याकरिता 150 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. आतापर्यंत 682 सिमेंटचे नाले व बंधारे बांधून पूर्ण झाले आहेत. 683 कामे प्रगतीपथावर आहेत. हा या अभिभाषणातील सर्वात महत्वाचा भाग आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना वाजवी किंमतीत ठिबक सिंचनाचा संच उपलब्ध करुन देण्यासाठी नियत तांत्रिक मानके विचारात घेऊन ठिबक संचाचे दर निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. 2 लाख हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्र ठिबक आणि तुषार सिंचनाखाली आणण्यासाठी राज्य आणि केंद्र शासनाने 675 कोटी रुपयांहून अधिक निधी उपलब्ध करुन दिला आहे. शेतीविषयी अनेक महत्वाचे प्रश्न निर्माण झालेले आहेत.

सभापती महोदय, नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर करण्यात आले त्या धोरणाच्या अंतर्गत आतापर्यंत 312 प्रकल्प मंजूर केलेले आहेत. यातून 2700 कोटी रुपयांची गुंतवणूक अपेक्षित आहे. 21000 नवीन रोजगाराची संधी यातून निर्माण होणार आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अधिकाधिक अन्नधान्य उपलब्ध होण्यासाठी नाबार्ड आणि आरआयडीएफच्या माध्यमातून 6 लाख मे.टन इतक्या क्षमतेची गोदामे बांधण्याचे प्रस्तावित केले आहे ही चांगली गोष्ट आहे.

सभापती महोदय, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम देशात 6 फेब्रुवारी, 2013 रोजी ठाणे जिल्हयातील पालघर येथे सुरु करण्यात आला. 0 ते 18 वयोगटातील मुलांची सर्वव्यापी आरोग्य तपासणी होणार आहे. अशा आरोग्य तपासणीची आवश्यकता आहे. बालकांचे कुपोषण दूर करण्यासाठी सुध्दा या योजनेचा उपयोग होणार आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ D/ MMP/गितेनंतर 16:50

श्रीमती विद्या चव्हाण....

सभापती महोदय, सर्वात लाजिरवाणी गोष्ट म्हणजे राज्यातील स्त्री भ्रूण हत्येमध्ये गेल्या दहा वर्षात झालेली प्रचंड वाढ ही आहे. प्रसार माध्यमांनी हा विषय लावून धरल्यामुळे महाराष्ट्र ढवळून निघाला. 400 हून अधिक फौजदारी खटले दाखल करण्यात आले. 49 व्यक्तींना दंडाची शिक्षा आणि 33 वैद्यकीय व्यवसायींना कारावासाची शिक्षा झाली आहे. परळी येथील डॉ.मुंडे यांच्या प्रकरणात शासनाने अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आदिवासी भागात 1259 आरोग्य संस्था निर्माण करावयाच्या आहेत. फक्त कागदोपत्री आकडेवारी घोषित करुन उपयोग होणार नाही. ग्रामीण आणि आदिवासी भागात आरोग्य केंद्रामध्ये डॉक्टर्स, परिचारिका, औषधे यांची नेहमीच कमतरता भासते. त्याचबरोबर गुटख्यावर शासनाने बंदी आणलेली आहे. परंतु आजही अनेक प्रकारच्या बंद पाकिटामधून गुटखा उपलब्ध होत असल्याचे दिसून येते. या संदर्भात शासनाने कडक कारवाई केली पाहिजे.

सभापती महोदय, स्त्रियांवरील होणाऱ्या अत्याचारामध्ये खास करुन नुकतीच दिल्ली येथे जी घटना घडली त्यानंतर हा विषय ऐरणीवर आला. पीडित महिलांचे पुनर्वसन करणे, ॲसिड अटॅक, मानसिक अत्याचार या गोष्टीबाबत केवळ सहानुभूती दाखविणे, न्यायालयात खटले दाखल करणे एवढे करुन भागणार नाही. पीडित महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी आधार दिला पाहिजे. आज दर 24 ते 30 मिनिटाला एक बलात्काराची घटना घडत असेल तर अनेक पीडित स्त्रियांसाठी आर्थिक तरतुदीची आवश्यकता आहे.

नंतर 3एम.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .........

सभापती महोदय,या ठिकाणी शासकीय योजनांचा उल्लेख करण्यात आलेला असून त्यामध्ये संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, इंदिरा गांधी विकलांग निवृत्ती वेतन अशा योजनांचा उल्लेख आहे. परंतु मला खेदाने म्हणावे लागत आहे की, या योजना तळागाळापर्यंत ज्या प्रमाणात पोहचावयास पाहिजे होत्या त्या प्रमाणात पोहचलेल्या नाहीत. गेल्या 64 वर्षात या योजना आपल्या प्रशासनाने व्यवस्थित राबविल्या असत्या तर एकही कुटुंब दारिद्रय रेषेखाली राहिले नसते. त्यामुळे यासंदर्भात प्रशासन चांगले काम कसे करेल यासाठी शासनाने कडक धोरण आखण्याची गरज आहे.

सभापती महोदय, मुंबईध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज तसेच कोल्हापूर येथे छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक शासन उभारणार आहे व ती चांगली गोष्ट आहे. स्मारकासाठी निधीची तरतूद करणे आवश्यक आहे परंतु ज्या थोर पुरुषांची स्मारके आपण उभी करणार आहोत त्या थोर महापुरुषांचे विचार जतन करण्याची फार आवश्यकता आहे असे मला वाटते. स्त्रियांवरील अत्याचार असो, दलित स्त्रियांवरील अत्याचार असो, लहान मुलांवर होणारे अत्याचार असो यासंदर्भात स्मारकांपेक्षा या थोर महापुरुषांचे विचार जतन करण्याकडे शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. स्मारके तर होतच राहतील परंतु पुरोगामी महाराष्ट्रात थोर महापुरुषांचे विचार रुजविण्यासाठी आपण सर्वांनी एकत्र येऊन प्रयत्न केले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करुन मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

----------

...2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाचा जो ठराव मांडलेला आहे त्यावर विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. या सभागृहात माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर चर्चा करीत असतांना सर्वच मान्यवरांनी सरकारच्या चुकीच्या धोरणावर बोट ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. चुकीचे घडले असेल तर त्यासंदर्भात विरोधी पक्षाने सूचना करण्याची आवश्यकता असते. सूचना न करण्याच्या जागेवर विरोधी पक्ष चुकला असे मला वाटते.

सभापती महोदय, फेब्रुवारी 2012 अखेर आपल्या राज्यात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी केवळ 230 टँकर सुरु होते परंतु या वर्षी पिण्याच्या पाण्याच्या टँकरची संख्या मात्र 2136 झालेली आहे. जवळपास ही संख्या 10 पट झालेली आहे व ही बाब माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये नमूद केलेली आहे. मागच्या वर्षी पाऊस कमी पडला, या वर्षीही पाऊस कमी पडला व पुढच्या वर्षात पाऊस जास्त पडेल असे काही होणार नाही. पाऊस कमी का पडला, त्याची कारणे काय आहेत यावर आता चर्चा करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार हे वयाने,शिक्षणाने,ज्ञानाने मोठे आहेत. त्यानी या विषयाच्या संदर्भात चांगल्या प्रकारे विचार मांडलेले आहेत. परंतु माननीय रावते साहेब आपल्या राज्यात आपण मोठया प्रमाणात बोअरवेल केल्यामुळे संपूर्ण भूगर्भाची चाळणी करुन टाकली आहे व त्यामुळेच भूगर्भातील पाण्याची पातळी कमी झाली आहे. पुढील वर्षी जास्त पाऊस पडला म्हणून जास्त जमीन ओलिताखाली येईल असे काही नाही.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, आपल्याकडे मोठया प्रमाणात वृक्षतोड सुरु झालेली आहे. सरकारी जमिनीवरील आरक्षण उठवण्यासाठी व तेथे बांधकाम करण्यासाठी लोक मत्र्यांकडे जात आहेत. एकीकडे वृक्षतोड मोठया प्रमाणात होत आहे तर दुसरीकडे ग्रामीण भागाचे शहरीकरण मोठया झपाटयाने होत असल्यामुळे बांधकामाचे प्रमाण वाढले आहे. या बांधकामासाठी लागणाऱ्या पाण्याचा आम्ही सर्वच दुरुपयोग करीत आहोत.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये लाखोच्या संख्येत उपहारगृहे आहेत. आपण विधान भवनच्या कॅन्टिनमध्ये गेलात तर त्या ठिकाणी आपल्याला ग्लासातील अर्धेच पाणी पिल्याचे व अर्धा ग्लास पाणी तसेच सोडून गेल्याचे दिसून येते.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

मी ग्रँट हयात सारख्या एका हॉटेलमध्ये बघितले की, चहा सोबत एका छोट्या ग्लासात पाणी आले होते. तेव्हा मी मॅनेजरल विचारले असता त्याने सांगितले की, प्रत्येक जण अर्धे ग्लास पाणी पितो. त्यामुळे अर्धे पाणी फुकट जाते म्हणून आम्ही छोटे ग्लास देऊन पाणी वाचविण्याचा प्रयत्न करीत आहोत. लाखो उपाहारगृहात लोकांसमोर पाण्याचे ग्लास ठेवले जाते. लोक ग्लासातील थोडेच पाणी पित असल्यामुळे त्यातील अर्धे पाणी आपल्याला फेकून द्यावे लागते. त्यामुळे आपल्याला अशा प्रकारच्या योजना राबवाव्या लागतील. पाण्याची चोरी व पाण्याची गळती पुष्कळ ठिकाणी होते. ती आपल्याला मोठ्या प्रमाणावर थांबवावी लागेल. पाण्याची गळती कुठे होत आहे हे मीडिया रोज दाखवत आहे. त्यासाठी जनजागृती करण्याची गरज आहे.

दुष्काळावर सर्वांचीच भाषणे झाली आहेत. मी असे म्हणतो की, पुढच्या वर्षी आपल्याला यापेक्षाही पाण्याची टंचाई भासणार आहे. यंदा आपण 2036 टँकरचा उपयोग पाणी पुरवठा करण्यासाठी करीत आहोत. पुढच्या वर्षी ते आणखी लागणार आहेत. यातून सर्वांना वाचवायचे असेल तर पाणी अडवा, पाणी जिरवा हे धोरण पुन्हा अवलंबावे लागेल. सर्प मित्रांद्वारे आपण सर्पांसंबंधी जनजागृती केली. त्यामुळे सर्पाच्या संख्येत वाढ झाली. वृक्षाच्या लागवडीसाठी वृक्ष मित्र निर्माण केले. मी या सदना मार्फत शासनाला विनंती करणार आहे की, आपण जल मित्र केले व त्यांच्या माध्यमातून जनजागृती केली तर पाण्याचा दुरूपयोग वाचवू शकू. तसे केले तर पुढच्या वर्षीच्या भाषणामध्ये आपण सांगू शकाल की, अमुक एवढे लीटर पाणी आपण वाचवू शकलो.

मी सन्मानीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचे अभिनंदन करतो. आपल्या राज्यावर लाखो कोटी रूपयांचा बोजा असताना, कर्ज असताना देखील गुटख्याच्या विक्री पासून मिळणारे 100 कोटी रूपये मिळाले नाहीत तरी चालतील असा विचार करून त्यांनी गुटखा विक्रीवर बंदी आणली. गुटखा, पानमसाला यांच्या सेवनाने कर्करोग होतो. राज्यातील 70 टक्के जनता खुटखा व पान मसाल्याचे सेवन करत असल्याचे एका पाहणीत आढळून आले आहे. त्यामुळेच गुटखा, पानमसाला व तत्संबंधीच्या पदार्थांची साठवणूक व वितरण करणे तसेच विक्री करणे यावर बंदी घालण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतलेला आहे. कर्जाचा बोजा असतानाही हा निर्णय शासनाने घेतलेला आहे. आपल्या राज्यातील नागरिकांचे आरोग्य चांगले कसे राहील हे डोळ्यासमोर ठेवून हा निर्णय घेतलेला आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

सभापती महोदय, राज्याच्या क्रीडा संस्कृतीस चालना देण्यासाठी शासनाने क्रीडा धोरण मंजूर केले असून राज्यातील युवकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी राज्य शासनाने युवा धोरण मंजूर केले आहे अशा प्रकारची बातमी आजच्या वर्तमानपत्रात आहे. आमच्या महिलांनी कबड्डीचा वर्ल्ड कप जिंकल्यामुळे त्यांना एक कोटी रूपये देण्याचे शासनाने मान्य केले आहे. पण त्यांना एक कोटी रूपये देण्यास विलंब झालेला आहे. कालच यासंबंधी माननीय क्रीडा मंत्र्यांनी घोषणा केली की, 31 मार्च 2013 पूर्वी त्यांना त्यांचे पैसे दिले जातील. यास विलंब झालेला आहे. त्यास शासनाने पुन्हा विलंब न करता हे पैसे लवकरात लवकर द्यावेत.

आजचा महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, सकाळ यांनी हॉकी संबंधातील बातमी दिली आहे. भारतीय हॉकी महासंघाच्या बंगळूर येथे 25 तारखेपासून स्पर्धा सुरू होत आहेत. त्यासाठी मुंबई हॉकी असोसिएशनचे मैदान सरावासाठी मिळावे म्हणून त्यांनी शासनाकडे विनंती केली. शासनाने त्यांची विनंती मान्य करून क्रीडा उप संचालक श्री.मोटे मुंबई हॉकी असोसिएशनला पत्र लिहिले. काल सर्व स्पर्धक हॉकी खेळण्यासाठी गेले असता त्यांना मुंबई हॉकी असोसिएशनने खेळण्यास बंदी केली. या बातमी संबंधातील सर्व फोटो आजच्या वृत्तपत्रामध्ये फोटो आले आहेत. ही बाब खरोखर गांभीर्याने घेण्यासारखी आहे. ही जागा शासनाची आहे. त्याचा दुरूपयोग केला जात होता. लग्न समारंभासाठी ती जागा भाड्याने दिली जाते. त्यामुळे शासनाने ती जागा स्वत:कडे घेण्याचे ठरविले आहे. त्यामुळे मुंबई हॉकी असोसिएशन ही संघटना कोर्टामध्ये गेली आहे. कोर्टामध्ये वेळ काढला जात आहे. 25 तारखेला होणाऱ्या खेळासाठी हे मैदान दिले जात नाही म्हणून खेळाडू रस्त्यावर हॉकी खेळले. एका खेळाडूला मार लागल्यामुळे त्याला तीन टाके देखील पडले.

यानंतर श्री.अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

तेव्हा शासनाने याची गांभीर्याने दखल घेऊन ते मैदान लवकरात लवकर ताब्यात घेऊन खेळाडुंना न्याय द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्याबद्दल बोलल्याशिवाय भाषण पूर्ण करणे चुकीचे होईल. महसूल प्रशासनामध्ये सुधारणा करण्यासाठी ई-डिस्ट्रीक्ट, ई-सेवा केंद्र, ई-लोकशाही, ई-टेंडरींग, ई-मोजणी, ई-फेरफार, ई-नकाशा, ई-चावडी हे सर्व उपक्रम राबविल जात आहेत. पण ई-ऑफिस संकल्पना राज्यात प्रथम सिंधुदुर्ग जिल्ह्यात राबविण्यात आली ही एक अभिमानास्पद गोष्ट आहे.

सभापती महोदय, दुय्यम न्यायालयातील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्याची गरज आहे. दुय्यम न्यायालयामध्ये सुविधांची कमतरता आहे. आपण सर्वजण या ना त्या कारणाने न्यायालयात जातो ते आपणास पहावयास मिळते की, तेथे बसण्यासाठी खुर्च्या नाहीत, चांगल्या रुम्स नाहीत. टॉयलेटची व्यवस्था नाही. राज्यातील दुय्यम दर्जाच्या न्यायालयातील पायाभूत सुविधांमध्ये वाढ करण्यासाठी शासनाने ठोस कार्यक्रम आखलेला आहे. हा कार्यक्रम अमलात आणण्यासाठी प्रयत्न करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र इमारत बांधकाम कामगार कल्याण मंडळाकडे 979 कोटी रुपये इतका उपकर गोळा करण्यात आलेला आहे. अंदाजे 1 लाख इमारत बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली आहे. परंतु या बांधकाम व्यवसायामध्ये परराज्यातून आलेले कामगार भरपूर आहेत. आज सकाळी त्या विषयावर चर्चा झालेली आहे. तेव्हा या मंडळाचा निधी परराज्यातील कामगार येथे काम करीत आहेत त्यांच्यासाठी खर्च न करता आपल्या कामगारांसाठी खर्च करावा.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त केलेला आहे. मी त्या बाबत सांगू इच्छितो की, उपक्रम राबविण्याची जबाबदारी शासनाची आहे तेवढीच ती विरोधी पक्षाची देखील आहे. विरोधी पक्षाने आपली भूमिका चांगल्याप्रकारे वटविली तर मला वाटते विरोधी पक्षाला खेद व्यक्त करावा लागणार नाही. पण गर्भात असलेल्या जीवापासून अगदी महापुरुषांच्या स्मारकापर्यंतचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी सरकारने वेगवेगळ्या तऱ्हेने प्रयत्न केलेले आहेत. तसेच जन्माला आलेल्या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

बालकापासून वयोवृध्दापर्यंतच्या सर्व घटकांसाठी, सर्व जातीधर्माच्या लोकांसाठी सोयीसुविधा पुरविण्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मांडलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो आणि माननीय राज्यपालांच्या आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला पाठिंबा देऊन माझे भाषण पूर्ण करतो.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानतो.

सभापती महोदय, माझ्या अगोदरच्या वक्त्यांच्या भाषातील कोणत्याही मुद्याचा मी पुनरुच्चार केल्यास आपण घंटी वाजवावी, मी लगेच खाली बसेन.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील सरकार भ्रष्टाचार विरहित राहिले पाहिजे अशा विचारांचे आपण असाल आणि त्या व्यतिरिक्त मी काही बोलत असेन तर आपण घंटी वाजवावी, मी लगेच खाली बसेन. परंतु माझे मुद्दे जर महाराष्ट्रातील सर्व विचारांना व्यापक असतील तर कृपया आपण घंटी वाजवू नका अशी माझी नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या भाषणास सुरुवात करताना कौल ॲन्ड शकधर यांच्या "प्रॅक्टीस ॲन्ड प्रोसिजर ऑफ पार्लमेन्ट" या पुस्तकाचा उल्लेख केला. त्या पुस्तकातील गर्व्हनर स्पीच म्हणजे काय असे सांगताना, "Governor Address is a public declaration of policy that Government wants to follow in the coming year..." म्हणजे येणाऱ्या वर्षात सरकारची काय पॉलिसी असली पाहिजे. पुढे म्हटले आहे की, "..The Address is supposed to look into the future and to the present." भाषणाचे मूळ काय असले पाहिजे तर, आपण भविष्याचा विचार करताना तो वर्तमानाच्या संकल्पनेतून करतो आहे किंवा नाही.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. कारण या अभिभाषणामध्ये मुंबई आणि मुंबईच्या पायाभूत सुविधांबद्दल एका चकार शब्दाचा उल्लेख नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SJB/ MMP/ D/ पूर्वी श्री.अजित.... 17:10

ॲड.आशिष शेलार.....

गेल्या कित्येक वर्षांच्या अभिभाषणांमध्ये किंबहुना नावासाठी का होईना मुंबईचा उल्लेख असायचा. मुंबईतून देशाला आणि राज्याला मोठ्या प्रमाणावर रेव्हेन्यू मिळतो. त्यामुळे आतापर्यंतच्या अभिभाषणात मुंबईतील पायाभूत सुविधांच्या बाबतीत काही ना काही मांडले जात होते. परंतु या वर्षीच्या अभिभाषणात मुंबईच्या बाबतीत काहीच मांडण्यात आलेले नाही. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर, अशा परिस्थितीत आम्ही माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करायचा नाही तर काय करायचे हा प्रश्न आमच्यासमोर आहे.

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.मोहन जोशी)**

महोदय, मी भाषणाच्या सुरुवातीला आपल्याकडे वेळेबाबत जी विनंती केली होती ती आपण माननीय तालिका सभापतींना सांगावी.

महोदय, नगर विकास विभागाच्या बाबतीत अभिभाषणामध्ये काहीच उल्लेख नाही. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील उपस्थित नाहीत. ते बोलताना असे म्हणाले की, या अभिभाषणात काँग्रेस पक्षाकडे असलेल्या विभागांचा प्रभाव जास्त आहे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे असलेल्या विभागांना काहीच दिले नाही. त्यांच्या वक्तव्याने माझी गफलत झाल्यामुळे मी माननीय राज्यपालांचे अभिभाषण पुन्हा वाचले. माझ्या निदर्शनास आले की, नगर विकास विभागाच्या बाबतीत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कसलाही उल्लेख नाही. महोदय, मी ज्या वेळी नगर विकास विभागाच्या निर्णयाची जंत्री वाचतो त्या वेळी असे लक्षात येते की, महाराष्ट्र मुंबईला सापत्नीक वागणूक आणि महाराष्ट्राच्या विकासाबद्दल उलट्या दिशेने प्रवास करण्याची प्रक्रिया सुरु करीत असल्याचे दिसून येते. नगर विकास विभागाने गेल्या वर्षभरात काय केले याचा अभ्यास केला असता असे निदर्शनास आले की, नगर विकास विभागात फारच घोडदौड सुरु आहे.

महोदय, आतापर्यंत जे जे नगर विकास मंत्री झाले किंवा ज्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्याकडे नगर विकास विभाग ठेवला त्यांच्यामागे एकप्रकारचे शुक्लकाष्ठ लागले. आजपर्यंतचे नगर विकास मंत्री आणि मुख्यमंत्री त्यांच्या नातेवाईकांना पुढे घेऊन जात असल्याचे वातावरण आपल्याला दिसले. विद्यमान मुख्यमंत्री माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण यांची प्रतिमा खूप चांगली आहे. आताच्या माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल सदनात आणि सदनाबाहेर बोलण्याचे कोणी धाडस करीत नाही. या पूर्वी श्री.अशोक चव्हाण आणि दिवंगत श्री.विलासराव देशमुख हे मुख्यमंत्री होते. परंतु

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार.....

त्यातील कोणी सासूमुळे अडचणीत आले किंवा आपल्या मुलाला एक्स्ट्रा कार्यालय चालविण्यास दिल्यामुळे अडचणीत आले. महोदय, आज नगर विकास विभागात जे सुरु आहे त्या बाबतचे दाखले आमच्यासमोर आले आहेत. माझ्याकडे त्या बाबतची यादी आहे.

महोदय, गेल्या वर्षभरात नगर विकास मंत्री आणि मुख्यमंत्री यांनी केलेल्या झोन चेंजची यादी माझ्याकडे आहे. त्यानुसार अनेक झोन रहिवासी क्षेत्राखाली आणले. ज्या 33 झोन चेंजमुळे बिल्डरांना करोडो-अब्जो रुपयांचा फायदा झाला त्याची यादी माझ्याकडे आहे.

महोदय, बिल्डरांच्या फायद्यासाठी वर्षभरात निरनिराळ्या 33 झोन अंतर्गत 664 एकर जागा रहिवासी क्षेत्रात कन्व्हर्ट केली गेली. अशा प्रकारचा बदल करताना इकॉलॉजी, पर्यावरण विभागाचा कसल्याही प्रकारचा सर्व्हे झाला नाही. महोदय, मी जबाबदारीने बोलत आहे. केवळ पार्टी फंडच्या इंटरेस्टमध्ये 2 कोटी 89 लाख स्क्वेअर फूट इतकी नो डेव्हलपमेंट झोन आणि ॲग्रीकल्चरल झोनची जागा रहिवासी क्षेत्रात कन्व्हर्ट झाली आहे. महोदय, 2-3 कोटी स्क्वेअर फूट जागा आताच्या नगर विकास विभागाच्या माध्यमातून एका वर्षात बदलण्यात आली. या संदर्भात चौकशी केली असता असे दिसून आले की, कोणी तरी रोहन जगदाळे नावाचा नातेवाईक झोन चेंज करण्याबाबतच्या फाईली घेऊन फिरतो. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, कोण आहे हा रोहन जगदाळे ?

महोदय, सर्व्हे नं.102 कोथरुड, पुणे येथील 20 हेक्टर जागा नो डेव्हलपमेंट झोन मध्ये असताना ती बदलून रहिवासी क्षेत्रात कन्व्हर्ट केली. या जमिनीचे मालक केसरी व्होरा डेप्युटी कंपनी आहे. तसेच सर्व्हे नंबर 17 येथील 3 हेक्टर जागा इंडस्ट्रीयलची होती, परंतु ती सुध्दा रहिवासी क्षेत्रात कन्व्हर्ट केली. या जमिनीचे मालक पद्मश्री सोनी हे आहेत. या शिवाय गट नंबर 542, 545 ही शिरुर-पुणे कृषी विभागाची जागा होती. ती नो डेव्हलपमेंट झोनची जागा असताना सुध्दा विनय बोथराच्या अर्जान्वये ती रहिवासी क्षेत्रात कन्व्हर्ट केली आहे.

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. आशिष शेलार .....

या सर्व 33 प्रोजेक्टसची यादी मी सदनासमोर ठेवण्यास तयार आहे. यामध्ये 666 एकर म्हणजे 3 कोटी स्क्वेअर फूट जागा होते. मार्केटमध्ये रोहन जगदाळे फिरतो आणि सांगतो की, प्रत्येक जागा आम्ही एकरी 17 ते 18 लाख रुपये घेऊन बदललेली आहे. माननीय मुख्यमंत्री असे करीत असतील की, नाही हे मला माहीत नाही. नगरविकास खात्याबद्दल बोलावयाचे असेल तर ते त्यांना ठरवावे लागेल पण रोहन जगदाळे जो त्यांचा नातेवाईक आहे त्यांनी सांगितलेला पार्टी फंड हा केवळ झोन चेन्जमधून 125 कोटी रुपये पार्टी फंडच्या नावाखाली येतो.

सभापती महोदय, हे प्रस्ताव केवळ झोन चेन्जपुरते राहिले असे नाही. मुंबई शहरासाठी एक अयशस्वी योजना आली त्याचे एक उदाहरण मी आपल्याला देतो. मुंबई शहराच्या डेव्हलपमेंटच्या बाबतीत 33/24 ची नवीन स्कीम आली. मुंबई शहरात एफएसआयची कशी लूट चालली आहे हे दिसून येते. आता मला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते झोपडपट्टी विकासातील सामान्य माणसाच्या संदर्भातील योजना सांगत होते. 33/24 ही पब्लीक पार्कीन्ग स्कीम आहे. ती स्कीम पूर्वीच्या मुख्यमंत्र्यांनी आणली. ते बदनाम झाले. ते गेले. स्वत: नगरविकास मंत्र्यांनी त्या स्कीममध्ये बदल केला. त्या बदलामध्ये प्रिमियम वाढविला. पण प्रिमियमबरोबर अगोदरच्या मुख्यमंत्र्यांनी जो पार्टी फंड गोळा केला त्याच्या दुप्पट रेट केला. मी जबाबदारीने बोलतो. माझ्याकडे त्या पार्कीन्ग लिजची यादी आहे. 33/24 मधील ज्या 11 स्कीम आहेत त्यामध्ये मुलुंडमधील स्कीमच्या बिल्डरचे नाव छगनलाल खिमजी मेट्रीक्स आहे. मुलुंडमधील दुसरी स्कीम आहे त्यामध्ये रुणवाल बिल्डर्स आहेत. मलबार हिलमध्ये क्लिफोर्ड डिसोजा बिल्डर्स, गोरेगावमध्ये विनायक सोंगटे बिल्डर्स, मरोळ अंधेरीमध्ये निपार रियल इस्टेट बिल्डर्स, विक्रोळीमध्ये वाबला रेसिडेन्सी, अंधेरीमध्ये रुणवाल बिल्डर्स, बोरीवलीमध्ये वनिता इस्टेट्स या 11 स्कीम्स मुख्यमंत्र्यांकडे गेली चार महिने पेंडींग आहेत. स्क्वेअर फुटामध्ये बोलावयाचे झाले तर 7 लाख 75 हजार स्क्वेअर फूट होते. जर ही शहराला रेव्हेन्यू मिळणारी स्कीम होती, जर शहराला पार्कीन्ग स्पेस मिळणारी स्कीम होती, जर त्या स्कीमसाठी ट्राफीक डिपार्टमेंट, बीएमसी डिपार्टमेंट, आमचे अडिशनल कमिशनर आणि संबंधित सर्व खात्यांनी मंजुरी दिली होती तर मुख्यमंत्र्यांकडे ती फाईल

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D

ॲड. आशिष शेलार .....

येते कशाला ? जर कायद्यानुसार ती फाईल नगरविकास मंत्रालयाकडे येते आणि जर ती योजना हिताची होती तर त्या फाईलवर मुख्यमंत्र्यांना सही करण्यासाठी चार महिने का लागले ? पुन्हा एकदा पार्टी फंडचा घोडा आडवा येतो. पर स्क्वेअर फूट 2500 रुपये दर आहे. रुणवाल यांची शेवटची स्कीम पार्टी फंडमध्ये 3 हजार 200 रुपये पर स्क्वेअर फूटप्रमाणे दिली तेव्हा पास झाली. आता 2500 रुपये पर स्क्वेअर फूट दर आहे. 7 लाख स्क्वेअर फुटाचा मामला जर मोजवयाचा झाला तर 100- 150 कोटी रुपयांचा पार्टी फंड होतो. केवळ पार्कीन्ग स्पेसमधून 100 कोटी रुपये आणि पार्कीन्ग स्लॉटचे एफएसआय विकण्यामधून जर पार्टी फंड येत असेल तर नगरविकास खात्याला आणि या राज्यपालांच्या अभिभाषणाला खेद व्यक्त करण्याशिवाय काय राहते ?

सभापती महोदय, तिसरी योजना याच नगरविकास मंत्र्यांनी आणली, महाराष्ट्राला एक मोठे चित्र दाखविण्यासाठी योजना आणली ती योजना म्हणजे स्पेशल टाऊनशीप स्कीम. या स्पेशल टाऊनशील स्कीमखाली सुध्दा या महाराष्ट्राचे मुख्यमंत्री बदनाम झाले. 2000 साली योजना आली. श्री. विलासराव देशमुख यांनी नो डेव्हलपमेंट झोनमध्ये डेव्हलपमेंट होणार नाही अशी योजना आणली. अशोक चव्हाण साहेब आले. नो डेव्हलपमेंट झोनमध्ये आणि ॲग्रीकल्चरल लँडमध्ये केवळ 0.2 एफएसआय होता आणि तो सुध्दा फार्म हाऊस आणि आय.टी. साठी ठेवला. आताच्या नगरविकास मंत्र्यांनी त्याच्याही पुढे कहर केला. त्यांनी 31 डिसेंबर, 2012 ला जी योजना आणली ती योजना 0.2 एफएसआयवरुन डायरेक्ट 1.5 ते 1.7 एवढा एफएसआय देण्यावर आणली. आज नो डेव्हलपमेंट झोनमध्ये, ॲग्रीकल्चरल झोनमध्ये सुध्दा स्पेशल टाऊनशीप बिल्डर्सना मंजूर करावयाची आणि त्यामधील एफएसआय 0.2 वरुन 1.5 ते 1.7 पर्यंत वाढविला.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.आशिष शेलार....

मी केवळ एक स्किम सांगणार आहे. 100 एकर जागा असेल तर जुन्या स्किमप्रमाणे त्या जागेवर 43 लाख चौ.फू.बांधकाम झाले असते आणि आताच्या नगरविकास मंत्र्यांच्या नवीन स्किममुळे 74 लाख बांधकाम होणार आहे. त्यामुळे 50 टक्के वाढ केवळ रेसिडेन्सी प्रिमायसेसमध्ये झालेली आहे. एनडीझेड व ॲग्रीकल्चरची स्किम पाहिली तर त्यामध्ये 8 लाख चौ.फू.बांधकाम होणार होते, नवीन स्किमप्रमाणे 34 लाख चौ.फू.बांधकाम होणार आहे. याचा अर्थ 400 ते 500 टक्के वाढ झालेली आहे. यासंबंधी माझा गंभीर आरोप आहे. ही स्किम डिसेंबर महिन्यामध्ये झाली. त्या डिसेंबर महिन्यामध्ये गुजरातमध्ये निवडणूक होती. त्या निवडणुकीसाठी पक्षाला फंडाची गरज होती. या महाराष्ट्रातील स्पेशल टाऊनशिपसाठी पुन्हा एकदा रोहन जगदाळे हा नातेवाईक समोर आला. त्याच्या माध्यमातून 300 ते 350 कोटी रुपये पक्षासाठी फंड....

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपले भाषण संपवावे.

ॲड.आशिष शेलार : सभापती महोदय, आपण मला माझे भाषण आटोपण्यासाठी सांगत आहात. परंतु त्यामुळे आपण भ्रष्टाचाराला पाठिशी घालत आहात असे चित्र लोकांसमोर जाईल. त्यामुळे हा रोहन जगदाळे कोण आहे, हे नगरविकास खाते राज्यपालांचे आहे की रोहन जगदाळेचे आहे ? मी आणि माझे सरकार असे राज्यपाल म्हणतात त्यावेळी नगरविकास खाते चालविणारा रोहन जगदाळे कोण आहे ? 3 स्किम्समधून राज्यात 400 ते 600 कोटी रुपये पार्टी फंड जमा केला जात आहे. याबद्दल खेद व्यक्त करावयाचा नाही तर काय करावयाचे ? सभापती महोदय, नगरविकास विभागाबाबतच खेद व्यक्त केला पाहिजे असे नाही. जे स्पेशल टाऊनशिप, पार्किंग स्लॉट, बदलेले झोन या सर्वांची यादी मी देण्यास तयार आहे.

सभापती महोदय, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाला देण्यात आलेल्या फंडाबाबतचा एक मुद्दा मी मांडतो. या महामंडळाच्या माध्यमातून अल्पसंख्याकांसाठी फंड मंजूर करण्यात आला. त्यातील निधी हा समप्रमाणात वाटण्यात आला नाही. केवळ मुंबई शहरात 60 टक्के वाटण्यात आला आहे. त्याचे व्हेरिफिकेशन केलेले नाही, स्टेट फंडाची रिकव्हरी झालेली नाही, गेल्या 7 वर्षांपासून या महामंडळाचे ऑडिट झालेले नाही. राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये या मंडळाचे भांडवल 250 कोटींनी वाढविल्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

ॲड.आशिष शेलार........

मुंबई शहरातील 2500 अर्जांपैकी 1700 अर्ज एकाच मतदार संघातील आहेत आणि दुसऱ्या मतदार संघातील 800 अर्ज आहेत. संपूर्ण मुंबईत हा निधी वितरित झालेला नाही. याबाबत खेद व्यक्त करावयाचा नाही तर काय करावयाचे ? आणखी काही मुद्दे आहेत. पण नगरविकास खात्याच्या माध्यमातून एफएसआयचा झालेला भ्रष्टाचार, झोनमध्ये बदल करण्यात आलेला आहे, रोहन जगदाळे हे राज्य चालविणार असेल तर राज्यपालांच्या अभिभाषणाबाबत खेद व्यक्त करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. एवढेच मी सांगतो आणि येथेच थांबतो. धन्यवाद.

---------

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.नरेंद्र पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा सुरु आहे. त्यावर बोलण्यासाठी मला आपण संधी दिली त्याबद्दल प्रथम मी आपले आभार मानतो.

राज्यपालांचे विधान भवनमध्ये ज्या पध्दतीने स्वागत करण्यात आले त्याबद्दल आम्हाला दुःख वाटले. कारण राज्यपालांचे हंडापाणी व चाऱ्यांनी स्वागत केले हे न पटण्यासारखे होते. भविष्यामध्ये असा प्रकार घडू नये एवढीच माझी विनंती आहे. हे वर्ष स्व.यशवंतराव चव्हाण आणि स्व.वसंतराव नाईक यांची जन्म शताब्दी वर्ष म्हणून साजरे करीत असताना या महाराष्ट्रामध्ये दुष्काळ पडलेला आहे. मराठवाडा, विदर्भातील व पश्चिम महाराष्ट्रातील काही दुष्काळी तालुक्यातील लोक दुष्काळाला तोंड देत आहेत. दुष्काळाची झळ केवळ माणसांनाच पोहोचते आहे असे नाही. जनावरांनाही त्याची झळ पोहोचत आहे. राज्यपालांनी या लोकांना दुष्काळातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केला आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. राज्यपालांच्या माध्यमातून आणि आमचे नेते माननीय श्री.शरदराव पवार यांच्या माध्यमातून, माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या माध्यमातून, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांच्या माध्यमातून जास्तीत जास्त निधी मिळावा व दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील...

सभापती महोदय, या ठिकाणी आधार कार्डाचा उल्लेख करण्यात आला. दोन दिवसापूर्वी वर्तमानपत्रातून आम्ही वाचले की आधार कार्डाचा उपयोग सर्वसामान्य लोकांना जेवढा व्हावयास पाहिजे तेवढा तो होत नाही. पनवेल पोस्टामध्ये आधार कार्डाचे ढीगच्या ढीग पडलेले आहेत. त्याचे कारण अपुरा स्टाफ हे आहे. केन्द्र आणि राज्य सरकारने आधार कार्डाची ही योजना चांगल्या प्रकारे राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु हा प्रयत्न कुठे तरी अपुरा पडलेला आहे. ही आधार कार्डाची योजना यशस्वी करावी अशी माझी शासनाला विनंती आहे. ग्रामपंचायत, पंचायत समित्या, जिल्हा परिषदा, विधानसभा, विधानपरिषद या ठिकाणी जनतेमधून लोकप्रतिनिधी निवडून जातात. कमीत कमी या लोकप्रतिनिधींना तरी आधार कार्ड अनिवार्य करावे आणि त्याची तारीख शासनाने जाहीर करावी. निवडून आलेल्या उमेदवाराकडे आधार कार्ड नसेल तर त्याला त्याचे अधिकार वापरता येणार नाही असा नियम करावा. असे केले तरच आधार कार्डाचे महत्व आणि उपयोग चांगल्या प्रकारे होईल.

सभापती महोदय, गिरणी कामगारांच्या घरकुल योजनेबाबत राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये उल्लेख आहे. महाराष्ट्रामध्ये गिरणी कामगारांच्या नंतर मोठया प्रमाणावर काम करणारा कृषी उत्पन्न बाजार समित्यामधील कामगार वर्ग आहे. मी फक्त नवी मुंबई पुरता बोलत आहे असे कुणाला तरी वाटत असेल. परंतु तसे नाही. महाराष्ट्रामध्ये जेवढया कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये काम करणारा कामगार वर्ग आहे हा वर्ग शेतीपासून वंचित आहे. त्याच्या शेतीमधून उत्पादन निघत नसल्यामुळे त्याला नाईलाजाने हमाली करावी लागत आहे. ही हमाली करीत असताना त्याला आजूबाजूच्या झोपडपट्टीमध्ये रहावे लागत आहे. पुण्याच्य गुलटेकडी मार्केटची परिस्थिती अशी आहे की तेथील कांदा, बटाटा, भाजीपाला मार्केटचा कामगार हा जवळच्या झोपडपट्टीमध्ये राहातो. मध्यंतरी बाजार समितीच्या माध्यमातून एका घराच्या संकुलाचे उद्‌घाटन करण्यात आले. परंतु जुन्या कामगारांना न्याय मिळाला नाही. त्यांना न्याय मिळाला पाहिजे. तसेच महाराष्ट्रामध्ये जेवढया कृषी उत्पन्न बाजार समित्या आहेत त्या बाजार समित्यामध्ये कष्ट करणारा कामगार मग तो कोणत्याही जातीचा, धर्माचा अगर पंथाचा आहे हे न पाहता त्याच्यासाठी बाजार समित्यांच्या माध्यमातून घरकुल योजना राबविण्यात यावी अशी माझी शासनाला विनंती आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नरेंद्र पाटील...

सभापती महोदय, राज्यामध्ये 1 एप्रिल पासून एलबीटी टॅक्स लागू केला जाणार आहे. माझी विनंती आहे की, हा टॅक्स लागू करीत असताना याआधी जी जकात घेतली जात होती त्यापेक्ष हा टॅक्स जास्त नसावा अशी माझी विनंती आहे. या मुंबापुरीमध्ये येताना पूर्वी आम्हाला जकात भरावी लागत होती. जकाती पेक्षा एलबीटी जास्त होणार असेल तर एलबीटी कमी करण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 20 लाख रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासंबंधीचा उल्लेख आहे. महाराष्ट्रातील मोठ मोठी औद्योगिक क्षेत्रे बंद पडत चालली आहेत. पुण्यासारख्या औद्योगिक क्षेत्रामध्ये जेथे गाड्या बनविल्या जातात तेथे देखील मंदी आहे. हे उद्योग चालत नसताना बेरोजगारांना कशा प्रकारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन दिल्या जाणार आहेत हे मला समजत नाही. राज्य आणि केन्द्राच्या माध्यमातून परदेशी गुंतवणूकदार रिटेल ट्रेडमध्ये आणण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु सध्या अस्तित्वात असलेल्या बाजार समित्या उद्ध्वस्त करुन मोठया उद्योगपतींना संधी दिली जात असेल तर महाराष्ट्रातील मराठी माणसावर, भूमिपुत्रावर अन्याय होईल असे मला वाटते. तेव्हा राज्यातील कोणत्याही कामगाराला बेरोजगार न करता रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करुन दिल्या तर शासनाच्या धोरणाचे निश्चितच स्वागत होईल. काही वर्षापूर्वी राज्यामध्ये एसईझेड प्रकरण सुरु झाले. एसईझेड सुरु करण्याआधी कामगार कायदे अस्तित्वात येणार नाहीत, कामगार कायद्यांची अमलबजावणी करता येणार नाही अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली तर तो राज्य शासनाचा चुकीचा निर्णय ठरेल. कामगार हा शब्द म्हटला की त्याला कामगार कायद्याचे संरक्षण मिळते आणि गुलाम शब्द म्हटला की त्याने फक्त कामच करायचे, त्याने कोणत्याही कायद्याचे संरक्षण घ्यायचे नाही असा त्याचा अर्थ होतो. म्हणून महाराष्ट्रातील कामगार हा कामगार कायद्याच्या संरक्षणातच राहिला पाहिजे तो गुलाम होता कामा नये याची शासनाने काळजी घ्यावी.

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील....

सभापती महोदय, बिल्डींग आणि कन्स्ट्रक्शन वर्कस्‌ची योजना केंद्र सरकारने फार पूर्वी सुरु केली होती. होती, ती योजना राज्य सरकारने राबविण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपण यासंबंधीच्या महामंडळासाठी बिल्डरांकडून सेस घेत आहोत, त्या सेसचा रक्कमेचा उपयोग चांगल्या पध्दतीने झ ााला पाहिजे. त्या रक्कमेचा लाभ महाराष्ट्रातील मराठी माणसांना मिळाला पाहिजे. या गोष्टीची खबरदारी घेतली तर ते योग्य होईल असे मला वाटते.

सभापती महोदय, घरेलू कामगारांसाठी नवीन कायदा झालेला आहे. या कायद्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात झालेला नाही. घरेलू कामगार भगिनींना सक्षम करण्यासाठी केंद्र शासन व राज्य सरकारच्या माध्यमातून अनुदान मोठया प्रमाणात द्यावे एवढीच मला या निमित्ताने विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकांसबंधीची अतिशय चांगली चर्चा दोन दिवसापूर्वी या सभागृहात झाली. राज्य शासनाने इंदू मीलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यासंबंधीचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही आंतरराष्ट्रीय स्मारकांचे काम लवकरात लवकर सुरु करावे, जेणे करुन महाराष्ट्रातील जनता सरकारवर विश्वास ठेवून कार्य करेल.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर गेल्या दोन दिवसापासून या सभागृहात चर्चा सुरु आहे, त्या चर्चेत वारंवार पश्चिम महाराष्ट्राचा उल्लेख सन्माननीय सदस्यांकडून होतो आहे. मराठवाडा, विदर्भात ज्या प्रमाणे दुष्काळ पडला आहे, पश्चिम महाराष्ट्रातील काही जिल्हयांमध्ये सुध्दा दुष्काळ पडलेला आहे. दुष्काळ हा नैसर्गिक जरी असला तरी काही प्रमाणात तो मानवी आहे ही गोष्ट कोणाला नाकारता येणार नाही. 1995-96 मध्ये युतीचे सरकार सत्तेवर होते. त्यावेळी सातारा जिल्हयात काही धरणांच्या कामांना सुरुवात करण्यात आली होती. महूहत्तेगर धरण, पाटण तालुक्यामध्ये वांगमराठवाडी धरण यांची अद्यापर्यंत कामे पूर्ण झालेली नाहीत. त्या धरणग्रस्तांना त्यांच्या जमिनीचा मोबदला दिला गेला नाही, म्हणून त्या धरणांची कामे पूर्ण झालेली नाहीत. त्या धरणांची कामे पूर्ण झाली असती तर त्यातील पाणी दुष्काळी भागास मिळाले असते. त्या धरणांची कामे पूर्ण न झाल्यामुळे पश्चिम महाराष्ट्राती दुष्काळी भागाची परिस्थिती बिकट होत चालली आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील...

सभापती महोदय, काल माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी दुष्काळाच्या संदर्भात उत्तर दिले, त्यावेळी त्यांनी अपूर्ण धरणांच्या बाबतीत काहीही खुलासा केलेला नाही. अपूर्ण असलेली धरणे पूर्ण करण्यासाठी ठोस असे धोरण जाहीर करावे व ती धरणे तातडीने पूर्ण करावीत व धरणग्रस्तांना तातडीने मोबदला देण्याबाबतची देखील कार्यवाही तात्काळ करुन धरणग्रस्त शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी माझी या निमित्ताने विनंती आहे.

सभापती महोदय, या अभिभाषणात शेतीच्या संदर्भात काही चांगल्या योजनांचा उल्लेख दिसून येत नाही. भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला चांगला भाव कसा दिला जाईल या गोष्टीचा अभिषणात कोठेही उल्लेख दिसून येत नाही.

सभापती महोदय, राज्यातील कापूस खरेदी करण्यासाठी शासनाने महामंडळाची स्थापना बऱ्याच वर्षापूर्वी केलेली आहे. शेतकरी भाजीपाला पिकवितो, त्या भाजीपाल्यास चांगला भाव मिळाला पाहिजे याकडे राज्य सरकार थोडेसे दुर्लक्ष करीत आहे असे मला वाटते. शेतकऱ्यांनी पीक सोसायटयांमध्ये माल आणावा आणि तो विकावा यासंदर्भात एक धोरण पणन विभागाच्या माध्यमातून राबविण्याचा प्रयत्न झाला होता. परंतु ते धोरण यशस्वी झालेले नाही असे माझे ठाम मत आहे. राज्य सरकारच्या माध्यमातून कापूस खरेदी केला जातो, त्या प्रमाणे भाजीपाला खरेदी करण्याची योजना राज्य सरकारच्या माध्यमातून सुरु करावी अशी माझी विनंती आहे. भाजीपाला खरेदी संबंधीची योजना सुरु केली तर भाजीपाला पिकविणाऱ्या शेतकऱ्यांची लुबाडणूक होणार नाही. म्हणून या सूचनेकडे शासनाने गांभीर्याने पहावे.

सभापती महोदय, माझा पर्यटना संबंधी शेवटचा मुद्दा आहे. आपण दररोज दूरदर्शनवर इतर राज्याच्या पर्यटनाबाबतच्या जाहिराती पहात असतो. इतर जिल्हयातील पर्यटनाच्या जाहिराती वृत्तपत्रांमध्ये मोठया प्रमाणात छापून येतात. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री श्री.अखिलेश यादव हे पर्यटनाच्या कशा पध्दतीने काम केले आहे व करीत आहे या बाबतीत टाईम्स ऑफ इंडिया मध्ये मोठया प्रमाणात जाहिरात दिली आहे. महाराष्ट्रातील पर्यटनाकडे शासनाचे बऱ्याच वर्षापासून दुर्लक्ष होत आहे असे मला वाटते. महाराष्ट्रात छत्रपती शिवरायांचे स्मारक बांधत आहात. परंतु

3...



ABG/ MMP/ D/ प्रथम श्री.शिगम 17:30

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेंद्र पाटील....

शिवयारांचे महाराष्ट्रात जे किल्ले आहेत, त्याकडे नजरअंदाज करता कामा नये. त्या किल्यांची चांगल्या प्रकारे दुरुस्ती त्यांना पर्यटन स्थळाचा दर्जा देण्यात यावा व महाराष्ट्रातील शिवरायांचा इतिहास व किल्ले यांचे जतन करण्याचा शासनाकडून प्रयत्न व्हावा अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

--------

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला पाठिंबा देण्यासाठी आणि त्यांचे अभिनंदन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यात यावे अशी राज्यातील सर्व जनतेची भावना होती. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या राज्याला किंवा देशालाच नव्हे तर संपूर्ण जगाला आदर्श घालून दिला. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असा मंत्र त्यांनी दिला. त्या संदेशाच्या माध्यमातून माणसाला माणूस म्हणून जगण्याची प्रेरणा किंवा शक्ती कशी मिळते हे महाराष्ट्र आणि देशाने दाखवून दिले आहे. अशा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक उभारण्यासाठी इंदू मिलची जागा उपलब्ध करुन दिली आहे. त्याचबरोबर छत्रपती शाहू महाराजांनी राज्यातील जनतेला समानतेचा हक्क दिला आणि या राज्यातील बहुजन समाज, मागासवर्गीय यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करुन न देता अधिकार प्रदान केले. अशा छत्रपती शाहू महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी शासनाने कोल्हापूर येथील शाहू मिलची जागा उपलब्ध करुन दिली आहे.

सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाबद्दल सविस्तर चर्चा या सभागृहात झाली आहे. अशा या थोर पुरुषांच्या माध्यमातून जी समाज भावना जोडली गेलेली आहे, तिचा आदर करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराने प्रेरित होऊन पुरोगामी महाराष्ट्राचे स्वप्न साकार करण्यासाठी आघाडीचे सरकार कटिबध्द आहे. त्यांच्या भावनेचा आदर करुन मान सन्मान केला त्याबद्दल मी सर्वप्रथम शासनाचे आभार मानतो.

सभापती महोदय, राज्य दुष्काळासारख्या भयानक नैसर्गिक आपत्तीला सामोरे जात असताना आज जवळजवळ 1663 गावे आणि 4490 वस्त्यांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी आतापर्यंत 414 कोटी रुपये खर्च झालेले असून 2200 टँकर लावण्यात आले आहेत. राष्ट्रीय नैसर्गिक आपत्ती ही सांगून येत नसते. नैसर्गिक आपत्ती आपल्यानंतर राज्यातील जनतेला कशाप्रकारे सहकार्य मिळते, आलेली आपत्ती कशी बाजूला सारली जाते यावरुन राज्यकर्त्यांबद्दल जनतेच्या मनात भावना आणि आपुलकी दिसून येत असते. भीषण दुष्काळाची चाहुल लागल्यानंतर राज्य सरकारने चांगल्याप्रकारे नियोजन केले, जनावरांसाठी छावण्या निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ D/ गितेनंतर 17:35

श्री.रमेश शेंडगे........

सभापती महोदय, 554 छावण्या निर्माण केलेल्या आहेत. त्याशिवाय या राज्यातील ज्या गावामध्ये, ज्या गणामध्ये किंवा गटामध्ये छावणीची मागणी करण्यात येईल त्या ठिकाणी छावणी मंजूर करण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्या माध्यमातून 750 कोटी रुपये आजपर्यंत खर्च केलेले आहेत. यापुढेही शेकडो कोटी रुपयांचे नियोजन केलेले आहे. राज्यात 4.5 ते 5 लाख जनावरे छावण्यांमध्ये दाखल झालेली असली तरी उस्मानाबाद जिल्हयामध्ये फक्त 20 ते 25 छावण्या मंजूर झालेल्या आहेत. उस्मानाबाद हा होरपळून निघणारा जिल्हा आहे. उस्मानाबाद नव्हे तर मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रात जी गावे किंवा तालुके होरपळून गेली आहेत तेथील छावणीचे दर विचारात घेता कोणत्या स्थानिक स्वराज्य संस्था किंवा संघटना पुढे येत नसतील तर शासनाने लक्ष घातले पाहिजे. शासनाने स्वत: छावणी सुरु केली पाहिजे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दुष्काळावरील चर्चेला उत्तर देत असताना जाहीर केले की, 5 लाख रुपये डिपॉझिट भरण्याची अट होती ती शिथिल करुन 2 लाख रुपयांवर आणली आहे. ग्रामीण भागातील संस्थांना 2 लाख रुपये भरणे शक्य होत नाही. 2 लाख रुपयांच्या अटीबरोबर इतर समस्या येत आहेत, त्याचा विचार करुन सहकार्य केले पाहिजे. शासनाने जे पाऊल उचलले आहे त्याबद्दल शासनाला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, टेंभू, म्हैसाळ, ताकारी, पुरंदर, उरमोडी या उपसा सिंचन योजना कायम दुष्काळी भागातील आहेत. त्यांना शासनाने अधिक निधी देण्याचा प्रयत्न केला आहे. कवठे महाकाळ तालुक्यातील 40 गावांमध्ये भयानक दुष्काळ आहे.

नंतर 3व्ही.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

आजच्या घडीला कवठे महांकाळ तालुक्यातील 30 गावांना टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे. माझ्या स्वत:च्या गावाला सुध्दा गेल्या 7-8 महिन्यापासून रोज टँकरने पाणी पुरवठा केला जात आहे.

सभापती महोदय, ढालगाव सर्कलमधील 16 गावांचा समावेश टेंभू योजनेत करण्यात येईल असा निर्णय सन 2009 मध्ये घेण्यात आला होता परंतु त्यामध्ये पळवाटा काढण्यात आल्या व त्यामुळे या 16 गावांचा सर्व्हे अद्याप पावेतो होऊ शकला नाही. राज्यातील प्रत्येक तहानलेल्या भागाला पाणी दिले पाहिजे, भुकेलेल्याला अन्न दिले पाहिजे, वस्त्र, निवारा दिले पाहिजे हे आपले आद्य कर्तव्य आहे. शासनाने आता या 16 गावांचा समावेश टेंभू योजनेत करण्याचा तसेच या गावांचा सर्व्हे करण्याची घोषणा केल्यामुळे मी शासनाचे खासन अभिनंदन करतो.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेच्या कामातील निकष बदलण्याची आज नितांत आवश्यकता आहे. मनरेगा मध्ये 2200 कोटी रुपयाचे नियोजन झाले असून त्यातील 1700 कोटी रुपये खर्च देखील झाले आहेत. परंतु रोजगार हमी योजनेमध्ये आता एवढया भयानक अटी घालण्यात आल्यामुळे रोजगार हमी योजनेची कामे करण्यासाठी आज शासकीय यंत्रणा पुढे येत नाही. त्यामुळे रोजगार हमी योजनेतील निकष बदलण्याची आवश्यकता आहे एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना आपण चांगल्या प्रकारे कर्ज देण्यास सुरुवात केलेली आहे. आज आपण शेतकऱ्यांना प्रती वर्षी 2 टक्के व्याजाने 3 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज देत आहोत. आपल्याला आठवत असेल की, आपले केंद्रीय कृषीमंत्री श्री. शरदचंद्र पवार साहेब जेव्हा पहिल्यांदा कृषी मंत्री झाले तेव्हा त्यावेळेस केंद्राचे बजेट केवळ 65 हजार कोटी रुपयांचे होते परंतु आज केंद्राचे कृषीचे बजेट 7.5 लाख कोटी रुपये झाले असून शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात कर्ज उपलब्ध करुन देण्याचा निर्णय मागच्या वर्षीच्या बजेटमध्येच घेण्यात आलेला आहे.

सभापती महोदय, आपला देश शेतीप्रधान देश असून आपल्या देशाने 227 द.टन अन्नधान्याचे उत्पादन केले असून भारत जगामध्ये सर्वात जास्त अन्नधान्य पिकविणारा एकमेव देश झालेला आहे. अमेरिका, जपान असे दोन तीन देश सोडले तर बाकी जवळपास सर्व देशांनी

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

धान्याचा पुरवठा करण्याची मागणी केलेली आहे. मागच्या वषी आपल्या देशाने 1 लक्ष 67 हजार कोटी रुपयांचे अन्नधान्य निर्यात केले असून त्या माध्यमातून आपल्याला 1.67 लक्ष कोटी रुपये परकीय चलन मिळालेले आहे. ही बाब आपल्या दृष्टीने अभिमानाची आहे.

सभापती महोदय,विरोधक शासनाच्या कामाबद्दल काहीही म्हणत असले तरी शासन योग्य दिशेनेच पावले उचलीत आहे. आज 65 टक्के जनता शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेती धंदा करणाऱ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या विकासासाठी अधिक लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शेतीकडे आपल्याला चांगल्या प्रकारचे लक्ष द्यावे लागणार आहे. मला खात्री आहे की,माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातून आपल्याला राज्याची होत असलेली प्रगतीच दिसत आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक व खाजगी भागीदारीच्या सहाय्याने सक्रीय सहभागातून राष्ट्रीय कृषी महामंडळाने 12 योजना राबविलेल्या आहेत. या ठिकाणी मी अभिमानाने सांगू इच्छितो की, शेतकऱ्यांच्या बाजारपेठेला राज्य शासनाकडून मला काहीही निधी मिळाला नाही परंतु यासंदर्भात मी माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री. शरदचंद्रजी पवार साहेबांकडे मागणी केली असता त्यांनी राष्ट्रीय कृषी विकास योजनेतून मला काही कोटी रुपये उपलब्ध करुन दिले. त्यामुळे मी राज्यातील सात बाजारपेठांमध्ये शेळया-मेंढयांसाठी प्रत्येकी एक एक कोटीचे नियोजन करुन इमारत बांधून दिली, वजन काटे, पाण्याच्या टाक्या, शेळी-मेंढीचे वजन करण्यासाठी संगणक सुध्दा दिलेले आहे. आतापर्यंत शेळया-मेंढयाचे वजन नगाने होत होते ते वजनाने व्हावे व शेतकऱ्यांना चांगल्या प्रकारचे पैसे मिळावे यासाठी मी चांगल्या प्रकारचे नियोजन या माध्यमातून केलेले आहे.

सभापती महोदय,आपल्या राज्यात स्त्रीभ्रूण हत्या वाढत होत्या परंतु राज्य शासनाने यासंदर्भात चांगल्या प्रकारची उपाययोजना केल्यामुळे स्त्रीभ्रूण हत्या आपण रोखू खकलो. स्त्रीभ्रूण हत्येच्या संदर्भात शासनाने केलेल्या उपाय योजनेमुळे सांगली जिल्हयातील हातनूर या गावामध्ये हजार मुलांच्या मागे मुलींचे प्रमाण 1150 एवढे झाले आहे. स्त्रीभ्रूण हत्येच्या संदर्भात राज्य शासनाने चांगल्या प्रकारची उपाययोजना केल्यामुळे परिवर्तन होऊ शकले व संपूर्ण महाराष्ट्रात अशाच प्रकारचे परिवर्तन आता होऊ लागल्यामुळे मी राज्य शासनाचे अभिनंदन करतो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

सभापती महोदय, अनुसूचित जाती-जमाती व भटक्या विमुक्तांच्या मुलांसाठी शासनाने 1581 कोटी रुपयांची शिष्यवृत्ती दिलेली आहे व ही अभिनंदनीय बाब आहे. परंतु मला नमूद करावेसे वाटते की, ही शिष्यवृत्ती वेळेत मिळाली तर या समाजाच्या विद्यार्थ्यांना फायदा होईल. जर बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांना 1-1,2-2 वर्षे शिष्यवृत्ती मिळाली नाही तर ते अडचणीचे होते. त्यामुळे बहुजन समाजाच्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती वेळेवर द्यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामधून व्यक्त करण्यात आलेल्या सर्व मुद्यांना मी जाहीर पाठिंबा देतो, अभिनंदन करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

----------------

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, आज आपल्याला चर्चा संपवायची आहे. सोमवारी माननीय मुख्यमंत्री महोदयांचे उत्तर होणार आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आम्ही आज सकाळ पासून सभागृहात बसलेलो आहोत. त्यामुळे आपण आम्हाला बोलण्यास अनुमती द्यावी.

**तालिका सभापती** : ठीक आहे. आपण पाच मिनिटामध्ये आपले विचार मांडावेत.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, अगदी थोडक्यात मी माझे मुद्दे मांडणार आहे. या राज्याचे सन्माननीय राज्यपाल महोदय, यांच्या अभिभाषणावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कुपोषण रोखण्याच्या संदर्भात काही तरी वक्तव्य असेल अशी अपेक्षा होती. परंतु, तशा प्रकारचा कोणताही उल्लेख सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणामध्ये नाही. आज सकाळी एक लक्षवेधी सूचना चर्चेसाठी आली होती. या लक्षवेधी सूचनेमध्ये आदिवासी उपयोजना क्षेत्रातील बालमृत्यू आणि कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी 15 जिल्ह्यांमध्ये नवसंजीवनी योजना सुरू केली आहे, त्याच जिल्ह्यांमध्ये जानेवारी 2013 पर्यंत जवळ जवळ 4000 बालकांचा मृत्यू झालेला आहे. अशी गंभीर परिस्थिती असताना, त्यासंबंधातील कोणताही उल्लेख अभिभाषणामध्ये नाही.

आम्ही शिक्षक मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करतो त्यामुळे आम्हाला सर्वात शेवटी संधी मिळते. या राज्यातील शिक्षणासंबंधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये जराही करण्यात आलेला नाही म्हणजे तिकडेही आम्ही दुर्लक्षितच आहोत.

आज आपण बघितले असेल की, सर्वात जास्त समस्या, सर्वात जास्त प्रश्न व गदारोळ हा शिक्षकांच्या प्रश्नासंबंधी होतो. आज शिक्षकांचा दहावी आणि बारावीच्या परीक्षांवर बहिष्कार आहे. एवढेच नव्हे तर विद्यापीठीय परीक्षांवर देखील बहिष्कार आहे. अशा या वातावरणामुळे विद्यार्थ्यांवर टांगती तलवार आहे. त्यासंबंधीचा कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आलेला नाही. दहावीचा प्रश्न सुटलेला आहे, पण बारावीचा प्रश्न अजून सुटलेला नाही. विद्यापीठीय प्रश्न सुद्धा सुटलेला नाही. त्यामुळे एक अत्यंत गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीपूर्व नाही

श्री.रामनाथ मोते...

या राज्यामध्ये आर.टी.इ.लागू झाला आहे. त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. हा अत्यंत नाविन्यपूर्ण आणि अभिनव उपक्रम आहे. ही केंद्र शासनाची योजना आहे. तीन वर्षापासून आपण वेगवेगळ्या प्रकारची योजना लागू केली आहे. त्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे निर्णय घेतले आहेत. या देशात सर्वात प्रथम आर.टी.इ.कुठे लागू झाला असेल तर तो महाराष्ट्रात. दिनांक 1 एप्रिल 2010 रोजी माननीय पंतप्रधान पुण्यामध्ये आले होते तेव्हा यासंबंधीचा कार्यक्रम झाला होता. या योजनेबद्दल, हक्काच्या शिक्षणासंबंधी कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही.

शासनाने अनेक योजना सुरू केल्या आहेत, अनेक योजनांची घोषणा केलेली आहे. दुर्दैवाने अनेक योजना अपूर्ण राहिलेल्या आहेत. अपूर्ण राहिलेल्या योजना पूर्ण करण्यासंबंधी कोणताही उल्लेख या अभिभाषणामध्ये नाही.

राज्यातील वेगवेगळ्या विभागांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरू आहे. तो रोखण्यासाठी आपण कोणती उपाययोजना करणार आहात ? यासंबंधी शासनाची नेमकी भूमिका काय आहे, या संबंधातील कोणताही उल्लेख येथे नाही.

आपण आजच्या महाराष्ट्र टाइम्स वाचला असेल. सर्व शाळांनी 31 मार्च पर्यंत नोंदणी करून प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. आमच्या कल्याण मधील विस्तार अधिकाऱ्याने शाळा-शाळांमध्ये जाऊन मुख्याध्यापकांकडे पाच-पाच-दहा-दहा हजार रूपयांची मागणी केली. तुम्ही जर पैसे दिले नाहीत तर नोंदणी होऊ देणार नाही असे सांगितले. त्यासंबंधातील तक्रार 14 मुख्याध्यापकांनी सी.इ.ओ.साहेबांना केली आहे. सर्वसामान्य अधिकारी शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांकडून पैसे मागत असतील तर ते चुकीचे आहे. आमच्या ठाण्यातील लेखाधिकारी नोकरीतून निलंबित झालेले आहेत. ते शिक्के मारून द्यायचेत. वेतन निश्चितीचे काम करायचे. पैसे घेतल्याशिवाय ते एकाचेही काम करत नव्हते. ते ॲन्टी करप्शनमध्ये पकडले गेले आणि आता घरी बसले आहेत. हे प्रकरण मी या अधिवेशनामध्ये उघड करणार आहे.

पुण्यातील परीक्षा परिषदेतील अधिकारी, जिल्ह्यांचे अधिकारी यासंबंधातील मुद्दा उपस्थित करणार आहे. आज महाराष्ट्रात हजारो बोगस शिक्षक काम करीत आहेत.

यानंतर श्री.अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चौकशी अधिकारी : यात वकिलीचा प्रश्न नाही. सर्व कर्मचाऱ्यांना सर्वसाधारण सेवा शर्ती ह्या माहीत असल्या पाहिजेत. सेवा शर्तीच्या कुठल्या नियमा नुसार आपल्या विरूद्ध चौकशी सुरू आहे यासंबंधातील आपल्याला माहिती आहे काय ?

श्री.मुकणे : नियम 10 नुसार माझी चौकशी सुरू आहे.

सादरकर्ता : निवेदना पुरते माझे म्हणणे संपले आहे. श्री.मुकणे यांचे अभिकथन माझ्या समोर आहे. त्यांच्यावर तीन दोषारोप ठेवले आहेत. त्यांना दोषारोप दिल्यानंतर त्यांनी अभिकन केलेले आहे.

चौकशी अधिकारी : श्री.मुकणे यांनी तीन वेगवेगळ्या स्वरूपाचे अभिकथन केलेले आहे.

सादरकर्ता : श्री.मुकणे यांनी तीन बाबीबर अभिकथन केलेले आहे. त्यापैकी पान क्र.31 वर पहिले अभिकथन आहे. त्याकडे मी आपले लक्ष वेधू इच्छितो. त्यात नमूद केले आहे की, " आस्थापना अधिकारी श्री.साळ्वे यांनी आश्वासन दिले नसते तर ही वेळ आली नसती असे म्हटले आहे. श्री.मुकणे यांना कार्यालयाच्या कार्यपद्धतीची माहिती आहे. निलंबित कर्मचारी अधिकारी याचा आढावा कोणी घ्यायचा आहे. जो प्राधिकारी किंवा ऑथॉरिटी एखाद्या अधिकारी,कर्मचारी याला निलंबित करू शकतो तोच प्राधिकारी रिव्हयू घेऊ शकते. यातील जी काही वस्तुस्थिती आहे ती त्यांाच्या समोर ठेवायची हे आस्थापना शाखेचे काम आहे. मग त्यांनी त्याचा सारासार विचार करून रिव्हयू घ्यायचा. श्री.मुकणे ज्या ज्यावेळी माझ्याकडे आले त्यात्यावेळी मी त्यांना सांगितले की, आस्थापना शाखेने तयार केलेला प्रस्ताव माननीय अध्यक्ष व माननीय सभापती यांच्याकडे माननीय प्रधान सचिव यांच्या मार्फत पाठविलेला आहे. प्रस्तावाबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार माननीय अध्यक्ष व माननीय सभापती यांना आहे. ज्यावेळी पहिला रिव्हयू झाला त्यावेळी ते वर्षेभर येत नव्हते. कारण ते 2 वो 20 महिने फरार होते. जी ंव्यक्ती फरार आहे त्यांच्याकडे मी कसा काय ॲप्रोच होऊ शकतो.कोर्टाच्या अभिलेखावर श्री.मुकणे हे 20 महिने फरार आहेत. त्यामुळे न्यायालयाने अटक वॉरंट काढले होते. अशा परिस्थितीलत कार्यालयाने कोणता व्हयू घेतला आहे हे मी त्यांच्या पर्यंत कसा काय पोहचू शकतो. जी व्यक्ती फरार आहे त्यांच्या संपर्कत मी कसा काय येऊ शकतो ?

श्री.मुकणे : मी सादरकर्त्यांच्या मताशी सहमत नाही.

सादरकर्ते : मग असे आहे काय, न्यायालयीन अभिलेख्या नुसार ते फरार आहेत तरली ते कार्यालयात येत होते असे काही आहे काय ? **श्री.मुकणे यांना न्यायालयाने फरारी घोषित केल्यानंतर देखील ते येथे येत होते असे आहे काय ?**

चौकशी अधिकारी : कोर्टाच्या रेकॉर्डवर व पोलीस स्टेशनच्या रेकॉर्डवर आपण दहा महिने फरारी होता. त्या कालावधीत आपण कार्यालयात येत होता काय ?

श्री.मुकणे : मी कार्यालयात एकदाही आलेलो नाही.

चौकशी अधिकारी : आपण दोन वर्षे ऑफीसच्या संपर्कात नव्हता. आपण पुनर्नेमणुकीसंबंधी कार्यालयाकडे अर्ज केला होता काय ?

श्री.मुकणे : सन 2011 मध्ये अर्ज केला होता.

चौकशी अधिकारी : आपले प्रकरण सन 2007 चे आहे. म्हणजे आपण साडेतीन वर्ष कार्यालयात आला नाहीत किंवा म्हणजे पुनर्नेमणुकीसंबंधी आपण काहीच प्रयत्न केलेला नाही.

सादरकर्ते : न्यायालय आणि पोलीस सांगत आहेत की, आपण फरारी आहात.

श्री.मुकणे : मी वाशिंद येथेच होतो. वाशिंदचे सगळे पोलीस मला ओळखतात. माझी मुले शिक्षण घेत आहेत. माझ्या विरूद्ध वॉरंट काढले आहे असे मला समजल्यानंतर मी लगेच जाऊन वॉरंट रद्द केला आहे. मी फरारी होतो हे त्यांचे म्हणणे रेकॉर्डवर ठीक आहे. त्याबद्दल मला काही म्हणावयाचे आहे. माझ्या विरूद्ध वॉरंट काढले आहे याची मला माहिती नव्हती. माझ्या विरूद्ध वॉरंट काढले आहे हे पोलिसांनी मला सांगितले असते तर वॉरंट रद्द करून घेतले असते.

चौकशी अधिकारी : आपण 20 महिने कोर्टा समोर हजर झालाच नाहीत काय ?

सादरकर्ते : नाही. ते कोर्टा समोर हजर झालेले नाहीत.

चौकशी अधिकारी : तारखा पडत होत्या ना ?

श्री.मुकणे : दोन -दोन महिन्यांनी तारखा पडत होत्या.

चौकशी अधिकारी : आपण एकाही तारखेला हजर नव्हता काय ?

श्री.मुकणे : मी कोर्टाच्या तारखांना हजर होतो.

चौकशी अधिकारी : मग रेकॉर्ड असे का म्हणत आहे ?

सादरकर्ते : श्री.मुकणे हे दिनांक 19 एप्रिल 2010 ते 24 फेब्रुवारी 2012 पर्यंत फरारी होते. as per police record 25 फेब्रुवारी 2012 रोजी ते कोर्टा समोर हजर झाले आहेत. माझे एवढेच म्हणणे आहे की, रेकॉर्ड असा सांगत आहे की, ते न्यायालया हजर होत नाहीत, तर मग ते माझ्यावर आरोप करीत आहेत की, मी त्यांना आश्वासन दिले होते. A व्यक्ती फरारी आहे तर त्यांना मी आश्वासन देण्याचा प्रश्न येतो कुठे ?

श्री.मुकणे :मी न्यायालयात गैरहजर होतो हे आपले म्हणणे बरोबर आहे. पण मी येथे कार्याल्यात येत होतो. मी अर्ज दिला होता.

अप्रमाणित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

सादरकर्ते : मी फरारी होतो परंतु, कार्यालयात येत होता असे जर त्यांचे म्हणणे असेल तर ते रेकॉर्डवर घेतले पाहिजे. हे मान्य असेल तर ते रेकॉर्डवर घ्यावे.

श्री.मुकणे : आपणास जे काही बोलावयाचे आहे ते बोलावे. मी शांत राहतो. मला आपले यातील कुठलेही म्हणणे मान्य नाही. मी जे लेखी मुद्दे दिलेले आहेत ते योग्य असून मला मान्य आहेत. बाकी मला या संदर्भात काहीही बोलावयाचे नाही. श्री.साठ्ये, सादरकर्ते हे खोटे बोलत आहेत.

सादरकर्ते : माझ्याकडे सर्व रेकॉर्ड आहे.

चौकशी अधिकारी : ते आपण मला सादर करावेत.

सादरकर्ते : होय.

श्री.मुकणे : त्या पोलीस केसचा आणि आपल्या चौकशीचा काहीही संबंध नाही. त्यांनीच पत्र दिलेले आहे. त्या गोष्टीचा कीस इथे का काढत आहात ? जे काही आहे ते नियमानुसार करावे.

सादरकर्ते : मी नियमानुसार चाललो आहे. ते आता स्वत: कबेल करीत आहेत की, त्या केसचा आणि या गोषटी चा काहीही संबंध नाही. मग हे मुद्दे त्यांनी अभिकथनामध्ये कशासाठी घेतले आहेत ? त्यांनी ते मुद्‌दे अभिकथनामध्ये घेतल्यामुळे रेफ्युट करणे माझे काम आहे. अभिकथनामध्ये मुद्दे घेतले की, ते विभागीय चौकशीच्या रेकॉर्डमध्ये येतात. जो मुद्दा विभागीय चौकशीमध्ये आला तो खोडून काढणे हे माझे कर्तव्य आहे.

श्री.मुकणे : कोर्टाचा मुद्दा रेकॉर्डवर आलेला नाही. स्थानिक मंडळींनी त्रास दिला, अडचणीत आणले हे मी अभिकथनामध्ये सांगितले आहे.

सादरकर्ते : आस्थापना अधिकारी वारंवार मला आश्वासन देत होते हे आपण सांगितले आहे.

चौकशी अधिकारी : तसेच आपण अपल्या खुलाशामध्ये म्हटले आहे. त्यामुळे सादरकत्या्रंना आपण संधी दिली पाहिजे.

श्री.मुकणे : श्री.साठ्ये, सादरकर्ते खोटे बोलत आहेत. ते निष्णात वकील आहेत. ते ख-याचे खोटे करीत आहेत हे माझ्या लगेच लक्षात आले आहे.

सादरकर्ते : माझे जे काही काम आहे ते करीत आहे. सगळे काही रेकॉर्डवर आलेले आहे.

श्री.मुकणे : मी येथे ज्या ज्या वेळेला आलो आहे त्याचे पास माझ्याकडे आहेत.

सादरकर्ते : असे जर असेल तर पोलिसांचा रेकॉर्ड खोटा आहे ते फरारी नव्हते असे आपण रेकॉर्डवर घ्यावे.

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मुकणे : आपण एकसारखे तेच मुद्दे का घेत आहात ? आपल्याला जे काही बोलावयाचे असेल ते बोलावे. मी माझ्या मुद्याला अजूनही चिकटून आहे की., त्यांनी सांगितल्यामुळे मी वेळोवेळी येथे आलेलो आहे. त्यामुळेच हे प्रकरण केवळ श्री.साठ्ये यांच्यामुळे घडलेले आहे.

सादरकर्ते : माझे असे म्हणणे आहे की, रेकॉर्ड असा सांगतो की, ते श्री.मुकणे 20 ते 22 महिने फरारी होते. एखादी व्यक्ती फरारी असेल तर तिला आश्वासन देण्याचा प्रश्न येतोच कुठे ? दाऊद फरारी आहे. त्याला आश्वासन देऊ शकतो काय ?

श्री.मुकणे : आपण निष्णात वकिल असला तरी आपण नियमाला धरून बोलत नाही. त्यांच्याकडे नीतिमत्ता ही चीजच नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

त्यांच्याकडे डीएडची बोगस प्रमाणपत्र आहेत. त्यांचे दाखल बोगस आहेत. नोकरी मिळाल्या नंतर त्यांची प्रमाणपत्र व्हेरिफिकेशनसाठी पाठविल्यानंतर ते कॉलेज अस्तित्वात नव्हते, शाळा अस्तित्वात नव्हती, तो विद्यार्थी परीक्षेला बसला नव्हता, त्या विद्यार्थ्याला विचारले असता त्याने सांगितले की, "मी अनट्रेन्ड आहे, मला काही माहीत नाही तुम्हाला घरी पेपर मिळेल असे मला सांगण्यात आले." एकेका विद्यार्थ्याकडून चार-साडे चार लाख रुपये घेण्यात आले असे हजारो विद्यार्थी आहेत. हे संपूर्ण प्रकरण मी सभागृहात मांडणार आहे. परंतुअशा प्रकारचा भ्रष्टाचार रोखण्यासाठी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी महिला व बाल कल्याण विभागाच्या मंत्री प्रा.वर्षा गायकवाड उपस्थित आहेत. राज्य शासनाने महिलांसाठी खूप चांगल्या प्रकारे योजना जाहीर केलेल्या आहेत. आमच्या अनेक भगिनी महिला कर्मचारी मूल दत्तक घेतात. इतर महिलांना प्रसुती रजा मिळते परंतु मूल दत्तक घेतलेल्या महिलांना प्रसुती रजा मिळत नाही. तेव्हा त्या महिलांना सुध्दा प्रसुती रजा मिळणे आवश्यक आहे. या संदर्भात 1995 मध्ये एक धोरणात्मक निर्णय घेण्यात आला होता. परंतु त्यानंतर त्यामध्ये सुधारणा झालेली नाही.

सभापती महोदय, आश्रमशाळांची अवस्था खूप वाईट आहे त्याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही.

सभापती महोदय, आज सर्व क्षेत्रामध्ये हजारो पदे रिक्त आहेत. ही रिक्त पदे भरण्याबाबतचा कोणताही उल्लेख माननीय राज्यापालांच्या अभिभाषणामध्ये नाही.

सभापती महोदय, मी मघाशी भ्रष्टाचाराचा उल्लेख केला. शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी केंद्र सरकारकडून आणि राज्य शासनाकडून मदतीची घोषणा केली जाते. मी काल रात्री टी.व्ही.वर एक बातमी ऐकली की, कोल्हापूर येथे एका कुटुंबाला 39 लाख रुपयांची कर्जमाफी मिळाली. तेव्हा अशाप्रकारचा भ्रष्टाचार रोखण्यासाठी कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे भाषण पूर्ण करतो.

-------

..2.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे ( पुणे विभाग शिक्षक ) : सभापती महोदय,माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, मला काही बाबींकडे शासनाचे लक्ष वेधावयाचे आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून 65 वर्षाचा कालावधी लोटला परंतु अजून पर्यत राज्य सरकारने पूर्व प्राथमिक शिक्षणासाठी काही निधी देणे,त्यावर नियंत्रण ठेवणे अशी कोणतीही बाब हाती घेतलेली नाही. पूर्व प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था नसल्यामुळे विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे प्रचंड शोषण होत आहे त्याबद्दलचा कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही, त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्रामध्ये प्राथमिक शिक्षणाच्या बळकटीकरणाकरिता गावोगावी मुले आणि मुलींच्या शाळा काढल्या. आज त्या शाळा धडाधड बंद पडत आहेत आणि अर्थोपायाधिष्ठीत खाजगी शाळा प्रचंड वेगाने वाढत आहेत. तर मराठी माध्यमाच्या शाळा बंद पडत आहेत. हा वेग इतका वाढला आहे की, नजीकच्या काळात या शाळा नामशेष होतील अशी गंभीर स्थिती प्राथमिक शाळांची झालेली आहे. या शाळा वाचविण्याचा कोणताही उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो आणि खेड्यापाड्यातील प्राथमिक शाळा वाचविण्यासाठी एक मोहीम उघडावी अशी शासनास विनंती करतो. .

सभापती महोदय, राज्यामध्ये प्राथमिक आणि माध्यमिकच्या साडेचार हजार कायम स्वरुपी विनाअनुदानित शाळा आहेत. सन 2009 मध्ये "कायम" हा शब्द काढण्यात आला. परंतु अजून त्या शाळांचे मूल्यांकन झालेले नाही. मूल्यांकनाच्या इतक्या जाचक अटी लावल्या आहेत की त्यामध्ये एक टक्का देखील शाळा बसत नाही. त्या विरोधात आजही आझाद मैदानात हजारो शिक्षक आंदोलनासाठी बसले आहेत. त्यातील काही जणांनी काल आत्मदहनाचा प्रयत्न केला तेव्हा त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या प्रकरणाची सरकारने अजून दखल घेतलेली नाही याबद्दल मी खेद व्यक्त करतो आणि सरकारला विनंती करतो की, या साडेचार हजार शाळांना निधी उपलब्ध करुन किमान 50 टक्केपेक्षा जास्त शाळा निकषपात्र ठरतील अशाप्रकारची योजना करावी.

..3..

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.....

सभापती महोदय, दहावीच्या निकालाची टक्केवारी 90 टक्क्यांपर्यंत गेली आहे. त्यामुळे माध्यमिक शाळांना जोडून अकरावी आणि बारावीच्या तुकड्या भरपूर दिल्या गेल्या. आज राज्यामध्ये अकरावी आणि बारावीच्या दहा-अकरा हजार तुकड्या आहेत. तेथे प्रामुख्याने मुली शिकत आहेत. तेथे एम.ए.बीएड, एम.सी.बीएड, नेटसेट पास झालेले प्राध्यापक पगार न घेता गेली दहा-अकरा वर्षे काम करीत आहेत. त्यांचे होणारे शोषण हा भयानक विषय आहे. तेव्हा उच्च माध्यमिक शाळांतील कायम विनाअनुदानित हा शब्द काढून टाकण्यासंबधीचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये असण्याची नितांत आवश्यकता होती, दुर्दैवाने तो उल्लेख दिसला नाही.

यानंतर श्री.बोर्डे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

महोदय, आज महाराष्ट्राच्या शालेय शिक्षण विभागामध्ये वर्ग-1 व 2 च्या अधिकाऱ्यांची आणि वर्ग-3 च्या कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. यामुळे शिक्षणाधिकारी शाळांना भेटी देऊन तपासणी करु शकत नाहीत. ही पदे कमी असल्यामुळे शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनागोंदी कारभार वाढत आहे. ही रिक्त पदे तातडीने भरुन प्रशासनाचे बळकटीकरण करण्याबाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही नाही. त्यामुळे मी खेद व्यक्त करतो.

महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या सातारा जिल्ह्यात कृषी आणि वैद्यकीय महाविद्यालय नाही. सोलापूर येथे सुध्दा कृषी महाविद्यालय नाही. त्या भागातील लोकांकडून वारंवार कृषी व वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याबाबतची मागणी होत आहे. परंतु या बाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही नाही. उक्त तिन्ही महाविद्यालये त्या ठिकाणी सुरु करणे नितांत गरजेचे आहे.

महोदय, महाराष्ट्रात सन 2002 पासून अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींच्या मुलांसाठी खाजगी शिक्षण संस्थांनी 288 शाळा सुरु केल्या आहेत. त्या शाळांचे मूल्यांकन झालेले आहे. परंतु या शाळांची यादी घोषित करुन त्यांना पुरेसा निधी देण्याचे काम झाले नाही. हे काम लवकरात लवकर करण्यात यावे. परंतु या बाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोठेही उल्लेख नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो.

महोदय, स्वयं-अर्थसहाय्यित शाळांबाबतचा कायदा मंजूर करुन त्या बाबत प्रस्ताव मागविण्यात आलेले आहेत. या नुसार मागेल त्याला मागेल तेथे शाळा, देण्यात येईल असे जाहीर करण्यात आलेले आहे. परंतु यामुळे आज अस्तित्वात असलेल्या शाळा बंद पडतील आणि पुन्हा दयनीय अवस्थेला जाऊन पोहोचू अशी परिस्थिती निर्माण होणार आहे. या बाबत शासनाने फेरविचार करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, खाजगी औद्योगिक शिक्षण संस्थांतून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी बाहेर पडतात. परिणामी त्यांच्या बेकारीचा प्रश्न प्रचंड वाढत आहे. प्राथमिक शिक्षण सोडलेल्या आणि माध्यमिक शिक्षण घेतल्यानंतर बाहेर पडणाऱ्या विद्यार्थ्यांना कुशल रोजगार उपलब्ध करुन देणे आवश्यक



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे....

आहे. यासाठी अनेक शॉर्ट टर्म कोर्सेस आहेत. परंतु त्यांना कायम विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता दिल्यामुळे मुले तेथे प्रवेश घेऊ शकत नाहीत. त्यामुळे कृषी सहायक, नर्सिंग अशा छोट्याछोट्या कोर्सेसना अनुदानित करण्याची आवश्यकता आहे.

महोदय, 2003 पासून शाळांना वेतनेतर अनुदान दिलेले नाही. आता ते अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. परंतु जे अनुदान देण्यात येणार आहे ते अत्यल्प स्वरुपाचे आहे. त्यामुळे मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल खेद व्यक्त करुन वेतनेतर अनुदानाची रक्कम 5 टक्के नव्हे तर पूर्वीप्रमाणे 12 टक्के देण्यात यावी, अशी मागणी करतो. तसेच गेल्या 10 वर्षातील थकलेले अनुदान शाळा विकास निधीत जमा करुन ते शाळेच्या विकासासाठी वापरले पाहिजे अशी मी विनंती करतो.

महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो व वेळे अभावी माझे भाषण पूर्ण करतो.

----------

**तालिका सभापती** (श्री.मोहन जोशी) : सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 18 मार्च, 2013 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन्हा भरेल. सकाळी 10.00 ते 11.00 वाजेपर्यंत आजच्या कामकाजपत्रिकेवर विरोधी पक्षाचा म.वि.प. नियम 260 अन्वये दर्शविण्यात आलेला प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.15 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 58 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 18 मार्च, 2013 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

---------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही